

REFBK-0026869

# स्त्रीलिखित कादंबऱ्या

## प्रेरणा आणि प्रवृत्ती

डॉ. विद्या देवधर

संदर्भ
निबंध
3428
२६८६९
9/3/93

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

5 MAY 1993

25 SEP 1993

(क्र. मा. पहा)
१००००—११—८९

# स्त्री लिखित कादंबऱ्या प्रेरणा आणि प्रवृत्ती

(इ. स. १८७३ ते १९५०)

लेखिका :
डॉ. विद्या देवधर

REFBK-0026869

प्रतिमा प्रकाशन

● प्रकाशन क्र. ९६

● © डॉ. विद्या देवधर

● **प्रकाशक :**
अरुण पारगावकर
प्रतिमा प्रकाशन,
१३५९ सदाशिव पेठ, नवा विष्णू चौकाजवळ,
पुणे ४११ ०३० फोन ४३७४४४

● **मुद्रक :**
हाय लाइट प्रिन्टर्स,
२५० / ११ शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

● **अक्षरजुळणी :**
टाइपो आर्टस्
१४८१ शुक्रवार पेठ
पुणे ४११ ००२

● **मुखपृष्ठ :**
संदिप कुलकर्णी, पुणे

● **प्रथमावृत्ती : कार्तिक वद्य १३ शके १९१४,**
**२२ नोव्हेंबर १९९२**

● **मूल्य : रु. ४५ /-**

गुरुप्रमाणे मार्गदर्शक आणि
मित्राप्रमाणे सहाय्यक असणाऱ्या,
ती. तात्या ( कै. मधुकरराव महाजन )
यांस, सादर समर्पण

# अनुक्रम


१) अंतरंग / १०

२) प्रबोधनपर्व ( इ.स. १८७३ ते १९२०) / २०

३) विचारपर्व ( इ.स. १९२१ ते १९३४) / ३९

४) विकासपर्व ( इ.स. १९३५ ते १९५०) / ६५

५) क्षितीज विस्तारले / ९३

६) मागोवा / १२०

७) लेखिकांच्या सहवासात / १२९

८) लेखिकांच्या कादंबऱ्यांची सूची / १४३

९) संदर्भ ग्रंथ सूची / १४९

१०) संदर्भ नियतकालिकांची सूची / १५७

सौ. विद्या देवधर यांच्या पुस्तकास प्रास्ताविकाचे चार शब्द लिहिताना मला अतिशय आनंद होत आहे. गेली दोन दशके स्त्रियांशी संबंधित अशा प्रश्नांविषयी बऱ्याच प्रमाणात नव्याने विचार व संशोधन होत आहे. याचाच एक महत्त्वाचा परिणाम स्त्रीवादी अभ्यासक पूर्वीच्या लेखनाकडे आता एका नव्या परिप्रेक्ष्यात पाहू लागण्यात झाला आहे. अनेक दशकांपूर्वी लिहील्या गेलेल्या लेखनाचा आज नव्याने अन्वयार्थ लावण्याच्या त्यांच्या पद्धतींशी / मार्गांशी किंवा त्यांच्या निष्कषांशी कदाचित एखादा सहमद होणारही नाही. परंतू या अभ्यासकांच्या प्रयत्नांचे फलित निश्चितपणे बौद्धीक ताजेपणा आणि ज्ञानात भर घालणारे म्हणावे लागेल.

प्रस्तुत ग्रंथात सौ. विद्या देवधर यांनी इ. स. १८७३ ते १९५० या कालखंडातील स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्या स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून तपासल्या आहेत. या कालपटाची तीन भागांत त्यांनी केलेली विभागणी वेधक आहे. १८७३ ते १९२० हा कालखंड त्यांनी प्रबोधनपर्व म्हणून वर्णिला आहे. १९२१ ते १९३४ हा कालखंड विचारपर्व आणि १९३५ ते १९५० हा विकासपर्व मानला आहे. एखाद्याला या नामाभिधानांविषयी प्रश्न उत्पन्न करावेसे वाटतील. उदा. १९३५ ते १९५० या कालखंडात खरोखरीच विकास झाला का ? की हा कालखंड आश्वासनांचा होता ? या आश्वासनांची अपेक्षित प्रमाणात पूर्तता झाली का ? महत्त्वाचा मुद्दा असा की, सौ. देवधरांचे लेखन अशा स्वरुपाचे विविध प्रश्न उत्पन्न करते. कोणत्याही संशोधनपर कृतीचे मूल्यमापन केवळ तीमधून मिळणाऱ्या माहितीवरून होता कामा नये, तर ती कृती कोणते प्रश्न उत्पन्न करते यामधून व्हायला हवे. आणि या दृष्टीने पाहाता सौ. देवधर यांचे हे पुस्तक यशस्वी म्हणायला हवे.

**डॉ. सुमा चिटणीस,**
उपकुलगुरु एस. एन. डी. टी.
महिला महाविद्यालय, मुंबई ४०० ०२०

**(मूळ इंग्रजीचा भावानुवाद)**

# परिचय

## डॉ. विद्या देवधर

मुंबई विद्यापीठातून बी. ए. (मराठी) उस्मानिया विद्यापीठातून एम. ए. (मराठी)

श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यातील समाजप्रवृत्ती या विषयावर एम्. फिल.

लेखिकांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्तींचे दर्शन (१८७३ ते १९५०) या विषयावर पीएच. डी. चा प्रबंध. उस्मानिया विद्यापीठातील रा. ब. माढेकर सुवर्णपदकाची मानकरी.

वास्तव्य– हैद्राबाद. तेथील उर्दू, मराठी, हिंदी, साहित्यविषयक कार्यक्रमात सहभाग.

पंचधारा या त्रैमासिकाच्या संपादक मंडळ सदस्य. मराठी साहित्य परिषद, महाराष्ट्र मंडळ, स्त्री-सखी मंडळ यांच्या हैद्राबाद शाखेच्या कार्यकारिणीची सभासद. राष्ट्रसेविका समितीची सक्रिय कार्यकर्ती. हैद्राबात आकाशवाणीवर निवेदिका व मराठी कार्यक्रमात सहभाग.

सामाजिक, वैचारीक, संशोधनात्मक, टीकात्मक लिखाणाची आवड. पंचधारा, तरुण भारत, लोकसत्ता, स्त्री, वसंत, अनुबंध मिळून, साऱ्याजणी, हिंदी मिलाप, सियासत, इ. मराठी, हिंदी नियतकालिकांतून नियमित लेखन, दूरदर्शनसाठीही दोन मालिकांचे लेखन.

महाराष्ट्र टाइम्समध्ये बृहनमहाराष्ट्र वृव लेखन.

उस्मानिया विद्यापीठाच्या निझाम कॉलेज व वुमेन्स कॉलेज येथे गेली सात वर्षे मराठीची अर्धवेळ अध्यापिका.

१९८९ पासून कॉम्प्युटर्सना लागणारी सामग्री व इलेक्ट्रॉनिक्स सर्व्हो स्टॅबिलायझर्स व यू. पी. एस. सिस्टीम्स यांच्या विक्रीचा स्वतंत्र व्यवसाय. या क्षेत्रात मार्केटींग करणारी हैद्राबादमधील पहिली महिला.

आई सुशीला व वडील मधुकर महाजन यांच्या सामाजिक व राष्ट्रीय विचारांचा वारसा पुढे चालविण्याचा प्रयत्न.

# मनोगत

**स्त्रीलिखित कादंबऱ्या - प्रेरणा व प्रवृत्ती, (१८७३ ते १९५०)** हे माझे पहिले पुस्तक वाचकांच्या हाती देत असताना, मनामध्ये अनेकविध भावनांचा कल्लोळ उडाला आहे. पुस्तक पूर्ण झाल्याचे समाधान आहे, तसेच मनाच्या कोपऱ्यात एक रुखरुख आहे. विषयाच्या अपूर्णतेची जाणीव आहे. पण लवकरच ती पूर्ण करण्याची मनीषाही आहे. मनाला हुरहूर आहे ती माझे वडील, ति. तात्या - मधुकरराव महाजन यांच्या अनुपस्थितीची.

वाङ्मयाच्या अभ्यासकाने एकतरी अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला पाहिजे हा तात्यांचा आग्रह होता. त्यामुळे स्वत:ची पुस्तके प्रकाशित करताना त्यांनी आईलाही (सुशीला महाजन) लिहिते केले. तिचे अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रकाशित केले. माझ्या पीएच. डी. च्या प्रबंधामध्ये त्यांनी मला बहुमोल साहाय्य केले. आणि पदवी मिळाल्यावर तो प्रकाशित करण्याचा आग्रह धरला. पण तो सोहळा पाहण्यास मात्र तात्या नाहीत. आज त्यांच्या स्मृतिदिनी ग्रंथ प्रकाशित होत आहे.

पुस्तक लिहावे, अभ्यास करावा हा जसा तात्यांचा आग्रह, तसेच आपल्या जीवनव्यवहाराला सामाजिक जाणिवेचे भान पाहिजे हे सुद्धा त्यांचे तत्त्व होते. आयुष्यातील उमेदीची वीस वर्षे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केल्यानंतर त्यांनी स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. आमची आईही राष्ट्र सेविका समितीची निष्ठावान आणि नि:स्पृह अशी कार्यकर्ती. या समाजसेवक आणि रसिक अशा आईतात्यांनी आम्हा दोघी बहिणींना अतिशय विचारपूर्वक घडवले. सामाजिक बांधिलकीची जाण ठेवून जीवनाला सामोरे जाण्याइतके खंबीर बनवले. साहित्यातील रसास्वाद आणि जीवनातील सामाजिक जाण या दोन्ही संस्कारांचे मूर्त स्वरूप म्हणजे हा ग्रंथ होय.

स्त्रीजीवन आणि स्त्रियांच्या चळवळी यामध्ये मला विशेष रस असल्यामुळे स्त्रियांच्या कादंबऱ्या आणि त्यातील समाजप्रवृत्ती असे अभ्यासाचे स्वरूप मी

निश्चित केले. स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांचा शोध घेणारे हे वाङ्मयीन संशोधन तर आहेच; पण सामाजिक स्थित्यंतरे, समाजप्रवृत्ती आणि लेखिकांची सामाजिक जाणीव या दिशेनेही हे संशोधन मार्गदर्शक ठरेल.

हे पुस्तक प्रकाशित करीत असता, माझे गुरू आणि प्रबंधाचे मार्गदर्शक कै. डॉ. वसंतराव कुलकर्णी यांचा सर्वप्रथम ऋणनिर्देश करावयास हवा. अत्यंत व्यासंगी आणि बहुश्रुत अशा डॉ. वसंतरावांचे बहुमोल मार्गदर्शन मला लाभले. त्यांची मी अत्यंत ऋणी आहे. लेखिकांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्ती शोधत असताना श्रीमती मालतीबाई बेडेकर, श्रीमती कुमुदिनी रांगणेकर, कै. कमलाबाई टिळक या मान्यवर लेखिकांच्या मी अनेकवेळा भेटी घेतल्या. त्यांच्याशी चर्चा केली. ग्रंथात त्यांच्या मुलाखती समाविष्ट करण्यास त्यांनी संमती दिली, त्याबद्दल या ज्येष्ठ लेखिकांची मी अत्यंत आभारी आहे. याशिवाय अनेक नामवंत लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक यांच्याकडून मला कादंबरीचा आकृतिबंध, समाजप्रवृत्ती आणि प्रत्यक्ष सामाजिक घडामोडी याबद्दल अत्यंत उपयुक्त माहिती मिळाली. त्या सर्वांची मी मनापासून ऋणी आहे. हैदराबादमधील प्रा. विमलाबाई थत्ते, प्रा. दिनकर देशपांडे यांनी माझ्या लेखनाबद्दल उत्सुकता दाखविली आणि वेळोवेळी उपयुक्त सूचना केल्या. त्यांचे मी आभार मानते.

हा वाङ्मयीन प्रबंध असला तरी समाजप्रवृत्तींचा शोध व त्याबरोबरच कादंबरीची कलात्मकता यांचा एक विस्तृत पट त्यातून दृग्गोचर झाला आहे. त्यामुळे समाजविज्ञानाच्या कक्षेतील हा वाङ्मयीन प्रकल्प आहे. नामवंत समाजशास्त्रज्ञ आणि ना. दा. ठा. महिला विद्यापीठाच्या कुलगुरू मा. सुमा चिटणीस यांनी आपल्या अत्यंत व्यस्त अशा दिनक्रमातून वेळ काढून या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचे मान्य केले हा माझ्या आयुष्यातील अत्यंत भाग्याचा क्षण होय. त्यांची मी सदैव ऋणी राहीन.

पीएच्. डी. च्या प्रबंधाचा पसारा खूप मोठा होता. त्या संशोधनाच्या आधारावर ग्रंथ लिहिणे थोडे अवघड काम होते. त्या कामात माझी मावशी, सौ. मंजिरी ताम्हनकर हिने मला बहुमोल साहाय्य केले. माझ्या आईवडिलांकडून लेखनाचा वारसा मला मिळाला. माझे पती श्री. अजित व मुली कस्तुरी व करीश्मा यांनी मला घरामध्ये सहकार्य केले. ही सर्व माझ्या अगदी जवळची माणसं. त्यांचे आभार मानणे त्यांना रुचणार नाही, परंतु सहकार्याची नोंद तर हवीच नां !

संशोधनात्मक ग्रंथ प्रकाशित करणे हे अव्यवहारी. परंतु अवघडही काम

आहे. प्रतिमा प्रकाशनचे श्री. अरुण पारगावकर यांनी हे काम हाती घेतले व आकर्षक स्वरूपात प्रकाशित केले, त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

इ. स. १८७३ ते १९५० या कालखंडातील स्त्रीलिखित कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्ती व त्यांच्या प्रेरणा शोधण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे. १९५१ ते १९९० या कालखंडातील प्रेरणा शोधून त्यांतील सामाजिक जाणिवांची जाण करवून देण्याचे आश्वासन मात्र या निमित्ताने व्यक्त करीत आहे

**विद्या देवधर**

४/२/१३१ सुलतान बझार,
हैदराबाद.

मराठी ग्रंथ संग्रहालय शाखा (स्थल ग्रह)
3528
ग्रा. क्र. २६८६९
निबंध ७।३।९३

# अंतरंग

माणूस स्वभावत:च गोष्टीवेल्हाळ आहे. मग त्या गोष्टी काल्पनिक असोत अथवा सत्यावर आधारित असोत, दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनातील घडामोडी समजून घेण्याची त्याला उत्सुकता असते. त्या घटनांची आपल्या जीवनातील अनुभवांशी तुलना करून त्यांची वास्तव संगती माणूस लावत असतो. माणसाच्या या स्वभावाची सत्यता आपणाला पटते ती त्याच्या कथांच्या व कादंबऱ्यांच्या आवडीमधून. सर्व वाङ्मयप्रकारांमध्ये कादंबरी हा एक वाचकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. मराठी कादंबरीचा जन्म अगदी अलीकडील असला तरी गेल्या सव्वाशे वर्षांतील कादंबऱ्यांमधील गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ लक्षणीय आहे. आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भातही वाङ्मयाच्या इतिहासात कादंबरीचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. कादंबरीची लोकप्रियता कशी वाढत गेली, याबद्दल एक वाचक आणि एक अभ्यासक म्हणून माझ्या मनात उत्सुकता निर्माण झाली आणि मी कादंबऱ्यांच्या अभ्यासाकडे वळले.

समाजप्रबोधन हे एकमेव उद्दिष्ट एकेकाळी लेखकांसमोर होते. १९व्या शतकाच्या प्रारंभापासून आधुनिक मराठी वाङ्मयसेवकांपुढे समाजपरिवर्तन हेच ध्येय होते. वास्तवजीवनाचे चित्रण करून, सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, समाजाची जागृती करणे, आणि सामाजिक समस्यांची सोडवणूक करणे हे वाङ्मयाचे कार्य मानले जात असे. साहजिकच वाङ्मयाचे लेखनही त्या अनुषंगाने होत असे. या कालखंडात स्त्रीजीवनसुधारणा हे समाजसुधारणेचे महत्त्वाचे अंग असल्याचे लक्षात येते.त्यादृष्टीने प्रत्यक्ष कार्य करणारे महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, पंडिता रमाबाई आणि महर्षी धोंडो केशव कर्वे व बाया(आनंदीबाई) कर्वे इ. समाजसुधारक १९व्या शतकातच झाले. त्याचप्रमाणे स्त्रीजीवनाकडे चिकित्सक दृष्टीने पाहणारे कादंबरीकार व नाटककार या कालखंडात अनेक झाले. इ. स. १८४२ मध्ये म. ज्योतिबा फुले यांनी पहिली मुलींची शाळा काढली. त्यानंतर काही स्त्रिया शिकू लागल्या, आपले विचार

व्यक्त करू लागल्या, लिहू लागल्या. या वातावरणाच्या, विचारांच्या संस्कारातून स्त्रियांनी कादंबरीलेखनाला सुरुवात केली. सामाजिक परिस्थितीचा, समाजप्रवृत्तींचा लेखकाच्या विचारांवर व लेखनावर फार मोठा परिणाम होतो असे दिसते. म्हणून १८७५ ते १९५० या कालखंडातील कादंबऱ्यांचा त्यातही स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्याचे ठरवले. कारण या काळातील सामाजिक परिवर्तनामध्ये स्त्रीजीवनसुधारणा ही महत्त्वाची घटना आहे. स्त्रीशिक्षण या एकाच सुधारणेमधून स्त्रियांचे अर्थार्जन, विभक्त कुटुंबपध्दती, स्त्रीपुरुष समानतेचा आग्रह, अशा अनेक नवीन प्रवृत्ती निर्माण झाल्या. त्यांचा स्त्रीजीवनावर फार मोठा परिणाम होत गेला. स्त्रीच्या संबंधातील या घटनांकडे, विचारप्रवाहांकडे स्त्रिया कशाप्रकारे पाहात होत्या हे पाहणे अतिशय महत्त्वाचे आहे. मराठीतील पहिली स्त्रीलिखित कादंबरी १८७३ मध्ये प्रकाशित झाली. त्यापासून पुढे स्त्रियांचे कादंबरीलेखन वाढतच गेले. १८७३ ते १९५० पर्यंतच्या या कादंबऱ्यांतून तत्कालीन समाजप्रवृत्ती दिसतात का, आपल्या जीवनातील या घडामोडींकडे पाहण्याचा, नवशिक्षित स्त्रीचा, पुरुषांपेक्षा काही स्वतंत्र दृष्टिकोन होता का, स्त्रीचे आयुष्य ढवळून टाकणाऱ्या सुधारणांचे व सुधारक विचारांचे स्वागत स्त्रीने कशा प्रकारे केले, असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. त्यासाठी समाजात घडत गेलेले बदल व स्त्रियांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्ती यांचा समांतरपणे अभ्यास केला.

• या सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या लेखकांनाही मुळातून ओढ होती, ती मानवी जीवनातील मनोव्यापारांची. जातिवंत लेखकांचा माणसांकडे, घटनांकडे व समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजशास्त्रज्ञाच्या किंवा नीतिशास्त्रज्ञाच्या दृष्टिकोनाहून भिन्न असतो. समाज आणि मनुष्यस्वभाव यांच्या नातेसंबंधांचा तोल कादंबरीत राखला जाणे आवश्यक असते. म्हणून एक वाङ्मयीन कलाकृती या दृष्टीने स्त्रियांच्या कादंबऱ्यांतील कलात्मकतेचाही येथे विचार केला. माणसाच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न वाङ्मयातून होत असतो. माणसाच्या कृतीवर व विचारांवर, सामाजिक विचारप्रवाहांचे व प्रवृत्तींचे संस्कार झालेले असतात. सामाजिक परिस्थितीच्या आणि समाजप्रवृत्तींच्या अभ्यासामुळे, वाङ्मयीन कलाकृतीतील व्यक्तिरेखांच्या व्यवहाराचे आकलन अधिक स्पष्टपणे होते. त्यामुळे वाङ्मयीन समीक्षा परिपूर्ण होते. समाजप्रवृत्तींचा अंत:स्रोत सर्व प्रकारच्या सामाजिक स्थित्यंतरामधून, ललितवाङ्मयामधून आणि मानवी मनामधून अखंड वाहात असतो. सामाजिक परिस्थिती आणि

मनुष्यस्वभाव यांच्या परस्परावलंबी संयोगातून समाजप्रवृत्ती तयार होतात. या समाजप्रवृत्तींचा संस्कार घेऊन पुन्हा लेखकाचे मन घडत असते. त्यामुळे साहजिकच त्या समाजप्रवृत्तींचे किंवा विविध वृत्तीच्या माणसांचे दर्शन वाङ्मयामधून होते. त्यामुळे त्या वाङ्मयालाही वास्तवतेचे अधिष्ठान मिळते आणि कलाकृतीतील वाङ्मयीन मूल्ये कायम राखून, समाजप्रवृत्तींमधून सहजपणे समाजदर्शन होते. सारांश, समाजप्रवृत्तींचा अभ्यास हे वाङ्मयीन अभ्यासाचे एक महत्त्वाचे अंग आहे.)

लेखिकांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्तींचा अभ्यास करण्यापूर्वी, समाजप्रवृत्ती म्हणजे काय, त्या कशा निर्माण होतात, त्यांचा जनजीवनावर काय परिणाम होतो ते पाहणे आवश्यक आहे.

'समाजप्रवृत्ती' हा नेहमी वापरला जाणारा शब्द असूनही त्याची व्याख्या शब्दकोशात आढळत नाही. 'प्रवृत्ती' म्हणजे आध्यात्मिक अर्थाने वापरले जाणारे निवृत्ती, प्रवृत्ती हे शब्द कोशात येतात. पण रूढार्थाने आपण ज्याला जीवनपध्दती किंवा विचारधारा म्हणतो, त्याअर्थाने प्रवृत्तीची व्याख्या कुठेही उपलब्ध नाही. वाङ्मयातील समाजप्रवृत्तींचा समीक्षेच्या दृष्टिकोनातून अभ्यास मराठीमध्ये अपवादाने झाला आहे.।

'समाज' या संकल्पनेचा विचार करीत असता, संपूर्ण मानवजातीचा विचार आपण करू शकत नाही. कारण असा एकसंध समाज अस्तित्वात नाही. अखिल जगताचा विचार करताना पौर्वात्य समाज आणि पाश्चात्त्य समाज असे भाग अपरिहार्यपणे होतात. पौर्वात्य समाज अधिक आध्यात्मिक प्रवृत्तीचा आहे, तर पाश्चात्त्य समाज भौतिकवादी आहे अशी एक रूढ समजूत आहे. केवळ भारतीय समाजाचा विचार करावयाचा ठरवला तरी त्या समाजाचे भिन्न भिन्न घटक कल्पून विचार करावा लागतो. प्रांत, जाती, धर्म, आर्थिक स्थिती, भाषा अशा अनेक गोष्टींमधून प्रवृत्तींचा वेगळेपणा जाणवतो. पंजाबी लोक लढवय्ये असतात, बंगाली भावनाप्रधान, मारवाडी कंजूष असतात, गुजराथी लोक व्यापारी प्रवृत्तीचे असतात, अशी भिन्न मनोवृत्ती त्या त्या प्रांतामागे सांगितली जाते. भारतातील जातिनिष्ठ समाजात, प्रत्येक जातीची भिन्न भिन्न वैशिष्टचे आहेत. एवढेच नव्हे, तर त्या जातींमधील पोटजातीसुद्धा आपापले वेगळेपण सांभाळून आहेत. परिस्थितीशी झगडून कोकणस्थांना आर्थिक स्थैर्य मिळवावे लागते म्हणून ते काटकसरी, व्यवहारी व चुटपुटीत असतात, तर देशावर सुबत्ता असल्यामुळे देशस्थ दिलदार पण संथपणे काम करणारे असतात.

देशकालपरिस्थितीप्रमाणे समाजप्रवृत्ती बदलतात.

समाजप्रवृत्ती या विषयाची व्याख्या थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल -' समाजातील एका विशिष्ट भागात, मग तो विभाग, जाती, धर्म, प्रदेश आदी कोणत्याही कारणाने अलग म्हणून मानला गेला असला तरी, त्यातील बहुसंख्य व्यक्तींमध्ये प्रकर्षाने आढळणारा जीवन आणि आचरणविषयक विचार म्हणजे त्या समाजाची सर्वसमावेशक प्रवृत्ती असते तिलाच ' समाजप्रवृत्ती ' असे म्हणतात.

काही समाजप्रवृत्ती सार्वत्रिक असतात, तर काही विशिष्ट परिस्थितीत निर्माण होणाऱ्या तात्कालिक प्रवृत्ती असतात. समाजप्रवृत्ती म्हणजे विशिष्ट समाजात रूढ असलेली विचारधारा होय. या समाजप्रवृत्ती कशा निर्माण होतात ते पाहणेही आवश्यक आहे.

**समाजप्रवृत्तीची निर्मिती :** समाजातील बहुसंख्य लोकांच्या समान स्वभाववैशिष्ट्यांमुळे समाजप्रवृत्ती निर्माण होतात. माणसांचे हे स्वभाव जीवननिष्ठा, आचारपद्धती, सामाजिक आंतरक्रिया (Social interaction) यामुळे निर्माण होतात. सामाजिक आंतरक्रियांमधून समाजात स्थिरावलेल्या काही सार्वत्रिक प्रवृत्ती असतात. उदा., माणसा-माणसात जन्मावरून किंवा आर्थिक स्थितीवरून उच्च-नीच भेद मानण्याची प्रवृत्ती सर्वत्र आणि सर्वकाल दिसते. त्याचे प्रकटीकरण जातिभेद किंवा वर्गभेद यासारख्या समस्यांमधून झालेले दिसते. यालाच आपण सार्वत्रिक समाजप्रवृत्ती म्हणत असतो. तसेच परमेश्वर प्राप्तीचा ध्यास मानवाला कायमचा लागलेला आहे. त्यामुळे त्यातून उत्पन्न झालेल्या श्रद्धा, अंधविश्वास या प्रवृत्ती सार्वत्रिक आहेत. त्यापैकी काही प्रवृत्तींमधील प्रथा, परंपरा बदलत जातात. परंपरा म्हणजे आचाराच्या व विचारांच्या रुळलेल्या सवयी, त्यामध्ये काही चांगल्या तर काही वाईट, काही जिवंत तर काही कालबाह्य असतात. परिस्थिती या वृत्तींवर प्रहार करते तेव्हा काही अंशी परंपरा बदलल्याचे आपणास दिसते. उदाहरणार्थ, कुटुंबसंस्था किंवा विवाहसंस्थेमधील एकत्र कुटुंबपद्धती. सुधारक विचारांमुळे विधवाजीवन, बालविवाह या परंपरा बदलल्या. विधवाविवाह, प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह या परंपरांना अनुकूल समाजप्रवृत्ती निर्माण झाल्या. काही वेळा मात्र परंपरा बदलल्या तरी मूळ प्रवृत्ती बदलत नाहीत. उच्चनीच भेद मानण्याची प्रवृत्ती आपल्याला जातीयतेमध्ये दिसते आणि वर्गभेदामध्येही आढळते.

मानवी स्वभावामुळे निर्माण झालेल्या विचारपरंपरेला ' वृत्ती ' असे

म्हणतात. या वृत्तीचा कालखंड आणि विस्तारक्षेत्र मर्यादित असते. उदा. – कूपमंडूक वृत्ती, कष्टाळू वृत्ती, प्रतिष्ठा जोपासण्याची वृत्ती, कातडीबचावू वृत्ती, या सर्वांचाही समाजजीवनावर परिणाम होतच असतो. व्यक्तीच्या जीवनात केवळ वैयक्तिक धनार्जन आणि त्याकरिताच सर्व जीवनाची धडपड तर्कशुद्ध मानली जाते. पण ही धनलालसा कधी हुंडा, लाच, इ. अयोग्य मार्गांनी पूर्ण केली जाते. हुंडा देणे हे आर्थिकदृष्ट्या काही लोकांना वैयक्तिक पातळीवर शक्य असेल, पण हा व्यवहार बहुसंख्यलोक पाळत असल्याने हुंडापद्धतीच्या मर्यादा विस्तारल्या. हुंडा द्यावा किंवा नाही हा पर्यायही उरला नाही. स्वार्थी स्वभावाचे हे समाजप्रवृत्तीमध्येच रूपांतर झाले. त्यामध्ये मुलीच्या वडिलांनी पैसे देणे हे कर्तव्य व मुलाच्या वडिलांनी पैसे मागणे हा हक्क बनला आहे. अनेक लोकांच्या स्वार्थी वृत्तीमधून ही स्वभावजन्य प्रवृत्ती तयार झाली व आज हुंडाप्रवृत्ती आपली मुळे पक्की रुजवून बसली आहे.

समाजप्रवृत्तींच्या निर्मितीच्या संदर्भात आणखी काही प्रकारच्या परिस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक ठरेल. समाजप्रवृत्ती या परिस्थितिसापेक्ष असतात. बाह्य परिस्थितीप्रमाणे त्या बदलत जातात.

१. अर्थव्यवस्थेनुरूप समाजप्रवृत्ती बदलते. माणसाच्या गरजा, अपेक्षा आणि शक्यता यांच्याप्रमाणे प्रवृत्ती तयार होतात. उदा., श्रीमंत लोकांची प्रवृत्ती समाजाशी फटकून वागण्याची असते. पैशाने सर्व गोष्टी विकत घेता येतात अशी त्यांची भावना असते. याउलट, गरीब समाजात सर्वांना धरून राहण्याची प्रवृत्ती आढळते. साम्यवादी विचारानुसार आर्थिक संबंधांतूनच समाजधारणा झाली, कुटुंबसंस्था टिकून आहे, असे मानले जाते. म्हणूनच समाजप्रवृत्तींचे नियंत्रण आर्थिक परिस्थितीप्रमाणेच होत असते असा साम्यवादी लोकांना विश्वास आहे.

२. राजकीय परिस्थितीमुळे समाजप्रवृत्ती बदलते. राजकीय ताणतणावांतून महायुद्धे निर्माण झाली. त्याचे संपूर्ण समाजावर दूरगामी परिणाम झाले. उदाहरणार्थ, युरोपातील पुरुष युद्धात गुंतल्यानंतर तेथील स्त्रिया अधिक कार्यक्षम बनल्या. त्यांच्यामध्ये अर्थार्जनाची प्रवृत्ती वाढीस लागली. अणुस्फोटानंतर आयुष्याचे क्षणभंगुरत्व माणसाला पटल्यामुळे माणूस अधिक आत्मकेंद्री व स्वार्थी प्रवृत्तीचा बनला.

३. समाजातील लोकोत्तर व्यक्तिरेखांच्या विचारप्रणालीचा समाजप्रवृत्तींवर जबरदस्त प्रभाव असतो. उदाहरणार्थ, लोकमान्य टिळक असतानाच आगरकरांनी

स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, यासंबंधी सुधारणावादी दृष्टिकोन मांडला होता. मात्र टिळकांनी समाजसुधारणेपेक्षा राजकारणावर लक्ष केंद्रित केले, त्यामुळे त्याकाळात सुधारणावादी प्रवृत्तींचा प्रभाव दिसत नव्हता. लो.टिळकांच्या मृत्यूनंतर टिळकांच्या परंपरावादी दृष्टिकोनाचा प्रभाव कमी झाला आणि सुधारणावादी प्रवृत्ती निर्माण झाल्या.

४. लोकमान्य पुढाऱ्यांप्रमाणेच समाजप्रवृत्तींना नवी दिशा देण्याचे सामर्थ्य काही जबरदस्त घटनांमध्ये असते. पेशवाई नष्ट झाली आणि महाराष्ट्रात इंग्रजी अंमल सुरू झाला. ही घटना सामाजिकदृष्ट्या इष्ट मानली जाते. कारण पाश्चात्त्य संस्कृती आणि शिक्षणाच्या प्रभावामुळे नवीन समाजप्रवृत्ती निर्माण झाल्या.

**समाजप्रवृत्ती आणि समाजपरिवर्तनाचा परस्परसंबंध :** समाजप्रवृत्तींच्या निर्मितीची कारणे पाहिल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, ही कारणे समाजपरिवर्तनाच्या कारणांशी निगडित आहेत. समाजपरिवर्तनालाही दृष्टिकोनातील बदल, व्यक्तींच्या भूमिकेतील बदल, वैज्ञानिक शोध या गोष्टी कारणीभूत होतात. समाजशास्त्राच्या क्षेत्रात प्रवृत्ती व परिवर्तन हे परस्परांशी संलग्न असतात. सामान्यत: समाजप्रवृत्तींमुळे सामाजिक परिवर्तन घडते. समाजप्रवृत्ती या टिकतात किंवा नाहीशा होतात. मात्र समाजपरिवर्तनाची प्रक्रिया अनेक काळपर्यंत चालू राहते, तसेच तिचे परिणाम दूरगामी असतात. 'Social trends indicate social changes'. ट्रेंड्स् म्हणजेच आपण त्यांना समाजप्रवृत्ती म्हटले आहे. हे ट्रेंड्स् समाजातील उच्चवर्णीय निर्माण करतात किंवा नवीन संस्कृतीच्या परिणामातून निर्माण होतात. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावामुळे अनेक समाजप्रवृत्ती निर्माण झाल्या, तसेच फार मोठे समाजपरिवर्तन घडले.

सामाजिक परिवर्तन अनेक समाजप्रवृत्तींच्या सामूहिक परिणामातून घडते. त्याचप्रमाणे समाजपरिवर्तनामधून अनेक समाजप्रवृत्ती नव्याने निर्माण होतात. बालविवाह, विधवाजीवन यांच्या विरुद्ध जनजागरण झाले, तेव्हाच स्त्रीशिक्षणाला प्रारंभ होऊ लागला होता. स्त्रीशिक्षण हे तत्कालीन समाजजीवनाला ढवळून टाकणारे सामाजिक परिवर्तन होते. स्त्रीसंबंधातील सहानुभूतीच्या प्रवृत्तींमधून पुढे अनेक प्रवृत्ती निर्माण झालेल्या दिसतात. स्त्रियांचे अर्थार्जन, विभक्त कुटुंबपद्धती, स्त्रीपुरुष समानता या घटनांना अनुकूल प्रवृत्ती 'स्त्रीशिक्षण' या समाजपरिवर्तनामधूनच निर्माण झालेल्या आहेत. अशा रीतीने समाजप्रवृत्तींमधून सामाजिक बदल घडताना, त्या बदलामधून नवीन प्रवृत्ती निर्माण होण्याचे चक्र

सतत चालू असते.

मराठी कादंबऱ्यांतून या समाजप्रवृत्ती विविध स्वरूपात आढळतात. साहित्य आणि समाजजीवन यांचे संबंध परस्पराश्रयी असतात. साहित्य हे समाजातील संस्कार घेऊन निर्माण होते, तसेच समाजप्रवृत्तींचे दर्शनही घडवते. समाजजीवन रंगविताना उपदेशाचा अट्टाहास नसावा असा कलात्मक दृष्टिकोन आज स्वीकारला जातो. परंतु गेल्या शतकामध्ये साहित्य समाजचिंतनासाठीच मानले जात असे. कलाकृतीचा हेतू कोणताही असला तरी वाचकाच्या मनावर त्याचा काय परिणाम होतो इकडे लक्ष देण्याची विचारवंतांची प्रवृत्ती होती. समाजाच्या भावी उत्कर्षाशी नाते सांगणारी भद्रमुद्रा साहित्यातून उमटली पाहिजे अशी समीक्षकांची अपेक्षा होती. अशा आग्रही वाड़मयामधून समाजप्रवृत्तींचे दर्शन अधिक समर्थपणे घडणे स्वाभाविक आहे. लेखकांनी पुरस्कारलेली विचारधाराही पुढे समाजप्रवृत्ती बनते. कारण वाङ्मयाचा समाजमनावर फार मोठा प्रभाव असतो हे एक चिरंतन सत्य आहे. उदा., काऊ-चिऊच्या, इसापच्या गोष्टी ऐकत अनेक पिढ्या लहानाच्या मोठ्या झाल्या. लबाड कोल्हा, मूर्ख गाढव या प्रतिमा जनमानसात पक्कया रूढ झाल्या. प्रत्यक्षात त्या प्राण्यांचे स्वभाव शोधण्याचा सामान्यजन प्रयत्नही करीत नाहीत. या गोष्टी सतत कानावर पडल्यामुळे ते स्वभाव गृहित धरले गेले. समाजपरिवर्तन केवळ साहित्यामुळेच होत नसले तरीही समाजप्रवृत्तीला नवी दिशा देण्याचे ते एक प्रभावी माध्यम आहे. अव्वल इंग्रजीकाळापासून २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळापर्यंत निर्माण झालेले साहित्य हे बव्हंशी बोधवादीच होते. सामाजिक परिस्थितीचे वास्तवरूप त्यामध्ये स्पष्ट करून त्या पार्श्वभूमीवर नवा प्रागतिक विचार मांडला गेला. साहजिकच तत्कालीन समाजप्रवृत्तींचे दर्शन या साहित्यात प्रकर्षाने घडते. कादंबरीलेखनकाळाच्या प्रारंभापासून १९५० पर्यंतच्या कालखंडाचा विचार त्यादृष्टीने महत्त्वाचा ठरतो. स्त्रीसुधारणेच्या प्रेरणेतून जेव्हा बहुसंख्य मराठी साहित्य प्रकाशित होत होते, तेव्हा लेखिकांनी यासंबंधात कोणते प्रयत्न केले, हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर इ. लेखकांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्तींपेक्षा काही भिन्न प्रवृत्ती स्त्रियांच्या अंत:करणाला भिडल्या होत्या का, हे महत्त्वाचे प्रश्न मनात निर्माण झाले. त्यासाठी, प्रत्यक्ष समाजात घडत गेलेले बदल, त्याअनुषंगाने समाजात निर्माण झालेल्या आणि लेखिकांच्या कादंबऱ्यात आढळणाऱ्या समाजप्रवृत्ती यांचा समांतरपणे विचार केला. काळानुसार काही प्रवृत्ती झपाट्याने बदलतात तर

काही ठिकाणी काळावरही समाजप्रवृत्तींचे वर्चस्व राहते. एकंदरीत समाजप्रवृत्ती आणि कालखंड यांचा अन्योन्य संबंध आपणास येथे दिसतो. प्रस्तुत पुस्तकात १८७३ ते १९५० पर्यंत प्रकाशित झालेल्या स्त्रियांच्या प्रत्येक कांदबरीचा विचार केला आहे. कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्तींतील ठसठशीत बदल लक्षात घेऊन त्याप्रमाणे तीन खंडांमध्ये या कादंबऱ्यांची विभागणी केली आहे.

१८७३ मध्ये पहिली स्त्रीलिखित कादंबरी 'चंद्रप्रभाविरहवर्णन' ही प्रकाशित झाली. तेथपासून १९२० पर्यंतच्या कालखंडातील विचारवंतांचे चिंतन समाजाभिमुख होते. महात्मा फुले यांनी दलित व स्त्रिया यांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्यक्ष प्रयत्न केले. तत्कालीन निबंध-वाङ्मयामधून राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा या दोन ध्येयांचा पाठपुरावा केलेला आढळतो. गोपाळराव आगरकर व लोकमान टिळक यांचा 'आधी सामाजिक सुधारणा का राजकीय सुधारणा' हा वाद गेल्या शतकाच्या अखेरीस विकोपाला गेला होता. प्रखर राष्ट्रवादाचे जनसामान्यांना अधिक आकर्षण वाटले तरी स्त्रीशिक्षण, अंधश्रद्धानिर्मूलन आणि समानता यासबंधात सुधारकांचे प्रयत्न सातत्याने चालू होते. त्याचे दृष्य परिणाम मात्र १९२० नंतरच दिसतात. सुधारणेच्या दिशेने वैचारिक मंथन व लोकजागृती करण्याचे काम विचारवंतांबरोबर कादंबरीकार हरिभाऊ आपटे, नाटककार गो. ब. देवल यासारख्या साहित्यिकांनीही केले. या काळातील नवशिक्षित स्त्रियांना शिक्षणाची अत्यंत तळमळ होती. सुधारक पुरुषांचेच विचार स्त्रिया आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त करू लागल्या. १९२० पर्यंत लेखिकांच्या नऊ कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. सर्व समाजाला नवीन विचारांची बैठक या काळाने दिली, म्हणून त्याला 'प्रबोधनपर्व' असे म्हटले आहे.

स्त्रीशिक्षणाला अनुकूल प्रवृत्ती हळूहळू निर्माण होऊ लागली. स्त्रीकडे माणुसकीच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे या आगरकरांच्या मताचा प्रभाव १९२० नंतर दिसू लागला. लेखिकांच्या कादंबऱ्यांचा विचार करू लागल्यावर १९२१ मधील यशोदाबाई भट यांची 'मुलांचे बंड' ही कादंबरी तत्पूर्वीच्या कादंबऱ्यांपेक्षा स्वतःच्या वेगळेपणाने उठून दिसते. समाजातील धार्मिक रूढी आणि बुवाबाजीला शरण जाणारी समाजप्रवृत्ती मागील काळाप्रमाणे या 'विचारपर्वांत दिसत असली तरीही विधवांकडे किंबहुना स्त्रीजातीकडे पाहण्याची प्रवृत्ती बदलली पाहिजे असा आग्रह स्त्रीलिखित कादंबरीत प्रथमच आढळतो तो 'मुलांचे बंड' मध्ये! लेखिकांची वैचारिकदृष्ट्या नव्या युगाकडे वाटचाल

सुरू झालेली दिसते. त्यानुसार १९२१ पासून विचारपर्वास सुरुवात होते. धर्मसंबंधातील रूढी, जातीयता याबद्दलचा डोळस दृष्टिकोन या काळातील कादंबऱ्यांतून आढळतो. स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य याबद्दल लेखिकांनी स्वतंत्रपणे काही विचार मांडले. स्त्रीचा आई म्हणून गौरव आपल्याकडे अनेकदा झाला आहे. पण मातृत्व ही स्त्रीची सहजप्रवृत्ती आहे आणि तिची ती शारीरिक व मानसिक गरज आहे हा विचार मराठी मनाला कधीच शिवला नव्हता. कोणाही विचारवंताने, मनोवैज्ञानिकाने किंवा समाजशास्त्रज्ञाने आजपर्यंत माणूस म्हणून स्त्रीमनाचा विचार केला नव्हता. मराठी कादंबरीतून एका स्त्रीने, परित्यक्तेची मातृत्वाची ओढ धीटपणे समाजापुढे मांडली. अशी स्त्री समाजात तेव्हा सर्रास दिसत नव्हती, तरी या चित्रणातील स्त्रीची गरज अवास्तव नव्हती. स्त्रीच्या मनाचा, शरीरधर्माचा पूर्ण विचार करून विभावरीबाईंनी 'हिंदोळ्यावर' मध्ये अचला रंगवली. मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण अशी ही कादंबरी, समाजप्रवृत्तींना ढवळून टाकणारी होती. विचारपर्वातील नव्या युगाची वाटचाल या कादंबरीपर्यंत चांगलीच रुंदावली.

लेखिकांच्या विचारांची नवी दिशा स्पष्ट करणाऱ्या 'हिंदोळ्यावर' मधील विचार पुढील कादंबरीकार स्त्रियांना कितपत पेलला, तसेच त्या नायिकेला ज्या समाजप्रवृत्तींशी संघर्ष करावा लागला, त्या प्रवृत्ती कालांतराने बदलत गेल्या का, लेखिकांच्या कादंबऱ्यांतून बदलत्या समाजजीवनाचे दर्शन कोणत्या मर्यादेपर्यंत घडते, या सर्वांचा शोध घेणे हे "विकासपर्वाचे" उद्दिष्ट आहे. त्याची कालमर्यादा १९५० पर्यंतची आहे.

मराठी कादंबरी वाङ्मयातील महत्त्वपूर्ण कादंबरी १९५० साली प्रसिद्ध झाली, ती म्हणजे विभावरी शिरूरकर ऊर्फ मालतीबाई बेडेकर यांची 'बळी' होय. त्यापूर्वीच्या कादंबऱ्यांतून मध्यमवर्गीय समाजप्रवृत्तींचे दर्शन घडत होते. शांता शेळके व सरोजिनी बाबर यांच्या कादंबऱ्यांना बहुजनसमाजजीवनाची पार्श्वभूमी होती. 'बळी'मधून मराठी साहित्यात प्रथमच दलित समाजाच्या व्यथा, वेदना सुशिक्षित समाजापुढे आल्या. दलित वाङ्मयाने स्वतःची वेगळी चूल मांडलीही नव्हती त्यावेळी एका दलितेतर स्त्रीने मांग-गारुडी समाजातील आबाची सुशिक्षितांना ओळख करून दिली. लेखिकांच्या अनुभवविश्वाने मध्यमवर्गाच्या मर्यादा ओलांडल्या याची साक्ष 'बळी' त पटते. यामुळे लेखिकांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणाऱ्या समाजप्रवृत्तींनी विकासाचा एक नवा टप्पा गाठला.

'बळी' ही कादंबरी सर्वार्थाने परिवर्तनाच्या नव्या खुणा जपणारी ठरली. तेथेच मी प्रबंधापुरता स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास संपवला आहे. परंतु मराठी साहित्याच्या दृष्टीने हा अभ्यास १९९० पर्यंत पूर्ण होणे आवश्यक आहे. १९५० नंतर स्वतंत्र भारताचे नवे पर्व सुरू झाले. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात फार मोठी स्थित्यंतरे झाली. शिक्षणामुळे स्त्रीचे कार्यक्षेत्र विस्तारले, पण घर-संसार या संबंधातील जबाबदाऱ्या संपल्या नाहीत. उलट विभक्त कुटुंबामुळे, नोकरीमुळे त्या अधिकच वाढल्या. स्वातंत्र्याचे ध्येय संपले. परंतु राजकारणातील भ्रष्टाचार, हा राष्ट्रीय प्रश्न बनला आहे. स्वातंत्र्यानंतर सुमारे ६०० कादंबऱ्या स्त्रियांनी लिहिल्या आहेत. वर्षाला आठ-दहा कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखिकांची आणि त्यांच्या कादंबरीची दखल घेणे हे मोठे आव्हान आहे. त्याचबरोबर समाजसुधारणा हे आपले कर्तव्य मानून लिहिण्याची प्रवृत्ती आता कमी झाली आहे. अशा वेळी स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांची कलात्मकता आणि सामाजिकता यांचा सविस्तर अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण कुटुंबव्यवस्था व नैतिक मूल्ये ढासळत असताना, शिक्षणाबरोबर नवे प्रश्न उभे राहिले असताना, स्वातंत्र्याबरोबर स्त्रीची सुरक्षितता अजूनही धोक्यात असताना, एक जबाबदार नागरिक म्हणून स्त्री या सर्व प्रश्नांकडे कशी पाहात आहे, स्त्रीचे संवेदनशील मन तळागाळातल्या, अशिक्षित, खेड्यातील स्त्रीच्या समस्यांचा वेध कसा घेत आहे हे पाहणे फार महत्त्वाचे आहे. तथापि पुस्तकाला पृष्ठमर्यादांचे भान ठेवणेही आवश्यक आहे. १९५० नंतर बदललेल्या आमच्या पिढीला घडविणाऱ्या या कालखंडातील लेखिकांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास मी सुरू केला आहे व तो पुढील पुस्तकात स्वतंत्रपणे सादर करावा अशी माझी इच्छा आहे.

१८७३ ते १९५० असा विस्तृत कालखंड आपल्यासमोर आहे. कलात्मक-दृष्ट्या जुन्या लेखिकांच्या कादंबऱ्या आजच्या वाङ्मयीन निकषांवर काहीशा निकृष्ट ठरल्या तरी कादंबरीच्या विकासाचा एक विस्तृत पट त्यामधून आपल्यासमोर उलगडला जातो. स्त्रीजीवनात होणारी स्थित्यंतरे, तत्संबंधीच्या स्त्रियांच्या प्रतिक्रिया याची जाण तत्कालीन कादंबऱ्यांतून व्यक्त झाली आहे. स्त्रीने रंगविलेले नायिकेचे भावजीवन, तिच्या वैयक्तिक अनुभवातून उमललेले असते. स्त्रीसुधारणेच्या अंगाने लिहिल्या जाणाऱ्या एंकदर मराठी वाङ्मयात; स्त्रियांच्या कादंबरीचा वेगळेपणा अगदी प्रारंभापासून म्हणजे प्रबोधनपर्वापासूनच लक्षात येतो.

● ● ●

# प्रबोधनपर्व (१८७३-१९२०)

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून भारतातील राजकीय आणि सांस्कृतिक जीवन बदलत गेले. इंग्रजी आक्रमणानंतर नव्या विचारांशी आणि विज्ञानाशी आपला संबंध आला आणि परिवर्तनाची प्रक्रियाही सुरू झाली. महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' या नावाने पहिले वृत्तपत्र सुरू केले. नियतकालिकांच्या प्रारंभापासूनच 'लोकशिक्षण' हा त्यामागील हेतू असल्याचे संपादकांनी वारंवार स्पष्ट केले आहे. बाळशास्त्रींनंतर समाजसुधारक पंडितांची एक परंपराच महाराष्ट्रात निर्माण झाली. व्यक्तीला उच्चार, विचार व आचाराचे स्वातंत्र्य असावे, व्यक्तीची योग्यता तिच्या जन्मावरून नव्हे, तर गुणांवरून ठरवावी, स्त्री-पुरुषांत समानता असावी, स्त्रियांना पुरुषांप्रमाणे शिक्षण मिळावे, बालविवाह, पुनर्विवाहबंदी या रूढी नष्ट व्हाव्यात यासारख्या मतांचा पुरस्कार प्रारंभीच्या सुधारकांनी वृत्तपत्रांमधून केला. दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, ज्योतिबा फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर या सर्व सुधारकांनी नियतकालिकांच्या माध्यमाद्वारे समाजात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानदर्शन', 'ज्ञानप्रसारक', 'पाठशालापत्रक', 'इंदुप्रकाश', 'विविधज्ञानविस्तार' इ. नियतकालिकांनी सुशिक्षित मध्यमवर्गाच्या विचारांना पुष्कळच चालना दिली. सरकारी नियम, कायदे लोकांपर्यंत पोहोचविणे आणि लोकांच्या प्रतिक्रिया सरकारच्या नजरेस आणून देणे अशी मध्यस्थाची भूमिका नियतकालिकांनी स्वीकारली होती.

इंग्रजी शिक्षणाचा प्रसार झाला आणि नोकरदारांचा एक नवा मध्यमवर्ग तयार झाला. प्रत्येक वर्णातील लोक हळूहळू आपले जातिधिष्ठित निजकर्म सोडून देऊ लागले. म. फुले यांनी दलितांच्या दुःखाला जाहीर वाचा फोडली. तरीही अस्पृश्यतानिवारणार्थ लोकजागृतीचे अधिकांश श्रेय उच्चवर्णियांकडेच जाते. न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, न्या. चंदावरकर इ. सुधारकांनी

दलितांबद्दल तळमळीचे उद्गार काढले होते. 'जातीय धर्माच्या आणि परंपरा-रक्षणाच्या भ्रामक कल्पनेमुळे आपल्या विद्या, कला आणि शास्त्रे यांची वाढ खुंटली आहे.' असे आगरकर आग्रहाने सांगत असत. लोकमान्यांनी सुरू केलेल्या सार्वजनिक शिवजयंती व गणपती उत्सवांमध्ये हजारो स्पृश्य आणि अस्पृश्य सहभाग घेऊ लागले होते. लोकजागृतीचा हा दृष्य परिणाम होता. म्हणून जातीयता निर्मूलनाच्या कार्यातील हा महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल.

इंग्रजांच्या आशीर्वादाने ख्रिस्ती धर्मप्रचाराचे काम याच काळात झपाट्याने वाढू लागले. हिंदुधर्मातील सोवळे-ओवळे, बुवा-महंत यांचे प्रस्थ वाढल्यामुळे सुशिक्षितांना ख्रिश्चनधर्माचेही आकर्षण वाटू लागले होते. हा धोका लक्षात येऊन, धर्मातील रूढी, बुद्धीच्या निकषावर तपासून पाहाव्यात असे धर्माभिमानी लोकांना वाटत होते. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या सेवाभावी वृत्तीचा आगरकरांनी गौरव केला; पण धर्मांतराला मात्र त्यांचा विरोध होता. प्रत्येक धर्मात काही ना काही वैगुण्य आहेच असे आगरकरांचे स्पष्ट मत होते. आगरकरांच्या सामाजिक सुधारणा व टिळकांच्या देशाभिमानी विचारांचा प्रभाव वाढत होता. त्यातही टिळकांच्या राजकीय नेतृत्वाने मराठी मनामध्ये कायमचे मानाचे स्थान मिळवले.

सुधारकांच्या समाजपरिवर्तनाचा केंद्रबिंदू स्त्रीजीवनसुधारणा हाच होता. इतिहासातील काही कर्तबगार स्त्रिया वगळता सर्वसामान्य स्त्रीचे जीवन शूद्रांपेक्षा फारसे वेगळे नव्हते. विधवाविवाहविरोध, बालविवाह, हुंडा यांसारख्या अनिष्ट चालींचा निषेध करून स्त्रियांस विद्या शिकविण्याचा लोकांनी जरूर विचार करावा, असे लोकहितवादींपासून सर्वच समाजसुधारकांचे म्हणणे होते. स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न म. फुल्यांपासून सातत्याने सुरू झाले. ज्योतिबांनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकवले, एवढेच नव्हे, तर १८४२ मध्ये पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली आणि सावित्रीबाई पहिल्या शिक्षिका बनल्या. त्यांना लोकांनी खूपच त्रास दिला कारण स्त्रीशिक्षणाला विरोध करण्याची प्रवृत्ती सर्व समाजात होती. तथापि, काही तुरळक घरातील पुरुषांना फुले-आगरकरांचे विचार पटले आणि त्यांनी आपल्या बायकांनी शिकावे असा आग्रह धरला. डॉ. आनंदीबाई जोशी यांना गोपाळरावांच्या हट्टामुळे लग्नानंतर माहेरी असताना शिकावे लागले, तेव्हा त्यांच्या आईने व आजीने त्यांच्या अभ्यासात अनेक अडथळे आणले. नवऱ्याच्या हौसेसाठी शिकणाऱ्या बायकांची होणारी कुचंबणा रमाबाई रानडे व काशीबाई कानिटकर यांच्या आठवणींतून

वाचावयास मिळते.

स्त्रीचे सारे आयुष्य कुटुंबाच्या चौकटीत सीमित झाले होते. या कुटुंबजीवनाला अनेक स्वभाववैशिष्ट्यांचे कंगोरे होते. सर्वसाधारण पुरुषप्रधान कुटुंबसंस्थेमध्ये आई, बायको, मुले ही पुरुषांचा राग निवारण करण्याची साधने बनली होती. स्वतंत्र विचाराच्या काही स्त्रिया एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आपणास दिसतात. परंतु त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा किंवा कुटुंबियांचा दृष्टिकोन फारसा समजूतदारपणाचा नव्हता. आंतरजातीय विवाह करणारी पंडिता रमाबाईसारखी विदुषी समाजात उपेक्षित राहिली. परदेशी जाऊन डॉक्टर झालेल्या आनंदीबाई जोशीही स्वतंत्र नव्हत्या. अशा काळात 'ताराबाई शिंदे' यांच्यासारखी तेजस्वी स्त्री 'स्त्री-पुरुष तुलना' करते, स्त्री-पुरुषांसाठी समान हक्क असावेत अशी मागणी करते, ही मोठी कौतुकाची व धाडसाची गोष्ट होती. स्त्री-पुरुषांनी बरोबरीने वागणे म्हणजे काही गुन्हा आहे अशी समाजाची प्रवृत्ती होती. घरातील मुलामुलींमध्ये तर भेदभाव केला जातच असे; पण लागोपाठ मुलींना जन्म देणारी स्त्री दोषी ठरत असे. प्रवृत्तींच्या संदर्भात महाराष्ट्रातील समाजस्थिती १९२० पर्यंत अशीच होती. त्यामध्ये अंधश्रद्धा, जातीयता यासारख्या काही सार्वत्रिक प्रवृत्ती आपणास आढळतात; तथापि स्त्रियांच्या अपमानित जीवनाला विरोध करणारी नवीन प्रवृत्तीही निर्माण होऊ लागली होती. स्त्री-जीवनाशी संबंधित असलेल्या चळवळी म्हणजे या नव्या प्रवृत्तींचे द्योतक आहेत.

स्त्रीला जागृत करून तिला विकासाच्या दिशा खुल्या करण्याची धडपड तत्कालीन सुधारकांनी केली. त्याला अनुसरूनच वाङ्मयनिर्मिती होत गेली. स्त्रीची वाचनाची ओढ वाढली आणि नियतकालिकांनी ही गरज पूर्ण केली. स्त्रियांना विद्वान करण्यासाठी ज्ञानसत्र सुरू केले ते दर्पण, प्रभाकर, विविध-ज्ञानविस्तार या नियतकालिकांनी. ज्ञानसंग्रह, ज्ञानप्रसार आणि लोकसुधारणा हे या मासिकांचे हेतू होते. स्त्रियांच्या संदर्भातील विचार, नवीन सुधारणा यासंबंधी चर्चेला या नियतकालिकांनी व्यासपीठ दिले. समाजात नव्याने येऊ पाहणाऱ्या अनेक प्रवृत्ती आणि स्त्रीजीवन याबद्दल आपलेही अनुभव मांडण्याची इच्छा शिकलेल्या स्त्रियांना होऊ लागली. त्याच वेळी समाजकार्यात भाग घेणाऱ्या रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर, पंडिता रमाबाई यासारख्या स्त्रियांचे आदर्श त्यांच्यापुढे होते. या सर्व सामाजिक परिस्थितीचे संस्कार घेऊन तत्कालीन स्त्री ललितवाङ्मयाकडे वळलेली दिसते.

समकालीन वाङ्मयात पारंपरिक काव्याच्या मर्यादा ओलांडून मराठी कवितेमधून, 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' म्हणून संदेश देणारी केशवसुतांची तुतारी निनादली ती याच कालखंडात. श्री. देवलांचे 'शारदा' नाटक एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस रंगभूमीवर आले आणि स्वतंत्र सामाजिक नाटकांचा नवा इतिहास निर्माण झाला. याच काळातील कोल्हटकर, गडकरी, खाडिलकर यांच्यावर लोकमान्य टिळकांच्या राजकीय व परंपरावादी धोरणांचा परिणाम झाला होता, असे त्यांच्या नाटकातून दिसते. कादंबरी वाङ्मयात सामाजिक कादंबरीचा मान हरिभाऊ आपटे यांच्याकडे जातो. मराठीतील पहिली कादंबरी बाबा पद्मनजींची 'यमुनापर्यटन' ही स्त्रीजीवनाविषयी असली तरी ती स्वतंत्र सामाजिक कादंबरी नव्हे. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांना वास्तवजीवनदर्शनाचा एक अनोखा स्पर्श झाला आहे. पांढरपेशा ब्राह्मणसमाजातील समाजप्रवृत्ती आणि व्यक्तिरेखा यांचे नेमके दर्शन हरिभाऊंनी घडविले. पण त्यासाठी उपदेशाची भाषा न वापरता समर्थ व्यक्तिरेखा, वास्तवकुटुंबचित्रण, आणि समाजस्थिती यांचा सुरेख संगम त्यांनी साधला. हरिभाऊंचा आदर्श काशीबाई कानिटकरांसारख्या लेखिकांसमोर होता.

**स्त्रियांच्या लेखनास प्रारंभ :** तत्कालीन कादंबरीकार स्त्रियांची लेखनप्रेरणा या प्रकारच्या वाचनामधूनच आली होती. वाचता यायला लागले, ज्ञानाची कवाडे उघडली गेली आणि स्त्रीने मागे वळून पाहिले नाही. स्त्रियांनाही पुरुषांइतकी बुद्धी व ग्रहणशक्ती आहे या आगरकरांच्या प्रतिपादनाला बायकांनी सार्थ ठरविले. एखाद्या सामाजिक प्रश्नावर स्वत: विचार करून तो मांडण्याइतका आत्मविश्वास स्त्रियांनी मिळवला आणि हातात लेखणी घेतली. अव्वल इंग्रजी काळामध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या वाङ्मयाचा शोध घेतला तर मिसेस फेरार यांचे नाव आधी घ्यावे लागेल. या फेरारबाईंनी १८३५ मध्ये मराठी भाषेत विपुल निबंधलेखन केले आहे. 'एक परभाषी स्त्री असून अतिशय सुबोध आणि घरगुती वळणाची तिची भाषा आहे' अशी 'मराठी वाङ्मयाच्या इतिहासात' नोंद आहे. १८३५ ते १८३८ पर्यंत मिसेस फेरार यांच्या नावावर सात ग्रंथ आहेत. त्यात अनेक कथासंग्रह आहेत, पण त्यांचे वाङ्मय मुख्यत: भाषांतरित आहे. आधुनिक काळात स्त्रीने स्वतंत्रपणे केलेला ललितलेखनाचा प्रयत्न म्हणजे १८७३ मध्ये प्रकाशित झालेली साळूबाई तांबवेकरांची 'चंद्रप्रभाविरहवर्णन' ही कादंबरी होय. १८४२ मध्ये सावित्रीबाई फुले यांची मुलींची शाळा निघाली व अवघ्या तीस वर्षांत कादंबरीलेखनापर्यंत स्त्रीने प्रगती

केली ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. अद्भुतकथा-कादंबऱ्यांचे आदर्श साळूबाईंसमोर होते. आपल्या कलाकृतीचे वाचकांकडून कसे स्वागत होईल याबद्दल उत्सुकता व धाकधूक तत्कालीन लेखिकांच्या मनात होती. म्हणून प्रारंभीच्या लेखिकांनी आपल्या कांदबऱ्यांत प्रथम सविस्तर अशी मनोगतेही लिहिली आहेत. त्यातून लेखिकांची सामाजिक जाणीव व्यक्त झालेली आहे. तेव्हा कादंबऱ्यातील प्रवृत्तींचा शोध घेण्यापूर्वी या मनोगतांकडे लक्ष वळवणे आवश्यक ठरते.

'पुस्तक करणारणीचा उद्देश' यामध्ये साळूबाई तांबवेकर 'चंद्रप्रभाविरहवर्णना'च्या सुरवातीलाच लिहितात– 'सांप्रतचे सुधारलेले विद्वज्जन यांचे अभिरुचीस हे पुस्तक मुळीच येणार नाही. याचे कारण उघड आहे. प्रथम एकतर मी स्त्री, दुसरे असे की पुस्तक करण्यास जी सामग्री पाहिजे ती मजजवळ मुळीच नाही.' यावरून असे दिसते की बाईंचे वाचन चांगले असावे. सांप्रतचे विद्वज्जन म्हणजे ज्ञानवंत निबंधकार, यांची बहुश्रुतता बाईंनी ओळखली आहे. आणि त्यांच्याइतके विविध विषयांचे ज्ञान आपल्याजवळ नाही याची जाणीव त्यांना आहे. एका अल्पमती स्त्रीचे लेखन या विद्वान पुरुषांना आवडणार नाही असे बाईंना वाटते. तसेच, एक स्त्री असे मनोरंजनाचे पुस्तक लिहू शकते ही गोष्ट समाजातील धुरंधर अशक्य ठरवतील ही भीतीही बाईंना आहे. एखाद्या विद्वान गृहस्थाने हे पुस्तक लिहिले व बाई केवळ निमित्तमात्र झाली असेही लोकांचे मत होऊ शकेल, अशी शंका बाई व्यक्त करतात.बाईंची ही भीती सार्थ होती, कारण पुढे 'प्रदक्षिणा'मध्ये आंबेकर यांनी - साळूबाईंचे पती भाऊराव तांबवेकरांनी हे पुस्तक लिहिले असावे असे मत व्यक्त केले. पण असा पुरावा कोठेही मिळत नाही. साळूबाईंचे दुसरे पुस्तक 'हिंदुस्थानातील तारा' हे शके १८१६ (इ.स. १८९४) मध्ये प्रसिद्ध झाले. त्याच्या प्रस्तावनेत साळूबाई शिक्षणाचे महत्त्व सांगतात आणि शिक्षणाच्या दुरुपयोगाबद्दल खंतही व्यक्त करतात, ती पुढीलप्रमाणे:- 'शिक्षणक्रम असा असावा की बालपणात मुलांची धर्मावर पूज्यबुद्धी निर्माण होण्याकरिता, ज्या जातीची मुले असतील त्या जातीतील जे धर्मबोधक ग्रंथ आहेत त्यांचा अभ्यास चांगल्या रीतीने करवून, त्यांची बुद्धी धर्माचरणाकडे दृढ झाल्यानंतर मग उदरपोषणाकरिता ज्या काळात ज्या भाषेची गरज असेल त्या भाषेचे ज्ञान घेण्याकरिता यत्न करवावा म्हणजे स्वधर्मनिष्ठता सुटणार नाही... आता स्वधर्मनिष्ठता पुर:सर विद्यासंपादनाकडे वा शिक्षणक्रमाकडे आमचे देशबांधव लक्ष देतीलच अशी मला आशा आहे.'

इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व आर्थिक स्वावलंबनासाठी बाईंनी मान्य केलेच आहे; पण सर्वस्वी इंग्रजी शिक्षण घेतल्यास मुलांचा धर्मविचार बदलू शकेल, आपल्या देशाबद्दलचे प्रेम कमी होईल, असा धोकाही दाखवला आहे. यामधून बाईंचा दूरदर्शीपणा लक्षात येतो. आज इंग्रजी माध्यमाचे अवास्तव स्तोम माजले आहे, बुद्धिमान मुले स्वदेशाचा विचारही न करता परदेशात स्थायिक होत आहेत. आणि त्याच वेळी मुलांना प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून द्या, असा आग्रह आजच्या शिक्षणतज्ज्ञांनी धरला आहे. साळूबाईंचे शंभर वर्षांपूर्वीचे हे शिक्षण विषयक विचार त्यांच्या बुद्धीच्या प्रगल्भतेची साक्ष आहे.

तत्कालीन लोकप्रिय व मान्यवर लेखिका काशीबाई कानिटकरांच्या कादंबऱ्यांतूनही अनेक नवीन विचार मांडले गेले, पण तरीही मनोगतांमधून बाईंचे अगदी नम्र निवेदन आढळते. इंदिराबाई हरिपूरकर आपल्या 'दैवलीला' (१९११) पुस्तकापूर्वी 'माझे दोन शब्द' सांगतात. कादंबरीमध्ये समाविष्ट केलेल्या या पुस्तकाला बाई आत्मचरित्र म्हणतात.

'मी एका साधारण स्थितीतील गृहस्थाची स्त्री होते, तेव्हा माझे हे आत्मचरित्र श्रीमंतांच्या स्त्रियांना रुचेल किंवा नाही याची मला शंकाच आहे. पण हा प्रयत्न मी अशा मानी महिलांसाठी केला नसून सहृदय गृहिणींसाठी केला आहे. त्यांना संसारातल्या सुखदु:खाची गुरुकिल्ली या पुस्तकाच्या वाचनाने थोडी जरी उमगली तरी माझ्या लेखणीने केलेल्या विहाराचे मी सार्थक मानीन.' सर्वसामान्य स्त्रियांच्या सुखासाठी इंदिराबाईंनी हा लेखनप्रपंच मांडला होता असे दिसते.

स्त्रियांच्या कादंबरीपूर्वी येणाऱ्या या मनोगतांमधून आपल्या लक्षात येते की, समाजप्रवृत्तींच्या फार मोठ्या दडपणाखाली तत्कालीन स्त्री लिहीत होती. स्त्रीला सदैव दुय्यम स्थान देण्याची प्रवृत्ती स्त्री-मनावर मोठा प्रभाव ठेवून होती. न्यूनगंडाची भाषा या मनोगतांमधून दिसते. परंतु स्त्रीशिक्षणाला अनुकूल पार्श्वभूमी कथानकातून उभी करण्याची धडपड या स्त्रियांनी केली आहे. स्त्री-शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची सुधारकांची प्रवृत्ती या कादंबरीकारांना दिलासा देते ही महत्त्वाची गोष्ट वरील मनोगतांमधून स्पष्ट होते. या सर्व लेखिकांची लेखनप्रेरणा स्त्रियांचे मनोरंजन करणे व त्यांना बहुश्रुत करणे हीच असल्याचे दिसते.

मनोगतांनंतर प्रत्यक्ष कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्तींचा आपण विचार करणार आहोत. आपल्या विचारांचा वाचकांवर अनुरूप परिणाम व्हावा अशा प्रकारे येणारे कथानक या कादंबऱ्यांना लाभले आहे. राजेरजवाड्यांच्या काळात नेणाऱ्या

सरदारपुत्रांच्या साहसकथा येथे आहेत, तसेच तत्कालीन काळाला सुसंगत समाजदर्शन, चालीरीती घडविणारी कथानके काही ठिकाणी आहेत. बदलती राजकीय परिस्थिती सामाजिक चळवळी आणि धार्मिक रुढी, परंपरा या संबंधातील विविध समाजप्रवृत्तींचा प्रत्यक्ष संस्कार त्या लेखिकांवर झालेला आहे. त्यामुळे या जाणिवांचा हुंकार त्यांच्या कादंबऱ्यांत उमटला आहे.

**जाणिवेचा हुंकार :** स्त्रियांनी लेखन करणे आज नवीन नाही. पण १८७३ मध्ये पहिली कादंबरी लिहिणाऱ्या साळूबाई तांबवेकरांचे मात्र विशेष कौतुक केले पाहिजे. नुसतेच मनोरंजन हा त्यांच्या लेखनाचा हेतू दिसत नाही. शिकलेली, बुद्धिमान, धैर्यशील आणि स्वत:च्या लग्नाबद्दल निर्णय घेणारी स्त्री त्यांनी नायिका दाखविली आहे. नव्या स्त्रीबद्दलच्या त्यांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब नायिकेच्या वर्णनात व वागणुकीत दिसते. कादंबरीचे कथानक पुढे मात्र रंजनप्रधान अद्भुताच्या वळणाने गेले आहे.

कादंबरीच्या प्रारंभी मणिभद्र राजाच्या चतुरंग नगरीचे वर्णन आले आहे. राजमहाल, फळबागा, बाजारपेठ इ. समृद्धतेचे दर्शन घडविणारी पारंपरिक वर्णने यात आली आहेत. परंतु साळूबाईंना शिक्षणाचे महत्त्व फार जाणवले होते. म्हणूनच या संपन्न नगरीमध्ये २५-३० शाळा आहेत. यामध्ये मुलामुलींच्या शाळा वेगळ्या असून अनेक प्रकारचे अभ्यासक्रम आहेत. मुलींना मात्र शालेय शिक्षणाबरोबर त्यांनी शिवण, विणकाम, भरतकाम व कशिदा शिकायला लावले आहे. कादंबरीचे कथानक स्थूलमानाने असे : एक दिवस मणिभद्र राजाच्या दरबारात एक फकीर येतो. तो तीन प्रश्न विचारतो. राजा आपला मुख्य प्रधान रघुनाथराव दादासाहेब यांना प्रश्नांची उत्तरे देण्यास सांगतो, आणि उत्तरे आली नाहीत तर तत्कालीन कथानकाच्या परंपरेप्रमाणे प्रधानाला फाशी ठरलेलीच ! त्या अवघड प्रश्नांमुळे प्रधान घरी अगदी चिंतातुर होतो. अशा प्रसंगी दैवी साक्षात्कार होऊन उत्तरे कळतात असे त्यावेळच्या सर्व कथानकांमध्ये असे. या ठिकाणी मात्र प्रधानजींची धाकटी मुलगी चंद्रप्रभा, वय वर्षे ११, ही वडिलांना या संकटातून सोडविते. तीन्ही प्रश्नांची बरोबर उत्तरे देऊन त्यांना निश्चिंत करते. अशा प्रकारे स्त्रीशिक्षणाचा व स्त्रीच्या बुद्धीचा उपयोग लेखिकेने दाखविला आहे.

तत्कालीन समाजात बालविवाह रूढ होते. वराच्या पसंतीसंबंधात वधूचे मत विचारात घेतले जात नसे. चंद्रप्रभा उपवर झाली तेव्हा तिचे वडील म्हणतात : "तुझ्या मनायोग्य जो वर वाटेल तो तू कळव म्हणजे मी लग्न करून देईन.

मात्र त्यामध्ये गुण, रूप, विद्या जे काही असेल ते तू पूर्णपणे पाहा. ''

अशारीतीने वडिलांनी चंद्रप्रभेस अनेक तसबिरी दाखविल्या. पण त्या तिला नापसंत असतात. लोकांनी मान डोलवावी असा वर पाहावा असे ती वडिलांस सुचविते लग्नाच्या. बाबतीत बापलेकीचे संभाषण अगदी मोकळेपणे झाले आहे, ही त्या काळातील अपवादात्मक घटना आहे. कुलदीपक पुत्राप्रमाणे असलेली चंद्रप्रभा वडिलांना प्रिय होती असे म्हणताना लेखिकेने स्पष्ट केले आहे की स्त्रीला पुरुषांइतकेच स्थान आहे.

चंद्रप्रभेच्या आईच्या चित्रणातून पारंपरिक स्त्रीच्या विचारांचे दर्शन आपणास घडते. चंद्रप्रभा मैत्रिणींबरोबर खेळत असते तेव्हा चंद्रप्रभेची आई म्हणते, '' बायकांनी किती बोलावे, जसे कृपणाचे धन, एक पैसा खर्च झाला तर त्यास सर्वस्व गेलेसे वाटते, त्याप्रमाणे बायकांनी आपले शब्दांस जपत असावे. '' चंद्रप्रभेचा विवाह होतो. मग चंद्रप्रभेस न्हाण येणे, मखरात बसविणे वगैरे वर्णने साळूबाई अगदी सविस्तरपणे देतात. समाजातील रूढीप्रिय प्रवृत्तींचे दर्शन येथे घडते.

लेखिकेची नवविचारांची जाणीव आणि परंपरागत संस्कार यांचा प्रत्यय कादंबरी वाचताना सतत येत असतो. चंद्रप्रभा भावाच्या मुंजीसाठी माहेरी जाते येथेच ' चंद्रप्रभाविरहवर्णन ' सुरू होते. दोघेही विरहव्याकुळ होतात, त्यानंतर विराण्या, शृंगारपदे व अभंग येतात. यानंतर कथानक सामजिक जाणिवेकडून अद्भुतरम्यतेकडे वळते. चंद्रप्रभेचा नवरा अवलियाचा वेष करून तिच्या माहेरच्या घरावरून जातो. तेव्हा विरहाने दोघेही पदे-ओव्या म्हणतात. त्यात हिंदी भाषेचा भरपूर उपयोग केला आहे. अवलिया म्हणतो – '' चौंचल गातसे कौन चलत है पीछे आँख फिराव...'' त्यावर चंद्रप्रभाही आपली विरहावस्था काव्यातून प्रकट करते. चंद्रप्रभा एकूण २०७ आर्या म्हणते. शेवटी अद्भुतरम्य शृंगारकथेप्रमाणे दोघांचे मिलन दाखवून साळूबाई म्हणतात, ' याप्रमाणे चंद्रप्रभा आपले भ्रतारास भेटली तो हर्ष अवर्णनीय आहे, पण तो इथे वर्णिता येत नाही. कारण आपल्या महाराष्ट्र भाषेत शब्दसंग्रह फार थोडा आहे व संस्कृत शिकल्याशिवाय त्याची संपूर्णता मनाप्रमाणे होणार नाही.' बाईंनी हिंदीचा आधार घेतला आहे व त्यांना संस्कृत शिकण्याचा उत्साह आहे हे अभिनंदनीय आहे. यापुढील भागात काही मनायोग्य भाग करून त्यात ' स्त्रीसौंदर्यवर्णन व स्त्रियांनी आपली स्तुत्य वागणूक कशी ठेवावी यासाठी मी एक पुस्तक करणार आहे. ' असा मनोदय साळूबाई व्यक्त करतात.

हे पुस्तक सचित्र आहे. राजाच्या दरबारात फकीर आला, चंद्रप्रभेचे मैत्रिणीबरोबर खेळणे, चंद्रप्रभेचा वाडा, वगैरे प्रत्येक प्रसंगाचे, स्थळाचे, वर्णनाप्रमाणे चित्र असलेले एक एक पान पुस्तकामध्ये आहे.

'हिंदुस्थानातील तारा' ही दुसरी कादंबरी साळूबाईंनी १८९४ मध्ये प्रसिद्ध केली. ही एक कल्पनारम्य साहसकथा म्हणावी लागेल. वादळात जहाज फुटते व समुद्रकिनाऱ्याला एक स्त्री लागते. तिची तिच्या पतीशी ताटातूट होते. तेव्हा ती स्त्री अतिशय दुःखी होते. या एकाकी स्त्रीचा फायदा घेण्याचा, तिला फसविण्याचा प्रयत्न काहीजण करतात. समाजातील मतलबी प्रवृत्तीचे दर्शन येथे घडते. स्त्रीच्या या पतिव्रत्याचे दाहक तेज तिचे रक्षण करते आणि तिचे शिक्षण तिला जगण्याचा नवा मार्ग दाखविते. येथेही परंपरा सांभाळण्याची लेखिकेची प्रवृत्ती आहे. पण स्त्री-शिक्षणाला अनुकूल प्रवृत्ती आग्रहाने दाखविली गेली आहे. तिची अजून एका स्त्रीशी भेट होते आणि दोघी मिळून लोकशिक्षणाचे व्रत घेतात. लेखिका म्हणते,

"त्या दोघी स्त्रियांनी परोपकारी गृहस्थाच्या शेजाऱ्या-पाजाऱ्यांच्या लहान मुलामुलींना विद्या, कलादिकांचे शिक्षण देण्याचा उद्योग चालविला. वेळेचा सद्व्यय व्हावा हाच उद्देश" सुरवातीला लोकांनी त्यांना त्रास दिला पण पुढे तीच माणसे म्हणू लागली, 'या बायका कोण ? उत्तम शिकलेल्या व सदाचरणी दिसतात.' यावरून स्त्री-शिक्षणाकडे उपहासाने पाहण्याची समाजप्रवृत्ती बदलेल असा आशावाद लेखिकेजवळ दिसतो.

मराठीतील पहिल्या स्त्री-कादंबरीकर्तीचे वेगळेपण आपल्या लक्षात राहते ते तिच्या शिक्षणावरील अदम्य विश्वासामुळेच होय. त्या काळात कथेमध्ये अनेक उपकथानके घालून कादंबरी तयार होत असे. साळूबाईंची दुसरी कादंबरी म्हणजे अशीच सुटया कथानकांची सांधेजोड आहे. परंतु आपल्या पहिल्या कादंबरीत कथेला वाढविण्यासाठी उपकथानके योजून लेखिकेने विषयांतर केले नाही. तेव्हा कथानकाची सुसूत्र मांडणी हा 'चंद्रप्रभाविरहवर्णना'चा गुण लक्षणीय आहे.

'प्रीतीचा मोबदला अथवा पुष्पगुच्छ आणि वनमाला' ही गोदावरीबाई पंडित यांची कादंबरी इ.स. १८९० मध्ये प्रसिद्ध झाली. ही प्रीतिकथा सरदारपुत्राची शौर्यकथा सांगते. 'जगातील महत्त्वाच्या राजकीय उलाढाली बळाच्या वापराने होतात.' हे सूत्र कथेच्या प्रारंभी लेखिकेने सांगितले आहे. एका राजवाडयात मध्यरात्री बंडखोर शिरतात व राजाचा वध करून विजयी होतात. शहरात

व वाड्यात अंदाधुंदी माजते. 'पुष्पगुच्छ' नावाच्या सरदारपुत्रास बंडखोर ठरविले जाते. त्यावेळी वनमाला नावाची पंधरा वर्षांची मुलगी पुष्पगुच्छाला फाशीपासून वाचवते. राजपुत्रास नकार देऊन वनमाला पुष्पगुच्छावर प्रेम करते. तेव्हा वनमाला धीटपणे राजपुत्राला सांगते की, 'प्रीतीचा मोबदला केवळ प्रीती आहे. प्रीतीवाचून प्रीती मिळत नाही. प्रीती संतोषाने व खुषीने प्राप्त होते; जबरदस्तीने नव्हे.' तेव्हा राजपुत्रास बोध होऊन तो पुष्पगुच्छाशी तिचे लग्न लावतो. या कथानकामध्ये समाजचिंतन, समाजप्रबोधन कुठेही येत नाही. मात्र वनमालेच्या प्रेमाची परिपूर्ती होते त्याचे सूत्र गोदावरीबाई पंडितांनी स्त्रीशिक्षणाशी नेऊन जोडले आहे. कादंबरीच्या शेवटी अनुमानामध्ये लेखिका म्हणते, "हा सर्व परिणाम स्त्री-शिक्षणाचा होय. यावरून प्रपंचात सुशिक्षित स्त्रियांची मातब्बरी किती आहे हे आमच्या सूज्ञ वाचकांच्या लक्षात सहज येण्यासारखे आहे. म्हणून सुखेच्छु आर्यदेश बांधवहो, तुम्हांस जर संसारात सुखाची इच्छा असेल तर स्त्रियांस सुशिक्षण देऊन त्यांस ज्ञानप्राप्ती करून देण्याविषयी आळस करू नका."

स्त्री-शिक्षणाचा विचार सतत लोकांसमोर असावा असा लेखिकांचा आग्रह दिसतो. या कालखंडातील सुधारणावादी कादंबऱ्या आपले लक्ष वेधून घेतात ते त्यातील प्रगल्भ विचारांमुळेच. काशीबाई कानिटकर लग्नानंतर गोविंदराव कानिटकरांच्या आग्रहाखातर शिकल्या आणि स्वत: वेगळा विचार मांडण्याचा आत्मविश्वास त्यांनी शिक्षणातून मिळवला. काशीबाईंची 'रंगराव' ही कादंबरी १९०३ साली प्रसिद्ध झाली. या कादंबरीत काशीबाईंनी डोळसपणे रूढींचा पुनर्विचार केलेला दिसतो. सुधारक विचारांची पण जुन्याला धरून असणारी राधाबाई ही रंगरावची आई. काशीबाईंनी विचारपूर्वक रंगवलेल्या या व्यक्तिरेखेची वाखाणणी खुद्द हरिभाऊंनी केली होती. राधाबाईंचे वर्णन करताना काशीबाई म्हणतात, "राधाबाई चाकरमाणसांवर मुलांप्रमाणे प्रेम करी. पथ्यपाणी, पैसा मदत देई. तिला वाटे की, व्रतवैकल्ये करण्यापेक्षा हाच धर्म योग्य व सत्पात्री आहे. (रंगराव, पृ. ६३)

सुधारक विचारांची राधाबाई रंगवतानाच समाजातील अंधश्रद्धाळू प्रवृत्तींची प्रतिनिधी म्हणून त्यांची सून सुंद्राबाई 'रंगराव' मध्ये दाखविली आहे.

सुंद्राबाई देवऋषींवर फार भरवसा ठेवून नेहमी गंडेदोरे घेत असते. तिला काही मूलबाळही नाही. देवऋषींच्या मागे हा भोळा, अज्ञानी समाज लागतो. अशा भोंदू महाराजांचे दर्शन काशीबाईंनी घडविले आहे. 'रंगराव' मधील सगुणाबाई ही महालबाड, कारस्थानी स्त्री होती. तिने चोरी, लबाडी, खोटेपणा

यामधूनच मुलाला जगण्याचा मार्ग दाखविला. मुलावर चोरीचा आरोप आल्यावर ती मुलाला एक नवीन व्यवसाय करण्याचा सल्ला देते. ती सांगते की, बुवामहाराज किंवा बैरागी यांचे रूप घेऊन लोकांची फसवणूक करायची आणि आपल्या दोन वेळच्या जेवणाची व्यवस्था करायची. अशा भोंदू लोकांकडे लोक आजारपणात उपचार करायला जातात व पस्तावतात. अंगारा म्हणून तिखट देणाऱ्या एका क्रूर साधूचा भोंदूपणा उघडकीस आणणारा प्रभाकर येथे आहे.

**सोवळं-ओवळं :** धर्मवेडा समाज सोवळ्या-ओवळ्याच्या वेडगळ कल्पना जपत होता. शिवाशिव मानत होता. विलायतेला गेलेल्या ब्राह्मणाला प्रायश्चित्त घ्यायला लावत होता. त्याचे दर्शन ' रंगराव 'मध्ये घडते. समाजसुधारक सर मोरोपंत जोशी यांना विलायतेहून आल्यावर ब्राह्मणांच्या पंक्तीत वेगळे बसावे लागले होते. रंगरावच्या संदर्भातही हाच प्रश्न लेखिकेने उभा केला आहे.

**बालविवाह :** इ.स. १९२० पूर्वीचा काळ म्हणजे लग्नाच्या वयाच्या जोरदार चर्चेचा काळ. ५व्या, ६व्या वर्षी होणारं मुलींचं लग्न बारातेरा वर्षांपर्यंत पुढे ढकललं गेलं, ते याच काळात. पण संमतिवयाच्या कायद्यासाठी कितीतरी सभा-चर्चा झाल्या. मुलगी ८-९ वर्षांनंतर लग्नाविना राहिली तर मुलीच्या आईचा जीव कानकोंडा होत असे. ' रंगराव ' मध्ये प्रभाकरची आई सखू-ठकूंना उजवून टाकण्यास अधीर झाली होती. त्यांच्या मुली लग्नाच्या राहिल्या तर उपाध्येपण सोडण्याचा विचार उपाध्याय करू लागतात, तर एकजण त्यांना विचारतो, ' का माई, सखी का मांडीवर मूल घेऊन गौरीहार पूजणार वाटतं ? ' (रंगराव, पृ.२५०) न्हाण येण्यापूर्वी मुलीचं लग्न झालंच पाहिजे अशी तत्कालीन रूढी होती. प्रभाकरचे दोन भाऊ लग्नाचे असते तर त्यांच्या लग्नाची चर्चा झाली नसती. तसेच प्रभाकर श्रीमंत असता तरी त्याच्या बहिणींच्या लग्नाची चर्चा झाली नसती, असे अनुमान लेखिका काढते. स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत हा भेद समाजाच्या अंगवळणी पडला आहे. त्यामुळे दुर्बल घटकांकडूनच रूढींचे पालन अधिक श्रद्धेने होते.

याच काळात शिकलेले मुलगे आपल्या लग्नाबद्दल स्वतंत्रपणे काही वेगळा विचार करू लागले होते. परदेशी नोकरीसाठी गेलेल्या रंगरावला त्याचे वडील लग्नासाठी बोलावून घेतात तेव्हा रंगराव वडिलांना कळवतो – ' लोक हसतात व मोठ्यांच्या मुली सांगून येतात एवढ्याच कारणाने लग्न करणे मला बरे दिसत नाही. लग्न म्हणजे काही हंगामात माल चांगला व स्वस्त मिळतो म्हणून त्याची बेगमी करायची नाही. ' (रंगराव, पृ. १७९) रंगराव व व्यंकटराव

यांना लग्नाचा आग्रह करताना घरचे लोक म्हणतात – 'बायको चांगली गरीब, संसाराला जपणारी असली, तिला दोन पोरेबाळे झाली म्हणजे झालं, यापेक्षा आणखी काय असायचं!' त्यावर व्यंकट म्हणतो – 'तसा संसार काय आमची गुलनिहाळ घोडी, कावेरी गाय आणि कुत्री सुद्धा करते. त्यांच्यात आणि आम्हा मनुष्यांच्या संसारात काय अंतर! (रंगराव, पृ. १९९)

लग्नासंबंधी व साथीदाराच्या निवडीबद्दल या लेखिका मोकळेपणे बोलताना दिसतात. असा धीटपणा साळूबाईंपासून सर्वच लेखिकांनी दाखविला आहे. तसेच स्त्री शिकली तरी तिने देवधर्म सोडला नाही हे मित्रांच्या संवादातून सांगण्याचा अट्टाहासही केला आहे. नवीन विचारांशी जमवून घेताना प्रत्येकवेळी स्त्रीची ओढाताण होते. कारण स्त्रीकडे पाहण्याची समाजाची संकुचित प्रवृत्ती!

**स्त्रीशिक्षण :** स्त्रीशिक्षणाची व्याख्या काशीबाईंनी फार समर्पक केली आहे. 'शिकलेली याचा अर्थ नुसते वाचायला, लिहायला येणे एवढाच नाही, तर विचारांत सुधारणाही त्याबरोबर झाली पाहिजे. त्याप्रमाणे वर्तनात बदल झाला पाहिजे तरच त्याचा उपयोग' (रंगराव, पृ.२०२). स्त्रीशिक्षणाला सनातनी लोकांनी फार विरोध केला होता. त्यामुळे स्त्रीशिक्षणाबद्दल काशीताईंनी सखोल चिंतन केलेले दिसते. समाजामध्ये आपल्या शिक्षणाची चर्चा होऊ नये याबद्दल त्या सतत जागरुक होत्या हे त्यांच्या आत्मचरित्रावरून व चरित्रावरूनही समजते. लग्न म्हणजे स्त्रीजीवनाचे सार्थक! शिक्षणामुळे लग्न जमण्यात अडचणी येऊ नयेत हा तत्कालीन दृष्टिकोन. त्याबद्दल रंगरावचा एक मित्र म्हणतो – 'बहिणी १३-१४ च्या झाल्या की लग्न करायला हवे, नाहीतर बीजवर मिळेल ना!' दुसरा मित्र म्हणतो, 'ती तिला हवं तेव्हा लग्न करेल, तू तिला पोटापाण्यासाठी Education दे.' त्याच चर्चेत एक मित्र सांगतो,

'मी माझ्या बायकोला लिहायला, वाचायला शिकवले आहे. तिच्याबरोबर नेहमी डिस्कस करतो.'

'मग तुझी बायको पिंपळाला का जाते?' असे विचारून दुसरा मित्र त्याला निरुत्तर करतो. (रंगराव, पृ. १८९)

स्त्री शिकली तरी तिने देवधर्म सोडला नाही हे समाजाला दाखविण्याचा अट्टाहास स्त्रिया करीत असत. त्याचे प्रत्यंतर पिंपळाला जाणाऱ्या सुशिक्षित स्त्रीमध्ये येते. नवीन विचारप्रवाहांशी जुळवून घेताना प्रत्येक वेळी स्त्रीची ओढाताण झाली होती; कारण स्त्रीशिक्षणाकडे पाहण्याची चोखंदळ समाजप्रवृत्ती.

काशीबाई कानिटकरांच्या आत्मचरित्राला जोडलेल्या 'उत्तरायण'मध्ये

प्रा. सरोजिनीबाई वैद्य सांगतात – ' आपले घरदार, भांडीकुंडी, कपडेलत्ते सगळे काही एखाद्या अशिक्षित सुगृहिणीइतकेच लखलखीत असले पाहिजे, नीटनेटके असले पाहिजे, नाहीतर शिक्षणाचा उद्धार होईल हे काशीबाई ओळखून होत्याच. ' चार लोक नाव ठेवतील हे माहीत असूनही काशीबाईंनी शिक्षणाचा आग्रह धरला.

शिक्षणाच्या आधारे स्त्री अर्थार्जन करू लागेल अणि त्यामुळे स्वावलंबी बनेल हा विचार लेखिकेची दूरदृष्टी सुचविते. आपल्या अल्प ज्ञानाची जाणीव लेखिकांनी वारंवार व्यक्त केली आहे. पण साक्षेपी समीक्षकांनी मात्र त्यांच्या पुरोगामी विचारांचे योग्य ते स्वागतही केले आहे. ' रंगराव 'चे समीक्षण करताना श्री. वा. ना. देव यांनी पंडिता रमाबाईंच्या विद्वत्तेशी तुलना करून काशीबाईंचा गौरव केला आहे. अभिप्रायामध्ये श्री. देव म्हणतात – " कादंबरीत महाराष्ट्र समाजाचे प्रथमदर्शनी दिसणारे सध्याचे चित्र चांगले उमटले आहे. अशा स्वभावाची माणसे जगात बरीच दिसतात. एंकदर सुधारणेची मजल कोठवर आली आहे याचा अंदाज बांधता येतो. सांप्रतच्या सामाजिक संक्रमणस्थितीत सामान्य मनुष्यास कोठवर पुढे पाय टाकणे शक्य आहे असे वाटते, विचार, प्रगती कोणत्या पायरीवर आहे, कोणत्या सुधारणा अमलात आणता येतील, कोणत्या आटोक्याबाहेर वाटतात, यांचे वर्णन यात आहे.

मनुष्यवर्णने यथारूप, स्वाभाविक, मार्मिक व व्यवहारज्ञानाने भरलेली आहेत. त्यावरून आपल्या समाजाचे स्वरूप, प्रकृती, नाडी, वातावरण, परिस्थिती यांचा ठाव काढता येतो."

तेव्हा १९०४ मध्येच लिहीलेल्या श्री. देव यांच्या अभिप्रायावरून आपल्या असे लक्षात येते की, काशीबाईंनी घडविलेले व्यक्तिदर्शन, समाजदर्शन वस्तुस्थितीला धरून होते. काशीबाईंचे व्यक्तिचित्रण करण्याचे सामर्थ्य हरिभाऊंनी ओळखले होते व तसे प्रशंसापत्रही दिले होते.

काशीबाईंची कादंबरी नियतकालिकातून क्रमशः प्रसिद्ध होत होती, त्यावेळी मध्येच काशीबाईंचे अवसान गळाले. हरिभाऊंसारखे आपल्याला लिहिता येणार नाही असे वाटून त्यांनी लेखन थांबविले. तेव्हा पत्र पाठवून हरिभाऊंनी काशीबाईंना प्रोत्साहन दिले होते. काशीबाईंची व्यक्तिचित्रे उठावदार असत. कारण दुसऱ्याच्या सुखदुःखाशी त्या सहमत होत असत. त्यांनी शिकलेल्या स्त्रीची व्यथा जाणली.

शिक्षणामुळे त्यांच्या आयुष्यात घरीदारी संघर्ष अटळ होऊन बसला.

या अनुभवातील सत्याच्या दर्शनाने त्या व्याकुळ होत. ही व्याकुळता त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील स्त्रीच्या जीवनावस्थांमधून व्यक्त झाली आहे. सासूरवाशिणी, परित्यक्ता, फसवलेल्या विधवा 'रंगराव' मध्ये आहेत.

'रंगराव' मध्ये प्रारंभी मानवी स्वभावाचे विविध पैलू अनेक घटनांमधून दृष्टीस पडतात. परंतु पुढे कथानक वेग घेत नाही. रंगरावची सैन्यातून येणारी पत्रे, त्याच्या लग्नासंबंधी चर्चा, वगैरे सर्व भाग अगदी रूक्ष, चर्चात्मक झाला आहे. काशीबाईंचा एक भाऊ सैन्यात गेला होता त्याच संदर्भात काशीबाईंनी रंगरावला सैन्यात पाठविले असावे. परंतु तो भाग कथानकाच्या दृष्टीने अपयशी ठरला आहे.

उपमा-दृष्टांतांनी सजवलेली भाषा वापरण्याचा तो काळ होता. स्त्रियांच्या कादंबऱ्यांतून मात्र जरा सुटसुटीत, लोकव्यवहाराची भाषा वापरण्याचा प्रघात सुरू झाला होता. 'रंगराव' मधील वर्णनांतून लेखिकेच्या भाषाशैली व निरीक्षणशक्तीचे सामर्थ्य दिसते. लेखिकेला मराठीबरोबर इतर भाषांचे ज्ञान होते. 'रंगराव' मधील चर्चांमधून अनेक इंग्रजी शब्द येतात. 'प्राईड अँड प्रेज्युडाइस' वाचल्याचे संदर्भ येतात. रंगराव 'मनोरंजन' व 'निबंधचंद्रिका' मधून क्रमश: प्रसिद्ध झाली होती. त्यामुळे विसंगतीचा दोष जाणवतो. तरीही तत्कालीन लेखिकांच्या कादंबऱ्यांपैकी ललितवाङ्मयाच्या कसाला उतरते ती फक्त काशीबाईंची 'रंगराव' होय.

इंदिराबाई हरिपूरकर यांची 'दैवलीला' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी १९८५ मध्ये प्रसिद्ध झाली. बाईंवर अनेक कौटुंबिक आपत्ती आल्या. त्याबद्दल बाईंची तक्रार नाही. शिक्षणातून आलेला समंजसपणा त्यांच्या नायिकेच्या वागणुकीतून जाणवतो. रूढींचा पुनर्विचार करण्याची नवी प्रवृत्ती तत्कालीन सुशिक्षितांमध्ये दिसते. इंदिरेच्या सासूबाई मृत्यू पावल्यावर त्यांचे श्राद्धकर्म थाटात करावे अशी त्यांच्या दीराची इच्छा असते. त्यावर इंदिराबाई सांगतात, 'पैशाचा विनियोग योग्य ठिकाणीच व्हावा असा त्यांचा (नवऱ्याचा) पहिल्यापासूनच स्वभाव असल्यामुळे त्यांनी आपल्या आईच्या नावे बरीच मोठी रक्कम विद्यालयाला दिली.' वैयक्तिक दानधर्माचा ओघ समाजकार्याकडे वळवावा असा विचार गेल्या शतकात मांडला गेला ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे.

लोक काय म्हणतील ? याची भीती सर्वसाधारणपणेर सर्वांनाच असते. 'दैवलीला' कादंबरीत पतीशी दोन शब्द बोलण्यास उत्सुक असलेली नववधू इंदिरा म्हणते– "घरी येणे झाल्यावर पत्नी या दृष्टीने त्यांची तरतूद ठेवणे

माझे कर्तव्य होते. पण आपण आपल्याच जबाबदारीवर तसे केल्यास वडीलधाऱ्या माणसांचा अपमान होईल या भीतीने मला काहीच करता येईना. '' (दैवलीला, पृ.२८) बाहेरून आलेल्या नवऱ्याची विचारपूस करावीशी वाटणे साहजिकच आहे, पण चारचौघांसमोर पति-पत्नींनी आपसात बोलण्याचा तेव्हा प्रघात नव्हता. इंदिराच पुढे सांगते की, 'मी इकडची चौकशी केली असती तर घरांतील जावांनी त्यावर चर्चा केली असती. मी टापटिपीने राही तर त्या मला मडमसाहेब म्हणत. मला लिहिता-वाचता येई तर चेष्टा करीत.' याप्रमाणे प्रागतिक विचाराच्या माणसांना नेहमीच लोकांची टीका सहन करावी लागते.

कादंबरीकार स्त्रिया, आपल्याला पटलेले विचार धीटपणे मांडतात. मुलगा, मुलगी भेद मानून मुलीच्या जन्माचा दोष आईलाच देणारा तो काळ होता. पण ही प्रवृत्ती चूक आहे. मुलीच्या जन्माचाही आनंद मानावा असे लेखिकेने स्पष्टपणे सांगितले आहे. अर्थात हे विचार केवळ आदर्शवादाच्या ओढीने सांगितले आहेत असे म्हणता येणार नाही. कारण यशोदाबाई जोशी आपल्या आत्मचरित्रात सांगतात की, १८८७ साली पहिली मुलगी झाली तरी त्यांनी त्याबद्दल दु:ख मानले नाही.

स्त्रीशिक्षणाबद्दल सर्वसाधारण समाजात उदासीन प्रवृत्ती दिसते. पण इंदिरा शिकलेली आहे. 'मी शिकल्यामुळे पती कसा असावा याचा विचार मी करीत होते,' असे नायिका म्हणते. सुशिक्षित स्त्रीचा समंजसपणा नायिकेच्या व्यक्तिमत्त्वामधून व्यक्त झाला आहे. कादंबरीच्या शेवटी लेखिका म्हणते, 'भवितव्यतेचे तडाखे, काललहरीचे गोते आणि मृत्यूची गांजवणूक आम्ही निमूटपणे सोशिली पाहिजे. या सर्वांनी मिळून एका य:कश्चित् स्त्रीची जी चरित्रसृष्टी निर्माण केली तीच ही दैवलीला! आहे तशी परिस्थिती स्वीकारण्याची प्रवृत्ती येथे दिसते.

इ.स. १९१५ नंतर सातत्याने आणि वेगाने जानकीबाई देसाई यांनी कादंबरीलेखन केलेले आढळते. 'सरस वाङ्मय रत्नमालामधून' त्यांच्या अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. गृहलक्ष्मी (१९१५) प्रेमळ सवत (१९१७), सौभाग्यतिलक (१९१८) आणि पातिव्रत्याची कसोटी (१९१९) या कादंबऱ्या १९२० पर्यंत प्रकाशित झाल्या. त्यानंतरही जानकीबाईंचे लेखन चालूच होते. या कादंबऱ्या स्त्री-जीवनाशी संबंधित असल्यामुळे तत्कालीन समाजप्रवृत्तीचे दर्शन त्यामधून सहजपणे घडत जाते. आधुनिक, प्रागतिक समाजप्रवृत्ती निर्माण व्हाव्यात असा लेखिकेचा दृष्टिकोन दिसतो.

'सौभाग्यतिलक' ही कादंबरी अनेक दैवी योगायोग आणि अंती ईश्वराची कृपादृष्टी लाभलेल्या प्रसंगांनी सजली आहे. यमूचा नवरा विश्वनाथराव एकाएकी नाहीसा होतो. तो परत भेटावा म्हणून यमू 'सौभाग्यतिलक' व्रत करते. पुढे नवऱ्याची भेट झाल्यावर थाटात व्रताची सांगता करते. आणि येथेच कादंबरी संपते. अत्यंत पारंपरिक विचारांची ही कादंबरी आहे.

रूढीपालन ही माणसाची मूलभूत प्रवृत्ती आपणास येथे दिसते. दुसऱ्याच्या वैयक्तिक जीवनात डोकावण्याची प्रवृत्तीही आपणास अनेक ठिकाणी आढळेल. मुंबईतील चाळीत विशेषत्वाने आढळणारी ही प्रवृत्ती, 'प्रेमळ सवत' मध्ये सहजपणे येते. 'लीला व मनोहर एकत्र राहात होते. ते कुणाच्या अध्यात-मध्यात नव्हते तरीसुद्धा त्यांच्या एकत्र राहण्याचा चाळकऱ्यांना त्रास होत होता. चर्चा केल्याशिवाय त्यांना चैन पडत नव्हते.'

रूढीपालनाच्या प्रवृत्तीतून हुंडापद्धती रूढ होत गेली. दुसऱ्याची आमदनी लुबाडणे या क्षुद्र मनोवृत्तीचे हे विकृत रूप आहे. स्त्री-जीवनाशी अत्यंत निगडित अशा या प्रवृत्तीचे दर्शन लेखिकांच्या कादंबऱ्यांमधून उत्कटपणे घडले आहे.

जानकीबाई देसाई यांच्या 'गृहलक्ष्मी' या कादंबरीचे हुंडापद्धती हे एक महत्त्वाचे अंग आहे.

यमू व कमल दोघी मैत्रिणी असतात. कमल माहेरी आल्यावर ती यमूला तिच्या लग्नाबद्दल विचारते. तेव्हा यमू म्हणते, 'लग्न म्हटल्याबरोबर काय ते होतंय कमल? आईबाप पहिल्याने वेडी झाली पाहिजेत, घरवाडी विकली पाहिजे, सर्वांनी झाडाखाली वसती केली पाहिजे तेव्हा लग्न होणार!' (गृहलक्ष्मी, पृ.४५)

लग्न या सुखसोहळ्यामागे इतकी दारुण पार्श्वभूमी असते. मुलीच्या लग्नासाठी आईबाप खरोखर वेडे होतात. यमूचे आईवडील सावित्रीबाई व पंडितजींना असाच मुलीच्या लग्नाचा ध्यास लागला होता. पंडितजी बायकोला म्हणतात, 'असल्या चांडाळ लोकांशी संबंध करणे योग्य नव्हे. द्रव्यावर ज्यांनी आपली नजर ठेवली ते कोणत्या वेळी काय करतील याचा नेम नाही. उद्या त्यांनी मुलीला नांदविली नाही तर! असल्या पाषाणहृदयी व असभ्य मनुष्यांच्या हातात मी ती सोन्यासारखी मुलगी देऊ? एखादा अधम असेल तोच असे कृत्य करील. जा तुम्ही, आम्ही आज लग्न करीत नाही.' (गृहलक्ष्मी, पृ. १६४)

वरपक्षाचा प्रत्येक शब्द झेलण्याची वधूपक्षाची तयारी असली पाहिजे

अशी समाजप्रवृत्ती होती. त्यामुळे वरपक्षाच्या बेताल वागणुकीला पायबंद घालण्याचे धाडस सहसा कुणी करत नसे. वधूपक्षाची बाजू घेऊन वरपक्षाला त्यांच्या बेजबाबदार वागणुकीची जाणीव करून देणारी काही तडफदार तरुण मंडळी समाजात होती. लेखिकांनी आपली सुधारक मते तरूण पुरुष-व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मांडली होती. 'प्रेमळ सवत' मधील नाना व मनोहर यांच्यामधील संवाद म्हणजे अशाच नवतरुणांचे विचारदर्शन होय.

नाना व मनोहर दोघे मित्र बोलत असतात. लीलाच्या लग्नावरून विषय निघतो तेव्हा त्यांचा संवाद पुढीलप्रमाणे होतो:-

मनोहर – 'स्थिती गरिबीची असो किंवा श्रीमंतीची असो, असल्या सुंदर मुलीला कोणीही जवळ केल्यावाचून राहणार नाही.

नाना – नाही मनोहर! जगातल्या चालीरीतींसंबंधीची बरीचशी मते तुला अजून बदलावी लागतील. मुलगी चांगल्या घरी अथवा चांगल्या वरी पडणे म्हणजे तू समजतोस तितकी सोपी गोष्ट नाही. स्वरूप म्हण किंवा गुण म्हण, पण त्याच्या मुळाशी रुपयांची चकाकी हवी.' (प्रेमळ सवत, पृ. २५)

मुलीच्या लग्नासाठी पैशाची आवश्यकता असते हे मनोहरला पटत नाही. त्याच्या मते सगळेच लोक हुंड्याच्या लोभाने लग्न करीत नाहीत. मनोहर म्हणतो

'छे, छे! नाना, तू तशी समजूत करून घेऊ नकोस. व्यक्तिविषयक कृत्ये आपल्या समाजाला लावणे योग्य नव्हे' (प्रेमळ सवत, पृ. २५)

समाजामध्ये हुंडाप्रवृत्ती निर्माण झाली ती अनेक व्यक्तींच्या हुंडा मागण्याच्या प्रवृत्तीमधूनच! समाजातील काही व्यक्ती अशा धनलालसी असतील, तरी सारा समाज काही असा लोभी नाही, असे तत्त्व जानकीबाई देसाईंनी प्रतिपादन केले आहे. लग्नसमारंभात हुंड्याचा लोभ पुरुषांपेक्षा स्त्रियाच जास्त प्रमाणात करीत असत. त्यावेळी त्याला विरोध करण्याचे धाडस पुरुषांनीच केले. लेखिकांनी तरूणांच्या चर्चेमधूनच हुंडाप्रवृत्तीला विरोध करून पर्यायी मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला, ही गोष्ट कालाच्या दृष्टीने अधिक सुसंगत होती.

संसारात स्त्रियांना फारशी किंमत नव्हती. आणि हा भेदभाव योग्यच असणार अशी सर्वसामान्य स्त्रियांचीही प्रवृत्ती होती. 'गृहलक्ष्मी' या कादंबरी मध्ये यमूला लग्नानंतर नवऱ्याने आपल्याबरोबर घरी नेलेच नाही. त्यामुळे त्याच्या मृत्यूचे पत्र आल्यावर यमू फक्त स्तब्ध उभी राहिली.

'यमूचे हे न बोलणे आणि स्तब्धपणा पाहून शेजारी-पाजारी मनातल्या मनात तिची निंदा करू लागले. त्यांच्या मताप्रमाणे पाहिले असता यावेळी यमूने मोठमोठ्याने रडून आकाश-पाताळ एक करून सोडले पाहिजे होते.' (गृहलक्ष्मी, पृ.७७)

ज्या नवऱ्याशी कधी संबंधही आला नाही, त्याच्यासाठी बायकोला रडायला लावणारा तो समाज होता. यमूची मैत्रीण कमल त्या काळातील स्त्रीचे समाजामधील स्थान विषद करून सांगते. यमूची मैत्रीण कमल अगदी खराब झाली होती. त्याबद्दल यमू विचारते, 'नवरा नाही विचारीत?'

कमल हसली. यमूला ते हसणे पाहून फारच करुणा आली. कमलने पुन्हा एकदा हसून म्हटले, "विचारीत? मी कोण तिकडची? त्यांनी मला का अडवावे? मी माहेराहून आले नाही म्हणून का चवकशी करावी, यमू? आम्ही मुली म्हणजे फुलांच्या माळेसारख्या आंहोत. माळ्याने हव्या त्याला द्याव्या आणि त्याने त्या बाशा झाल्या की उकीरड्यावर फेंकून द्याव्या! आमचा आदर तो किती दिवस!" (गृहलक्ष्मी, पृ.१०६)

या उदाहरणामधून तत्कालीन समाजात, कुटुंबात स्त्रीच्या मनाचा, मताचा विचार होत नसे ही वस्तुस्थिती स्पष्ट होते. 'प्रेमळ सवत' मध्ये कॉलेजात शिकणारा मनोहर वडिलांच्या इच्छेवरून विमलेशी लग्न करतो. आणि नंतर एकटाच शहरात शिकायला येतो. तेथे लीलेची आई मरताना लीलेला मनोहरच्या स्वाधीन करते. लीलाचे कुठेतरी लग्न जमेपर्यंत मनोहर तिला सांभाळायचे ठरवतो. पण पुढे तिच्यात गुंतत जातो. तोपर्यंत लीलेला त्याच्या पहिल्या लग्नाचा पत्ताही नसतो. आता दोन सवती समोर आल्यावर नाराज झाल्या तर दोष कोणाचा? त्या नवऱ्याचाच ना? पण लेखिकेने दोघींची दिलजमाई केली आहे. या प्रेमळ सवती दुसऱ्यासाठी नवऱ्याचा त्याग करायला तयार होतात. आपल्या नवऱ्याने आपल्याला फसवले हा आपल्या स्त्रीत्वाचा अपमान आहे. असा विचार दोघींपैकी एकाही बायकोच्या मनात येत नाही. दोन बायका करायची पद्धत तेव्हा होती आणि ही रूढी अयोग्य आहे याची जाणीवही सामान्य स्त्रियांना नव्हती. दोन सवती आनंदाने एकत्र राहाताना लेखिका दाखवते; यावरून शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या लेखिकांनाही यात काही गैर वाटत नव्हते.

१८७३ मध्ये स्त्रीने लिहिलेल्या पहिल्या मराठी कादंबरीपासून १९२० पर्यंत स्त्रियांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांतून दिसणाऱ्या समाजप्रवृत्ती याप्रकारे आहेत. धार्मिक पुनर्विचार, राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वावलंबन या महत्त्वाच्या

गोष्टींकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न या कालखंडात झाला. जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये नवविचारांचा संघर्ष प्रचलित समाज-प्रवृत्तींशी झाला. त्याचप्रमाणे या संघर्षातून काही नवीन समाजप्रवृत्ती उदयास आल्या.

कादंबरीला प्रारंभ करण्यापूर्वी लेखिका आपले मनोगत सांगतात. त्यामधून व प्रत्येक कादंबरीच्या कथानकामधून स्त्रीची दुय्यमपणाची जाणीव व्यक्त झाली आहे. त्यामुळे विवाह, शिक्षण यासाठी आग्रह धरणाऱ्या त्यांच्या नायिका नाहीत. विवाहात स्त्रीचे मत विचारात घेतले पाहिजे हे सांगण्यासाठी पहिल्याच कादंबरीत चंद्रप्रभेच्या वडिलांचा उदार दृष्टिकोन दाखविला आहे. कादंबरीमधून पुन:पुन्हा चर्चा करून समाजामध्ये बालविवाहविरोधी, हुंडाविरोधी प्रवृत्ती निर्माण करण्याचा आग्रह काशीबाई कानिटकरांचा दिसतो. स्त्री-शिक्षणाचे महत्त्व सांगण्याचा लेखिकांचा उद्देश असूनही शिक्षणाला अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही प्रवृत्तींच्या व्यक्तिरेखा या कादंबऱ्यांत आहेत. आपले मत मांडत असताना, वास्तवतेचे भान कुठेही सुटले नाही ही लेखिकांच्या संबंधातील महत्त्वाची गोष्ट आहे.

या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन करीत असता तंत्राच्या दृष्टीने लेखिका कमी पडतात हे खरे! याचे कारण म्हणजे सुशिक्षित स्त्रियांची ती पहिलीच पिढी होती. त्यातही त्यांना उच्च शिक्षण मिळाले नव्हते. पाश्चात्त्य वाङ्मयाचा अभ्यास त्यांनी केलेला नव्हता. याचा एक चांगला परिणामही कादंबऱ्यांवर झाला. आदर्श तंत्राच्या चौकटीत कथानकाला बसविण्याचे दडपण नसल्यामुळे, कादंबऱ्यांतून मुक्त विचार काहीसे ऐसपैस कथानक घेऊन व्यक्त होतात आणि म्हणूनच अधिक नैसर्गिक वाटतात.

१९२० पर्यंतच्या कादंबऱ्यांत कलात्मकता कमी आढळते, पण अनुभव मांडण्याची खरीखुरी ओढ दिसते. त्यामधून सहजपणे समाजप्रवृत्तींचे दर्शन घडते. १९२० नंतर काळ फार झपाट्याने बदलत गेला. स्त्रिया उच्च शिक्षण घेऊ लागल्या. तत्पूर्वी स्त्रियांच्या स्थितीबद्दलचा विचार पुरुषच करीत होते. परंतु १९२० नंतर स्त्रिया स्वत: विचार करू लागल्या. धीटपणे बोलू लागल्या. म्हणून आपण त्याला 'विचारपर्व' म्हटले आहे. या विचारपर्वामध्ये परिवर्तित समाजप्रवृत्तींचे दर्शन घडते.

• • •

निबंध ३५२४ २६८६९ ७।३।९३

# विचारपर्व (१९२१ ते १९३४)

प्रबोधनपर्वामध्ये भारताच्या राजकीय पारतंत्र्याची जाणीव सर्वसामान्य माणसापर्यंत तीव्रपणे पोहोचली होती. १९२० नंतर सामाजिक मागासलेपण आणि आर्थिक परावलंबित्व याचे भान सुशिक्षित समाजाला आले होते. विज्ञानाच्या प्रगतीबरोबर आणि पाश्चात्त्य वाङ्मयाच्या प्रभावामुळे धर्मविचाराकडे डोळसपणे पाहण्याची प्रवृत्ती समाजात प्रकर्षाने दिसू लागली. पहिल्या महायुद्धानंतर नव्या युगाकडे वाटचाल करणारे विचारपर्व सुरू झाले.

लो. टिळकांनी सुचविलेल्या बहिष्काराच्या तत्त्वाला गांधीजींच्या सत्याग्रहापासून व्यापक स्वरूप मिळाले आणि राजकीय घडामोडींना एक निश्चित गती मिळाली. म.गांधींबरोबर राजकारणात पं. नेहरूंचाही प्रभाव वाढत गेला. महाराष्ट्रात मार्क्सवादी व समाजवादी विचारांचा प्रभाव तरुणवर्गात वाढत होता. तसेच दहशतवादी क्रांतिकारकांबद्दलही मराठी माणसाला आपुलकी होती. म. गांधींना स्त्री-शक्तीची जाणीव होती. गांधीजींच्या आवाहनामुळे स्त्रियांनी राजकीय चळवळीतही भाग घेतला. ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू यासारखे नवे आदर्श, ध्येयवादी स्त्रियांसमोर निर्माण झाले.

स्वातंत्र्यलढ्यामध्ये सर्व जातीचे, पंथाचे लोक सामील झाले होते. पण प्रत्यक्ष व्यवहारात मात्र जातिभेद होताच. २० मार्च १९२७ रोजी झालेला महाडचा सत्याग्रह सर्व हिंदू समाजाला जागा करून गेला. १९३२ पासून साने गुरुजी, स्वा. सावरकर यांच्या प्रयत्नाने अनेक मंदिरे अस्पृश्यांना खुली झाली. प्रा. श्री. म. माटे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे संबंधित समाज चिंतनशील बनत गेला.

इ.स. १९२० च्या सुमारास बालविधवांचा महत्त्वाचा प्रश्न समाजापुढे होता. संमतिवयाचा कायदा झाला आणि हळूहळू बालविवाहांचे प्रमाण कमी होऊ लागले. प्रौढ कुमारिका, तरुण विधवा व परित्यक्ता यांची मानसिक कुचंबणा

'कळ्यांचे नि:श्वास' मध्ये फार भेदक शब्दांत वर्णन केली आहे. स्त्रियांना अब्रूने जगता यावे म्हणून हिंगण्याच्या संस्थेत महर्षी कर्व्यांनी स्त्रियांना आधार दिला, शिक्षण दिले व नोकऱ्याही दिल्या. विधवांचे दुःख हलके करावे या हेतूने रमाबाई रानड्यांनी सेवासदन संस्था काढली. स्त्रियांसाठी विविध शिक्षणवर्ग, संस्था निघू लागल्या. विधवा किंवा सासुरवाशिणींपेक्षा परित्क्तांचा गट अधिक दडपलेला, कुचंबलेला होता. सवाष्ण असूनही ती देवकार्यात चालत नसे. मात्र घरातील कष्टांना, स्वयंपाकाला ती चालत असे. आला दिवस दुःखात ढकलणारी ही स्त्री परंपरेने हरितालिका, वटसावित्रीचे उपवास करून सात जन्म हाच नवरा मागत असे. या अपमानित स्थितीतून बाहेर पडावे अशी या स्त्रियांची इच्छा होती; पण दुसरे लग्न करण्याचा पर्याय रूढींनी त्यांच्यापुढे ठेवला नव्हता.

शिक्षण हा जेव्हा अलंकार होता तेव्हा पुरुष शांत होता. पण शिकलेल्या बाईचे लग्न झाले आणि प्रश्न निर्माण झाले. पहिल्या महायुद्धानंतर काही मुली नोकरी करू लागल्या. आर्थिक मंदीच्या त्या काळात मिळवत्या मुलीच्या लग्नाकडे पालक दुर्लक्ष करू लागले. नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या पैशावर सर्वस्वी हक्क वडिलांचा किंवा नवऱ्याचा असे. कमविण्याची क्षमता असलेली ही स्त्री आपली कमाई मनाप्रमाणे खर्च करण्याइतकी स्वतंत्र बनली नव्हती. बायकांच्या मिळकतीवर हक्क सांगणारी ही वृत्ती सनातनच म्हटली पाहिजे. कारण कामकरी, शेतकरी स्त्रियांचीही मजुरी संसारासाठी वापरून उरलेली शिल्लक दादल्याच्या दारूसाठी खर्च होत होती. आजही तेच चालू आहे.

सुशिक्षित स्त्रियांसाठी या काळात अनेक भगिनी मंडळे निर्माण झाली. स्त्रियांना घराबाहेर करमणुकीचे नवीन क्षेत्र मिळाले. या संस्थांमार्फत स्त्री-शिक्षण, बालसंगोपन यासारखे उपक्रम राबविले जात असत. शिक्षण घेतलेली स्त्री एकत्र कुटुंबाच्या दिंडी-दरवाज्यातून बाहेर पडू लागली. १९३० मध्ये विद्याधनाचा कायदा संमत झाला, तो असा की, 'अविभक्त कुटुंबाच्या खर्चाने जरी विद्या संपादन केली तरी ती संपादन केल्यानंतर मिळणारी संपत्ती त्या व्यक्तीच्या मालकीची असेल. अविभक्त कुटुंबाच्या मालकीची नव्हे.' अशा रीतीने काळाप्रमाणे कायद्याची वाटचाल विभक्त कुटुंबाच्या सोयीनुसार होऊ लागली. घटस्फोटाच्या कायद्यासाठी जनमत जागृत होऊ लागले होते. पुरुषांशी बरोबरी करणाऱ्या या साऱ्या मध्यमवर्गीय महिलांना स्वत:च्या हक्कांची जाणीव होऊ लागली असतानाच समाजातील पातिव्रत्याच्या कल्पना मात्र बदलल्या गेल्या

नव्हत्या.

इ.स. १९२० ते १९३५ या अगदी लहानशा कालखंडात राजकीय स्वातंत्र्याच्या दिशेने हिंदुस्थानची निश्चित अशी प्रगती झाली. औद्योगिक क्रांतीमुळे आर्थिक जीवनातही अनेक बदल होऊ लागले. परंपरागत जमीनदारी, शेतकी हे व्यवसाय सोडून नोकरदारांचा फार मोठा वर्ग निर्माण झाला. औद्योगिक मंदीच्या कालखंडात स्त्रियाही नोकरी करू लागल्या. प्रवृत्तीच्या परिवर्तनाच्या दृष्टीने प्रचंड उलथापालथ करून गेलेला हा काळ होता. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळूनी किंवा पुरूनी टाका.' हा केशवसुतांचा महामंत्र, साहित्यिकांनी आपल्या वाङ्मयामधून समाजापुढे ठेवला. हा वैचारिक कल्लोळ संवेदनशील स्त्रीमनाने आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त केला आहे.

१९२० ते ३५ या विचारपर्वातील लेखिकांची मने या संक्रमणकाळाचे संस्कार घेतलेली आहेत. आपले शिक्षण, आपले लेखन नवविचारांच्या प्रचारासाठीच वापरले पाहिजे अशी प्रामाणिक समजूत या नवशिक्षित स्त्रियांची होती. लेखिकांच्या कादंबऱ्यांचा विचार करू लागल्यावर १९२१ मधील यशोदाबाई भट यांची 'मुलांचे बंड' ही कादंबरी तत्पूर्वीच्या कादंबऱ्यांपेक्षा स्वत:च्या वेगळेपणाने उठून दिसते. विधवांकडे किंबहुना स्त्रीजातीकडे पाहण्याची समाजप्रवृत्ती बदलली पाहिजे असा आग्रहही स्त्रीलिखित कादंबरीत प्रथमच आढळतो तो 'मुलांचे बंड' मध्ये. धर्म, स्त्री-स्वातंत्र्य, मानवता या संबंधातील प्रवृत्तीबद्दल लेखिकेने काही निश्चित पण वेगळे विचार मांडले आहेत. म्हणून विचारपर्वाचा प्रारंभ या कादंबरीपासून होतो.

धर्म संबंधातील आपली मते लेखिकेने जबाबदारीने व्यक्त केलेली दिसतात. येथे यमूकडे बसायला आलेल्या बायकांना यमू सांगते: 'आपला धर्म, आपले कुळाचार, आपली परंपरा यांचा तिरस्कार केला म्हणजे तो सुधारक झाला असे नाही, तर दोहोंतून चांगले निवडून काढून त्याप्रमाणे आचरण करणारा हाच खरा सुधारक होय.' (मुलांचे बंड, पृ. ४७)

नवीन पाश्चात्त्य विचारांनी भारून गेलेल्या तरुणांमध्ये धर्मातील सर्वच जुन्या चालीरीतींना नावे ठेवण्याची प्रवृत्ती वाढली होती. आपला धर्म सर्वस्वी टाकावू, चेष्टेचा मानण्याची ही वृत्ती धर्म टिकविण्याच्या दृष्टीने घातक ठरली असती म्हणून असा समन्वयवादी दृष्टिकोन लेखिकेने सांगितला आहे.

विधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याचा सुधारक विचारांचा लेखिकांनी पाठपुरावा केला. 'मुलांचे बंड' मध्ये विधवांनी समाजसुधारणेसाठी

घराबाहेर पडावे म्हणून यमू प्रयत्न करीत असते. तेव्हा तिचे वडील चिडून म्हणतात, 'विधवांनी लग्ने केली तर घरकाम कुणी करावे? आमच्या बायकांना बाळंतपण गर्भारपण आहेत' (मुलांचे बंड, पृ.२७) विधवांना कोणतेही स्वातंत्र्य द्यायला स्वार्थी समाज तयार नव्हता. रमाबाई रानडयांनी 'सेवासदन' काढले. त्यामध्ये विधवा शिकू लागल्या तेव्हा पुण्यातील लोकांना चिंता पडली होती की, आता आपल्याला स्वयंपाकाला बाई कशी मिळणार? असा समाज पुनर्विवाहाला सहजपणे स्वीकारणे कठीणच होते.

विवाहासंबंधी एक नवीन विचारही याच काळात उदयाला येऊ लागला होता. लग्नच न करणयाची प्रवृत्ती तरुणांमध्ये दिसू लागली होती. शिक्षणाचा वाढता प्रसार व देशभक्तीचे वारे यामुळे या विचारांचे वेड मुलांच्या डोक्यात शिरले. 'मुलांचे बंड' या कादंबरीचे हेच सूत्र आहे. प्रोफेसरांच्या विचारांच्या प्रभावामुळे काही मुले लग्न न करता देशसेवा करण्याचे ठरवतात. त्यावेळी अनेक विवाहित कार्यकर्त्यांची उदाहरणे यशवंत देतो. मात्र लग्न करूनही देशसेवा करता येते असे, अनेक पुढाऱ्यांची उदाहरणे देऊन लेखिकेला सांगायचे आहे.

**स्त्रीशिक्षण :** लग्न म्हणजे सर्वस्व नव्हे, असा विचार तरुणांच्या मनात रुजू लागला होता. शिक्षणाबद्दल प्रेम निर्माण होऊ लागले होते. यशवंतने लग्नाला नकार दिल्यावर गुणप्रभा शिकायचे ठरवते. ती वडिलांना सांगते, 'आपण माझ्या लग्नासाठी लागणारा पैसा माझ्या शिक्षणाकडे खर्च करा. माझ्या मुलालेकरांचे संगोपन मी केलेले पाहण्याऐवजी, रोगी, दुर्बल अशी परमेश्वराची अनाथ लेकरे माझ्या मदतीने वाचतील ती पहा. विश्वकुटुंबात मी माझ्या गुणांमुळेच पुण्य घेईन अशी मला खात्री आहे.' (मुलांचे बंड, पृ. १४) स्वतंत्रपणे विचार करण्याचे सामर्थ्य स्त्रीमध्ये निर्माण झाले ते शिक्षणामुळेच. तरुणांनाही बायकोने शिकावे असे वाटत असे. मित्रांच्या गप्पांमधून अशा विषयांची चर्चा येते. आनंदराव म्हणतो – 'अरे बाबा, ही जुनी खोडं जिथे तिथे आडवी येतात त्याला काय करणार? मी आपल्या पत्नीला अगदी बरोबरीच्या नात्याने वागवितो. पण त्याबद्दल मला कितीक जणांची तरी नासकी कुसकी बोलणी ऐकावी लागतात, याची काही तुम्हाला कल्पना यायची नाही. (मुलांचे बंड, पृ. १६)

थोरांचा विरोध पत्करूनही, आपल्या पत्नीला बरोबरीच्या नात्याने वागवा असे लेखिकेने सांगितले आहे. पण त्याचबरोबर समानहक्कांचा आग्रह धरताना स्वातंत्र्याचा गैरवापर स्त्रियांनी करू नये, अशी सूचनाही सहजसंवादातून केली आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समाजात स्थान मिळाले की स्त्री आपल्या

स्वातंत्र्याला विधायक कार्यक्रमासाठी उपयोगात आणू शकते. यमू म्हणते, 'खरे स्वातंत्र्य बायकांना कोणत्या प्रकारचे पाहिजे हे सांगायचे आहे. पुरुष व्यसनांत पैशांचा अपव्यय करतात तसाच स्त्रियांनीही करावा असे नाही, तर योग्य कारणासाठी स्त्रियांना हक्काने द्रव्य मिळाले पाहिजे.' स्त्रीस्वातंत्र्याचा प्रारंभ आर्थिक स्वातंत्र्यापासून सुरू होतो. याचा विचार १९२१ सालीच स्त्रियांनी केला होता. समानतेच्या पातळीवरच स्त्रियांना स्वातंत्र्य मिळू शकते याची जाण या कादंबरीतून दिसते. स्त्रियांच्या हट्टीपणाचे, असमंजसपणाचे कारण शिक्षणाचा अभाव होय. लेखिका म्हणते, 'पुरुषांनी जर स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांची मनं सुसंस्कृत केली नाहीत तर स्त्रियांनी तरी काय करावे? त्यांना जर नेहमी ताटाखालच्या मांजराप्रमाणे वागवलं जात असेल तर त्याचा परिणाम असा (हट्टीपणात) होणारच. प्रेमाने प्रेम वाढते. हट्टाने हट्ट वाढतो.' शिक्षण आणि समानतेच्या आधारामुळे स्त्रीमध्ये आत्मविश्वास वाढेल, ती जबाबदारीने वागेल असा या लेखिकांना विश्वास आहे. गृहिणींना मिळणाऱ्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्यासाठी 'मुलांचे बंड' मध्ये यमू सेविकाश्रम चालविते. या आश्रमातून शिक्षण, स्वच्छता, यासंबंधी कार्य चालत असे. त्यामध्ये पारशी, गुजराथी, धनिक स्त्रिया व अंत्यज स्त्रिया सुद्धा काम करीत असत. हे लेखिकेने काळाच्या पुढे टाकलेले एक पाऊल होते.

मातृत्वाची चाहूल ही स्त्रीच्या दृष्टीने नेहमीच विशेष कौतुकाची गोष्ट असते. त्या अनुषंगाने येणारे वैयक्तिक सोहळे (डोहाळेजेवण) ही त्याकाळात स्त्रीच्या दृष्टीने आनंदाची घटना ठरत असे. परंतु या कार्यक्रमांनाही लोकाभिमुख स्वरूप देण्याची योजना तत्कालीन कादंबऱ्यांतून मांडली गेली. यमुनेच्या सासूबाई यमुनेचं डोहाळेजेवण ठरवतात. पण त्या सर्व खर्चात यमुना गरिबांना जेवण देते. तसेच डॉक्टर गुणवतीला मुले झाले नाहीत, पण वांझ म्हणून तिची अवहेलना झालेली लेखिकेने दाखविली नाही. उलट गरीब बाया गुणवतीला म्हणतात – 'तुमच्या कृपेने ही मुले पुन्हा आम्हाला दिसली, मग ती आमची कसली? तुमचीच ती!' (मुलांचे बंड, २३९) वास्तवात निपुत्रिक स्त्रीकडे इतक्या उदारपणे पाहण्याची त्याकाळी समाजाची वृत्ती नव्हती. तरीही अशा वेळी वांझपणा हा स्त्रीदोष नव्हे, तेव्हा तिच्या मनाची काळजी घेणे इतरांचे काम आहे, असा मानवतावादी दृष्टिकोन लेखिकेने येथे स्वीकारला आहे.

'मुलांचे बंड' च्या लेखिका यशोदाबाई भट तत्कालीन लेखिकांमध्ये बऱ्याच धीट होत्या. समाजकार्यकर्त्या व उत्तम वक्त्या होत्या. त्यामुळे सर्वसामान्य

लेखिकांपेक्षा त्यांच्या लेखनात विशेष आत्मविश्वास जाणवतो. कादंबरीपूर्वी दोन शब्द लिहून त्यांनी आपल्या लेखनाचे प्रयोजन स्पष्ट केले आहे. यशोदाबाई म्हणतात – ' वाचकांस शृंगाररसात डुंबावयास सोडण्यापेक्षा कर्तव्याच्या मार्गावर आणून सोडणे हेच या काळात खऱ्या लेखक-लेखिकांचे आद्य कर्तव्य आहे, असे माझ्या अल्पमतीस वाटते आणि म्हणूनच तसा थोडासा प्रयत्न मी या पुस्तकाच्या उत्तरार्धात केला आहे. प्रस्तुत पुस्तकात मी आश्रम व संस्था रेखाटल्या आहेत, परंतु त्या भविष्यकाळी कर्तबगार बंधुभगिनी चालवतील तेव्हाच माझ्या लिहिण्याचे सार्थक झाले असे मला वाटेल. '

समाजजीवनाबद्दल काही अपेक्षा व्यक्त करून लेखिका आपले मनोगत संपवते. गांधीजींचे महिलाश्रम प्रत्यक्षात सुरू होण्यापूर्वी लेखिकेने कादंबरीत आश्रम व संस्था रेखाटल्या त्यावरून यशोदाबाईंचे लेखक म्हणून द्रष्टेपण सिद्ध होते.

साहित्यसम्राट न.चिं. केळकर यांनी प्रस्तावनेत समाजातील वास्तव आणि साहित्यातील वास्तव याचे नाते सांगितले आहे. ते म्हणतात, ' स्त्रियांच्या कर्तृत्वाचा उच्च दर्जा जरी एका स्त्रीने वर्णिलेला असला तरी तो पुरुषवर्गासही पटेल असाच वर्णिलेला आहे. '

सुप्रसिद्ध कादंबरीकार नाथमाधव तर आपल्या अभिप्रायात म्हणतात – ' येथे समाजाचे खरेखुरे कौशल्यपूर्ण चित्रण केले आहे. प्रत्येक सुशिक्षित म्हणविणाऱ्या व्यक्तीने ही कादंबरी अवश्य वाचून मनन करावी आणि आपल्या घरातील स्त्रियांकडून पारायणाने वाचून घ्यावी अशी विनंती आहे. असो. '

सौ. अवंतिकाबाई गोखले, त्या काळातील प्रख्यात विदुषी. त्यांनी लेखिकेच्या निरीक्षणशक्तीचे कौतुक केले आहे व कादंबरीबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. समाजातील मान्यवर स्त्री-पुरुषांनी या कादंबरीतील नवीन विचारांची भलावण केलेली आहे.

' मुलांचे बंड ' मध्ये लेखिकेने नवीन विचार मांडले आहेत. तसेच उपयुक्त अशा जुन्या प्रवृत्तींचा वारंवार गौरव केला आहे. तरुण पिढीची जी मते लेखिकेने मांडली आहेत ती त्या काळातील सुधारणा व व्यवहार यांची नेमकी सांगड घालतात. ही कादंबरी विषय आणि भाषा या दोन्ही बाबतीत पूर्वीच्या कादंबऱ्यांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण आहे. शिक्षण आणि शिक्षणाचा उपयोग यांची उदाहरणासहित चर्चा केली असूनही कथानकाला रटाळपणा आलेला नाही. काळाच्या मानाने ज्या नवीन समाजप्रवृत्ती कथानकातून आल्या आहेत

त्या लेखिकेच्या विचार-परिपक्वतेची ग्वाही देतात.

कमलाबाई सोहोनी यांची 'कुठे ?' ही कादंबरी म्हणजे शिकण्यासाठी धडपडणाऱ्या सरलची जीवनकहाणी आहे. सरलच्या शिक्षणामध्ये अडथळे आणणाऱ्या स्त्रियांची या कथेला पार्श्वभूमी आहे. शिकताना तिला त्रास देणाऱ्यांत पहिली तिची बहिणच होती. स्त्री-शिक्षणाचे महत्त्व व त्यातील अडचणी यांचा लेखिकेने आस्थेने विचार केलाच आहे. त्याचबरोबर स्त्रियांच्या सुखलोलुप प्रवृत्तीकडेही गंभीरपणे पाहिले आहे. या प्रवृत्ती बदलण्याची तळमळ नायिकेच्या व्यक्तिमत्त्वातून व्यक्त झाली आहे. मुलींवर नीटसे संस्कार न करणारे पालक, त्यांच्या शिक्षणात अडथळा आणणारे महाभाग व शिक्षणाच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळे होऊन बेताल वागणाऱ्या मुली यांचे प्रश्न लेखिकेने मांडले आहेत. साहजिकच स्त्रीजातीतील दोष दिग्ददर्शनावर भर दिला गेला आहे. त्यामध्ये काही वेळा अतिरेकही आढळतो. आटोपशीर व मोजक्या शब्दांत प्रसंग रंगविण्याची कला लेखिकेला साधलेली नाही. त्यामुळे एक चांगला विषय सदोष मांडणीमुळे अनाकर्षक झाला आहे.

कादंबरीच्या प्रारंभकालात जानकीबाई देसाई यांनी सातत्याने लेखन केले आहे. १९२० पर्यंत ६ कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. त्यानंतर अघोर पातक (१९२४), मूकनायिका (१९२५) या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. पारंपरिक कथानकात आणि विचारात या कादंबऱ्या गुरफटल्या आहेत. त्यामुळे तत्कालीन सर्वसामान्य समाजप्रवृत्ती त्यांतून दिसते. आणि मधेच, एखादी नवीन विचारांची शलाका चमकून जाते. धर्म व जातिसंबंधीचे सहजदर्शन यातून घडते. धर्मांतर जसे गरिबीमुळे होत असे तसेच जातिभेदांमुळेही होत असे.

आपल्या हक्कासाठी प्रत्येकजण जागरुक असतो, पण कर्तव्यासंबंधात मात्र उदासीन असतो. 'अघोर पातक' ही कादंबरी म्हणजे मित्राच्या स्वार्थीपणाची व विश्वासघातकी स्वभावाची कहाणी आहे. औद्योगिक क्रांतीनंतर समाज व्यक्तिवादी बनत गेला त्यामुळे स्वार्थीपणा ही समाजप्रवृत्तीच बनलेली दिसते.

मुलीचे लग्न ठरविण्याची पालकांना इतकी निकड असते की सारासार विचारशक्तीला सोडून काही निर्णय पालक घेतात. 'मूकनायिका' मध्ये धोंडोपंतांची मोठी मुलगी भागीरथी बहिरी, मुकी व दिसायला बेताची असते. धाकटी गंगू सुंदर असल्यामुळे तिचे लग्न विद्याधरशी ठरते. परंतु मोठीला कुंवार ठेवून धाकटीचे लग्न करून देणे त्यांच्या आईला ठीक वाटत नाही. गावातले

विद्वानही धोंडोपंतांनी धाकटीचे लग्न आधी ठरवले म्हणून त्यांना वाळीत टाकण्याचे ठरवतात. म्हणून धोंडोपंत मूळ मुहूर्तापूर्वीच बुरखा घालून भागीरथीचे लग्न विद्याधरशी उरकतात व नंतर लगेच दोन तासांनी धाकट्या गंगूचे लग्न करण्याचा बेत ठरवतात. पण पुन्हा लग्न करण्यास नवरामुलगा विद्याधर तयार होत नाही. त्यामुळे शांतारामशी गंगूचे लग्न होते. या ठिकाणी दाखवलेला प्रसंग अवास्तव मुळीच नाही. कारण आपल्या मुलीला पैसे देऊन दुसऱ्याच्या पदरात घालणारी अनेक मंडळी असतात. "मुलीच्या गळ्यात मंगळसूत्र बांधा आणि नंतर टाकून दिली तरी चालेल, पण तिच्या कुंकवाला धनी मिळावा" अशी इच्छा धरणारे हतबल आईबाप १९२८-२९ मध्ये प्रत्यक्ष आढळत असल्याचे, आज अनेक वृद्ध सांगतात. मुलीचे लग्न जमणे त्रासदायक असल्याने, आपल्याच मुलींच्या बाबतीत अशी बनवाबनवी करण्याची वेळ नाइलाजाने पालकांवर येते. जानकीबाई देसाई यांच्या कादंबऱ्यांतून स्त्रीसुधारणेचा अट्टाहास नाही, अन्यायाचा निषेध नाही, पण प्रखर समाजदर्शन व विचारी स्त्रीच्या चिंतनशीलतेची बैठक या कादंबऱ्यांना आहे आणि तत्कालीन स्त्रीजीवनाच्या संदर्भात ही गोष्ट निश्चितपणे स्वागतार्ह आहे.

शिक्षणामुळे स्त्रीचा जीवनविषयक दृष्टिकोन बदलू लागला. तिच्या विचारांना संसाराच्या चार भिंतीपलीकडच्या जगाचे भान आले होते. आदर्श गृहिणीच्या पारंपरिक चौकटीत न बसणारी नायिका मात्र समाजाकडून स्वीकारली जाणे अवघड होते. त्यामुळे पिरोज आनंदकरांच्या 'माझं बाळ ते!' (१९२७) कादंबरी ने काही काळ खळबळ माजवली. मातृत्वापेक्षा समाजकार्याचे महत्त्व अधिक मानणाऱ्या सेवाभावी सारजेची ही कहाणी आहे. वात्सल्य, प्रीती या मनुष्याच्या सहजप्रवृत्ती आहेत. मातृत्व, विवाह या जीवनपद्धतीमधून त्या व्यक्त होतात. कुटुंबाच्या या मूलभूत गोष्टींसंबंधी स्वतंत्र विचार मांडण्याचे धाडसही लेखिकेने केले आहे. सारजाला दिवस जातात. मातृत्वभावनेपेक्षा तिच्यामध्ये सेवावृत्ती प्रबळ होती. त्यामुळे या घटनेने ती व्यथित होते. सारजा म्हणते — "एका मुलाच्या खस्ता खाण्यासाठी, माझ्या अज्ञानी भगिनींच्या सेवेपासून मी च्युत होणार ही कल्पनाच मला असह्य वाटते."

'पण सारजाबाई, देशाला एक सुपुत्र लाभून देणे ही कामगिरीसुद्धा तुमच्या अज्ञान-भगिनी-सेवेइतकीच महत्त्वाची आहे,' असे कमलाबाई सांगतात.

सारजा - 'कोणत्याही अनाथ मुलाला वाढवून आपल्या मनाजोगे शिक्षण त्याला देऊन, देशाला एखाद्या सुपुत्राची ओवाळणी घालता येईल. पण

आपल्यालाच पुत्र व्हावा एवढा तुमचा अट्टाहास का ?' ('माझं बाळ ते', पृ. ५६)

मातृत्व व समाजसेवा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न लेखिकेने येथे केला आहे. स्वत:ची मुलंबाळं वाढवून, एकाच संसारात खस्ता खाण्यात स्त्रीचा सारा वेळ जात असे, त्यापेक्षा संसाराच्या ज़बाबदाऱ्या व वाढवता समाजसेवा करण्यामध्ये वेळेचे सार्थक होईल असे मानणे ही अभिनव कल्पना होती. मातृत्व या सहजप्रवृत्तीला लोकसेवेचे विश्वात्मक रूप लेखिकेने दिले आहे.

शिक्षणाचा उपयोग विधायक कार्यासाठी व्हावा अशी नवीन प्रवृत्ती प्रचलित होऊ लागली होती. समाजकार्यासाठी बाहेर पडणाऱ्या स्त्रीचे मन मुलांमध्ये अडकलेले असल्यामुळे तिची फार ओढाताण होऊ लागली. शिकलेल्या तरुण पिढीसमोर हे प्रश्न नव्यानेच निर्माण झाले होते. या नवनवीन समस्यांची मांडणी पिरोज आनंदकरांनी केली आहे. गृहव्यवस्था हाच मुळी स्त्रियांचा पैसे मिळविण्याच्या योग्यतेचा व्यवसाय मानला पाहिजे. उत्कृष्ट गृहसौख्य त्यामुळेच लाभू शकते हे लेखिकेने सांगितले आहे. पण श्री. माधवात्मज यांनी 'गृहलक्ष्मी' मासिकात (१९२९) त्यावर टीका करताना म्हटले आहे की, 'गृहव्यवस्थेला प्राधान्य देऊन समाजसेवाही करता येते असे लेखिकेने दाखवायला हवे होते.'

कादंबरीची भाषा सोपी आणि ओघवती आहे. तसेच व्यक्तिचित्रनिर्मितीचे लेखिकेचे सामर्थ्य उल्लेखनीय आहे. समाजसुधारणेसाठी घराबाहेर पडणाऱ्या सारजाचे काही मुद्दे बिनतोड आहेत. स्वत:ला मूल होऊ न देता, किंवा मूल होणारच नसेल तर अनाथ मुलांना दत्तक घेऊन आधार द्यावा ही अलीकडच्या काळातील कल्पना लेखिकेने ६० वर्षांपूर्वी मांडली ही विशेष कौतुकाची बाब म्हणावी लागेल.

काशीबाई कानिटकर यांच्या प्रगल्भतेचा प्रत्यय आपणास 'रंगराव' मध्ये आलाच आहे. 'पालखीचा गोंडा' ही त्यांची दुसरी कादंबरी १९२८ मध्ये प्रसिद्ध झाली. आदर्श स्त्रीराज्याच्या अभिनव कल्पनेतून त्यांनी स्त्रीपुरुषसमानतेचे स्वप्न सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी पाहिले. त्या समानतेच्या दिशेने अजूनही आपल्या समाजाची वाटचाल चालूच आहे.

'पालखीचा गोंडा'मध्ये ताईचे लग्न ठरते, पण फोटोची गडबड झाल्यामुळे खूप श्रीमंत पण वेडा नवरा ताईला मिळतो. मात्र सुदैवाने तिची सासू धोरणी व मनमिळावू होती. तिने मुलाच्या ऐवजी आपल्या सुनेला संस्थानच्या गादीवर

बसविले. वास्तविक मुलगा व मुलीमध्ये भेदभाव करण्याची, एवढेच नव्हे, तर सून आणि मुलीला वेगवेगळी वागणूक देण्याची प्रवृत्ती सर्वत्र दिसते. काशीबाईंनी मात्र सुनेलाही मुलीप्रमाणे मानणारी आदर्श सासू रंगवली होती. सासूबद्दल ताईलाही कृतज्ञता वाटत होती. स्त्रीशक्तीची जाणीव ठेवून लेखिकेने स्त्रीला एक नवे क्षेत्र निर्माण करून दिले आहे.

काशीबाईंच्या कल्पनेतील आदर्श शहराचे, राज्यव्यवस्थेचे दर्शन त्यांनी या कादंबरीत घडविले आहे. जे जीवन आहे, त्याचबरोबर ते कसे असावे, त्या कल्पनेप्रमाणे रंगविणे ही तत्कालीन लेखकांची भूमिका काशीबाईंनी अवलंबिलेली दिसते. विचारांचे पुरोगमित्व आणि भाषेचा डौल हे काशीबाईंचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. घरगुती संवाद जेव्हा काशीबाई रंगवतात तेव्हा त्याला खुसखुशीत विनोदाची साथ मिळते. काशीबाई एका ठिकाणी म्हणतात – 'बदली झाली की बायका बासनात पाट्यावरवंट्यासह सामान घेऊन जात असत. वेळ पडली तर हात धुवायला स्वयंपाकाची मोरीही बायका बरोबर घेऊन जातील.' अशा प्रकारे विनोदाचा शिडकावा करणारे संवाद कादंबरीत अनेक ठिकाणी आहेत. मुलींच्या भावल्यांचा खेळ, ठकीचं सांसारिक दुःख चित्रमय भाषेत वर्णन केलं आहे. उत्तरार्धात 'पालखीच्या गोंड्याचे' संस्थानी वातावरणही हुबेहूब उभे केले आहे. दरबारी वर्णन, प्रवासातील निसर्गशोभा यांच्या वर्णनात काशीबाईंनी उपमा-उत्प्रेक्षांची उधळण केली आहे. स्वातंत्र्य व समतेचा विचार करताना पुरुषांवर मात करण्याची वृत्ती मात्र लेखिकेमध्ये दिसत नाही. वाचकांना जुन्या वातावरणात नेऊन नवीन विचार त्यांच्यापुढे मांडणारी ही कादंबरी 'नवयुग' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झाली आणि पुढे तरुणांमध्ये लोकप्रिय ठरली.

'हाच का धर्म?' (१९३०) ही शांताबाई नाशिककरांची कादंबरी नावावरूनच त्याचे प्रयोजन सांगून जाते. हिंदुधर्मातील रूढी, निराधार समजुती, घातक चालीरीती ही 'श्रद्धा' या प्रवृत्तीचीच भिन्न रूपे आहेत. श्रद्धेमागील कारणमीमांसा शोधून, श्रद्धा डोळस असावी असा आग्रह लेखिकेने धरला आहे. 'हाच का धर्म?' मध्ये यशवंत, त्याची आई व काकू वगैरेंना घेऊन तीर्थयात्रेला जातो. यात्रेतील अनुभवांतून धर्मविचार मांडले गेले आहेत.

सोवळ्या-ओवळ्याचे प्रस्थही त्याकाळी फारच होते. सोवळ्या झालेल्या विधवा स्त्रिया घरोघरी होत्या. 'हाच का धर्म?' मधील १५ वर्षांच्या विधवा रंगूताईला सासू छळते म्हणून आई माहेरी आणते. पण तिला सोवळे केले नाही म्हणून लोकांची चर्चा होते व १७ व्या वर्षी तिला सोवळे व्हावे लागते.

शांताबाई लिहितात – 'सोवळे म्हणजे अंतर्बाह्य पावित्र्य किंवा निर्मलता. शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य राखावयाचे, हा त्या सोवळ्याचा उद्देश कुठल्या कुठेच राहून कोत्या मनातून निघालेल्या भलभलत्या कल्पना रूढ होऊन, त्या कल्पना हट्टाने पाळीत राहणे हाच सोवळ्याचा अर्थ होऊन बसला आहे'. लेखिकेने या सोवळ्याच्या प्रथेचे खंडण केले आहे.

अंधश्रद्धेचे एक सर्वसाधारण रूप म्हणजे बुवाबाजी. हे साधूमहाराज काही वैज्ञानिक प्रयोग दैवी चमत्कार म्हणून करून दाखवतात. स्वा. सावरकरांसारख्या विज्ञाननिष्ठांच्या लेखांच्या प्रभावामुळे तरुण जागे होऊ लागले होते. येथे कादंबरीत धर्माचे विवेचन करणाऱ्या यशवंताला बुवामहाराजांचा खोटेपणा समजला आहे.

शांताबाईंनी धर्मांतर समस्येची माहिती देऊन त्या दिशेनेही सुधारणेचे पाऊल उचलले आहे. अंधश्रद्धा आणि स्वधर्माभिमानाचा अभाव व गरिबी यामुळे अन्यधर्मियांपेक्षा हिंदूंमध्ये धर्मांतर करण्याची प्रवृत्ती अधिक दिसून येते. 'व्यसनी बाळासाहेब धर्मबाह्य खाणं-पिणं करीत होते तेव्हा त्यांना कोणी धर्मबाह्य म्हटले नाही. पण लौकिक विधीने त्यांनी धर्मांतर केले त्याबरोबर ते अहिंदू ठरले. पुन्हा ते शुद्धीकरणाने हिंदू झाले. त्यांचे वर्तनही शुद्ध झाले. पण त्यांना हिंदूधर्मीय 'आपले' म्हणण्यास तयार नव्हते, ही घटना हिंदुधर्मियांची धर्मविषयक प्रवृत्ती दाखवते.'

'हाच का धर्म'? मधील यशवंत, धर्माबद्दल विशेष चिंतन करतो. शिक्षण पूर्ण झाल्यावर तो हिंदू मिशन काढतो. शुद्धिसंस्कार, धर्मांतरास आळा, अनाथाश्रम अशी त्याची ध्येये असतात. देवपूजा ही मन:शांतीसाठी साधनस्वरूप आहे हे लेखिकेने स्पष्ट केले आहे. नव्या-जुन्याचा समन्वय साधण्याचा लेखिकेचा आग्रह दिसतो. 'जातीयता' या प्रवृत्तीकडेही लेखिकेने डोळसपणे पाहिले आहे. जातीयता नाहीशी व्हावी हे लेखिकेला पटले आहे. पण या जातिभेदाची पाळेमुळे उखडणे अवघड आहे हेही शांताबाईंनी ओळखले आहे.

विचारपर्वातील स्त्रीजीवन पाहिले तर विवाह मुलीचे लग्न या एका घटनेतून अनेक तत्कालीन प्रवृत्ती निर्माण होतात. त्यासाठी 'लग्नाचा बाजार' (१९२९) ही कादंबरी शांताबाईंनी लिहिली. येथे विषमविवाह, प्रीतिविवाह, हे विषय आहेत. तसेच उशिरापर्यंत लग्न न जमणाऱ्या शिकलेल्या मुलीची व्यथा आहे. बेजबाबदार पतीच्या पत्नीची वेदना आहे. हुंड्याची समस्या आहे. विधवाविवाहाचा प्रश्नही आहे. मुलीला दाखवायला नेणे या समारंभाचा लेखिकेने

निषेध केला आहे. हुंड्याचा विरोध करताना मुलींनाही लेखिकेने दोष दिला आहे. - 'आणि मुली काय कमी दोषी आहेत? सगळ्यांनाच पाहिजे I. C. S. मग मागणीच्या मानानं त्यांचा भाव वाढला हे साहजिकच आहे.' 'हुंड्याच्या हजारागणिक आपली किंमत कमी होत आहे याची या I. C. S. साठी हपापलेल्या मुलींना जाणीव नसते, (लग्नाचा बाजार, पृ.१९) तरुणींच्या या संवादातून, मुलींनी हुंडा देऊन आणि किंमत कमी करून घेऊ नये असा स्वाभिमानी विचार लेखिकेने मांडला आहे.

हुंडा देऊन, मानपान करून, मुलीचे लग्न लावून दिले तरी मुलीला नीट नांदवतील का नाही याची काळजी मुलीच्या पालकांना असे. परित्यक्तांचा प्रश्नही येथे हाताळला आहे. 'निरपराध स्त्रीला टाकून देऊन दुसरे लग्न करणाऱ्या नरपशूला समाजाने खुनी माणसाप्रमाणे वागवले पाहिजे आणि कायद्याने त्याला सक्त मजुरीची शिक्षा द्यायला पाहिजे,' अशी कडक भाषा वापरून दुसरे लग्न बेकायदेशीर ठरवण्याचा आग्रह शांताबाईंनी धरला आहे. दुसऱ्या लग्नाला वारंवार विरोध करून लेखिकांनी समाजमन जागृत केले, त्याचा परिणाम म्हणजे पुढे द्विभार्याप्रतिबंधक कायदा झाला. विधवांची स्थिती शांताबाईंनी वर्णन केली व विधवांनी कुंकू लावावे असा आग्रहही धरला. समाजातील बोलक्या सुधारकांचा उल्लेख स्पष्ट शब्दात शांताबाईंनी केला आहे. नायिका सुलोचना विधवाविवाहासंबंधी ५-६ पानी विस्तृत निबंध वाचते. 'पुनर्विवाहाला मोकळीक मिळाल्यास कमकुवत स्त्रियांचा अनीतीपासून बचाव होईल' असे सांगून पुढे लेखिका म्हणते, 'पैशाच्या अभावी विधवा, दुर्दैवाच्या परमावधीला पोहोचतात. पती मेला की पोटात काय हा भयंकर प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहतो. याला उपाय म्हणजे पतीची निम्मी इस्टेट पत्नीला सुलभतेने मिळाली पाहिजे.' स्त्रियांच्या हक्काची जाणीवही शांताबाईंनी करून दिली आहे. स्त्रियांना सुखी करण्याचे व्रत घेऊनच शांताबाई नाशिककरांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या होत्या. 'स्त्रियांना प्रोत्साहन देऊन, त्यांच्याकडून लिहून घेऊन, त्यांच्या बुद्धिमत्तेचे श्रेय महिला विजय-ग्रंथमालेने घेतले आहे.' अशा शब्दात सुप्रसिद्ध लेखिका यमुनाबाई हिर्लेकर या प्रकाशनमालेचा गौरव करतात.[११] परीक्षणे पाहता, कादंबऱ्यांची भाषा, मांडणी या कलात्मक गोष्टींना दुय्यम स्थान दिले जात असे, हे लक्षात येते. मुख्य महत्त्व या कथावाङ्मयातून प्रस्तुत केलेल्या विचारांना होते. त्यादृष्टीने शांताबाईंच्या कादंबऱ्यांची दखल टीकाकारांनी सविस्तरपणे घेतलेली दिसते.

या कादंबरीपूर्वी महिला विजय-ग्रंथमालेतून मामा वरेरकर यांनी लिहिलेली 'विधवाकुमारी' ही कादंबरी प्रसिद्ध झाली होती तेव्हा अनेक टीकाकारांनी शांताबाईंच्या कादंबरीची तुलना मामांच्या कादंबरीशी केलेली आढळते. स्त्रीनेच स्त्रियांचे प्रश्न मांडून साधलेले औचित्य बाळूताई खरे यांना कौतुकास्पद वाटते. स्त्री आणि पुरुष यांच्या कल्पनाशक्तीमध्ये व विचारमांडणीमध्ये त्याच्या स्वभावधर्माइतकाच फरक असतो. म्हणून या कादंबरीचे विशेष महत्त्व आहे. शांताबाईंच्या या कादंबरीने सुधारकांच्या सनसनाटी वाङ्मयाच्या अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत, तसेच सामान्य जनतेलाही तिने वैचारिकदृष्टय़ा कंटाळवाणे डोस पाजले नाहीत. अशी ही मध्यममार्गी कादंबरी होती.

'हाच का धर्म?' ही कादंबरी आकाराने मोठी आहे तशीच विषयाची विविधताही त्यामध्ये आहे. धर्म या विषयावर विचारप्रवर्तक असे दहा-बारा लेख लिहून त्याचे संकलन करावे त्याप्रमाणे कादंबरीचे स्वरूप आहे. परकीय राजसत्तेच्या आश्रयाखाली ख्रिश्चन धर्मियांना उदार आश्रय मिळत होता. त्याचवेळी खडतर आचारधर्म म्हणजे धर्म अशी हिंदूधर्मियांची समजूत होती. अशा वेळी धर्मसंस्थेतील प्रत्येक घटनेचा स्वतंत्रपणे अभ्यास लेखिकेने येथे केला आहे. धर्मविषयक कल्पना स्पष्ट करणे ही काळाची गरज होती. निबंधासारख्या रूक्ष विषयाकडे सामान्य लोक वळूनही पाहात नाहीत. म्हणून लेखिकेने आपली शास्त्रशुद्ध मते कादंबरीतून लोकांसमोर ठेवली. केवळ कलाकृती म्हणून कादंबरीची निर्मिती येथे झाली नाही, तर अनेक समाजप्रवृत्तींचे सम्यक् दर्शन घडविण्यासाठी कादंबरी हा वाङ्मयप्रकार वापरण्यात आला.

(बदलत्या समाजजीवनाला सामोरे जाताना स्त्रीजीवनात काही स्थित्यंतरे घडणे अपरिहार्य होते.| असफल असमाधानी विवाहितांसाठी कमलाबाई बंबेवाले यांनी एक पाऊल पुढे टाकले. 'बंधमुक्ता'(१९३०) या कादंबरीतून त्यांनी घटस्फोटाची जोरदार मागणी केली.

|शिक्षणामुळे स्त्री अधिक विचारी व समंजस बनली. दुर्दैवाने संसारातील जोडीदाराची साथ चांगली मिळाली नाही तर मात्र तिचे दु:ख अशिक्षित बाईपेक्षा अधिक म्हणावे लागते. सामान्य स्त्रीला स्वसामर्थ्याची जाणीव नव्हती. त्यामुळे अपमानाचे दु:खही कमी होते./ 'बंधमुक्ता'मध्ये सुशिक्षित आई-वडिलांनी उषाच्या संमतीने तिचे लग्न करून दिले. पण तिचा नवरा व्यसनी व दुर्वर्तनी असतो. उषाला तो माहेरी पाठवतो. उषा सुधाकडे राहू लागते. सुधाचा भाऊ प्रभाकर व उषा यांना कालांतराने एकमेकांबद्दल ओढ वाटू लागते. परंतु विवाहित

स्त्रीने परपुरुषाचा विचार करणे पाप आहे, या संस्कारामुळे ती अस्वस्थ होते. प्रभाकरही उषा आपली नव्हे असे मनाला पटवीत असतो. उषाच्या नवऱ्याच्या पुनर्लग्नाची बातमी पेपरमध्ये येते व उषा-प्रभाकरचे मीलन होते. परंतु घटस्फोटाचा कायदा नसल्याने धर्म बदलून ते एकत्र येतात. घटस्फोट आवश्यक आहे हे लेखिकेला पटवून द्यायचे आहे. विवाहविस्फोटाचा कायदा झाला तर सर्वच बायका संसार उद्ध्वस्त करून निघून जातील, असा बेजबाबदार प्रचार समाजात होऊ लागला. धर्मसत्तेला डावलून समाजोपयोगी निर्णय घेताना संघर्ष अटळ असतो याची जाणीव ठेवून सुधा-प्रभाकर व उषा यांनी घटस्फोटासाठी काही अटी तयार केल्या. व्यभिचारी, नपुंसक, गुन्हेगार, व्यसनी माणसाच्या स्त्रीला घटस्फोट मिळावा, पोटगी मिळावी, अल्पवयीन संततीची मालकी मातेकडे असावी, अशा त्या अटी कादंबरीतून मांडल्या गेल्या.

नायक-नायिकेने प्रेमासाठी कायदा मोडून केलेला विवाह यशस्वी होईल की नाही याबद्दल लेखिका साशंक असावी. दुसरे लग्न केलेल्या उषाच्या नवऱ्याने उषेविरुद्ध दावा लावला, त्याचा निर्णय कायद्याच्या चौकटीत असणार. तो मान्य करणे लेखिकेला जड गेले असते. उषाच्या मुलीलाही अनौरस म्हणून जगावे लागले असते. या सर्वांचे निराकरण करणे लेखिकेला शक्य नव्हते म्हणून नायक- नायिकेचा मृत्यू दाखविला.

विवाहबंधने झुगारून देणारा हा क्रांतिकारी विचार तत्कालीन समाजाला मात्र फारसा पटलेला दिसत नाही. क्वचित कधी माणुसकीही विसरायला लावणारा पातिव्रत्य धर्माचा पगडा, समाजावर किती होता हे तेव्हाच्या परीक्षणामधून दिसते. ‘पुरुषांनी बंधने झुगारली तरी आर्य स्त्रियांनी एकनिष्ठा ठेवली आहे हेच त्यांचे वैशिष्ट्य आहे. पुरुषांस काही बंधने घालावी या कायद्याने स्त्रियांनी आपल्याच हातांनी आपल्या पायावर धोंडा पाडून घेतल्यासारखे होणार आहे.’ घटस्फोटाची सोय नसल्यामुळे शेवटी नायक-नायिका धर्मांतर करून विवाह करतात त्यासंबंधीही टीकाकार म्हणतात, ‘लग्नासाठी धर्मांतर करणारी नायिका आदर्श नव्हे. ‘स्वधर्मे निधनं श्रेय:’ हे त्रिकालाबाधित भगवद्वचन आहे, ते हृदयाशी कवटाळून हाल-अपेष्टा भोगण्यास तयार असलेल्या भारतवर्षातील स्त्रियांचे हे शील नव्हे.’

स्त्री-सुधारणेच्या धोरणाने चाललेल्या ‘स्त्री’सारख्या मासिकातही या कादंबरीतील विचारांना फारसा अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. यावरून तत्कालीन समाजाच्या मनोवृत्तीची कल्पना येईल. हिंदूविवाह कायद्यामध्ये

तत्कालीन स्त्रीची जी कोंडी होत होती ती लेखिकेने हृदयस्पर्शी भाषेत मांडली आहे. 'बंधमुक्ता' हिचे वर्णन 'हेतुप्रधान व मतपरिवर्तक कादंबरी' असे प्रकाशकाने केले आहे. घटस्फोटाच्या कायदेशीर आवश्यकतेबद्दल पहिली कादंबरी प्रसिद्ध करण्याचा मान या मनोरमा ग्रंथमालेकडेच जातो. तत्कालीन लेखिका सामान्यपणे मध्यमवर्गीय उच्चभ्रू समाजातील होत्या. घटस्फोटाच्या कायद्यासंबंधी त्यांनी सांगोपांग चर्चा केली आहे. मात्र कायदा मोडून निर्णय घेण्याचे धाडस मध्यमवर्गीयांत नव्हते. त्यामुळे कायद्याचा निर्णय समजला नाही तेव्हा नायक- नायिका आत्महत्या करतात. हा शेवट मध्यमवर्गीय प्रवृत्तीची आठवण देत राहतो.

इंदिराबाई सहस्रबुद्धे यांच्या 'बाळूताई धडा घे' (१९३१) या कादंबरीत सोनूची आत्मकथा आली आहे. वडिलांच्या प्रोत्साहनाने सोनू शिकते. स्वतंत्रपणे विचार करण्याइतकी सोनूची बुद्धी प्रगल्भ असते. सोनूचे भास्करवर प्रेम असते. पण तो गरीब म्हणून तिच्या आईवडिलांचा विरोध असतो. तिचे सुधारक वडील दुसऱ्या श्रीमंत माणसाशी तिचे लग्न ठरवतात. पती चांगला असूनही मनाविरुद्ध झालेल्या लग्नामुळे सोनू सुखी होत नाही. सोनूच्या आयुष्याचा खेळखंडोबा होतो. कादंबरीच्या प्रारंभी सोनू अर्पणपत्रिका सादर करते, ती पुढीलप्रमाणे -

'सर्व अविवाहित मुलींना,  
आणि त्यातही त्यांच्या जन्मदात्यांना,  
-विशेषत: स्वत:ला सुधारक म्हणविणाऱ्या जन्मदात्यांना,  
मी - अर्थातच विशिष्ट अपेक्षेने - अर्पण करीत आहे.

सोनू.

ही अर्पणपत्रिका, कादंबरीचे नाव, यांतून लेखनाचा उद्देश स्पष्ट होतो.

सोनूचे मन संसारात रमत नाही. मनात भास्कर असताना आपल्याला तात्यारावांपासून मूल नको, असे सोनूला वाटत असते. ती म्हणते, 'मी पोटासाठी व सुखासाठी एक वेश्याच बनले असे मला वाटत असे.' घटस्फोटाची आवश्यकता मात्र येथेही लेखिकेने व्यक्त केली आहे. संसार करणे असह्य वाटून सोनू माहेरी येते. 'शिक्षण देऊनही तू धड संसार केला नाहीस' म्हणून वडील सोनूवर चिडतात. सोनूला मात्र शिक्षणाचा खूप आधार वाटत होता. तिच्या मनात येते, 'मी साधारण शिकलेली होते तरी देखील माझी अशी स्थिती होती. मग बिचाऱ्या अजाण, अज्ञानी मुलींची काय दुर्दशा उडत असेल.'

सोनू वडिलांना उत्तर देते की, ' स्वतंत्र रीतीने विचार करणे म्हणजे शिक्षणाचा दुरुपयोग नव्हे. स्वतंत्र रीतीने विचार करण्यासाठी व जगाची सुधारणा करण्यासाठीच शिक्षणाचा उपयोग करावयाचा असतो. '

सुधारणा व्हावी, स्त्रियांनी शिकावे हा विचार समाजात मूळ धरू लागला होता. पण या शिक्षणाला, सुधारणेला आपल्या सामाजिक स्थानाला अनुसरून मर्यादा घालणारे सुधारकही बरेच होते. अशा सुधारकांना उद्देशून लिहिलेली ही कादंबरी, महिला विजय ग्रंथमालेने, सामाजिक सुखासंबंधी ब्रीदवाक्य घालून प्रसिद्ध केली. कादंबरी वाङ्मयातील वैचारिक प्रगतीबरोबरच, कलात्मक दृष्ट्याही प्रगतीकडे वाटचाल सुरू झाल्याचे कादंबरी वाचताना जाणवते. कथेमधील कच्चे दुवे दुर्लक्षित करून एकंदर बंदिस्त मांडणीला कादंबरीच्या यशस्वितेमध्ये श्रेय द्यावे लागेल. भाषेतील सहजता वाचकाच्या भावनेला हलविण्याइतकी सामर्थ्यशाली आहे. कथानकातील आटोपशीरपणा त्या कालखंडातील अन्य कादंबऱ्यांच्या तुलनेत लक्षवेधी वाटतो. अन्यथा सोनूबरोबर इतर व्यक्तिरेखांचे स्वभावचित्रण व जीवनदर्शन फार सविस्तर घडविले आहे. ' समाजस्वास्थ्य ' (जुलै १९३१)मधील ' ग्रंथपरीक्षण ' सदरात प्रस्तुत कादंबरीच्या लेखनास धाडसाचे ठरविले आहे. पण त्याचे स्वागतही केले आहे.

मनोरमा ग्रंथमालेमधून १९३१मध्ये इंदिराबाई आंबेगावकर यांची ' उजळलेला हिरा ' ही कादंबरी प्रकाशित झाली. मनोरमा ग्रंथमालेचे गोपाळ गोविंद अधिकारी आपल्या प्रस्तावनेत पुस्तक प्रकाशनाचा उद्देश स्पष्ट करतात, ते म्हणतात, ' पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळवण्याची स्त्रियांची भाषासुद्धा ऐकून घेण्यास पुरुषवर्ग तयार नाही. स्त्रियांनी आता परुषवर्गापासून भांडून हक्क परत घेतले पाहिजेत. स्त्रियांना काय पाहिजे ते त्यांनीच बोलून दाखवले पाहिजे. आणि याच उद्देशाने मी सौ. इंदिराबाई आंबेगावकर यांना कादंबरी लिहिण्याबद्दल विनंती केली होती. '

' उजळलेला हिरा ' ही कादंबरी आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भात अत्यंत बेताची आहे. यामध्ये पद्माकर नावाच्या एका तरुणाने रंकाचा राव होण्यापर्यंतचे चरित्र एका इंग्रजी कथानकाच्या आधारे दिले आहे. लेखनासाठी स्त्रियांना पाठिंबा मिळत होता. प्रकाशक उपलब्ध होते. त्याप्रमाणात दर्जेदार लेखन मात्र झाले नाही असे खेदाने म्हणावे लागेल.

मनोरंजनासाठी परकीय भाषांतरे प्रसिध्द होत असतानाच आपल्या समाजातील काही प्रश्न घेऊन चटकदार कादंबऱ्या लिहिण्याचे श्रेय कुमुदिनी

प्रभावळकर (रांगणेकर) यांना द्यावे लागेल. या कालखंडात कुमुदिनीबाईंच्या 'कर्तव्याची जाणीव' (१९३२), 'अनियमित जग' (१९३४), 'निर्माल्यातील कळी' (१९३५), या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. या कादंबऱ्यांतून काही समाजप्रवृत्तींचा त्यांनी सविस्तरपणे विचार केला आहे. आंतरजातीय विवाह करून मोठेपणा मिरवण्याचे फॅड काही उच्चभ्रू समाजात आले होते. त्यावेळी मुलांचे पालकासाठीही काही कर्तव्य आहे, त्यांच्या मतांचा आदर केला पाहिजे. 'कर्तव्याची जाणीव'चे हे सूत्र आहे. तेथे बोलके सुधारकही आहेत. 'निर्माल्यातील कळी' कादंबरीत वेश्यांचे जीवन आणि त्यांच्यामध्ये निर्माण होऊ लागलेली शिक्षण व विवाह संबंधातील जाणीव यांचे अभ्यासपूर्ण विवेचन आले आहे. वेश्याजीवनासंबंधी त्याकाळात स्त्रीने कादंबरी लिहिणे हे धाडसाचे व कौतुकाचेही म्हणावे लागेल. अंधश्रद्धा, जातीयता, परंपराप्रियता, बुवाबाजी अशा अनेक रूढींच्या विळख्यात सामाजिक विचार गुरफटले गेले होते. जुन्या चालीरीतींचे दर्शन घडवताना लेखिकांनी मात्र प्रत्येक वेळी नवा विचार सुचविला आहे.

'अनियमित जग'मध्ये नायिकेच्या आईला आपल्या पैशाची ऐट असते. गरीब श्रीकांतला त्या चहाच देतात, तर त्यापाठोपाठ आलेल्या श्रीमंत रमेशला श्रीकांतसमोरच केशरी शिरा देतात. श्रीमंतांच्या घरातील वातावरण त्यांच्या कादंबऱ्यांतून प्रामुख्याने दिसते. त्यांच्या नायिका सुखवस्तू कॉलेजकन्यका आहेत. पण देवदासींच्या पितृविहीन मुलींना शिक्षणाचा केवढा आधार असतो हे लेखिका समर्पक शद्बात सांगतात. आपल्या संवादपूर्ण लेखनपद्धतीमधून मूळ कथानकाचा विस्तार करत असताना कुमुदिनीबाई स्वत:च्या तर्काला पटेल त्यापद्धतीने मूळ प्रश्न सोडवत जातात. त्यामुळे घटस्फोट, आंतरजातीय विवाह या प्रश्नांची उत्तरे समाजातील एका विशिष्ट उच्चवर्गालाच तर्कसुसंगत वाटतील. अर्थात आकर्षक, चटकदार, उत्कंठापूर्ण कथानक हीच बाईंची जमेची बाजू लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

कादंबरीमध्ये कथानकाची गुंतागुंत वाढविण्यापेक्षा व्यक्तिरेखांचे विश्लेषण करण्याचे प्रयत्न याकाळात सुरू होऊ लागले होते. आनंदीबाई जयवंत यांच्या 'कुलकथा' (१९३२) मध्येही परिस्थितीशी झगडून स्वावलंबनाने जगण्याची धडपड करणाऱ्या तरुणाची कथा आहे. डेव्हिड कॉपरफील्ड वाचून आनंदीबाई भारून गेल्या. तशा प्रकारची पण आपल्या समाजाला पोषक अशी कादंबरी लिहिण्याचा निश्चय करून १९२२ मध्ये केवळ दीड महिन्यात 'कुलकथा'

लिहिली गेली. समाजातील विविध प्रवृत्ती दाखवतच आनंदीबाईंनी कल्पनेतील आदर्श व्यक्तिमनाचा शोध घेतला आहे. कादंबरीच्या प्रारंभी अंधश्रद्धाळू समाजप्रवृत्तीची ओळख होते. मूल जगावे म्हणून चिंतामणीची सावत्र आई उपास-तापास, ताईत, दोरे, अंगारे-धुपारे, पूजा-प्रदक्षिणा असे अनेक उपाय करीत असे त्याचे सविस्तर वर्णन आले आहे. दुष्ट, लबाड प्रवृत्तीशी लढा देणाऱ्या केदारची गोष्ट ' जगाशी बंडखोरी ' (१९३५) मध्ये आली आहे. पुरुषाची फुलपाखरासारखी वृत्ती समाजाला मान्य असते, पण स्वच्छंदी स्त्री मात्र स्वैराचारी आणि पापिणी ठरते. ' जगाशी बंडखोरी 'मधील चंपावतीचे उदाहरण यासंबंधात पुरेसे बोलके आहे. ' चंपावतीचा नवरा कुमार्गगामी होता. तिला दोघा पुरुषांनी फसवले होते. परंतु जगाच्या दृष्टीने चंपावती स्त्री असल्यामुळे पातकी ठरत होती. ' लेखिकेच्या मते ' व्यभिचार हा स्त्री किंवा पुरुष कोणीही केला तरी वाईटच. स्वैराचार हा निसर्गत: स्त्रीला घातक असल्यामुळे स्त्रीला नेहमी पडते घ्यावे लागते. स्त्रीच्या चारित्र्यासंबंधीचे नियम म्हणजे पुरुषी समाजप्रवृत्तीचे द्योतक आहे. ' तत्कालीन मान्यवर साहित्यिकांना सदर कृती पसंत पडल्याचे दिसते. नाटककार शां. गो. गुप्ते (सातारा) यांनी प्रस्तावनेत बाईंच्या व्यक्तिचित्रणसामर्थ्याचे कौतुक केले आहे. वाङ्मयाकडून कलात्मकते-बरोबर बोधवादाचीही अपेक्षा त्याकाळी केली जात असे. मात्र स्त्रीचे लेखन म्हणूनही या कादंबऱ्यांकडे अधिक चिकित्सक दृष्टीने पाहिले गेले. तत्कालीन समीक्षक मुक्ताबाई लेले यांनी स्त्री (सप्टें.१९३५)मधील परीक्षणामध्ये आनंदीबाईंच्या लेखनशैलीचे कौतुक केले. पण स्त्रीने भडक शृंगारवर्णने करू नयेत असा आग्रहही धरला. वाङ्मयनिर्मिती करताना लेखिकेने शालीनता व संकोच या स्त्रीत्वाच्या मर्यादा मात्र सांभाळल्या पाहिजेत अशी समाजाची अपेक्षा होती.

इ. स. १९२० नंतरच्या लेखिकांमध्ये काही पदवीधर होत्या. शिक्षणामुळे पाश्चात्त्य आचार-विचारांशी त्यांचा परिचय झाला आणि स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण झाली. मनातले विचार लेखनाद्वारे व्यक्त करण्याचे सामर्थ्यही त्यांच्यामध्ये निर्माण झाले. त्याचा आविष्कार आपल्याला विभावरी शिरूरकर यांच्या ' हिंदोळ्यावर ' कादंबरी (१९३४) मधून झालेला दिसतो. अचला ही एका शाळेत शिक्षिका असते. तिचा पती व्यसनी व गुन्हेगार असतो. हा नालायक माणूस पुढे अचलेला टाकून देतो. परित्यक्ता अचला मातृत्वाच्या ओढीने विरागशी जवळीक साधते. त्याच्याशी लग्न करणे अशक्य असूनही त्याला सर्वस्व देते. अचलेला आपल्या बाळाच्या आगमनाची चाहूल लागते. आपण

स्वीकारलेला हा मार्ग चूक का बरोबर या विचारात तिचे मन गोंधळून जाते. तिच्या मनाची ही दोलायमान स्थिती ' हिंदोळ्यावर 'मध्ये दिसते. अशा अचलेला समाजासमोर आणले म्हणून समाजाने लेखिकेवरही अनेक आरोप केले. तिला समाजद्रोही ठरवले.

विविध आरोप-प्रत्यारोप आणि मतामतांचा गदारोळ यामध्ये गोंधळून न जाता विभावरीबाईंची दुसरी कादंबरी ' विरलेले स्वप्न ' (१९३४) हरिभाऊ मोटघांनीच प्रकाशित केली. कादंबरीच्या प्रारंभी हरिभाऊंनी विभावरीबाईंचे एक पत्र छापले आहे. साहित्यिकांतील दांभिकता आणि खोट्या निष्ठा लेखिकेने या पत्रात सांगितल्या आहेत. ' विरलेले स्वप्न 'मध्ये वैशाखवर रोहिणीचे प्रेम आहे, पण त्याच्याबरोबर सर्वस्व विसरून, ध्येयवेडे जीवन जगण्याचे सामर्थ्य रोहिणीमध्ये नाही, म्हणून ती वेळीच प्रेमाची इतिश्री करते. वैशाखशी लग्न न करण्याचे ठरवते. त्याकाळात ' आत्मकेंद्री ' म्हणून या नायिकेची संभावना झाली. परंतु स्वत:ची कुवत ओळखून प्रेम संपवणारी रोहिणी आज अधिक विचारी व व्यवहारी वाटते.

पुणे येथील ' सर परशुरामभाऊ कॉलेज ' मध्ये ' विरलेले स्वप्न ' या कादंबरीवर विद्यार्थ्यांची चर्चा झाली. तेव्हा सुप्रसिद्ध कादंबरीकार वि. स. खांडेकर यांनी कादंबरीतील कलात्मकतेचे कौतुक केले. मात्र उच्चभ्रू समाजासाठी लिहिलेली ही कादंबरी कोणताही आदर्श समोर ठेवत नाही अशी खंतही व्यक्त केली आहे.

मराठी समाजाची पर्वा न करता स्वत:च्या बुद्धीला व भावनेला पटेल तोच विचार करणाऱ्या व्यक्तिरेखा विभावरीबाईंच्या कादंबऱ्यांतून भेटतात. या व्यक्तींच्या अनुभवातून समाजाचे अधिक वास्तवदर्शन घडते. ' विरलेले स्वप्न ' मध्ये जातिभेदाचा कटू अनुभव वैशाखला येतो. आणि काही काळ स्वत:च्या श्रीमंतीचा मोठेपणा त्याला वाटत राहतो. परंतु पुढे गरीब-श्रीमंत या वर्गभेदाला श्रीमंतही जबाबदार आहेत, याची जाणीव वैशाखला होते. विवाह- संबंधात शिक्षण, स्वभाव यासारखी शाश्वत मूल्ये डावलून चंचल लक्ष्मीचाच विचार केला जातो अशी खंत वैशाख व्यक्त करतो. श्रीमंतांचा ओढा श्रीमंतांकडे असतो हे सार्वत्रिक सत्य जाणूनही ' हिंदोळ्यावर ' मधील विराग सामान्य अचलेवर प्रेम करतो. ' विरलेले स्वप्न ' मध्ये विभावरीबाईंनी वर्गभेदाचा अधिक डोळसपणे विचार केलेला दिसतो. वैशाख म्हणतो :

' काहींनी पोटाला चिमटा घेऊन दुसऱ्यांच्या सुखसोयीसाठी रात्रंदिवस

राबायचं अणि काहींनी त्यांची मान मुरगाळून त्यांना आपल्या सुखासाठी राबवीत ठेवायचं. सुखाचं अजीर्ण झालेले आम्ही लोक ! कुठल्यातरी क्लबचा मेंबर व्हायचं, सभा भरवायच्या, मोठमोठी भाषणं करण्याचा आव आणायचा, लोककल्याण करीत असल्याबद्दल स्वत:ची व दुसऱ्यांची फसवणूक करीत असायचं. (विरलेले स्वप्न पृ.६३)

प्रत्येक माणसाच्या माणूस म्हणून ज्या अत्यावश्यक गरजा आहेत त्या पूर्ण करण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे. विभावरीबाईंनी हे तत्त्वज्ञान आग्रहाने मांडले. रशियन क्रांती आणि पहिले महायुद्ध यानंतर साम्यवादी विचार येथील बुद्धिवाद्यांपर्यंत पोहोचला. लेखिकेने वर्गभेदाच्या प्रवृत्तीचा पाठपुरावा, मार्क्सवादी विचारांच्या प्रभावातून केला आहे.

मार्क्सवादातील गुणदोषांचे स्पष्ट विश्लेषणही कादंबरीच्या शेवटी मालतीबाईंनी चर्चेमधून केले होते; पण एवढे स्पष्ट विचार तत्कालीन समाजाला मानवले नसते. मार्क्सवादाचा पराभव त्यावेळी सर्वस्वी अशक्य कोटीतील वाटत होता म्हणून प्रकाशक मोटयांनी त्यावेळी तो भाग पुस्तकातून वगळला. अलीकडच्या काळातील रशियामधील राजकीय घडामोडींनंतर १९९२ मध्ये या पुस्तकाची नवी आवृत्ती काढण्याचे ठरले. त्यावेळी पूर्वी वगळलेले हे प्रकरण पुन्हा घालण्याचा प्रकाशकांचा विचार होता. पण मूळ प्रकरण आता गहाळ झाले होते व १९३४ सालचा, ५८ वर्षांपूर्वीचा भाषेचा ओघ पुन्हा नव्याने लिहिता येणार नाही असे मालतीबाईंचे मत होते. हे मुद्दाम सांगण्याचे कारण असे की, समाजप्रवृत्तींची जाणीव बाईंना प्रारंभापासून होती. सामाजिक विचारांच्या प्रागतिकतेबरोबर राजकीय विचारप्रवाहातील गुणदोषांचे भान मालतीबाईंना आहे. यामध्येच विभावरी शिरूरकर ऊर्फ मालतीबाई बेडेकर या बुद्धिमान लेखिकेचा वेगळेपणा दिसतो.

शिक्षण व पैसा या दोन गोष्टींसाठी, आपला देश सोडून परदेशी जाण्याची प्रवृत्ती नव्यानेच तरुणांमध्ये निर्माण झाली होती. सर्वच लेखिकांनी ही प्रवृत्ती दाखवली आहे. पण या प्रवृत्तीमधील फायदे, तोटे यांचा साधकबाधक विचार मात्र कोणी केलेला दिसत नाही. याला अपवाद म्हणजे विभावरी शिरूरकर. ' विरलेले स्वप्न ' मध्ये वैशाख म्हणतो, ' परदेशी जाऊन एखादी पदवी घेऊन आलो, काय होणारे माझ्यात फरक ? परदेशची वारी करणारे लोक भारताचा दरिद्रीपणा विसरून त्या इंद्रनगरीत सोम, अप्सरांनी लाचार होतात, इकडे आल्यावर त्याच धुंदीत या मर्त्यलोकात वावरतात. कित्येक कोरेच येतात,

तर कित्येक मनाने गंजलेले पण निव्वळ पोशाखी बनलेले मला दिसतात. उंच भरारी घेतलेल्या विचारांची येथे आल्यावर निराशा होते. ' (विरलेले स्वप्न पृ.७) परदेशची ओढ असणाऱ्या तरुणांनी एकदा आत्मपरीक्षण करून पहावे अशी अपेक्षा लेखिकेने व्यक्त केली आहे. त्यावरून लेखिकेच्या सखोल समाजचिंतनाची साक्ष पटते.

विवाह ही स्त्री-जीवनातील महत्त्वाची घटना आहे. विवाह म्हणजे तारुण्यातील क्षणभंगुर आकर्षण नव्हे, तर जन्मभराची विचारांची साथसोबत आहे, हे विभावरीबाई सहजपणे सांगून जातात. बौद्धिक भुकेसाठी विवाह करण्याची पद्धत समाजात काही काळ होती. म्हणून विभावरींच्या कादंबऱ्यांतून त्यांचे ओझरते उल्लेख आले आहेत. विचारवंतांच्या पहिल्या बायका पतिसहवासाला मुकल्या होत्या आणि व्यसनाधीन चंचल पुरुषांच्या स्त्रिया परित्यक्तेचं एकाकी जिणं जगत होत्या. ' हिंदोळ्यावर ' मधील नवऱ्याने टाकलेली ' अचला ' स्वावलंबी बनून एकटी राहात होती. पांढरपेशा समाज सोडला तर एकाशी जमलं नाही तर दुसऱ्याशी पाट लावण्याची मुभा इतर जातीतील स्त्रियांना होती. हिंदोळ्यावरमध्ये ' राजाई ' या मोलकरणीची व्यक्तिरेखा यासंबंधीचे मत सांगण्यासाठी आली आहे. परंतु सर्वसाधारणपणे विवाहबंधनातील सौख्य संपले तरी स्त्रीला त्यातून बाहेर पडता येत नाही. संसारात अडकलेले पाऊल सोडवता येत नाही, याबद्दल विभावरी शिरूरकर म्हणतात, ' पायाला दोरा बांधलेलं पाखरू दोरा तोडून उडतं, पण तुटका दोरा मात्र पायाभोवती असतो '. ' विरलेले स्वप्न ' मध्ये रोहिणी म्हणते ' कितीही स्वत: मानलं नाही तरी विचित्र परिस्थितीचं बंधन, समाजाचं बंधन असतंच. म्हणून भित्र्या, हळव्या मनाने, कर्तबगार स्त्रीने स्वयंपाक, मुलं आणि धर्मकर्म यातच पिचत राह्यचं. त्यांचं सारं जीवन आणि कला यांचंसुद्धा ध्येय एकच- पुरुषाची खुषामत! प्रथम त्यांना जिंकण्यासाठी आणि मग स्वत: जगण्यासाठी.' (विरलेले स्वप्न, पृ.६७) संसारात पडलं की स्त्रीचं व्यक्तिमत्त्व असं झाकोळून जातं.

स्त्री-पुरुष समानतेचा योग्य आग्रह विभावरीबाईंनी धरला आहे. समान हक्कांची भाषा सुशिक्षित स्त्रीला समजली. तेव्हा हक्क मागताना कर्तव्याची जाणीव ठेवण्याची ही अवघड वेळ आहे याची जाणीवही लेखिकेने दिली आहे. शिक्षणामुळे स्वावलंबी बनत असताना, पुरुषांकडून मदतीची अपेक्षा करून पुन्हा परावलंबित्व स्वीकारू नका, असे सुचविले आहे.

निसर्गत: स्त्री-पुरुषांमध्ये त्यांच्या शरीररचनेत फरक आहे. तो राहणारच

आहे. परंतु जीवनाबद्दल स्त्रियांना आणि पुरुषांना सारखीच आसक्ती असते या नैसर्गिक गोष्टीकडे मात्र जाणूनबुजून दुर्लक्ष केले गेले. स्त्री ही पुरुषांप्रमाणे स्वतंत्र व्यक्ती आहे हा विचार एका धाडसी, जगावेगळ्या घटनेमधून बाईंनी मांडला. ती म्हणजे 'परित्यक्तेचे मातृत्व'. नवऱ्याला सोडून राहणारी अचला घटस्फोटाची सोय नसल्यामुळे कायदेशीरपणे कधीही आई होऊ शकणार नसते. मात्र एक स्त्री म्हणून तिला मातृत्वाची तीव्र इच्छा असू शकते हे आजपर्यंत कुणाच्या मनातही आले नव्हते. स्त्रीच्या शीलाची व्याख्या पुरुषप्रधान समाजाने ठरवली. त्या शीलाचे रक्षण करताना, स्त्रीच्या मनातील मूलभूत भावनांकडे समाजाने कधीच लक्ष दिले नाही. तो प्रयत्न मराठी वाङ्मयामध्ये प्रथमच विभावरीबाईंनी केला. अचला-विरागच्या संबंधाकडे माणुसकीच्या दृष्टिकोनातून पाहिले. अचलेचे मातृत्व हा स्वैराचार नसून तिच्या स्त्रीत्वाचा तो हक्क मानला. मातृत्वाची चाहूल लागल्यावर अचला अस्वस्थ होते तेव्हा समाज तिला खूप दूषण देतो असे कादंबरीत दाखवले आहे. कादंबरीतील सामाजिक प्रतिक्रिया लेखिकेने पुढील शब्दांत व्यक्त केली आहे, 'मधमाशांचे पोळेच त्यांनी उठविले होते. मधमाशांनी स्त्रिया, स्त्री-शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य, इंग्रजी शिक्षण, पाश्चिमात्य संस्कृती साऱ्यांना दंश केला. सभा भरल्या, जाहीर निषेध झाले, वर्तमानपत्रांचे रकाने भरले. कित्येक कंपॉझिटर्स, कित्येक संपादक, कित्येक धर्मपालक संस्कृतिरक्षक या सर्वांना काही महिन्यांचे काम मिळाले.'

'परकीयांच्या सत्तेपुढे निस्तेजपणे नमताना ज्यांची अंत:करणे भरभरली नाहीत ते अन्यायाविरुद्ध बंड करणाऱ्या अचला-विरागपुढे तेजाचे लोळ पसरवू लागले.' लेखिका पुढे सांगते,

'पण सारा समाज असा असतो थोडाच! उदयोन्मुख नवी पिढी थोड्याफार प्रमाणात बंडखोर असते. कित्येक तरुण त्या दोघांच्या वागणुकीचे समर्थनही करू लागले.' (हिंदोळ्यावर, पृ.१५२)

लोक थोडे दिवस नावे ठेवतात आणि मग दुर्लक्ष केले की गप्प बसतात. स्वतंत्र व्यक्तिमत्त्वावर बंधने घालणारी समाजप्रवृत्ती त्रासदायक असली तरी समाजाचा घटक म्हणून ती व्यक्ती जोपर्यंत वावरते, तोपर्यंत तिला या समाजप्रवृत्तींची बांधिलकी मानावीच लागणार. ही प्रवृत्ती बदलावी म्हणून कोणताही नवीन पर्याय न सांगता गप्प बसणे हेच शहाणपणाचे आहे, असे लेखिकांना सुचवायचे आहे.

अचलेच्या वर्तनाने कादंबरीतील समाज बिथरला आणि प्रत्यक्षातही

वाङ्मयक्षेत्रात खळबळ माजली. विचारवंतांच्या सभांमधून ‘ हिंदोळ्यावर ’ वर चर्चा होऊ लागली. टीकेची झोड उठली. या पुस्तकाची परीक्षणे, त्यावरील वादविवाद यावर सहज नजर टाकली तरी या पुस्तकाचा वेगळेपणा प्रकर्षाने लक्षात येतो. बाळूताई खरे (सौ. मालतीबाई बेडेकर) यांनीच विभावरी हे नाव घेतले आहे, हे लोकांना समजले नव्हते तेव्हा लेखकाच्या अस्तित्वापासूनच ही कादंबरी वादविषय ठरली. विभावरी शिरूरकर कोण ? यासंबंधी विहार, ज्ञानप्रकाश, नवयुग, नवाकाळ इ. मध्ये बरीच चर्चा झाली. ‘ विभावरीचे टीकाकार ’ म्हणून या परीक्षणांचा, प्रतिक्रियांचा संग्रहही प्रसिद्ध झाला. तत्कालीन समाजधुरीणांनी, अचलेला त्रास देणाऱ्या समाजाला दोष दिला नाही. मात्र सहजसुलभ मानवी वासनांना कामांध ठरविले. त्यावेळी ज्येष्ठ कादंबरीकार वा. म. जोशी म्हणाले होते की, ‘ लेखिकेला समाज म्हणून काही आहे हे व्यक्तिभावनांच्या वादळात समजले आहे की नाही हे दिसत नाही. समाजबंधनानेही माझी काही कर्तव्ये आहेत, याची जाणीव लेखिकेला आहे असे दिसत नाही.

भावनांचा आविष्कार, वाङ्मयीन कलात्मकता या सर्व गोष्टी दुय्यम आहेत. लेखकांनी समाज, सामाजिक बंधने यांचाच विचार केला पाहिजे असे मानणाऱ्या अनेक समीक्षकांचे श्री. जोशी यांच्याप्रमाणेच मत होते. आचार्य प्र. के. अत्रे यांनी कादंबरीचा गौरव ‘ ढोंगीपणाचा अंशही न ठेवता सत्यकथन ’ अशा शब्दात केला आहे, तर ज्ञानकोशकार श्री. व्यं. केतकर ३-८-३४ च्या ‘ प्रतिभा ’मध्ये आवाहन करतात की, ‘ अडचणीतील स्त्रियांनी या मार्गाचा ताबडतोब अवलंब करावा. ’ समाजस्वास्थ्यकारांनीही स्वतंत्र विचार मांडल्याबद्दल लेखिकेचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

विभावरीच्या लेखनावर पुरुषांनी अनेकदा चर्चा केल्या, सभा गाजवल्या. सुप्रसिद्ध लेखिका कमलाबाई टिळक म्हणतात, ‘ स्त्री ही पुरुषांप्रमाणेच मानवी स्खलनशील आहे हे सत्य श्रेष्ठ धारिष्ट्याने जगापुढे मांडणे हा हेतू आहे.

देव्हाऱ्यातल्या अबोल देवी प्रभावळीतून खाली उतरू लागलेल्या पाहून आपल्या संसारात त्या हक्कांचे गोंधळ घालणार या विचाराने पुरुषांचे धाबे दणाणून गेले असावे. ’ (प्रतिभा, १४-९-३४)

वाङ्मयाचा समाजावर निश्चितपणे परिणाम होतो असा विश्वास बहुसंख्य लोकांना असतो. कादंबरीतील अचला समाजाचे नियम बाजूला सारून आपल्या मानवी हक्कांची मागणी करते. तेव्हा कोणी प्रत्यक्ष स्त्रीच अनीतीने वागत आहे

आणि सामाजिक मूल्यांची जपणूक करण्याची जबाबदारी आपलीच आहे असे मानून लेखिकेविरुद्ध सर्वांनी लेखण्या सरसावल्या. प्रत्यक्ष लेखिकेची आपल्या कादंबरीबद्दल काय भूमिका होती हे पाहणे उद्बोधक ठरेल. 'कळ्यांचे नि:श्वास' च्या प्रस्तावनेत विभावरीबाई लिहितात, 'लेखिका या सुमारास वकिलीचा अभ्यास करत होती. मनू, याज्ञवल्क्य इ.'स्मृती' वाचून स्मृतिकारांची निरनिराळ्या काळी स्त्रियांबद्दलची वृत्ती तिदला समजली होती. या सर्वांचा परिपाक म्हणून 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी लिहावी असे तिला वाटले. नवऱ्याला सोडून दुसऱ्या माणसाचा अंगिकार करणारी कोणतीही स्त्री तिने पाहिली नव्हती. टाकलेल्या स्त्रियांची वाढती संख्या पाहून, एखादी स्त्री अचलेसारखा मार्ग स्वीकारल्याशिवाय राहणार नाही, असे तिला वाटत होते. हा मार्ग धोक्याचा आहे. सामाजिकदृष्ट्या अनैतिक आहे, त्यातही आयुष्याला तड नाही हे लेखिकेला निश्चितपणे माहीत होते. पण अशा धोक्याच्या मार्गाचा अवलंब स्त्रीला करावा लागतो, तो तिला माणसाच्या नैसर्गिक भावना असतात हे समाजाने अमानुषपणे हजारो वर्षे जाणलेच नाही म्हणून, ही तिची ठाम समजूत होती. या अमानुषपणामुळे परित्यक्तेच्या मनाच्या होणाऱ्या चिंधड्या तिने तिच्या आवाक्याप्रमाणे समाजापुढे ठेवल्या.'

कादंबरी-लेखनामागील लेखिकेची भूमिका पाहिली की आज तरी कादंबरीवरील सर्व आक्षेप पुरुषी प्रवृत्तीचेच निदर्शक वाटतात. लेखनाची तीव्र इच्छा आणि मांडणीतील सडेतोडपणा हे अस्सल गुण विभावरीबाईंच्या सर्वच लेखनात दिसतात. आणि म्हणूनच बाईंनी मांडलेले प्रश्न हृदयाला जाऊन भिडतात.

'मराठी कादंबरी-पहिले शतक' या ग्रंथाच्या लेखिका कुसुमावती देशपांड्यांनी विभावरीच्या कादंबऱ्यांना मराठी वाङ्मयात मानाचे स्थान दिले आहे. 'विभावरीच्या लेखनाने, चार घटका सुललित करमणूक करण्याच्या प्रवृत्तीतून मराठी कथेला खेचून काढून त्यांनी तिला वास्तवजीवनदर्शनाच्या मार्गावर स्थिर करण्याचा प्रयत्न केला.' अशा शब्दांत कुसुमावतींनी विभावरीचा गौरव केला.

स्त्रियांच्या लेखनाला पुरुषांच्या प्रोत्साहनाने सुरुवात झाली. त्यामुळे प्रारंभीच्या काळात लेखनावर पुरुषप्रधान संस्कृतीचे दडपण आलेले दिसते. त्यामुळे घरीदारी पत्करावी लागणारी दुय्यमपणाची भूमिका लेखनक्षेत्रातही स्त्रियांनी स्वीकारली. प्रकाशक व वितरकही पुरुषवर्ग असल्यामुळे, स्त्रीपणावर लादल्या गेलेल्या सहनशील स्वभावानुरूप बव्हंशी लेखन होत होते. पुरुषांच्या

दडपणाखाली पुरुषी प्रवृत्तींकडे वळलेल्या लेखिकांच्या कादंबरीला विभावरीने स्त्रीत्वाचा एक अनोखा स्पर्श दिला. आणि केवळ लेखिकांच्याच नव्हे तर मराठी कादंबरीचा चेहरा-मोहराच बदलून टाकला. लेखिकांच्या कादंबरीला नवा अर्थ मिळवून दिला.

इ. स. १९२० नंतर स्त्री-शिक्षणाची झपाट्याने वाढ होत गेली. त्याबरोबरच स्वतःच्या स्थितीकडे स्त्री विचारपूर्वक पाहू लागली. महर्षी कर्वे, रमाबाई रानडे यांच्या समाजकार्याचे संस्कारही स्त्रीमनावर होत गेले. आगरकरांच्या निबंधामधील विचार समाजामध्ये आत्मसात होऊ लागले. त्यामुळे समाजातील धर्मविषयक, विवाहविषयक रूढ प्रवृत्तींचे पुनर्मूल्यांकन होऊ लागले. जुन्या समाजप्रवृत्तींबरोबर नव्या मानवतावादी प्रवृत्तींचा संघर्ष सुरू झाला. त्यामधून काही तात्कालीक प्रवृत्तींचाही उदय झाला. त्या प्रामुख्याने स्त्री-जीवनाशी निगडित होत्या. जुन्या प्रवृत्तींतील दोष दाखवून नवीन प्रवृत्तींना प्रोत्साहन देण्याची भूमिका विचारपर्वातील लेखिकांनी स्वीकारलेली दिसते.

धार्मिक रूढींकडे स्त्रियांनी डोळसपणे पाहिले. एवढेच नव्हे, तर धर्मांतराच्या प्रवृत्तीचा गंभीरपणे विचार केला. जातिभेद मानणे अयोग्य आहे हे लेखिकांना जाणवले आहे. पण प्रत्यक्ष कृती करण्याइतका समाज जागृत होईल असा दृष्टिकोन ठेवून लेखिकांचे लेखन फारसे झालेले नाही. गांधीजींच्या चळवळीमुळे राजकारण घराघरात पोहोचले. स्वदेशी, स्वराज्य यांची भाषा सामान्य माणसाच्या हृदयापर्यंत भिडली. एवढेच नव्हे, तर १९३० नंतर मराठी स्त्रियाही सत्याग्रहामध्ये भाग घेऊ लागल्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळींची नोंद स्त्रियांनी घेतली आहे. पण प्रत्यक्ष लढ्याशी संबंधित नायिका, लेखिकांनी रंगवल्या नाहीत.

समाजप्रवृत्तींचा मानवी जीवनावर अपरिहार्यपणे परिणाम होत असतो. म्हणूनच विवाहविषयक, शिक्षण किंवा कुटुंब यासंबंधी निर्माण होणाऱ्या प्रवृत्तींना लेखिकांच्या कादंबऱ्यांनी पाठिंबा दिला आहे. परंतु स्त्री-जातीचा अधिकाधिक फायदा पाहणारी स्वार्थी प्रवृत्ती मात्र कुठेही दिसत नाही. तुमच्या व्यक्तिमत्त्वाची गळचेपी होत असेल तर लगेच संसार सोडून जायचा आदेश लेखिका देत नाहीत. आत्मपरीक्षण करून समन्वयाची संधी स्त्रियांनी शोधावी, असा लेखिकांचा उद्देश दिसतो. त्यामुळे स्त्री-शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य यांचा अतिशय सौजन्यपूर्वक विचार लेखिकांनी अगदी १९२१ पासूनच केलेला दिसतो. स्त्रीच्या सहनशीलतेचा अंत झाल्यावर मात्र अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचा खंबीरपणाही

लेखिकांनी दाखविला आहे. ‘ बंधमुक्ता ’ व ‘ हिंदोळ्यावर ’ या कादंबऱ्यांमध्ये घटस्फोटाचा कायदा नसल्यामुळे स्त्री-जीवन किती दु:खमय बनते हे लेखिका दाखवतात. म्हणून त्या दु:खांची तीव्रता लेखिकेला अस्वस्थ करून जाते आणि त्या वेदना कलारूप घेतात. स्त्रीमनाला व्यापून टाकणाऱ्या समाजप्रवृत्तींचा आविष्कार अनेक प्रकारांनी कांदबऱ्यांतून झालेला आढळतो. कारण समाजातील कोणत्याही अन्यायाशी प्रगल्भ बुद्धीची व्यक्ती चटकन समरस होते. वेदना जाणण्याचे संवेदनाशील मन स्त्रीजवळ असते. त्यामुळे समाजातील रूढ प्रवृत्तींविरूद्ध बंड करून माणूसकीची दाद मागणारा नवा आशय या कादंबरीतून व्यक्त झालेला दिसतो. समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या या कादंबऱ्यानी कलात्मकतेकडे लक्ष दिलेले आहे. प्रबोधनपर्वाकडून विचारपर्वाकडे पाहताना स्त्रियांच्या लेखनातील हा बदल स्वागतार्ह वाटतो. समाजवादाचा, समतेचा आणि स्वातंत्र्याचा पुकारा करणाऱ्या नवीन पिढीच्या लेखिकांनी हा माणुसकीचा मंत्र जपला आहे, हे आपणास यापुढील विकासपर्वातही आढळेल.

●●●

# विकासपर्व (१९३५-१९५०)

भारतीय समाजातील परिवर्तनाच्या प्रक्रियेला एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून सुरुवात झाली होती. पण विसाव्या शतकामध्ये फार झपाट्याने बदल होत गेले. मराठी माणूस स्वभावत:च बुद्धिनिष्ठ आणि जागृत मनाचा! वैज्ञानिक शोध आणि कलांचे शास्त्रशुद्ध शिक्षण यामुळे समाजातील प्रत्येक बदल, बुद्धी आणि व्यवहार यांच्या निकषावर तपासून पाहण्याची प्रवृत्ती बनली. त्यामुळे सामाजिक विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर नवीन समस्या निर्माण होत गेल्या. १९३५ ते १९५० या कालखंडातील समाजप्रवृत्ती, सामान्यत: सामाजिक समस्यांमधून निर्माण झाल्या होत्या.

मानवी जीवनाला शांती आणि समाधान देण्यासाठी धर्मसंस्थेचा उदय झाला. आचारविचारांचे नियमन शिकविणाऱ्या धर्माने जेव्हा व्यक्तिजीवनावर अतिक्रमण केले तेव्हा त्यातील मूल्ये पुन्हा पुन्हा तपासण्याची जरुरी भासू लागली. सनातनी लोकांच्या मनात अंधश्रद्धा, जातीयता या चिरंतन प्रवृत्तीही घट्ट रुजल्या होत्या. त्यामुळे नव्या-जुन्या विचारांचा तीव्र संघर्ष जीवनातील अनेक क्षेत्रांत सुरू होता. परंतु जुन्यांसमोर बुद्धिवादी प्रवृत्तीची माणसे खंबीरपणे उभी राहू लागली होती. म्हणून हा कालखंड लहानसा असला तरी स्त्रियांच्या कादंबरींची संख्या आणि विचारांची विविधता या दोन्ही दृष्टींनी महत्त्वपूर्ण आहे.

शिकलेल्या बाईला पदोपदी या जुन्या धार्मिक विचारांशी संघर्ष करावा लागत होता. जुना विचार पटत नव्हता, पण बंड करण्याचे सामर्थ्य नव्हते. सर्वसामान्य स्त्रियांच्या या मानसिक अवस्थेचे मर्म लेखिकांनी नेमके जाणले होते. या दैनंदिन अनुभवातूनच लेखिकांची धर्मविषयक मते त्यांच्या साहित्यातून प्रकट झाली. 'नवीन पिढीने नवी श्रद्धास्थाने समाजापुढे ठेवावीत, नवा जीवनधर्म मांडावा' असे आवाहन 'काम आणि कामिनी' या कादंबरीत प्रेमाबाई कंटक यांनी केले आहे. कमकुवत मनाची, जगण्यासाठी आधार शोधण्याची प्रवृत्ती म्हणजे अंधश्रद्धा, असेही 'लतिका' कादंबरीत सुचविले गेले आहे.

दैनंदिन धर्मकृत्यांचा आग्रह धरण्याची प्रवृत्ती तत्कालीन प्रौढ समाजात होती. तुळशीला पाणी घालणे, रांगोळी, पूजा-अर्चा या गोष्टी पटल्या नाहीत तरी त्या सोडून देण्याचे धैर्य सामान्य लोकांत नव्हते. ‘ वठलेला वृक्ष ’ कादंबरीत कैलास विमलेला विचारतो, ‘ पूजा-आरतीवर विश्वास नसता सगळ्या गोष्टी यथासांग करीत बसणे तुम्हाला ढोंगीपणाचे वाटत नाही ? ’

विमल म्हणते, ‘ हो ! पण मी सर्वसामान्य स्त्री आहे. समाजाला विरोध करून त्याचा राग स्वत:वर ओढवून घेण्याची माझी तयारी नाही. सत्याची कास धरून माणसाला अनेकदा खड्ड्यात पडावे लागते. त्याला तत्त्वनिष्ठ माणसे लागतात. ’

जगरहाटीविरुद्ध जाण्याइतकी हिंमत विमलेमध्ये नाही. परंतु बिकट परिस्थितीत देवाधर्माचे स्तोम वाढविण्याइतकी ती अंधश्रध्दसुध्द नव्हती. या ठिकाणी परिस्थितीमुळे विमल अश्रद्ध बनत होती, तर तिचे पती विनायकराव अधिक श्रद्धाळू बनत गेले.

परमेश्वराला साकडं घालणं, नवस बोलणं या सगळ्या श्रद्धेच्या गोष्टी आहेत. ती उदाहरणे जशी या कादंबऱ्यांतून येतात तसेच शकुन अपशकुन मानण्याची प्रवृत्तीही दिसते. ‘ कीर्ती ’ कादंबरीत अपशकुनी ‘ निळाच्या ’ अंगठीने कीर्ती अस्वस्थ होते. शकुन अपशकुनावर विश्वास ठेवून ज्योतिषी आणि भविष्य यांच्यामागे लागण्याची चिरंतन प्रवृत्ती सर्व समाजांमध्ये दिसून येते. साधू, बुवा, महाराज यांच्यामागे गरीब, श्रीमंत, आबालवृद्ध यांच्यासह सर्व समाज जमा होताना दिसतो. ‘ भावनेच्या भोवऱ्यात ’ कादंबरीत शीला सरदारांनी एका गुन्हेगार साधूचे वर्णन केले आहे. ‘ वठलेला वृक्ष ’ मध्येही बुवाबाजीच्या उदाहरणातून अंधश्रद्धाळू प्रवृत्तीचे दर्शन घडते.

संकटकाळी देवाचा धावा केला जातो, तसेच दैनंदिन जीवनातही देवावर श्रद्धा ठेवण्याची प्रवृत्ती दिसते. १९३५ च्या सुमारास साम्यवादी विचारांचा बुद्धिवाद्यांवर विलक्षण पगडा होता. देव आणि धर्म यांचे अस्तित्वही न मानणारे अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते तयार होत होते. ‘ आविष्कार ’ (गीतासने) मध्ये भांडवलदारांविरुद्ध कामगारांना संघटित करणारा वृंदावन हा एक क्रियाशील कार्यकर्ता, देवाधर्मापेक्षा भाकरीचे मोल अधिक आहे हे गरिबांना पटवून देत असतो. जीवनात धर्माचे स्थान अढळ असले तरी धार्मिक कर्मकांडावरील लोकांची मते बदलत जातात. मालतीबाई दांडेकरांच्या ‘ तेजस्विनी ’ मधील क्षमा, श्रीमंत जमीनदारांची सून असते. श्रीमंत जावांच्या अडाणी घरगुती गप्पा

तिला अस्वस्थ करतात, तेव्हा ती एकदा हळदीकुंकुवाला आलेल्या स्त्रियांना संक्रांतीचे महत्त्व सांगते. गावातल्या बायकांना ते आवडते, पण तिचे दीर मात्र तिचा अपमान करतात. नवीन पद्धतींचे स्वागत क्वचितच होत असले तरी सण-उत्सवादी समारंभांना अधिक समाजाभिमुख बनविण्याचा विचारपूर्वक प्रयत्न या काळात होऊ लागला होता. लेखिकांनी या विचाराचे स्वागत केलेले दिसते.

विधवांनी कुंकू लावावे, हळदीकुंकवांना जावे, फुले माळावी याचा पद्धतशीर प्रचार ' माझी कोरीव लेणी 'मध्ये कृष्णाबाई मोटे यांनी केलेला दिसतो. महिन्याचे तीन दिवस सोवळं-ओवळं न पाळता स्त्रियांनी फक्त विश्रांती घ्यावी, असा विचारही मालतीबाई दांडेकरांनी ' वज्रलेख 'मध्ये मांडला. बुद्धीला पटले तरी सुधारणा आचरणात आणणे फार कठीण असते. घटस्फोटाचा कायदा झाला तरी घटस्फोटित नीमाला पहिले मंगळसूत्र तोडताना किंवा पुन्हा लग्न करताना कसा त्रास झाला हे मालतीबाई दांडेकरांच्या ' काटेरी मार्ग 'मध्ये दाखविले आहे. एकंदरीत आपल्यावरील अन्यायाचा विरोध करण्याची या नायक-नायिकांची वृत्ती दिसते. त्याला व्यापक स्वरूप देऊन मानवतावादी समाजप्रवृत्ती निर्माण व्हावी असा प्रयत्न लेखिकांनी केलेला दिसतो.

**महाराष्ट्रातील जातिव्यवस्थेचे स्वरूप :** देवादिकांवर अंधश्रद्धा ठेवून लोक वावरत राहिले किंवा जुन्या रूढींमध्येच घोटाळले तर विज्ञानाच्या वरदानाला समाज पारखा होईल म्हणून श्रद्धा कर्मावर ठेवली पाहिजे अशी प्रवृत्ती या काळात निर्माण झाली होती. कर्मावरून आपल्याकडे वर्णव्यवस्था आली आहे. परंतु औद्योगिक क्रांतीनंतर निजकर्म करताना कोणताही वर्ण दिसत नव्हता. त्याचे विकृत स्वरूप जातीयतेमध्ये दिसते. या विकासपर्वामध्ये गांधीवादी विचारसरणीमुळे हरिजनांवरील अत्याचारांची किमानपक्षी जाणीव झाली, तरी सर्वसामान्य घरांतून जातिभेद पाळण्याचीच प्रवृत्ती होती.

या काळातील कादंबऱ्यांमधून जातिव्यवस्थेचे व धर्मसत्तेचे स्वरूप स्पष्ट होते. जातिभेद न मानण्याच्या संस्कारात वाढलेल्या नायिकांना समाजातील जातीय प्रवृत्तींचा त्रास होत असे. शांताबाई नाशिककरांच्या ' कीर्ती 'मध्ये चांभार कीर्तीचे ब्राह्मण कौस्तुभशी लग्न होते आणि जग कौस्तुभकडे हा कोणी पापी असल्यासारखे पाहू लागते. त्यांना देवळातही प्रवेश नाकारला जातो. आपली धार्मिक मते व्यक्त करण्याचा सर्वांना अधिकार आहे. तसेच शिक्षणाची दारेही सर्वांना खुली असली पाहिजेत. शिक्षण मिळवण्यासाठी कीर्तीच्या वडिलांना

अतिशय त्रास झाला होता. वेळप्रसंगी चांभार असूनही ब्राह्मणाचे सोंग घेऊन माधुकरी मागून ते राहिले होते. आयुष्याच्या प्रारंभीच जातिभेदाने व्यापलेले जीवन त्यांना पाहायला मिळाले. मालतीबाई बेडेकरांच्या ' बळी 'मधील आबाचे शिक्षण जातिभेदविरहीत अशा बोर्डिंगमध्ये झाले. ' बोर्डिंगमध्ये तो समता शिकला. बोर्डिंगबाहेर जात त्याच्या गळ्याशी झोंबत होती. ' असे निवेदन लेखिका विभावरी शिरूरकर करतात. चोरवस्तीतील या मुलानं चोरी केली तर ! या भीतीने मांग-गारुडी समाजातील आबाला नोकरी मिळत नाही. आबाच्या आकांक्षा पार धुळीला मिळतात.

शिक्षण आणि नोकरी यांच्याप्रमाणेच लग्नाच्या बाबतीतही जातीचा विचार फार तीव्रतेने केला जातो. आंतरजातीय विवाहांना नेहमी विरोधातूनच जावे लागत असे. कीर्ती-कौस्तुभच्या लग्नाला नातेवाईकांनी बहिष्कार टाकला होता. गीता साने यांच्या ' लतिका ' मध्ये किशोरी व राधाचे वडील मुली मॅट्रीक झाल्यावर लग्नाचे पाहायला लागतात. लेखिकेचे निवेदन येते की,

' हरिहररावांची पोटजात फार लहान व मागासलेली होती व जातीबाहेर लग्न करण्याचा अजून प्रघात नव्हता. ' (लतिका, पृ.१४)

लीला देशमुख यांच्या ' पूर्वेचा वारा ' मधील भारती आंतरप्रांतीय विवाह करते आणि राष्ट्रीय एकात्मतेचा विचार मांडते. ' कीर्ती ' मधील कौस्तुभ, चांभार कीर्तीशी लग्न ठरवतो. आपल्या आईला तो सांगतो,

' आई, मनुस्मृतीच्या काळचा धर्म तो आजचा धर्म नव्हे. मी वागतो तेच कृत्य समाजधारणेला आज योग्य आहे. मी माझ्या हिंदुधर्माला सोडीत नाही. त्याचे जे लचके निघताहेत ते जोडण्याला हाच एक शहाणपणाचा मार्ग आहे. तोच मी आचरतो आहे. ' (कीर्ती, पृ.३२)

कौस्तुभने आंतरजातीय विवाहासंबंधी किती विचारपूर्वक निर्णय घेतला होता हे वरील उद्‌गारावरून लक्षात येते.

लेखिकांनी तरुणपिढीमध्ये जातीयताविरोधी प्रवृत्तीच रंगवलेली दिसते. ध्येयाने प्रेरित होऊन ' लतिका 'मधील कुमार अस्पृश्यतानिवारणाचे कार्य करीत असतो. वास्तविक मनुष्य पशूपेक्षा श्रेष्ठ आहे, पण तुम्ही अस्पृश्यांवर पशूइतकेही प्रेम करीत नाही याची जाणीव खेड्यातील लोकांना कुमार करून देतो. ' माझी कोरीव लेणी 'मध्ये समाजकार्य करीत असताना मुकुंदराव म्हणतात,

' अस्वच्छता व अज्ञान गेल्यास जातिभेद राहणार नाहीत. त्यासाठी तोड म्हणजे, रोजची स्वच्छता शिकून व चार यत्ता शिकून या, मी राममंदिरात

घेईन.' (माझी कोरीव लेणी, पृ.२२२)

अस्पृश्यांना केवळ सवलती देऊन किंवा सहानुभूती दाखवून परिस्थिती सुधारणार नाही. त्यांचा विकास घडेल अशी परिस्थिती निर्माण करणे, त्यांच्यावर उत्तम संस्कार करीत राहणे आवश्यक आहे याची जाणीव मुकुंदरावांच्या आवाहनातून कृष्णाबाई मोटे यांनी व्यक्त केली आहे.

म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वा. सावरकर यांच्या अस्पृश्यतानिवारणकार्याचा आदर्श समाजासमोर होता. त्याचे महत्त्व लक्षात घेऊन लेखिकांनी असे ध्येयवादी नायक लोकांसमोर ठेवले. अर्थात् समाजप्रवृत्तींमधील सुधारणा फार मंद गतीने होत असते. जातीभेदाने त्रस्त होऊन अस्पृश्य धर्मांतराचा मार्ग स्वीकारत होते. तेव्हा स्वधर्माभिमान जागृत ठेवण्याचे कार्य समाजधुरीणांनी केले. 'कीर्ती'मध्ये कीर्ती म्हणते- 'धर्मांतर म्हणजे भेकड पळपुटेपणा होईल... जास्त सवलतींसाठी आपल्या हिंदुबांधवांशीच भांडलं पाहिजे. पाय दुखतो म्हणून आपणच त्यावर कुऱ्हाडीचा घाव घालायचा का?'

कीर्तीच्या कार्याचा व भाषणाचा परिणाम म्हणून तेथील धर्मांतर स्थगित झाल्याचे लेखिकेने दाखविले आहे. 'बळी' कादंबरीत मांग-गारुडी समाजाला बाटविण्याचे प्रयत्न किरीस्ताव करताना दिसतात. हीच प्रवृत्ती 'काटेरी मार्ग' (मालतीबाई दांडेकर), 'पुसलेल्या रांगोळ्या' (शांताबाई नाशिककर) यात दिसते. 'सातपुड्यातील वनलक्ष्मी' (दुर्गाताई जोशी) या कादंबरीतून असहाय महिलांना संरक्षण म्हणून हिंदू आश्रम काढलेले दिसतात. हिंदू स्त्रियांना बलवान, सामर्थ्यवान व शीलवान करण्यासाठी लक्ष्मीबाई केळकर यांनी वर्धा येथे १९३६ मध्ये, 'राष्ट्रसेविका समिती'ची स्थापना केली होती. आणि कादंबऱ्यांतूनही लेखिका स्त्रियांना संघटित होण्याचे आवाहन करीत होत्या.

मध्यमवर्गीय समाजात परजातीय किंवा परधर्मीय लोकांच्या हातचे खाणे निषिद्ध मानीत असत. शीलवती केतकर, लक्ष्मीबाई टिळक यांच्या आत्मचरित्रांतून आपल्याला अशी उदाहरणे सापडतात. 'पूर्वेचा वारा', 'कीर्ती'मध्ये ही उदाहाणे दिसतात.

**राजकारण** - राजकीय व सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते मात्र तेव्हा जातिधर्माची बंधने पाळीत नव्हते. स्वातंत्र्य चळवळींचा जोर मात्र वाढला होता. तथापि मुसलमानांच्या मनात वेगळेपणाची जाणीव वाढत गेली. काँग्रेसच्या अंतर्गत समाजवादी व रॉयवादी यांनी आपले स्वतंत्र गट भक्कमपणे तयार केले

होते. सशस्त्र क्रांतीनेच भारत स्वतंत्र होईल अशी प्रवृत्ती काही धाडशी तरुणांमध्ये दिसून येत होती. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर राष्ट्रीय सभेने प्रांतिक सरकारांची सत्ता सोडून दिली. काँग्रेसच्या अंतर्गत समाजवादी गट स्थापन करणाऱ्या समाजवाद्यांनी १९४२ च्या चळवळीत हिरीरीने भाग घेतला. अनेक तरुण शाळा-कॉलेजे सोडून चळवळीत सामील झाले. जागतिक महायुद्धाविषयी काँग्रेसचे धोरण मान्य न झाल्यामुळे कम्युनिस्ट, रॉयवादी, आंबेडकरवादी या चळवळीपासून अलिप्त राहिले. इंग्रजांच्या जुलमी सत्तेचा बीमोड करण्यासाठी त्यांची राजकारण चालविले नाही, तर सामाजिक समतेसाठी गरीब मजूर व दलितांच्या संघटना उभ्या केल्या. लेखिकांच्या कादंबऱ्यांतूनही साम्यवादी-विचार प्रवाहाला स्वतंत्र महत्त्व मिळालेले दिसते. सामान्य मध्यमवर्गीय समाज मात्र कम्युनिस्ट चळवळींपासून दूर राहिला.

१९३५ पर्यंत स्वातंत्र्य चळवळीसंबंधीची माहिती खेड्यापाड्यापर्यंत पोहोचली होती. 'सातपुड्यातील वनलक्ष्मी' च्या प्रारंभीच राणूबाई पाटलीण जात्यावर बसून म्हणते,

**'कोंबडा आरवतो, स्वरबाई नवतीचा।**
**बोल बोले शकुनाचा, स्वातंत्र्याचा!!**
**दळण आटोपिते, घाई सडा रांगोळीची!**
**स्वातंत्र्य पथकाची वेळ झाली!!'**

(सातपुड्यातील वनलक्ष्मी, पृ.२)

स्वातंत्र्याची ओढ सर्वांमध्ये निर्माण झाली होती. पण प्रत्यक्ष राजकारणापासून अलिप्त राहण्याची प्रवृत्ती समाजामध्ये दिसते. सरोजिनी बाबर यांच्या 'अजिता' कादंबरीत पत्रीसरकार, सुभाषबाबू यांच्या कार्याची ओळख होते. त्यांच्याच 'कमळाचं जाळं'मध्ये सरोजिनी नायडूंच्या भाषणानं प्रभावित झालेली उषा दाखवली आहे. गीता साने यांच्या 'वठलेला वृक्ष'मध्ये असहकाराच्या चळवळीची माहिती येते. 'काटेरी मार्ग' मध्येही मिठाच्या सत्याग्रहाचे वर्णन येते. गीता साने यांच्या 'फेरीवाला' मध्ये अनंताला असाच अनुभव येतो. त्यांच्या 'आविष्कार'मधील अजयचा मित्रही असाच भित्रा आहे. त्यांच्या 'वादळापूर्वी' मध्ये विठ्ठलराव सत्याग्रहास निघाले तेव्हा आता तुरुंगवास भोगावा लागेल म्हणून मालती खिन्न होते.

'दोन घडीचा डाव' (लीला देशमुख) मध्ये राजकारणाचे व सुशिक्षित स्त्रियांचे संबंध खडाष्टकासारखे आहेत असे म्हटले आहे. घराघरातील स्त्रियांनी

राजकीय घडामोडींमध्ये भाग घ्यावा अशी लेखिकांची इच्छा होती, असे या कादंबऱ्यांतील चित्रणावरून लक्षात येते. लेखिका जागरुक होत्या म्हणूनच साम्यवाद, गांधीवाद व दहशतवाद या राजकारणातील विविध प्रवृत्तींचा ऊहापोह अनेक कादंबऱ्यांतून झालेला आहे. माई.ऐतिवडेकर यांच्या 'जीवनसाथी'मध्ये संजीव व आशा साम्यवादी चळवळीचे पूर्णवेळाचे कार्यकर्ते होते. 'मीनाक्षीचे जीवन' (कृष्णाबाई मोटे) मधील डॉ. भास्कर हा पत्रकार असतो. पण जहाल साम्यवादी विचारांमुळे त्याला नोकरी सोडावी लागते. भारतीय राजकारणातील साम्यवादाचे स्थान लेखिकेने स्पष्ट केले आहे.

भारतीय स्वातंत्र्यासाठी दहशतवादी प्रवृत्तीचा अवलंब करणाऱ्या अजयची कहाणी, गीता साने यांनी 'आविष्कार' मध्ये रंगविली आहे. वृंदावन साम्यवादी विचारांचा आहे. त्या दोघांच्या संवादातून दोन राजकीय प्रवृत्तींचे विवेचन आले आहे. तत्कालीन राजकारणातील विविध विचारप्रवाह स्त्रियांच्या कादंबऱ्यांतून आले आहेत. ज्याप्रमाणे प्रत्यक्ष संग्रामात भाग घेण्याच्या प्रवृत्तीचे आदर्श नेते कमी होते.तसेच त्या प्रकारच्या ध्येयवेड्या कादंबऱ्याही अगदी कमी आहेत. परंतु या थोडक्या कादंबऱ्यांतून स्वातंत्र्यासंबंधी स्पष्ट आणि डोळस विचार मांडलेले दिसतात.

स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्वस्व पणाला लावणारे स्वातंत्र्यवीर होऊन गेले. 'आविष्कार' मधील अजय असाच जिवावर उदार झालेला दिसतो. अजय म्हणतो -

'मरायला मी भीत नाही. मरायचं आहेच एकदा. पण त्यापूर्वी ज्या रेषा काढायच्या आहेत त्या पाण्यावर नसाव्या. दगडावर असाव्या.' (आविष्कार, पृ.८१)

अजय मृत्यूला, कष्टाला भीत नाही, पण काही विधायक कार्य करण्याची त्याला ओढ आहे. कोणतेही काम करा पण वारंवार रंग बदलू नका, असे 'काम आणि कामिनी' मध्ये सूचित केले आहे.

राजकारणाच्या होळीमध्ये आपली पोळी भाजून घेण्याची समाजप्रवृत्ती नेहमीच दिसते. परकीयांना मदत करणारे स्वकीय फितूर जसे भेटतात तसेच मतलबी लबाड लोक सत्तेवरही येतात. 'पागलखाना'मध्ये स्वातंत्र्यानंतर लबाड लोकांच्या हाती सत्ता गेल्याचे स्वप्न लेखिकेला पडते. या स्वप्नात संधिसाधू लोक प्रामाणिक देशभक्तांना वेडे ठरवून तुरुंगात टाकतात. स्वार्थी राजकारण्यांच्या जगात नि:स्पृह देशभक्ती हा वेडेपणाच होय, असे लेखिकेला सुचवायचे आहे.

राजकारण आणि सत्ता लोकांना नाचवीत असते, नीतिमूल्ये पायदळी तुडवीत असते. राजकारणी लोकांची ही स्वार्थी प्रवृत्ती सर्व देशांच्या इतिहासात आढळते. स्वतंत्र भारताचे चित्रही या प्रवृत्तीला अनुसरून असेल असे दु:स्वप्न 'दुर्गाताई जोशी' (एम्.एल्.ए.) यांना १९४१ मध्येच पडले आहे, हे लेखिकेचे द्रष्टेपणच म्हणायला हवे. 'बळी' कादंबरीत कॉंग्रेस व कम्युनिस्ट पक्षाचे पुढारी आपल्या स्वार्थासाठी दलितांना कसे वापरत असत तेच आले आहे.

स्वदेशी, स्वराज्य, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीच्या आधाराने भारतीय स्वातंत्र्यलढा चालू होता. १९३५ नंतरच्या कादंबऱ्यांतून खादी, वापरणाऱ्या अनेक व्यक्तिरेखा आपल्याला भेटतात. 'अग्नियान' (प्रेमा कंटक) मधून स्वदेशीचा पद्धतशीर पुरस्कार केलेला दिसतो. कारण लेखिकाही ते व्रत आचरत होती. गांधीटोपी हे स्वदेशीचे प्रतीक असल्याचे 'बळी'मध्ये सांगितले आहे. खादीबरोबर ग्रामोद्धार, दारुबंदी यासारखे उपक्रमही लेखिकांनी गौरवले आहेत. 'सातपुड्यातील वनलक्ष्मी' मध्ये दारूबंदीसंबंधी एक ठराव पास करतात की, गावात कोणी दारू प्यायल्यास त्याला खादीविक्रीचे व्रत घ्यावे लागेल. अशारीतीने दारूबंदी व खादी दोन्हींचाही प्रचार केला आहे. खादी, ग्रामोद्धार या तत्त्वांचा कशाप्रकारे विपर्यास होत असे तेही 'पागलखाना' मध्ये दिसून येते. खादी वापरून लोकांची दिशाभूल करण्याची गैरवर्तनी प्रवृत्ती त्याकाळात निर्माण होऊ लागली होती.

मराठी माणूस हा काहीसा बुद्धिवादी असल्यामुळे धार्मिक आंदोलनापेक्षा राजकीय घडामोडींमध्ये त्याला अधिक रस असल्याचे दिसते. राजकारणाबद्दल उत्सुकता दाखविण्याची प्रवृत्ती मराठी समाजात दिसते, असे आपण म्हणतो तेव्हा ती समाजप्रवृत्ती अनेकपदरी असल्याचे लक्षात येते. राजकीय घडामोडींबद्दल उत्सुकता दाखविण्याच्या प्रवृत्तीमधूनच चळवळीत भाग न घेता अर्थसाहाय्य करण्याची वृत्तीही आढळते. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करणारी माणसे या समाजात होती. या देशभक्तांबद्दल लेखिकांना सहानुभूती आहे. राजकारणाच्या अंतर्गत अशा विविध प्रवृत्ती आपल्याला या कादंबऱ्यांमधून दिसतात.

**वर्गभेद :** अर्थव्यवस्था हा समाजजीवनाचा मूलभूत पाया आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात निश्चित असे आधुनिक सूत्र शोधण्याचा प्रयत्न या कालखंडात झालेला दिसतो. त्याचेच परिणाम मार्क्सवादी विचारसरणीत किंवा औद्योगिक क्रांतीनंतरच्या बेकारीमधून दिसतात. या कालखंडातील कादंबऱ्यांत सनातन वर्गभेदाबरोबर त्यासंबंधीची जाणीवही स्पष्ट झालेली दिसते.

गरीब आणि श्रीमंतांच्या आचार-विचारातील फरक अपरिहार्य आहे. परंतु काही घरांतून त्याचा उच्चार पुन्हापुन्हा केला जातो. या प्रवृत्तीसंबंधी मालतीबाई दांडेकर यांनी ' हिरा आणि गारगोटी ' या नावाची एक बोधप्रद कादंबरी लिहिली. श्रीमंतीची ऐट दाखवणे, गरिबांचा अपमान करणे असे संस्कार मुलांवर लहानपणापासून केले तर ती मुले हट्टी, भांडखोर होतात. गरीब हिराला वाटते, आपण श्रीमंत झालो तर आपला अपमान होणार नाही. तेव्हा लेखिकेने, हिराच्या आईच्या तोंडून जीवनाचे सार सांगितले आहे.

' पैसे मिळाल्यानं का माणूस मोठा होतो ? योग्यतेनं, सद्‌गुणानं माणूस मोठा होतो. बाबी कीर्तीनं मोठा होतो, मनानं मोठा होतो आणि विद्येनं मोठा होतो माणूस। '

(हिरा आणि गारगोटी, पृ.२७)

पैसा म्हणजे सर्वस्व नव्हे, अशी प्रवृत्ती समाजात निर्माण व्हावी हा लेखिकेचा हेतू येथे स्पष्ट दिसतो. गरिबीतही स्वाभिमानाने राहता येते हे मालतीबाई दांडेकरांनी ' कृष्णरजनी 'मध्येही सांगितले आहे. श्रीमंतांची अहंकारी वृत्ती शांता शेळके यांच्या ' ओढ 'मधील गोपीची आहे, तसेच कुमुदिनी प्रभावळकर यांच्या ' रस्सीखेच 'मधील रश्मीची आहे. श्रीमंतांचे रूढीबाह्य वर्तन समाज चालवून घेतो हे ' हृदयाचे कढ ', ' आविष्कार 'मध्ये दिसते. आर्थिक विषमता असलेल्या विवाहांना सामान्यत: पालकांचा विरोध होतो. त्याचा प्रत्यय ' दूर कुठे तरी 'मध्ये येतो. गरिबीचे चटके सोसणे सोपे नसते हे प्रौढांना अनुभवाने माहीत असते. म्हणून हे नवीन आव्हान स्वीकारण्यास प्रौढांचे मन नकार देते.

श्रीमंत सुखवस्तू जीवनाचे सर्वांना आकर्षण असते. मध्यमवर्गीयांमध्ये कारकून किंवा शिक्षकापलीकडे नोकरी शोधण्याची प्रवृत्ती नसते आणि स्वतंत्र व्यवसायाच्या मागे लागल्यास त्यांची केविलवाणी स्थिती होते, असे समाजचित्र अनेक कादंबऱ्यांतून दिसते. गीता साने यांच्या ' फेरीवाला ' या कादंबरीतून बेकारीचा प्रश्न हाताळला आहे. मध्यमवर्गीय पापभीरू प्रवृत्ती धंद्यासाठी उपयोगाची नाही. धंदेवाल्यांची प्रवृत्ती कशी वेगळी असते तेही फेरीवालामध्ये स्पष्ट केले आहे.

केवळ पदवीच्या साहाय्याने मध्यमवर्गीय श्रीमंत बनू शकत नाहीत, तसेच आपल्या वाट्यालाही कधी सुबत्ता येईल ही जाणीवच कित्येकजण हरवून बसलेले असतात. गीता साने यांनी ' आविष्कार ' मध्ये पीडित शेतकऱ्यांना संघटनेचा मंत्र दिला आहे. शेतात राबणाऱ्या मजुराचाही मिळकतीत हिस्सा

आहे हे वीणा शेतकऱ्यांना सांगते. वीणाच्या व्यक्तिमत्त्वावर मार्क्सवादी विचारांचा प्रभाव जाणवतो.

**मध्यमवर्गीय प्रवृत्ती :** समाजातील नीतीनियमांचे पालन करण्याचे बंधन मुख्यत्वेकरून मध्यमवर्गीयांवर असते. मध्यमवर्गीयांची गरिबांइतकी लाचार प्रवृत्ती नसते, तसेच श्रीमंतांइतकी बंडखोर प्रवृत्तीही नसते. 'जीवनसाथी'मध्ये आशा संजीवला पत्रात लिहिते - 'मध्यमवर्गाची एकदा वैचारिक क्रांती झाली की तो झपाट्याने पुढे जातो. प्रचलित समाजपद्धतीमध्ये नव्या विचाराने नवे बदल घडवून आणणे हे फक्त मध्यमवर्गालाच शक्य आहे.'

(जीवनसाथी. पृ.४.५)

मध्यमवर्गाबद्दल आशावादी दृष्टिकोन लेखिकेने मांडला आहे. मध्यमवर्गीय स्वतःच्या प्रतिष्ठेला जपणारे असतात. विचारापेक्षा व्यवहाराला महत्त्व देतात.

या पांढरपेशा समाजाच्या पलीकडे अथांग असा दलित समाज पसरलेला होता. त्यांच्याजवळ नव्हती सुरक्षितता की नव्हती प्रतिष्ठा! पांढरपेशा समाज दलितांकडे तुच्छतेने पाहात असे. 'बळी'मध्ये दलितांच्या व्यथेला मराठीत प्रथमच मालतीबाई बेडेकर यांनी वाचा फोडली. दलितांची दुःखे मध्यमवर्गीयांनी जाणून घ्यावी अशी आबाची, पर्यायाने लेखिकेची इच्छा दिसते. आर्थिक परिस्थितीप्रमाणे प्रतिष्ठेबद्दल, संस्कृतीसंबंधी प्रवृत्ती बदलत जातात असे या उदाहरणांवरून लक्षात येते.

प्रतिष्ठेला अवास्तव महत्त्व देणाची प्रवृत्ती सर्व समाजात आढळते. स्त्रियांच्या बाबतीत तर समाजाच्या भावना अधिक टोकदार असतात. मुलीचं लग्न हा मोठा प्रतिष्ठेचा प्रश्न मानला जात असे. म्हणूनच नवरा गरीब नको, परजातीय नको, बीजवर नको, प्रेमविवाह नको आणि लग्न लांबायलाही नको. अशा अनेक अडचणींमधून मुलीचं लग्न जमणं अवघड होतं. स्त्रीची अब्रू काचेसारखी असते म्हणतात. परंतु शील म्हणजे सर्वस्व नव्हे. परस्पर विश्वास सर्वात महत्त्वाचा मानून बलात्कार हा अपघात मानण्याकडे विचारांची वाटचाल सुरू झालेली आपल्याला दिसते. विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असा हा विचार 'मधुबोल' मध्ये आला आहे. लीला दीक्षित यांची ही सरधोपट प्रेमकथा आहे. फसवणूक करणाऱ्या प्रियकरासमोर रडत न बसता खंबीरपणे वागणारी नायिका आपल्याला येथे भेटते.

समाजामधील पुरुषाचे वर्चस्व अनेक शतके स्त्रियांनी मान्य केले होते.

दारुड्या नवऱ्याला प्रतिष्ठा असते आणि ती बाईनेच सांभाळायची असते, अशी स्त्रियांची प्रवृत्ती बनली होती. ‘ विझती ज्योत ’ (शांता शेळके) मध्ये मुरारीच्या बाहेरख्याली स्वभावाला कंटाळून राजू काडीमोड मागते. ‘ आपण रहाळचिठ्ठीच्या वेळी आपले गाऱ्हाणे चार लोकांत मांडले हा मुरारीचा अपराध केला असे राजूला वाटत होते. ’ (विझती ज्योत, पृ. १७५) स्वत:च्या सुखापेक्षा नवऱ्याची प्रतिष्ठा जास्त मानणारी स्त्रीची प्रवृत्ती आपल्याला येथे दिसते. शांता शेळके यांच्या ‘ ओढ ’मध्ये माणुसकीही विसरणाऱ्या प्रतिष्ठेच्या कल्पना मनाला अस्वस्थ करतात. तरुणपणी विधवा झालेली सरस्वती तिच्या विधुर दिरांशी संबंधात येते. तिला दिवस गेल्यावर मात्र तिचा दीर लग्नाला नकार देतो आणि सासरे तिला गुपचूप विष देतात. सरस्वती सर्पदंशाने गेली अशी बातमी गावात पसरवली जाते. समाजात प्रतिष्ठित म्हणवणाऱ्या मानभावीपणे वावरणाऱ्या माणसांमध्ये अनेकदा असे स्त्रियांच्या अब्रूचे लुटारूही सामील असतात. शालिनी तुळपुळे यांची ‘ लपेलेले गुन्हेगार ’ ही आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. स्त्रियांचे उद्धारक डॉ. दिवाकर यांच्याबद्दल नायिकेचा भ्रमनिरास होतो तेव्हा उद्‌विग्न मनाने ती म्हणते : ‘ देवाचा नैवेद्य खाऊन पुजारी माजतो तसा हा समाज आहे. समाजात मोठे प्रतिष्ठित म्हणून मिरवणारे, स्त्री-उद्धारक म्हणून गाजणारे सारे ढोंगी आहेत. ’ (लपलेले गुन्हेगार, पृ. ६) समाजात प्रतिष्ठितांच्या कुकर्माकिडे नेहमीच कानाडोळा केला जातो, तर सामान्य माणसांच्या चाकोरीबाहेर जगण्यावर मात्र टीका केली जाते. या प्रवृत्तीचा प्रत्यय ‘ फेरीवाला ’ या कादंबरीतही येतो. प्रतिष्ठेचा डिंडिम वाजविणाऱ्यांची अब्रू तकलादू पायावर उभी असते. चारित्र्य हे वेश्यांकडेच जाऊन बिघडत नाही, तर कोणतेही अनीतीचे वर्तन समाजाला हितकारक नसते. चोरी, खोटेपणा वाईट, तसेच लाचलुचपतही वाईटच ! दुसऱ्या महायुद्धानंतर नोकरशाहीचा उदय झाला. टंचाईच्या त्या काळात नीतीची बंधने सैल झाली आणि लाचलुचपत करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. ‘ आविष्कार ’मध्ये खेड्यांमधून पैसे खाणारे सरकारी अधिकारी भेटतात. ‘ सातपुड्यातील वनलक्ष्मी ’ मध्येही पुराची पाहणी करून आश्वासने देऊन गेलेल्या अधिकाऱ्यांची माहिती आली आहे. लाच खाऊन किंवा खोटेपणा करून पैसा मिळवायचा आणि प्रतिष्ठा वाढवायची. दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावून त्यांच्या चुका काढण्याची प्रवृत्ती मात्र नेहमीच दिसते. दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावण्याची प्रवृत्ती लहानथोरांपासून सर्वांमध्ये आढळते. या समाजप्रवृत्तीची उदाहरणे आपल्याला सर्वच कादंबऱ्यांतून दिसतात. मुलींचे

शिक्षण, पतिपत्नीचे फिरायला जाणे किंवा स्त्रियांची हक्काची मागणी या गोष्टींबद्दल लोकांत चर्चा होत असे. लोकांनी नावे ठेवली तरी आपल्याला पटेल त्याप्रमाणे वागण्याची हिंमत तरुणांत आली होती. या संबंधात, 'माईचा तरी काय दोष ? क्रांतीच्या संधिकालात जन्म घेणाऱ्यांची अवस्था अशीच व्हायची.' (वठलेला वृक्ष, पृ.६९) अशी समजूत करून घेऊन वाद टाळण्याकडेच तत्कालीन सुधारकांची, सुशिक्षित तरुणांची प्रवृत्ती दिसते. असे प्रसंग अनेक प्रेमकथांतून आले आहेत. 'अजिता', 'काटेरी मार्ग' मधील नायिका घटस्फोटाचा मार्ग स्वीकारतात तेव्हा त्यांना लोकांची कुजबूज सहन करावी लागली. अनाहूत सल्ला देणाऱ्या माणसांना परिस्थितीचे, काळावेळाचे भान नसते. अशा माणसाच्या तोंडावर त्याची नालस्ती करण्याचे धैर्य काही माणसं दाखवतात. एक तर ती सुशिक्षित आणि ठाम विचाराची असतात किंवा सरळ मनाची अशिक्षित असतात. समाज नेहमी अडल्यानडलेल्या, फसवणूक झालेल्या, दुर्बल लोकांनाच अनेक प्रश्न विचारून त्रस्त करीत असतो. त्यांचे मनोधैर्य खच्ची करून टाकीत असतो. त्यातही पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे स्त्रियांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवणारी प्रवृत्ती विशेषत्वाने आढळते. 'काटेरी मार्ग' मध्ये निर्मला म्हणते - 'समाजाला वेश्येचे उंबरठे झिजवणारे पुरुष दोषी वाटत नाहीत; मात्र सारी काळजी समाजाला आमच्या स्त्रीजनांच्या वैवाहिक नीतीची लागून राहिली आहे ! किती हा पक्षपात ! असल्या दुटप्पी समाजाची मला पर्वा नाही ! (काटेरी मार्ग, पृ. १७६) स्त्रीच्या दैनंदिन व्यवहारावर लक्ष ठेवून असणारी समाजप्रवृत्ती मालतीबाई दांडेकरांनी योग्य शब्दात मांडली आहे.

अंधश्रद्धा, जातीयता यासारख्या प्रवृत्ती प्रत्येक पर्वामध्ये आढळल्या. श्रीमंत-गरीब भेद मानणाऱ्या समाजप्रवृत्तीबरोबर श्रीमंत, मध्यमवर्गीय व गरीब समाजातील प्रवृत्तींचा वेगळेपणाही आपण पाहिला. आत्तापर्यंत आपण ज्या समाजप्रवृत्ती पाहिल्या त्या सर्वांमध्ये एक समानधर्म आहे तो म्हणजे या समाजप्रवृत्ती सर्व काळात आढळतात. स्त्रियांच्या कादंबऱ्यांतील सार्वत्रिक प्रवृत्ती पाहिल्यानंतर स्त्रियांच्या विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर निर्माण झालेल्या तांत्कालीक प्रवृत्ती पाहणे आवश्यक ठरेल.

जो समाज स्त्रीला बंधनात ठेवीत होता त्याच समाजात स्त्रियांच्या उद्धाराची चळवळ पुरुषांनी चालविली होती. १९३५ नंतर तर या चळवळीचे अखेरचे पर्व सुरू झाले. स्त्रिया विकासाकडे सजगपणे पाहू लागल्या. विवाहाचे स्वातंत्र्य काही अंशी तिला मिळाले. अर्थार्जनाचे नवे दालन स्त्रीसाठी उघडले

गेले. अर्थात पुराणमतवादी प्रवृत्तीने स्त्रीजीवनातील हे बदल सहजपणे स्वीकारले नाहीत. प्रत्येक ठिकाणी जुन्यानव्या प्रवृत्तीचा संघर्ष होत गेला. तेव्हा स्त्रीजीवनावर प्रत्यक्षपणे परिणाम करणाऱ्या समाजप्रवृत्ती लेखिकांनी सांगितल्या आहेत.

'विवाह' हा लेखिकांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने त्यासंबंधातील समस्यांना अनेक दृष्टिकोनातून लेखिकांनी मांडले आहे. 'वठलेला वृक्ष' या कादंबरीच्या प्रारंभीच भारतीय जीवनातील विवाहाचे स्थान स्पष्ट केले आहे. हुंडा, पत्रिका, जातीची बंधने, प्रेमविवाहाला विरोध यांमधून विवाहाचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनला आहे. या कालखंडात बालविवाह झालेली अनेक दांपत्ये दिसतात. पण तरुणी मात्र थोडेफार शिक्षण घेतल्यावरच लग्न करू लागल्या होत्या. 'दाखवणे' या प्रकाराबद्दल 'वीणा' (लीला देशमुख), 'लतिका' (गीता साने), 'काटेरी मार्ग' (मालतीबाई दांडेकर), 'वठलेला वृक्ष' (गीता साने) या कादंबऱ्यांतून तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. सर्वसाधारण मुलींना सुरक्षित सुखवस्तू जीवन हवे. त्यामुळे आपल्या जोडीदाराच्या अपेक्षाही चाकोरीबद्ध असत. 'क्षितिजापार' (सिंधू गाडगीळ) मध्ये सदानंदला ८००रु. पगाराची वैमानिकाची नोकरी मिळते. पण मुलींना ही धोक्याची नोकरी पसंत नसते. शिकलेल्या तरुण मुलींचाही लग्नासंबंधीचा दृष्टिकोन या उदाहरणातून स्पष्ट होतो. ज्या समाजात लग्नासंबंधी फारसा विचार न करणाऱ्या मुली असतात, नवीन धाडशी प्रवृत्ती नसणाऱ्या मुली असतात, त्याठिकाणी अपेशी लग्नेही बरीच दिसतात.

**हुंडा प्रवृत्ती :** हुंड्याचा सौदा जमला तरच लग्न जमत असे. 'काटेरी मार्ग' मधील निर्मलाचं लग्न हुंड्याची घासाघीस होऊन ठरविले जाते आणि अपेशी होते. कुमुदिनी प्रभावळकरांच्या 'कुस्करलेलं हृदय'मध्ये हुंडा न मागता मानपान व सोन्याची मागणी होते. मुलीचे आईवडील श्रीमंत असतात म्हणून हे लग्न होते. पण ही प्रवृत्ती वाईट आहे, असे लेखिकेने सुचविले आहे.

मुलीच्या मताला लग्नाच्या बाजारात किंमत नसते, तसेच पत्नीलाही संसारात महत्त्व नसते. कित्येकदा पत्नी पुरुषापेक्षा बरीच लहान असल्यामुळे या प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळत असे. मनोरमा निमकर यांच्या 'अखेरची लाट'मध्ये १७ वर्षांच्या कुंचलेचा विवाह ७० वर्षांच्या नारायणरावांशी करून दिला जातो. पुढे कुंचला दुर्वर्तनी बनते व म्हातारा नवरा तिचा खून करतो. पतिपत्नीच्या वयातील अंतराचा गंभीरपणे विचार करण्याची प्रवृत्ती त्याकाळात नव्हती. आनंदीबाई विजापुरे यांची 'सारी जीवनकहाणी' या विषमविवाहाच्या

प्रवृत्तीतूनच घडली आहे. लीला देशमुख यांच्या ' दोन घडीचा डाव 'मध्ये जयश्री, ४२ वर्षांच्या पराशरशी प्रेमविवाह करते. परंतु पराशरने तिला कधीच आपल्या बरोबरीने वागविले नाही. त्यामुळे बौद्धिक आकर्षणातून हे लग्न झाले तरी अपयशी ठरले. पति-पत्नीच्या वयांत अंतर असलेल्या विवाहांना विषम-विवाह म्हणत. परंतु दोघांच्या स्वभावात असलेली विषमता हीदेखील एक चिंतनीय गोष्ट आहे. ' कुस्करलेले हृदय 'मध्ये नवऱ्याच्या संशयी स्वभावाचा त्रास असह्य होऊन मनोरमा घर सोडून जाते. प्रत्यक्षात अशा विषमविवाहाची अनेक उदाहरणे दिसतात. लग्नाच्या दिवशी पतीचे अंधत्व लक्षात येऊनही सरोजिनी शारंगपाणी जन्मभर ' दुर्दैवाशी दोन हात ' करीत राहिल्या. या अशा विवाहांना उपाय काय ? तर लग्नापूर्वीच मुलींनी आपली मते स्पष्टपणे मांडली पाहिजेत, असे ' वज्रलेख 'मध्ये मालतीबाई दांडेकरांनी सुचविले आहे.

**प्रेमविवाह :** वडील माणसांनी ठरविलेल्या लग्नातील दोष दाखवून दिल्यावर बहुसंख्य लेखिकांनी प्रेमविवाहाचा पुरस्कार केला आहे. कॉलेजमध्ये मुली जाऊ लागल्या आणि सहशिक्षणामुळे मुला-मुलींना थोडा मोकळेपणा मिळू लागला. बहुसंख्य कादंबऱ्यांतून प्रथमत: मित्र-मैत्रिणी, दादा-ताई, भाऊ-भाई, दीदी अशा संबोधनाने संबोधतात आणि पत्रातील मायने बदलत जातात. ' वठलेला वृक्ष ' मध्ये विनायकही प्रथम विमलेचा दादा असतो. ' पूर्वेचा वारा 'मध्ये समीर भारतीचा भाई असतो. कादंबऱ्यांतील हे दादा-ताईचे नाते प्रत्यक्षात पुढे जन्माच्या जोडीदारामध्ये बदलत होते. ' कुसुमानिल 'मध्ये कुसुमावती व कवी अनिल एकमेकांना दादा-ताईच संबोधताना आढळतात. सुप्रसिद्ध लेखिका कमलाबाई टिळकही श्री. टिळकांना लग्नापूर्वी भाऊ म्हणत असत, हे सांगून कमलाबाई म्हणाल्या, ' आमच्या वेळी कॉलेजच्या तरुणांमध्ये हीच प्रवृत्ती दिसत असे. '

या कालखंडातील बहुसंख्य कादंबऱ्या म्हणजे राजकीय किंवा सामाजिक पार्श्वभूमीवर रंगलेल्या प्रेमकथा आहेत. प्रेमविवाहांना विरोध केला तर प्रेमिकांच्या आयुष्याचे नुकसानच होते, असे लेखिकांना सुचवायचे आहे. म्हणून प्रेमिकांना मदत करणाऱ्या प्रवृत्तीचे मित्रही त्यांनी उभे केले आहेत. प्रेमविवाहाचे पाऊल विचारपूर्वक उचलले पाहिजे हे सांगण्याकरता कुमुदिनीबाईंनी ' प्रीतीचा गोलघुमट ', ' रस्सीखेच ' कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ओळख आहे, मैत्री आहे म्हणजे प्रेमही आहे, असे समजण्याची तत्कालीन समाजाची प्रवृत्ती होती आणि प्रेमिकांनाही तसेच वाटत असे. शेवटी प्रेमाचे पितळ उघडे पडले की

धक्का बसत असे. पुरुषांनी प्रेमाचे नाटक करून फसविलेल्या मुलींच्या कथा लेखिकांनी लिहिल्या आहेत. 'लपलेले गुन्हेगार 'मध्ये प्रेमातील फसवणुकीची कथा आहे. 'उर्मिला' मध्ये मकरंद हा अनेक मुलींना हिंडवणारा, तरुण डॉक्टर असतो. उर्मिला जेव्हा लग्नासंबंधी विचारते तेव्हा मकरंद म्हणतो, 'विवाह संस्थेवर माझा विश्वास नाही. तेव्हा आपण गुप्तरीतीने पतिपत्नीसारखे राहू.' पुरुषाच्या भ्रमरवृत्तीचे दिग्दर्शन या प्रेमकथेतून केले आहे. 'मीनाक्षीचे जीवन' मध्येही मीनाक्षी पुरुषांच्या प्रेमाची रीत मुलीला शिकवते. 'वादळापूर्वी 'मध्ये कुसुम व मालती या मैत्रिणींची मुद्दाम प्रीतिविवाहासंबंधी चर्चा आली आहे. युरोपमधील देशांप्रमाणे आपल्याकडे प्रेमविवाहाचे अंधानुकरण होऊ नये असा चर्चेचा सूर आहे. प्रेमविवाह करताना तरुणांची वैचारिक प्रगल्भता लेखिकांना अभिप्रेत आहे.

**बौद्धिक विवाह :** अल्लड वयातील तरुणांच्या प्रेमविवाहाबरोबर काही विवाहितांमध्ये प्रौढपणी द्वितीय विवाह करण्याची प्रवृत्ती काही काळ निर्माण झालेली दिसते. वास्तविक हेही प्रेमविवाहच; पण त्यामागे 'बौद्धिक भूक' हे आकर्षण असल्याचा युक्तिवाद या सुशिक्षितांकडून केला जात असे. या लग्नातून स्वत:ला हवे ते बौद्धिक समाधान पुरुष मिळवत असे आणि त्याच्या पहिल्या पत्नीला मात्र एकलेपणाचे दु:ख भोगावे लागत असे. स्त्रियांच्या दु:खाशी समरस झालेल्या या लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांतून पुरुषांना दोष दिलाच आहे. तसेच दुसऱ्या पत्नीलाही जबाबदार धरले आहे. द्विभार्याप्रतिबंधक कायदा नव्हता तेव्हा दोन विवाह करण्याची पद्ध रूढ होती. शांता शेळके यांच्या 'ओढ' कादंबरीत सवतीला सहजपणे स्वीकारणारी अशिक्षित पण उदार मनाची प्रथमपत्नी आहे. 'दोन घडीचा डाव '(लीला देशमुख) मध्ये अशीच उदारमनाची पत्नी दाखवली आहे. तिच्या पतीची-विश्वासची-प्रेयसी जयश्री तिला पसंत असते. जयश्रीला मात्र विश्वाससह त्याची प्रथमपत्नी संसारात नको असते. म्हणून समंजसपणे ती विश्वासच्या संसारातून दूर जाते. अशिक्षित स्त्रीची आपल्या सवतीबद्दल तक्रार नव्हती, परंतु स्त्री शिकली, तिला आपल्या स्वातंत्र्याची जाणीव झाली त्यावेळी मात्र दोघा सवतींनी समजुतीने एकत्र राहण्याची प्रवृत्ती बदलली. द्वितीय विवाहाच्या विरोधातून सरस्वतीबाई दाभोळकर यांनी 'हृदयाचे कढ' ही कादंबरी लिहिली. 'प्रथमपत्नी जिंवत असलेल्या वराशी लग्न केल्याने होणारे तोटे ' सांगण्याचा उद्देश लेखिकेने शीर्षकाखालीच स्पष्ट केला आहे. द्वितीय विवाहाचे तोटे सांगणारी अनेक कथानके यामध्ये आहेत. कवी

विठ्ठलरावांनी प्रथमपत्नीला वेडे ठरवून दुसरे लग्न केले. त्यांच्या लग्नाबद्दल अभिनंदनाची सभा झाली तेव्हा एक तरुण पुढे येऊन अशा लग्नासंबंधी विरोध दर्शवितो. 'पागलखाना'मध्ये, मुळात शहाण्या असलेल्या बायका मानसिक दडपणामुळे वेडचा होतात असे दाखवले आहे.

नवीन मैत्रीण आवडली म्हणून तिच्याशी लग्नाचा प्रस्ताव मांडताना पुरुषांना अजिबात अपराधी वाटत नसे. 'अजिता', 'दूर कुठेतरी', 'कोजागिरी', 'पुसलेल्या रांगोळ्या', 'कमळाचं जाळं' यासारख्या सुमारे १२ कादंबऱ्या त्या १० वर्षांत या एकाच विषयावर लिहिल्या गेल्या. त्यावरून या प्रवृत्तीचे गांभीर्य आपल्या लक्षात येईल. आपली पत्नी दुसऱ्याबरोबर गेली तर पुरुषांना चालेल का, असा धीट प्रश्न स्त्रियांनी विचारला आहे. पुरुषांप्रमाणे स्त्रियाही विकारवश असतात. ही मर्यादा लेखिकांनी ओळखली आहे. 'वीणा'मध्ये शिरीष दुसरीचे आहेत हे माहीत असूनही वीणा त्यांच्यावर प्रेम करते, तिला प्रतिसादही मिळतो. त्यावेळी वीणाच्या मैत्रिणीने-कुंदाने-काढलेले पुढील उद्‌गार सार्थ वाटतात.

'स्त्रीपुरुषांची मैत्री प्रथम पवित्र असली तरी त्याला भावनेचे व वासनेचे स्वरूप केव्हा प्राप्त होईल याचा काही नियम नाही.' (वीणा, पृ.४८)

'तू भेटायला नको होतास' मध्ये गायक देशमुखांवर प्रेम करणारी राजेश्वरी पुढे त्यांच्याकडून प्रेमाची अपेक्षा करते. दोन विवाह बेकायदेशीर ठरतील म्हणून लग्न न करता राहावे असे राजेश्वरीला वाटते. तेव्हा तिचा भाऊ म्हणतो,

'तुम्ही एकमेकांना मनानं वरलं आहे याला जगाच्या दृष्टीनं कवडीमोल किंमत आहे. जगानं जर तुमच्यासारख्यांच्या भावनेचा विचार करायचा म्हटले तर मग हवा तो गोंधळ माजून सगळीकडे अंदाधुंदी माजेल.' (तू भेटायला नको होतास, पृ.११५)

लेखिकांना समाजमनाची किती योग्य जाणीव होती ते येथे दिसून येते. बौद्धिक विवाहाच्या या प्रवृत्तीमधून विविध प्रवृत्तींची माणसे आपल्याला या कादंबऱ्यांतून दिसतात. स्त्रियांप्रमाणे पुरुषांनाही बंधने असावीत अशी मागणी सर्वच कादंबऱ्यांतून केली आहे. स्त्रियांनीही पुरुषांना उत्तेजन देऊ नये, असे आवाहन लेखिकांनी केले आहे. आपल्यामुळे आपल्या प्रियकराच्या संसारात वादळ उठणार असेल तर माघार घेणाऱ्या समजूदार प्रवृत्तीच्या प्रेमिका लेखिकांनी रंगवल्या आहेत. शांता शेळके यांच्या 'कोजागिरी' मध्ये मुकुंदाचे पत्नीवर-अहिल्येवर-अतिशय प्रेम आहे हे लक्षात आल्यावर त्याची प्रेयसी

प्रमिला म्हणते -

'हा देखणा परंतु मध्यम वयस्कर पुरुष - छे! हा माझा प्रियकर नव्हे. माझा प्रियकर सारे जग झिडकारून माझ्याबरोबर कुठेही आला असता. हा पुरुष व्यवहारी आहे. संसारी आहे, प्रौढ आहे. माझा आणि यांचा काय संबंध!'

(कोजागिरी, पृ.१६९)

प्रमिला अहिल्येच्या संसारातून दूर जायचे ठरवते. परंतु अहिल्येचे मनही आपल्या संसारातून उडून जाते. पतीची भ्रमरवृत्ती जाणून ती बुद्धिमान स्त्री दु:खी होते. तिच्या तोंडी आलेले हे उद्‌गार बहुसंख्य स्त्रियांच्या मनातले विचार सांगून जातात.

'त्यांचे प्रेम तुझ्यावरही नाही आणि माझ्यावरही नाही. ते केवळ स्वत:वरच प्रेम करतात हीच गोष्ट खरी. जो पुरुष एका स्त्रीला फसवतो तो दुसरीलाही फसवल्यावाचून राहणार नाही'

(कोजागिरी, पृ. १८२,१८३)

'हृदयाचे कढ'मध्ये सुशिक्षितांच्या बौद्धिक विवाहाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. सुशिक्षितांच्या वागण्या-बोलण्याचा समाजप्रवृत्तींवर परिणाम होत असतो. म्हणूनच मान्यवरांनी स्वीकारलेले बौद्धिक विवाह अनुकरणीय नाहीत हे लेखिकेने कादंबरीच्या माध्यमातून समान्यजनांवर ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. समाजातही या विवाहांना विरोध करणाऱ्या जाहीर सभा, चर्चा वगैरे होत होत्या. सुप्रसिद्ध समाजकार्यकर्त्या गंगूताई पटवर्धनांनी बडोद्यातील साहित्यसभेमध्ये असेच एक मान्यवर साहित्यिक अध्यक्ष म्हणून येणार असल्याचे कळल्यावर त्यांच्याविरोधी जाहीर ठराव मांडला होता. लेखिकांनीही हाच विरोधी सूर धरला तरी या प्रवृत्तीचा अनेक बाजूंनी विचार केला. ही प्रवृत्ती समाजातही दहा-पंधरा वर्षे होती. परंतु विवाहाचे वय वाढले, मुली शिकू लागल्या आणि समाजातील बौद्धिक विवाहाची प्रवृत्ती नाहीशी झाली. स्त्रियांनी त्याची जागरुकपणे नोंद घेतली ही महत्त्वाची गोष्ट मानली पाहिजे.

**परित्यक्ता :** प्रथमपत्नी जिवंत असताना पुरुषांनी केलेले दुसरे विवाह समाजाला अस्वस्थ करीत होते. त्यामुळे पतित्यक्तेचे दु:ख सांगणाऱ्या काही कादंबऱ्या या काळात प्रसिद्ध झालेल्या दिसतात. समाजात अनेक दु:खी पतित्यक्ता पाहून मालतीबाई दांडेकरांच्या 'मातृमंदिर'मध्ये मीना अशा स्त्रियांसाठी मातृमंदिर काढावयाचे ठरवते. मालतीबाई दाडेकरांच्या 'काटेरी मार्ग' ह्या कादंबरीत परित्यक्तेचे अनेक दृष्टिकोनातून दर्शन घडविले आहे.

निर्मलेच्या नवऱ्याने आईच्या इच्छेसाठी निमाशी लग्न केले, पण आपल्या मैत्रिणीशी राजरोस संबंध चालूच ठेवला. निर्मला कायमची माहेरी आली, पण वहिनीची कुरकूर चालू झाली. आहे या परिस्थितीतील लाचार जिणे जगण्यापेक्षा स्वतंत्र, स्वावलंबी व्हावे असे निर्मलेला वाटते. हाच तिचा वेगळेपणा आहे. 'पुसलेल्या रांगोळ्या'मधील कल्याणी परित्यक्ता आहे, पण पुन्हा लग्न करायचे ठरवते. ती म्हणते, 'आमची मुलं भरत, लवकुश, कर्णासारखी तेजस्वी निघाली तर समाजाला त्यांचा स्वीकार करावाच लागेल.' स्त्री बदलत असताना समाजालासुद्धा बदलून टाकण्याची प्रवृत्ती त्यांच्यात निर्माण होत होती ही विचार करण्याजोगी गोष्ट आहे.

घटस्फोटाच्या कायद्यामुळे स्त्रीस्वातंत्र्याच्या दिशेने एक पुढचे पाऊल टाकले गेले. अर्थात संसारात अवमानित झालेल्या स्त्रिया घटस्फोट घ्यायला चटकन पुढे आल्या नाहीत. घटस्फोटही सहज मिळत नव्हता, आणि समाजप्रवृत्ती तर विवाहविच्छेदाला मुळीच अनुकूल नव्हती. पांढरपेशा जातीत घटस्फोटाचा कायदा नवीन होता, पण इतर जातीत काडीमोड घेण्याची पद्धत होती. तरी सोडचिठ्ठी मिळाल्यावर त्या समाजातही चर्चा होत असे, हे शांता शेळके यांच्या 'विझती ज्योत' मध्ये दिसून येते. स्त्रीजातीच्या सहनशील आणि क्षमाशील प्रवृत्तीवर समाजाचा विश्वास होता. जेव्हा स्त्रियांनी घटस्फोटाचा दावा कोर्टात लावला तेव्हा या विश्वासाला तडा जाऊ लागला. त्यामुळे पांढरपेशा मध्यमवर्गीयांमध्ये किंवा अन्य जातींमध्ये घटस्फोटाला पाठिंबा देण्याची फारशी प्रवृत्ती दिसत नव्हती.

**विधवाजीवन :** भारतीय समाजात संसारी स्त्रिया दुय्यम स्थानावर जगत होत्या. त्यामध्ये विधवांच्या कष्टाला एकटेपणाचा शाप होता. शहरांमधून विधवांकडे पाहण्याची वृत्ती बदलत होती. परंतु खेड्यातील विधवांच्या मागचे नष्टचर्य संपले नव्हते. शीला सरदार यांच्या 'भावनेच्या भोवऱ्यात' मध्ये दहाव्या वर्षी विधवा झालेल्या भारतीची जीवनकहाणी आहे. तरुण विधवा म्हणजे निराधार. तिला कायम आपल्या चारित्र्याची जपणूक करावी लागत असे. 'फेरीवाला'मध्ये विधवा शंकुतलेच्या दुर्दैवाचे दशावतार सांगितले आहेत. दीराच्या वासनेची शिकार झालेली तरुण शकुंतला, दुष्ट सासूमुळे देशोधडीला लागते व वेश्याव्यवसायात अडकते.

**वेश्याजीवन :** स्त्री असूनही सर्वसामान्य कुटुंबसंस्थेतून वगळला गेलेला एक घटक म्हणजे वेश्या होय. विकासपर्वामध्ये विधवांचा, किंवा शिक्षणाचा

प्रश्न थोडासा सौम्य झाला तरी वेश्यांकडे मात्र उपेक्षेने पाहण्याची प्रवृत्ती समाजात दिसतच होती. 'फेरीवाला' (गीता साने) मध्ये शकुंतला म्हणते – 'वारयोषितेला हृदय नसते म्हणतात, पण ती कशी व का त्या पायरीला पोचते याचा विचार केला का? (फेरीवाला, पृ. ७७) शकुंतलेच्या प्रश्नाचे उत्तर कोणीच कधीही देणार नाही. कारण वेश्येची पार्श्वभूमी समजून घेण्याची समाजाला गरजच नसते. घरात दुर्लक्षिलेल्या विधवा किंवा पतीने टाकलेल्या निराधार स्त्रिया यांना शरीराचा बाजार मांडावा लागला तो अर्थार्जनासाठीच! 'पुसलेल्या रांगोळ्या' मध्ये परित्यक्ता अक्कांना नवऱ्याने परत घरी नेले. त्यांचा छळ केला, अनेक रोग दिले आणि परत हाकलले. एक मूल पदरात असलेली ती रोगीष्ट स्त्री जाणार कुठे? समाज तिला संरक्षणही देत नाही. नवऱ्याला शासन करीत नाही. शेवटी पैशासाठी अक्का रोज नवा मालक शोधतात. खोल्या भाड्याने देऊन अनेकांना धंद्याला लावतात. स्त्रीच्या या अधोगतीला समाजच जबाबदार म्हणावा लागेल. स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवण्याच्या प्रवृत्तीतूनच एकेकाळी तिची विकासाची गती मंदावली होती. हे शिक्षण मिळवण्यासाठी स्त्रीला समाजप्रवृत्तींशी झगडा करावा लागला.

**शिक्षणविषयक प्रवृत्ती :** प्रबोधनपर्वामध्ये स्त्रीशिक्षणाबद्दल समाजामध्ये जागृती झाली. विचारपर्वामध्ये विरोधाची धार बोथट झाली. त्यानंतर विकासपर्वामध्ये स्त्रीशिक्षण ही आवश्यक गरज होऊन बसली. स्त्रीशिक्षण हे समाजजीवनात अनेक स्थित्यंतरे घडवून आणणारे महत्त्वाचे समाजपरिवर्तन मानले पाहिजे. त्यामधून अनेक समाजप्रवृत्ती निर्माण झाल्या. मुलीचे लग्न जमले की शिक्षण संपले, असा सर्वसाधारण दृष्टिकोन होता. सुशिक्षित तरुण आपल्या पत्नीला आग्रहाने उच्चशिक्षण देत असत. आज साठीच्या घरातील बहुसंख्य स्त्रियांनी लग्नानंतर पदवी मिळवली, 'ललिता' मध्ये रमाबाई पतीच्या आग्रहाने शिकतात पण त्यांच्या शेजारी-पाजारी त्याबद्दल चर्चा होत असे. बहुसंख्य स्त्रियांनी विरोध सोसून पदवी मिळवली, मुलींनी स्वावलंबी व्हावे, त्यांचे लग्न लवकर जुळावे किंवा प्रतिष्ठा म्हणून.मुलींना शिकवण्याचे प्रमाण वाढू लागले तेव्हा मध्यमवर्गीय प्रौढ स्त्रियांचे मनोगत, 'वठलेला वृक्ष' मध्ये विमलची आई स्पष्ट करते,

'मुलींना शिकवायला पाहिजे म्हणून त्यांना काम सांगू नका, स्वत: कष्ट उपसा. पुढे सुना आल्यावर म्हणजे मुलांना अशिक्षित बायका नको असतात म्हणून त्यांना शिकवा. त्याचे कष्ट उपसा! मिळून काय? सारा जन्म असाच

जायचा आपला.' (वठलेला वृक्ष, पृ. ३२) विमलेची आई समंजस होती, लग्न जमवताना विमलेला दहा जणांना दाखवावे लागले. तेव्हा त्या म्हणतात, "आमची लग्ने लवकर होत. बरं-वाईट आम्हाला समजत नसे. पण तुम्ही शिकलेल्या म्हणून तुमची अशी स्थिती झाली."

शिकणाऱ्या मुलीच्या चुका शोधून तिच्या शिक्षणाला नावे ठेवणे ही प्रवृत्ती असल्यामुळे अशी अनेक उदाहरणे दिसतात. 'विझती ज्योत'मध्ये राजू किंवा 'वादळापूर्वी'मधील विमल, यांची जीवनचरित्रे या प्रवृत्तीमुळे झाकोळली होती. 'दूर कुठेतरी'मध्ये रजनीकांत बायकोच्या शिक्षणाला महत्त्व देऊन मित्रांना म्हणत असे, 'सुशिक्षित स्त्री जीवनाची सारी अंग परिपूर्ण करते. ती पुरुषाची मैत्रीण, सखी, प्रेयसी, आणि पत्नी या सगळ्याच नात्यांनी त्याच्या जीवनात समरस होण्याचा प्रयत्न करते. सुशिक्षित स्त्री घर सांभाळते, तुमच्या बैद्धिक जीवनात सहभागी होते आणि समाजातही मिसळते.' (दूरकुठे तरी, पृ. ११०) रजनीकांतचे हे विचार समाजाला आदर्श वाटावे असेच आहेत. सुशिक्षित स्त्रीबद्दल इतकी उदार प्रवृत्ती काही अंशी निर्माण झाली असावी म्हणूनच स्त्रीचा विकास झाला. सुशिक्षित स्त्री शिक्षणामुळे जागरुक बनली होती. स्त्रियांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम असावा, या महर्षी कर्वे यांच्या विचाराचा लेखिकांवर प्रभाव पडला. तसेच समान शिक्षणामुळे स्त्रीपुरुष समानतेचा अतिरेक झाला तर कुटुंबव्यवस्था डळमळीत होईल, असा धोक्याचा इशारा 'ललिता' कादंबरीत दिला आहे.

स्त्रियांच्याही नंतर शिक्षणाची कवाडे ज्यांच्यासाठी उघडली गेली त्या दलित समाजाची ओळख समाजाला 'बळी' कादंबरीमुळे झाली. मांग-गारुडी समाजातील अभ्यासाचा कंटाळा करणारी छोटी मुले 'बळी' कादंबरीच्या प्रारंभीच भेटतात. मुलांना शाळेत पाठविण्याचा आग्रह करणाऱ्या आबाला एक व्यवहारी आई सांगते, 'आमचा पोर ढोरामागं ग्येला तर चार आनं मिळत्याल, पोरगीनं भाकर क्येली तर प्वारं खात्याल. शिकूनशानी काय मिळनार हाय? (बळी, पृ. १८) शिकूनही बेकार राहिलेला आबा, शिक्षणावरच चिडतो. तो म्हणे - 'कशाला पाठवलंत मला शिकायला? इथं राहिलो असतो तर रस्ते उकरायची लाज वाटली नसती. शिकायला पाठवलंत आणि माझी अर्धीमुर्धी मान छाटून ठेवलीत. त्यापेक्षा मी तुमचा मुलगाच नाही म्हणा.' (बळी, पृ. १८) दोरी काटलेल्या पतंगाप्रमाणे आबाची अवस्था झाली होती. दलित समाजातही प्रथमतः शिक्षणासंबंधी अनास्था आणि शिक्षणानंतर येणारी निराशा

या दोन्ही प्रवृत्ती आपणास आढळतात. बेकारीच्या व्यथा या कादंबऱ्यांतून उमटतात. पुरुषांना धंदेशिक्षण (फेरीवाला), व स्त्रियांना पदवीपर्यंत गृहशिक्षण (पुसलेल्या रांगोळ्या) दिले जावे असा सूर लेखिकांच्या कादंबऱ्यांतून निघतो.

**अर्थार्जन :** स्त्रियांच्या संसाराच्या कल्पना बदलत होत्या. घर व मुलंबाळं यापलीकडे शिक्षणाचा उपयोग व्हावा असे काही स्त्रियांना वाटत होते. त्यांच्यापुढे समाजकार्य व अर्थार्जन ही ध्येये होती. साहजिकच महर्षी कर्व्यांनी सुरू केलेला उत्कृष्ट गृहिणी बनविणारा अभ्यासक्रम उपयुक्त असला तरी अलीकडच्या व्यवहारी जगामध्ये, त्या अभ्यासक्रमात कालानुक्रमे बदल करण्यात आले. दुसऱ्या महायुद्धानंतर स्त्रिया झपाट्याने नोकरी करू लागल्या. महागाईचा भस्मासुर वाढत गेला आणि नोकरी करण्यावाचून मध्यमवर्गीय स्त्रीला मार्गच उरला नाही. शिक्षणाचा उपयोग नोकरी करून पैसे मिळवणे, अशीच समाजप्रवृत्ती बनू लागली होती. परंतु स्वत:च्या चैनीसाठी स्त्री नोकरी करत नव्हती हेही तितकेच खरे होते. संसाराला हातभार लावणे एवढीच नोकरीची अपेक्षा ' वादळापूर्वी ' मधील विमल व्यक्त करते. कालांतराने स्वतंत्र अस्तित्वासाठी अर्थार्जन ही प्रवृत्ती निर्माण होऊ लागली. ' दूर कुठेतरी 'मध्ये ' स्वप्नाचा नोकरी करण्यामागे स्वातंत्र्य टिकवण्याचा उद्देश होता. शिक्षणानंतर स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास किती झपाट्याने होत गेला ते येथे दिसून येते. पुरुषांना मात्र या बदलत्या स्त्रीला समजावून घेणे अवघड होत असे. पत्नीची नोकरी स्वीकारणे पुरुषाला कमीपणाचे वाटत असे. कारण स्त्रियांनी नोकरी केली तर कुजबुजणारा तो समाज होता. कालांतराने स्त्रियांचे अर्थार्जन ही कौतुकाची किंवा कमीपणाची गोष्ट राहिली नाही. ' बेसूर संगीत 'मधील कुंदाताई, 'रस्सीखेच 'मधील कौमुदी, ' प्रीतीचा गोलघुमट 'मधील वैजयंती इ. कुमुदिनी रांगणेकरांच्या सर्वच नायिका शिकलेल्या, नोकरी करून स्वावलंबी बनलेल्या आहेत. नोकरी करणाऱ्या मध्यमवर्गीय स्त्रिया सामान्यत: नर्स किंवा शिक्षिका आहेत. त्यापलीकडे पसरलेल्या बहुजनसमाजातील स्त्रिया स्त्रीशिक्षणापूर्वीपासूनच विविध मार्गांनी अर्थार्जन करताना दिसतात.

' कृष्णरजनी ' मधील नीला शिंप्याचे दुकान चालविते. वडील गेल्यावर शिक्षिका म्हणून २० रु. कमवण्यापेक्षा ती शिवणाचे दुकान घालते. ' अजिता ' मधील लक्ष्मी नवऱ्याला सोडून एकटी राहते तेव्हा घरी बाहुल्या बनवून प्रपंच चालवते. पुढे मुलगा कमवता होतो, नवरा नीट वागू लागतो तेव्हाही आपला व्यवसाय चालूच ठेवते. आर्थिक स्वावलंबनाचे महत्त्व स्त्रीला समजले होते.

असा आत्मविश्वास गीता साने यांच्या 'आविष्कार' मधील वीणामध्ये आहे, 'वठलेला वृक्ष' मध्ये विमलामध्येही आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीला आपल्या वेगळेपणाची जाणीव झाली तेव्हाच गरज नसतानाही नोकरी करावी असा विचार पुढे आला. शकुंतला परांजपे यांच्या 'घरचा मालक' मधील लीलाबाई म्हणतात, 'येऊन जाऊन नोकरी केवळ पैशाकरता करायची असते की काय? पैसे घेऊ नयेत हवे तर; नाहीतर एखाद्या सार्वजनिक कार्याला द्यावेत.' (घरचा मालक, पृ. १७१) शिकलेल्या स्त्रीच्या पहिल्या पिढीला समाजऋणाची सतत जाणीव होती. लेखिकांच्या निवेदनातून किंवा व्यक्तिरेखांतून ती व्यक्त होते. शिक्षणामुळे स्त्रीला आत्मसामर्थ्याची जाणीव झाली. पुढे नोकरीच्या निमित्ताने स्त्री घराबाहेर पडली आणि अधिक बहुश्रुत झाली. सांसारिक जबाबदाऱ्यांचा दुहेरी भार स्त्रीवर पडला. या प्रत्येक घटनेगणिक स्त्रीची प्रवृत्ती बदलत होती. अर्थार्जन करणाऱ्या स्त्रीची भाषा बदलली. समतेच्या, स्त्रीमुक्तीच्या लढ्याची भाषा त्यासाठी काही लेखिकांनी वापरली आहे. स्त्रीला दुय्यम दर्जा देऊन तिची अवहेलना करणारी समाजप्रवृत्ती आणि स्त्रीमध्ये निर्माण झालेली स्वतंत्र प्रवृत्ती यांचा संघर्ष या कादंबऱ्यांतून आला आहे.

**स्त्रीविषयक दृष्टिकोन :** स्त्रीने परावलंबीच असले पाहिजे हा विचार समाजात इतका रुजला होता की स्त्रीने स्वावलंबी, समर्थ होण्यासाठी काही धडपड केली तरी समाजाला पटत नव्हते. स्त्रियांच्या शिक्षणाला एकेकाळी प्रचंड विरोध झाला. तसेच स्त्रियांनी धावपळीचे, मैदानी खेळ खेळण्यास लोक फारसे अनुकूल नव्हते. 'वादळापूर्वी' मध्ये कुसुम म्हणते - मध्यमवर्गीय अर्धशिक्षित सुधारक हे बायकांचे काळ असतात. बायकांनी अर्थार्जन करावे आणि पारंपरिक आर्य स्त्रीप्रमाणे असावे असे ते पुरुष मानतात. तिची लहानशी चूक काढण्यात तत्पर; नाहीतर ती डोक्यावर बसेल ही भीती! घरोघरच्या स्त्रियांना या पुरुषी प्रवृत्तीला तोंड द्यावे लागत असे. पुरुषप्रधान प्रवृत्तीच्या दबावामुळे स्त्रीचे समाजातील, घरातील स्थान कसे बनले होते ते 'वादळापूर्वी'मध्ये विमलने सांगितले आहे.

'स्त्रियांना दंडक काय, की फावल्या वेळात त्यांनी वाचावे-लिहावे किंवा शिकावे. एखादी स्त्री निर्भयतेने व स्वतंत्रतेने वावरताना दिसली तर त्याप्रमाणे वावरण्याची मुभा म्हणजे ती देणाऱ्याची कृपा! तो हक्क नव्हे. रोजच्या क्षुल्लक गोष्टीत आर्थिक स्वातंत्र्य आड येते असे नाही. बायकांना हजारोंचे दागिने असतात; पण संस्थेला देणगी, वर्गणी ती आपल्या मताने देऊ शकत नाही.'

(वादळापूर्वी, पृ.१०६)

स्त्रीला पुरुष स्वातंत्र्य देत नसेल तर तिने ते मिळवले पाहिजे, असे लेखिकांनी सांगितले; पण समानतेची उत्कट इच्छा स्त्रियांनाही नसते असे मान्यही केले. अग्नियान 'मध्ये पती स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झाल्यावर त्याची पत्नी सासूकडे, तिची बोलणी खात राहू लागते. स्त्रीजीवनविकासाच्या प्रारंभकालात स्वयंनिर्णय घेण्याची क्षमता सर्वच स्त्रियांमध्ये आली नव्हती याची जाणीव या जागरुक लेखिकांना होती.

१९३५ नंतर महागाई व स्त्रीशिक्षण यांच्या प्रभावामुळे स्त्रिया अर्थार्जनाकडे वळल्या. त्यासाठी वेगवेगळ्या वाटा स्त्रियांनी चोखाळल्या. 'मीनाक्षीचे जीवन' मध्ये पतीच्या प्रोत्साहनाने मीनाक्षी नाटकात काम करू लागते व पुढे नवऱ्याला सोडल्यावर सिनेमातही जायचे ठरवते. पुरुषांच्या लंपट नजरांपासून एकट्या राहणाऱ्या स्त्रीला शीलरक्षण करणे किती अवघड होते तेही या कादंबऱ्यांतून समजते. 'काम आणि कामिनी 'मध्ये वृंदा नाशिकला एकटी राहत असे. ती म्हणते, 'भयंकर सुधारलेल्या या जगातसुद्धा स्त्रियांनी एकटं राहणं भयंकर आहे. त्यांना पुरुषांचा आश्रय नेहमीच आवश्यक असावा ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे!' निसर्गतः स्त्री व पुरुष यांच्यामध्ये काही अंशी भेद आहे. स्वार्थी प्रवृत्तीच्या पुरुषांनी स्त्री आपल्या अंकित राहावी म्हणून हा भेद वाढवत नेला. स्त्रीवर ती दुय्यम, अबला असल्याचे संस्कार केले गेले. त्यामधूनच स्त्री ही भोगवस्तू मानण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. पुरुषांची स्त्रीबद्दलची कामुक प्रवृत्ती बदलण्यासाठी स्त्रीने सामर्थ्यवान बनणे आवश्यक होते. स्त्री शारीरिक व मानसिकदृष्ट्या बलवान होण्याची जरुरी होती. गांधीजींच्या भाषणातून स्त्रीशक्तीची जाणीव सामान्यांना करून दिली गेली. स्त्रियांनी स्वतःचा उद्धार केला पाहिजे, असे म्हणताना पुरुषांवरही ती जबाबदारी आहे, असे आग्रहाने सांगणारा हा गांधीवादी मुकुंदा 'काम आणि कामिनी 'मध्ये आहे. मात्र तत्त्व म्हणून समानता पटली तरी आचरणारे पुरुष कमीच होते. पुरुषी प्रवृत्तीबद्दल बोलताना हारिणी म्हणते, 'पुरुषच बायकांना पुढे येऊ देत नाहीत. आपण स्वतः मात्र भराभरा आवडेल त्या मार्गाने जातात.' (कीर्ती, पृ. १०७)

पुरुषांच्या तुलनेत प्रारंभी स्त्रियांचा विकास फार सावकाश व मर्यादित क्षेत्रापुरताच झाला. याचे कारण जशी पुरुषांची स्वार्थी अरेरावी वृत्ती हे आहे, तसेच स्त्रियांची थंड प्रवृत्तीही त्यांच्या विकासाच्या मार्गावरील एक अडथळा आहे. सामाजिक परिस्थिती आणि पिढ्यान्‌पिढ्यांचे संस्कारही याला कारणीभूत

आहेत. त्यामुळे नोकरी आणि घर दोन्ही सांभाळणाऱ्या स्त्रीलासुद्धा पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळविणे कठीण होऊन बसले. प्रत्येक भारतीय गृहिणीला पुरुषांच्या अरेरावी प्रवृत्तीशी सामना करावा लागला. त्यामुळे या प्रवृत्तीच्या संदर्भातील जिवंत, लखलखीत असे अनुभव लेखिकांनी मांडले आहेत. पुरुषी प्रवृत्तीशी सामना देताना स्त्रीने आपली जन्मजात वत्सल प्रवृत्ती कधी सोडली नाही. प्रत्यक्षात स्त्री आई झाली किंवा झाली नाही तरी वात्सल्य ही स्त्रीची मूलभूत प्रवृत्ती आहे.

**मातृत्व :** वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ असलेली स्त्री आर्थिक दृष्ट्याही स्वावलंबी बनली होती. तरीही राजकारणात, समाजकार्यात सर्वस्वाची आहुती देणाऱ्या स्त्रिया, पुरुषांच्या तुलनेत अत्यल्प होत्या. याचे कारण अपत्यजन्माची व संगोपनाची जबाबदारी केवळ स्त्रीलाच पार पाडावयाची असते. स्त्रियांवरील मातृत्वाची जबाबदारी तिच्या स्वातंत्र्याला मर्यादा घालते, म्हणून ही जबाबदारी स्त्रियांनी सहसा नाकारलेली दिसत नाही. उलट मुलांसाठी तडजोड करायची तिची तयारी असते. मातृत्व ही तिची सहजप्रवृत्ती आहे. आपण हट्टाने आपल्या मनाप्रमाणे वागलो तर आपल्या पतीशी संघर्ष करावा लागेल आणि त्याचा विपरीत परिणाम मुलांवर घडेल ही जाणीव तत्कालीन सुशीक्षित स्त्रियांना झाल्याचे 'वादळापूर्वी'मधील विमलेच्या वागणुकीतून दिसते. लीला मस्तकार रेळे यांनी १९४७ साली दादर वनिता समाजामध्ये सांगितले की, 'लग्नानंतर पहिली दहा वर्षे मुलांना वाढविणं, संसाराची घडी नीट बसवणं अत्यंत महत्त्वाचं आहे.' (कल्लोळ, पृ. २९-३०)

मुलांसाठी आईनेच त्याग केला पाहिजे, या पारंपरिक कर्तव्याच्या कल्पनेमागे स्त्रीची दबलेपणाची, पड खाण्याची प्रवृत्ती दिसते. 'विझती ज्योत' मध्ये राजूला दिवस राहिल्यावरही मुरारीचे घराबाहेरील रंगढंग बदलत नाहीत. राजूला तो आपल्या प्रेमाचा, स्त्रीत्वाचा पराभव वाटतो आणि ती माहेरी जाण्याचे ठरविते. परंतु तिच मन शांत नसते. तिच्या मनात येते की, 'त्या बालकाच्या हक्काच्या घरापासून-पित्यापासून त्याला वंचित करणे हा मोठा अन्यायच होणार, नाही का?' (विझती ज्योत, पृ. २२२) जन्माला येणाऱ्या अपत्यासाठी राजू तिथे राहते. मुलासाठी कोणताही अपमान मुकाट्याने सोसणे ही तत्कालीन स्त्रीची प्रवृत्ती होती. मात्र मुलाला व नवऱ्याला सोडून प्रियकराकडे जाणारी 'राधा' आपल्याला 'लतिका' कादंबरीत भेटते. थोडे दिवसांनी तिला मुलाची ओढ लागते. त्याला डोळे भरून पाहावेसे वाटते. तिच्या नवऱ्याकडे जाण्यामागे

मातेचे वात्सल्य असले तरी समाज तिला स्वीकारणार नाही असे तिचा प्रियकर कुमार सांगतो. ती म्हणते - 'मला समाजाशी काय करायचं आहे! रामला डोळे भरून पाहावा हीच माझी इच्छा!' (लतिका, पृ. ५३) पतीवर प्रेम नसताना मुलासाठी तिथे राहणे हा व्यभिचार आहे असे कुमार राधाला बजावत असतो.

पतीवर प्रेम असूनही मातृत्वाच्या तीव्र ओढीने परपुरुषाशी संबंधही व्यभिचारच समजला जातो. स्वत:चे मूल वाढविण्याच्या आत्यंतिक ओढीने असा 'निष्पाप व्यभिचार' करणारी नायिका उषा मंत्री यांनी उभी केली आहे. हे मूल आपले नाही हे जेव्हा मीनाच्या पतीला कळते तेव्हा त्या धक्क्याने त्याचा मृत्यू होतो. ते मूल मकरंदचे असते, तो मीनाला लग्नाचे विचारतो तेव्हा मात्र ती नकार देते. ती सांगते-शारीरिक गरज म्हणून नव्हे तर अपत्यजन्मासाठी तिने एकदाच व्यभिचार केला होता. आता त्यासाठी तिला लग्न नको होते. मीनाची आई होण्याची तीव्र इच्छा कादंबरीला एका नव्या वळणावर नेऊन पोहोचवते.

अपत्यसंगोपनाच्या जाणिवेने वेडी होऊन स्वैराचार करणारी आई आपल्याला 'बळी' मध्ये भेटते. पोटच्या मुलांना दोन वेळेला जेवण मिळावं म्हणून गोऱ्या सोजिरांची शेज सजविणारी आबाची आई विभावरी शिरूरकरांनी दाखविली आहे. गोऱ्या सोजिरांची वस्ती झाडून, एक दिवस टोपपदरी लुगडं घेऊन आबाची आई येते आणि थोडे दिवसांनी निळ्या डोळ्यांच्या गोऱ्या बाळाला जन्म देते. आबाच्या मनातील आईच्या आदराला एकदम ठोकर बसते. आबाचे चिडणे स्वाभाविक होते. पण आबाची मावशी त्याला समजावते,

'तुमी प्वार जन्माला आला म्हून शेज धराया लागली दुसऱ्याची चांगीला. त्या हाडांना वासना तरी उरलेय का? मरायची वासना हाए बाकी; तरी बी तुमा पोरांना पोसायां हाडं टाकिती कुत्र्याम्होरं!' (बळी, पृ. ७७)

मावशीच्या या समर्थनामुळे चांगीच्या धंद्याला मातृत्वाच्या करुणस्पर्शाने पवित्र केले आहे. अपत्यप्रेमासाठी स्वत:च्या इच्छा बाजूला सारणारी भारतीय आई लेखिकांनी रंगवली आहे. या आदर्श मातांबरोबरच 'मातृत्वाला' कलंक अशी आई दाखवली आहे 'हिरा आणि गारगोटी' मध्ये. बाईसाहेबांच्या घरात पैसा असूनही संस्काराच्या अभावामुळे मुले दुर्गुणी बनतात. मालतीबाई दांडेकर म्हणतात, 'आपली कन्या हिरकणी ठरावी की गारगोटी निपजावी या दोन्ही गोष्टी मातेच्या मनावरच अवलंबून आहेत यात काय संदेह!' (हिरा आणि

गारगोटी, पृ. १५१) प्रत्येक स्त्री स्वभावतःच वत्सल माता असते म्हणून मुलांच्या भवितव्याची जबाबदारी स्त्रीवर असते. तेव्हा आई होण्याबरोबरच मुलाचे संपूर्ण संगोपन करणे म्हणजे मातृत्वाची परिपूर्ती, असे लेखिकांनी सुचविले आहे. तसेच कुटुंबनियोजन हा शब्द माहित नसताना, खात्रीचे उपाय सहज उपलब्ध नसताना, मुलांची संख्या मर्यादित असावी असा आधुनिक विचार स्त्रियांनी मांडला आहे. ' वठलेला वृक्ष ' मध्ये विमला विचारी आहे. मूल न होण्याचा खात्रीचा उपाय नाही, एका घरात अलिप्तपणे राहताही येत नाही हे तिला समजून चुकते. शेवटी दुसऱ्या गावात नोकरी करण्याचे ती ठरवते. लेखिकेने सुचवलेला हा उपाय म्हणजे कुटुंबनियोजनविषयक प्रवृत्ती वाढीस लावण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न म्हणावा लागेल.

कुटुंबनियोजन आणि विभक्त कुटुंबपद्धती यांचा पुरस्कार करणारा नवीन विचार मध्यमवर्गीय तरुणांमध्ये उत्पन्न होऊ लागला. एकत्र कुटुंबामध्ये सुशिक्षित, नवीन विचारांच्या तरुणांची कुचंबणा होत असे. ' लतिका 'मधील राधा सासूबाईंशी जमेना म्हणून संसार सोडून जाते, तसेच ' तेजस्विनी 'मधील क्षमेला संसाराबरोबर समाजकार्याची आवड असते म्हणून घराबाहेर पडावे लागते. एकत्र कुटुंबात तरुण मुलींचा उत्कर्ष रोखला जात असे. उद्याची कुटुंबं आटोपशीर असतील असा आशावाद लेखिकांनी व्यक्त केला आहे.

' आमच्या उद्याच्या जगात स्त्रीपुरुषांना, आर्थिक, सामाजिक अन् बौद्धिक वाटा समान हक्कानं उचलायचा आहे. पण त्यांत परस्परांच्या बुद्धीबद्दल व व्यक्तित्वाबद्दल जिव्हाळा अन् आदर असल्याशिवाय संसाराचा हा मार्ग सुखाचा होणार नाही. ' (दूर कुठेतरी, पृ. ११६) आदर्श कुटुंबाचा जणू मूलमंत्रच लेखिकेने येथे सांगितला आहे. त्याच्याही पुढे जाऊन ' वठलेला वृक्ष ' मध्ये समूहकुटुंबाचा विचार मांडला आहे. एकत्र व विभक्त कुटुंबपद्धतीचा समन्वय साधण्याचा हा प्रयत्न साम्यवादी विचारांच्या प्रभावातून झाला.

कुटुंबपद्धती कोणतीही असली तरी स्त्रीपुरुषांचे सुखी सहजीवन हा कुटुंबपद्धतीचा पाया असतो. लेखिकांनी पुन्हापुन्हा स्त्रीपुरुष समतेचा आदर्श ठेवला आहे. ' दूर कुठेतरी ', ' पुसलेल्या रांगोळ्या ', ' विझती ज्योत ' या कादंबऱ्यांतून समतेची अपेक्षा ठेवणाऱ्या स्त्रीवरही समजुतदारपणाची जबाबदारी आहे हे स्पष्ट केले आहे. स्त्रीने किंवा पुरुषाने दुसऱ्यावर हक्क गाजविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे समानतेच्या दिशेने चाललेल्या जीवनाच्या विकासातील अडथळा होय, असा स्पष्ट इशारा लेखिकांनी दिला आहे. 'वठलेला वृक्ष'

मध्ये विमला-विनायक प्रेमविवाह असूनही त्यांच्यामध्ये खटके उडत असतात. विमला म्हणते, 'हे माझ्यापासून दूर चालले होते. खरे सांगायचे म्हणजे आम्ही दोघे वयाने व बुद्धीने जवळजवळ समान होतो, पण त्यांना वाटे विमल लहान आहे, तिने माझ्या कलाने घ्यावे. मला वाटे हे मोठे आहेत ह्यांनी माझा थोडा हट्ट काढावा.' (वठलेला वृक्ष, पृ. ११७) तत्त्व म्हणून समानता मान्य झाली तरी व्यवहारात त्याची अंमलबजावणी होणे कठीण असते. कारण माणसाची दुसऱ्याकडून अपेक्षा करण्याची प्रवृत्ती होय. 'दूर कुठेतरी' मध्ये रजनीकांत-स्वप्नाचे सहजीवन हे तत्कालीन लेखिकांच्या कल्पनेतील आदर्श जीवन होते. वास्तवापेक्षा त्यामध्ये समजुतदारपणा अधिक होता. स्त्रीपुरुषांमध्ये समानता मानणारी समाजप्रवृत्ती निर्माण व्हावी या इच्छेतून लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांची मांडणी केली होती.

विकासपर्वातील या कादंबऱ्यांतून विविध समाजप्रवृत्तींचे दर्शन घडते. समाजप्रबोधनाचा सूर या कादंबऱ्यांतून आग्रहाने उमटला नसला तरी सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या या लेखिका आहेत. त्यामुळे वास्तवसमाजजीवनाच्या भक्कम पायावर या कथावस्तू उभ्या राहिल्या आहेत. या कादंबऱ्यांतून मुख्यत: मध्यमवर्गीय जीवन आहे आणि त्यांचे विषयही मध्यमवर्गाशी निगडित आहेत. त्यामुळे मुख्यत्वेकरून पांढरपेशा समाजातील प्रवृत्तीच येथे आढळल्या. विकासपर्वाचा शेवट आपण विभावरी शिरूरकरांच्या 'बळी' कादंबरीशी केला आहे. मध्यमवर्गीय कोशातून बाहेर पडून, दलित जीवनदर्शन घडविण्यापर्यंत मराठी कादंबरीचा विकास साधण्याचे श्रेय एका लेखिकेकडेच जाते. लेखिका पांढरपेशा असूनही त्यांनी अत्यंत समर्थपणे दलितजीवन चितारले आहे. शिकलेल्या दलित तरुणाची होणारी त्रिशंकूसारखी अवस्था लेखिकेने सांगितली आहे. दलितजीवनातील दु:ख, उपेक्षित समाजातील प्रवृत्ती, कादंबरी माध्यमातून प्रथमच समर्थपणे समाजासमोर ठेवल्या गेल्या.

१९३५ नंतरचा कालखंड म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनांनी भारून गेलेला काल होता. स्वातंत्र्याच्या जाणिवेने मध्यमवर्गीय घराघरांतून जे नवचैतन्य संचारले होते त्याचे पडसाद या कादंबऱ्यांतूनही उमटले आहेत. या काळात आपल्याला काही जुन्या प्रवृत्तींचे आवर्तनही घडत असलेले दिसते. नव्या-जुन्या प्रवृत्तींचा संघर्ष होऊन, नव्या समाजाला अनुकूल अशा समाजप्रवृत्तींचा विकास याच कालखंडातील कादंबऱ्यांमधून झालेला दिसतो. अंधश्रद्धा, जातीयता या प्रवृत्ती बदलल्या नाहीत तरी अंधश्रद्धानिर्मूलक किंवा

जातीयता विरोधी प्रवृत्तींचे दिग्दर्शन लेखिकांनी कादंबऱ्यांतून केले आहे. स्त्रियांनी सुचविलेल्या सुधारणा केवळ कल्पनारम्य नसून त्यांना व्यवहारी जगाची ठोस बैठक आहे. दुसऱ्यावर टीका करण्याची प्रवृत्ती कधी बदलणार नाही हे लक्षात घेऊन, समाजाच्या टीकेला न घाबरता, खंबीरपणे उभे राहण्याचा आत्मविश्वास लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांच्या नायिकांना दिला. व्यक्तिमत्त्वविकासातील ही सर्वात महत्त्वाची गोष्ट मानली पाहिजे.

राजकीय व धार्मिक क्षेत्रातील घटनांकडे स्त्रिया डोळसपणे पाहात होत्या, तर विवाह, स्त्रीशिक्षण यासंबधातील प्रवृत्ती त्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित होत्या. साहजिकच या संबंधातील छोटेमोठे बदल आणि त्याचे परिणाम यांची विशेष दखल लेखिकांनी घेतली आहे. स्त्रीशिक्षण आणि विधवाविवाह समाजाने आता स्वीकारले होते, पण स्त्रीपुरुषसमानता आणि स्त्रियांचे अर्थार्जन व स्त्रीस्वातंत्र्य या प्रश्नांचा पाठपुरावा लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यांतून केला आहे; या सुधारणांबद्दल आग्रह धरला आहे.

समाजप्रवृत्तींतील बदल जागरुकपणे टिपून घेतच लेखिकांच्या कथानकांनी आकार घेतला आहे. या कथानकांतील वास्तवता समकालीन परिस्थितीचे योग्य भान ठेवून आहे. त्याचप्रकारे कलाकृती म्हणूनही या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्य ठरविणे आवाश्यक आहे. अर्थात वाङ्मयीन समीक्षेचे निकष काळाप्रमाणे, नवनवीन वैचारिक जाणिवांबरोबर बदलत जातात. म्हणून तत्कालीन टीकाकारांनी या कादंबऱ्यांची नोंद कशी घेतली आहे आणि वाचकांचा प्रतिसाद या कादंबऱ्यांना कसा मिळाला यासंबंधातील माहितीवरून या कादंबरीलेखनाची वाङ्मयीन प्रतिमा स्पष्ट होत जाईल. जीवनातील सर्वच क्षेत्रांत विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली होती. तेव्हा वाङ्मयातील जीवनानुभवांचे क्षितिज कसे विस्तारत गेले ते आपणांस कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यांकन करीत असताना समजून येईल.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३५२४
निबंध
क्र. २१९८९९
७।३।९३

# क्षितिज विस्तारले

१८७३ ते १९५० या कालखंडात, स्वातंत्र्याची भावना जागृत होऊन, आंदोलने, चळवळी या प्रयत्नांमधून भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले. विज्ञानाची प्रगती, वाहतुकीची साधने, यामुळे जीवनाला वेग आला आणि जग अधिकाधिक जवळ आले. समाजप्रबोधनाकडून वास्तव समाजचित्रणाकडे कादंबरीवाङ्मयाची वाटचाल सुरू झाली. त्यामुळे वाङ्मयीन समीक्षेचा विकासही स्थूलापासून सूक्ष्माकडे होत गेला. तपशिलापेक्षा मनोविश्लेषणाकडे लेखिकांचे लक्ष केंद्रित होऊ लागले. या काळात मराठी कादंबरी समृद्ध झाली. ही समृद्धी कादंबऱ्यांच्या संख्येमध्ये दिसते, तशीच त्यांच्या कलात्मक मांडणीमध्येही दिसते. कादंबरीच्या प्रारंभी लेखिकांनी जे 'दोन शब्द' मनोगत म्हणून सांगितले आहेत, त्यावरून लेखिकांची लेखनप्रेरणा स्पष्ट होते. देशाचे किंवा समाजाचे ऋण मानण्याची प्रवृत्ती बव्हंशी लेखिकांमध्ये दिसते. काळानुसार विचारांमध्ये आणि मुख्यत: प्रकटीकरणाच्या पद्धतीमध्ये मात्र निश्चितपणे फरक पडत गेला. म्हणूनच कादंबरीच्या प्रकाशनवर्षानुसार या कालखंडातील प्रत्येक लेखिकेच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यांकन होणे आवश्यक आहे.

श्रीमती प्रेमा कंटक यांचे नाव राजकीय क्षेत्रातील निष्ठावान व्यक्तींमध्ये आदराने घेतले जाते. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाने प्रभावित होऊन या महिलेने आजन्म गांधी सेवाश्रमात लोकसेवेचे कार्य केले. त्यांनी 'काम आणि कामिनी' (१९३७) व 'अग्नियान' (१९४२) या दोन कादंबऱ्या या कालखंडात लिहिल्या. 'नैष्ठिक ब्रह्मचर्य' हा विषय घेऊन लिहिलेली त्यांची 'काम आणि कामिनी' ही कादंबरी बरीच गाजली; वादविषय ठरली. गांधीजींची ब्रह्मचर्यासंबंधी मते पटल्यानंतर त्या विचारांचा पाठपुरावा करण्यासाठी ही कादंबरी लिहिली गेली आहे. १९२९ मध्ये साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमात महात्माजींबरोबर रोज फिरावयास जाताना त्यांच्या तत्त्वज्ञानाचा खोलवर परिणाम लेखिकेवर झाला आणि त्यातूनच या कादंबरीचा जन्म झाला, असे प्रेमाबाईंनी स्पष्ट शब्दात

सांगितले आहे. या कादंबरीचा नायक मुकुंदा आईच्या आग्रहामुळे लग्न करतो. परंतु ब्रह्मचर्य पाळण्याच्या त्याच्या निर्णयामुळे त्याच्या पत्नीवर अन्याय होतो. अर्थात बायकोच्या भावनांचा आदर करून तो तिला पूर्ण स्वातंत्र्य देण्यास तयार असतो. हा नायक म्हणजे असामान्य पुरुष आहे आणि केवळ आदर्शाच्या अट्टाहासातून आला आहे. त्यामुळे प्रेमाबाईंनी उभी केलेली कथावस्तू सर्वसाधारण सामान्यजनांना अनैसर्गिक वाटते. या पुस्तकाचे परीक्षण करताना, सुप्रसिद्ध राजकीय कादंबरीकार ग. त्र्यं. माडखोलकरांना मुकुंदा आदर्श नायक म्हणनू अयोग्य वाटतो. अस्वाभाविक वाटतो. कादंबरीच्या मांडणीचे मात्र माडखोलकरांनी कौतुक केले आहे. ते म्हणतात, 'प्रणय त्याज्य मानणारा नायक निर्माण करून त्याच्या निखालस राजकीय जीवनातून त्यांनी अत्यंत सरस कथानक उभे केले आहे. क्रांतिवादाच्या निराशेतून जन्म घेतलेला नायक, शांतिवादाच्या पुरस्कारार्थ आत्मसमर्पण करतो, ही घटना रोमांचकारी आहे.'[१] जानेवारी १९३९ मधील 'समाजस्वास्थ्य' मासिकाच्या 'पत्रव्यवहार' या सदरात मात्र या कादंबरीवर जोरदार आक्षेप घेतले आहेत व महात्माजींवर टीकाही आहे.

आपल्या कादंबरीवर आक्षेप घेतले जातील याची प्रेमाबाईंना कल्पना असावी. वास्तववादाचा आग्रह धरणारी वाङ्मयीन प्रवृत्ती त्यावेळी विकसित होत होती. त्यानुसार आदर्शवादांचा अट्टाहास हे कालबाह्य निकष ठरले होते. आपल्या आदर्शवादाचे समर्थन बाई करतात, त्यामागे समाजसुधारणेची कळकळ दिसते. गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर प्रेम करणाऱ्या बाईंनी स्पष्टपणे आपल्या निवेदनात म्हटले आहे की, 'वास्तववाद म्हणजे समाजातील घाण उपसून उघडच्यावर टाकणे नव्हे. दोषी व दुष्ट समाजावरही प्रेम केले पाहिजे व त्याच्या विचारसरणीतील त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न करीत असताना तेथे आदर्शवादाची प्रतिष्ठापना करण्यासाठी मेहनत घेतली पाहिजे. नाहीतर शीड नसलेले तारू कुठेतरी भरकटते तशी समाजाची स्थिती होईल.' अत्यंत प्रामाणिकपणे प्रेमाबाईंनी मुकुंदाचे जे चित्रण केले आहे, त्यात अशक्य काही नाही. मुकुंदासारख्या प्रवृत्तीची माणसे समाजात सहसा आढळणार नाहीत. मात्र गांधीवादाने भारून थोर देशभक्त जयप्रकाशजी नारायण आणि त्यांच्या पत्नी प्रभावतीजी यांनी विवाह करूनही ब्रह्मचर्यव्रताचे पालन केले होते ते याच कालखंडात. १९२२ मध्ये गंगूताई पटवर्धनांनी विवाह करताना श्री पटवर्धनांना आपली ब्रह्मचर्याची अट सांगितली होती. आणि विवाह करून दोघेही मैत्रीपूर्ण सहजीवन जगले

होते. तेव्हा प्रेमाताईंचा हा कथाविषय पूर्णत: अनैसर्गिक म्हणता येणार नाही. परंतु अपवादात्मक प्रवृत्तीचाच येथे विचार झाला आहे, असे म्हणावे लागेल.

प्रेमा कंटक यांना मुळातच आदर्शाची ओढ आहे. आपल्या ' अग्नियान ' या दुसऱ्या कादंबरीत लेखिकेने देशभक्त तरुणांचा अनेक पातळींवर विचार केला आहे. लेखिकेला ओढ आहे ती चिरंतन सौंदर्याची, मांगल्याची. अर्थपूर्ण जीवन जगण्याचा संदेश देणारी ही कादंबरी, गांधीजीप्रणित चळवळींचे नेमके चित्र आजच्या पिढीतील तरुणांसमोर उभे करते. भारतीय स्वातंत्र्यासाठी त्याकाळी घराघरातील लोक स्वातंत्र्यभावनेने कसे भारले गेले होते, ते येथे दिसते. प्रभातफेऱ्या, व्याख्याने असे लोकजागृतीचे जाहीर कार्यक्रम, तसेच स्वदेशी, बहिष्कार यासारखे कृतिप्रधान कार्यक्रम, यांचे तपशील ' अग्नियान ' कादंबरीच्या कथानकातून सांगितले आहेत. लेखिकेने कॉंग्रेस अधिवेशनाचा उत्साह एखाद्या चित्रपटासारखा रंगवला आहे. राजकीय कादंबरीच्या नावाने भडक प्रेमकथा त्यावेळी वाचकांच्या हातात येत होत्या. याउलट ' अग्नियान ' ही सामान्य घरातून आढळणाऱ्या राजकीय आंदोलनाचे वास्तव चित्र वाचकांसमोर ठेवते. स्त्रीमध्ये स्वभावत:च दिसणारी सत्याची बूज आणि संयम प्रेमाबाईंजवळ आहेतच. त्याबरोबर, म. गांधीजींच्या सहवासाचा आणि आठवणींचा अमोल ठेवा त्यांना लाभला होता. म्हणूनच ही कादंबरी वाचकाला तत्कालीन स्वातंत्र्यचळवळीच्या वातावरणात नेते. प्रेमाबाई कंटक यांनी गांधीवादी विचार हा जीवनाचा मूलाधार मानला होता. त्यामुळे त्यांच्या दोन्ही कादंबऱ्या त्याला अनुसरून असणाऱ्या विचारसरणीचा पुरस्कार करतात.

' वादळापूर्वी ' (१९३७) या कादंबरीच्या लेखिका कमलाबाई सोहनी या हिंदुत्ववाद आणि राष्ट्रवाद यांची संयमाने सांगड घालणाऱ्या आहेत. स्त्रीशिक्षण, आर्थिकमंदी, त्यामधून अपरिहार्यपणे आलेले स्त्रियांचे अर्थार्जन, याची चिकित्सा कमलाबाईंनी या कादंबरीत केली आहे. वर्गकलह, कामगार चळवळ, कष्टकरी कामगार स्त्रिया, साम्यवादी लाल बावट्याची चळवळ, गांधीजींच्या स्वातंत्र्यचळवळी इत्यादींची माहिती लेखिकेने दिली आहे. समाजात निर्माण होणाऱ्या नवीन प्रवृत्तींची उदाहरणांसह चर्चा करून समान्यजनांचे या विचारप्रवाहांकडे लक्ष वेधण्याचा लेखिकेचा प्रयत्न आहे. स्त्री-शिक्षणामुळे पति-पत्नीचे सहजीवन अधिक सुरेल व्हावे असा आशावाद लेखिकेने व्यक्त केला आहे. संसारातील परस्पर सामंजस्य प्रधान मानून, त्याच अनुषंगाने सौ. मथुराबाई द्रविड यांनी अभिप्राय दिला आहे. " तरूणांना मार्गदर्शन करणारी,

स्त्रियांचा आत्मविश्वास जागृत करणारी ही कादंबरी तत्कालीन समाजप्रवृत्तींचे वास्तव दिग्दर्शन करणारी आहे.'' 'कादंबरीतील प्रश्न सामान्यपणे मध्यमवर्गाशीच निगडित आहेत. त्यापलीकडे पसरलेल्या समाजामध्ये असलेले दारिद्र्य, स्त्रियांचे अज्ञान, यासंबंधी न लिहिणारे लेखक हे पुरोगामी लेखकच नव्हेत' असे परखड विचार 'वादळापूर्वीचा वारा' या १६ पानी प्रस्तावनेत व्यक्त केले आहेत. तसेच पांढरपेशा सुशिक्षित स्त्रियांचे आजचे आद्य कर्तव्य म्हणजे आपल्या दुर्दैवी व अशिक्षित भगिनींचा भार वाहणे व त्यांना ज्ञानदान देणे अशी अपेक्षा प्रस्तावनेच्या शेवटी व्यक्त केली आहे. पण प्रस्तावना-लेखकाचे नाव मात्र दिलेले नाही.

या कालखंडातील लेखिका मध्यमवर्गीय असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांतून मध्यमवर्गाच्याच प्रवृत्ती सूचित होणे अपरिहार्य आहे. परंतु पांढरपेशा समाजाच्या पलीकडे असणाऱ्या बहुजनसमाजातील दुःखांची या सुशिक्षित स्त्रियांना जाणीव झाली होती. एवढेच नव्हे, तर लोकसेवेचे कार्य करणाऱ्या नायिका लेखिकांनी निर्माण केल्या आहेत. 'वादळापूर्वी'मध्ये कमला, विमला व मालती या तिघी सुशिक्षित समंजस स्त्रिया वेगवेगळ्या प्रकारे समाजसेवा करतात. पतीचा विरोध, पतीची अलिप्तता आणि पतीचे सहकार्य या तीन भिन्न अनुभवांतून त्यांचे कार्य चालू असते. त्या अनुषंगाने संसारातील व समाजातील स्त्रीचे स्थान निश्चित करण्याचा लेखिकेने प्रयत्न केला आहे. चांगल्या ओघवती भाषेतील या चर्चा स्वतंत्रपणे मांडण्याऐवजी कादंबरी-माध्यमातून घडविल्या आहेत. कादंबरी म्हणून त्या कथानकाचा एकजिनसी परिणाम वाचकावर होत नाही. मात्र त्या मैत्रिणींच्या तडफदार व्यक्तिरेखा वाचकावर आपला ठसा उमटवितात.

कादंबरीच्या लेखनकौशल्याचा विचार करीत असता, 'आनंदीबाई जयवंतांचे' नाव आदराने घ्यावे लागेल. कथानकाचा सलग असा परिणाम वाचकाच्या मनावर उमटविण्याचे सामर्थ्य त्यांच्या 'ऊर्मिला' (१९३८) कादंबरी मध्ये आहे.

'ऊर्मिला' ही श्रीमंतीमध्ये, पाश्चात्य वातावरणात वाढलेली मुलगी आहे. तिचा भाऊ बारा वर्षे अमेरिकेत आहे असे दाखवून लेखिकेने 'ब्रेन ड्रेनचा' संभाव्य धोका त्या काळातच सूचित केला आहे. तसेच पाश्चात्त्यांचे अनुकरण करताना मुलींना कोणत्या मर्यादेपर्यंत स्वातंत्र्य द्यावे हे कथानकामधून अत्यंत संयमाने मांडले आहे. समाजात रूढ होऊ पाहणाऱ्या या नवीन प्रवृत्तींचा

आनंदीबाईंनी चिकित्सक दृष्टीने विचार केला आहे. नाविन्याचे अनुकरण ही सहजप्रवृत्ती असली तरी अंधानुकरणामुळे केवळ अपयश हाती येते, ही जाणीव लेखिकेने करून दिली आहे. स्त्रीस्वातंत्र्यावर येणाऱ्या नैसर्गिक बंधनांचे, अपत्यजन्म व अपत्यसंगोपन यांच्या जबाबदारीचे दाखले लेखिकेने दिले आहेत. स्त्रीच्या इच्छेविरुद्ध तिचे शील लुटले गेले तर तो अपघात मानावा, असा नवा क्रांतिकारी विचार या कादंबरीतून येतो. सामाजिक स्थित्यंतराचे, बदलत्या समाजप्रवृत्तींचे परिणाम सांगताना कोठेही मार्गदर्शकाची भूमिका घेऊन लेखिकेने रसभंग केला नाही, हे विशेष.

'ऊर्मिला'मध्ये ऊर्मिलेच्या मोकळ्या वागणुकीचा गैरफायदा घेणारा मकरंद लेखिकेने दाखविला आहे. तसेच विवाहापूर्वी माता बनणाऱ्या ऊर्मिलेला, जवळ करणारा सदानंदही येथे आहे. समाजामध्ये स्त्रीचे असणारे दुय्यम स्थान आणि स्त्रीचे परावलंबित्व याची मीमांसा सुप्रसिद्ध लेखक श्री. चिं. वि. जोशी यांनी प्रस्तावनेत केली आहे.

स्त्रीमुक्तीचा सखोल विचार या कादंबरीत केला आहे. स्त्रीचे शरीर विटाळले तरी स्त्री मनाने पवित्र राहू शकते, असे मानण्याची आजची प्रवृत्ती आहे. यासंबंधातील विकासाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल म्हणजे 'ऊर्मिला' मध्ये स्त्रीच्या शरीराला दिलेले दुय्यम महत्त्व होय. येथे स्त्रीच्या मनाला अधिक मोलाचे मानले गेले आहे.

स्त्रियांच्या कादंबऱ्या स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा तर करतातच; पण त्यांची उत्तरे शोधण्याचाही प्रयत्न करतात. कलात्मकतेकडे मात्र काही वेळा लेखिकांचे दुर्लक्ष होते. म्हणूनच अनुभवाच्या अस्सलपणामुळेच लक्षात ठेवावयास हवी अशी 'हृदयाचे कढ' (१९३९) ही सरस्वतीबाई दाभोळकर यांची कादंबरी आकर्षकतेमध्ये मात्र 'ऊर्मिला' पेक्षा कमी पडते. विवाहित पुरुषांच्या द्वितीय विवाहामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची चर्चा करण्यासाठी ही कादंबरी लिहिली आहे. त्यामुळे वाङ्मयीन दृष्ट्या तिचे महत्त्व बेताचे असले तरी सुशिक्षित समाजात मान्यता मिळवू पाहणारी ही प्रवृत्ती लिखिकेने विविध दृष्टिकोनातून मांडली आहे. नव्यानेच उद्‌भवलेल्या या प्रश्नाचे व्यावहारिक व तात्त्विक पातळीवर चिंतन केले आहे. काळाचे नेमके दर्शन, हा लेखिकेच्या यशातील महत्त्वाचा भाग येथे साधलेला दिसतो.

या कादंबरीत 'बाबी' ही एक साधी, सरळ स्त्री असूनही, तिला वेडे ठरवून, तिचा नवरा दुसरे लग्न करतो हे मूळ कथानक आहे. अशा प्रकारच्या

दुसऱ्या लग्नाच्या अनेक उदाहरणांतून उपकथानके उभी केली आहेत. कादंबरीच्या शेवटी आपला हेतू स्पष्ट करताना लेखिका म्हणते, 'बाबीसारखी एकटी बाबीच दुर्दैवी नाही! निदान निमूटपणे असह्य छळ सहन करीत असलेल्या हजारो स्त्रियांना आपले दुःख जगाला कळल्याचे तरी समाधान होईल. माझ्याही तरुणपणी अशा हकीगती घडत होत्या व आजही घडतात. तशीच ही एक!'[२] परित्यक्तेचे जीवन भोगणाऱ्या स्त्रियांची प्रातिनिधिक व्यक्तिरेखा म्हणजे कादंबरीतील बाबी आहे. द्वितीय विवाह, स्त्रीपुरुष समानता, बुद्धिवादी समाज यांच्या अनुषंगाने अनेक समाजप्रवृत्तींमध्ये होणारे बदल लेखिकेने समर्थपणे मांडले आहेत. एवढेच नव्हे, तर अनिष्ट प्रवृत्ती बदलण्यासाठी आवश्यक असे विधायक उपाय लेखिकेने सुचविले आहेत. सुशिक्षित पुरुषांच्या द्वितीय विवाहाने लेखिकांतील स्त्रीला अस्वस्थ केले होते. त्यामुळे अजूनही काही कादंबऱ्यांतून अशा विवाहांचे प्रश्न लेखिकांनी मांडलेले दिसतात. पुढील विवेचनात त्यांचा विचार केला आहे.

शांताबाई नाशिककरांच्या विकासपर्वातील कादंबऱ्यांमधून मुख्यतः, स्त्री म्हणून जन्माला आल्यामुळे, बाईच्या हक्कांची कशी पायमल्ली होते, त्याचे विवेचन येते. तसेच समाजस्थितीचे केवळ वर्णन न करता, अनेक समाजप्रवृत्तींचे सखोल चिंतन शांताबाईंच्या कादंबऱ्यांतून येत असते.

'माझी कोरीव लेणी' (१९४०) ही शांताबाई नाशिककर यांची कादंबरी १९व्या शतकाच्या उत्तरार्धातील समाजजीवनावर आधारित आहे. ही कादंबरी 'स्त्री' मासिकातून क्रमशः प्रसिद्ध होत होती, आणि पुस्तकरूपाने किर्लोस्कर प्रेसमधूनच प्रकाशित झाली. 'ही कादंबरी म्हणजे गेल्या पिढीतील सुखवस्तू आणि सुधारक अशा मध्यमवर्गीय स्त्रीचे आत्मचरित्र आहे. ही कादंबरी वाचणाऱ्याला गेल्या अर्धशतकातील महाराष्ट्रीयांचे आचार-विचार, राहणी, समाजाचा दृष्टिकोन इत्यादींची उपयुक्त आणि मनोरंजक माहिती मिळण्यासारखी आहे. या कादंबरीला सत्यसृष्टीतील अनुभवाचा पाया असल्यामुळे त्यातील वर्णने व स्वभावचित्रे अत्यंत वास्तव अशी वठली आहेत.' अशा शब्दांत प्रकाशकांनी पुस्तकाची भलावण केली आहे. या कादंबरीत विधवा-विवाह आणि विधवांनी सौभाग्यसूचक कुंकू, फुले यांचा वापर करणे, या प्रश्नांची चर्चा केली आहे. हा प्रश्न काहीसा कालबाह्य होता. परंतु लोकशिक्षण, ग्रामसुधारणा हे नवे विचार कादंबरीत वर्णन केलेल्या काळाच्या मानाने अभिनव आणि तत्कालीन (१९४०) वाचकांच्या दृष्टीने आवश्यक होते. त्याचा योग्य

मेळ लेखिकेने घातला आहे. नायिका सुमती एका क्लबमध्ये जात असते. तेथे पत्ते, पिणे या गोष्टींत स्त्रीपुरुष रमलेले दिसतात. पुण्यात असे क्लब, १९व्या शतकात उघडपणे चालणे मात्र कालविसंगत वाटते. परंतु स्वैराचाराचा संभाव्य धोका लेखिकेने व्यक्त केला आहे, हा लेखिकेचा द्रष्टेपणा म्हटला पाहिजे. प्रस्तुत कादंबरीत जुना काळ दाखविल्यामुळे त्यावर जोरदार आक्षेप घेणारे एक परीक्षण सापडते. 'आजच्या पिढीला नवे हवे आहे व ते देणारेच वाङ्मय हवे'[३] असा वाचकांचा आग्रह होता.

या परीक्षणाच्या जहाल भाषेवरून तत्कालीन वाङ्मयाकडून समाजाच्या अपेक्षा काय होत्या ते लक्षात येते. शांताबाईंनी कादंबरीरूपाने सांगितलेला इतिहास सरोजिनी बाबरांना मात्र महत्त्वाचा वाटतो.

१९५० पर्यंत नाशिककरांच्या 'चिखलातले कमळ' (१९३९), 'कीर्ती' (१९४२), 'पुसलेल्या रांगोळ्या' (१९४७) याही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. या कादंबऱ्या त्यांनी ग्रामीण जीवन, चांभार जातीतील दलित जीवन, आणि नवऱ्याने टाकलेल्या स्त्रीचे जीवन या पार्श्वभूमीवर रंगविल्या आहेत. विविध सामाजिक विषय स्त्रियांच्या दृष्टिकोनातून मांडणे हे शांताबाईंचे वैशिष्ट्य आहे.

'चिखलातील कमळ' चे परीक्षण करताना श्री. गोपीनाथ तळवलकर म्हणतात 'कादंबरीची निवेदनपद्धती सुबोध व चटकदार आहे. लांब वर्णने नाहीत. 'लग्नसंस्था उत्कृष्ट दशेत असाव्या पण त्या डळमळीत असतील तर उगीच मधुमतीसारख्या निरपराध जीवांचे बळी द्यायचे का रे?' हा शकूचा कळकळीचा प्रश्न योग्य आहे. प्रचलित समाजस्थितीत व्यक्तिविकासाला येणाऱ्या अडचणी दाखवणे व त्या दूर करण्यासाठी मोठ्या सहानुभूतीचे आवाहन करणे ही विकसित वाङ्मयाची मुख्य लक्षणे म्हणता येतात. त्यादृष्टीने ही कादंबरी प्रगतिपर ठरण्यास कोणताच प्रत्यवाय नाही.'[३] 'चिखलातील कमळ' बरोबरच स्त्री-सामर्थ्याची जाणीव शांताबाईंनी 'पुसलेल्या रांगोळ्या' मध्येही करून दिली आहे.

सरोजिनी बाबर म्हणतात, 'स्त्री-जीवनात येणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगांचे मनोवेधक चित्रण करण्यात त्यांची लेखणी बरीच वाकबगार आहे. स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी, स्त्रीच्या दृष्टिकोनातून विचार करून त्यांनी लेखन केले आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात सहजता आणि सहृदयता हे दोन गुण विशेष साकल्याने आढळतात. पुरुषांचे अनुकरण केवळ न करता त्यांनी स्त्रियांचे प्रश्न किंवा

सामाजिक प्रश्न स्त्रिच्याच भावनेने रंगविण्याचा प्रयत्न केला आहे. '[४]

शांताबाईंच्या डोळ्यासमोर सतत समाजप्रबोधनाचेच उद्दिष्ट आहे. 'कीर्ती' मध्ये अस्पृश्योद्धाराच्या कार्याचे महत्त्व लोकांना समजावे म्हणून नायिका चांभार आहे. पण त्यांच्या जीवनातून दलित समाजाचे दर्शन न घडता उच्च मध्यमवर्गीय घरातील चित्र डोळ्यासमोर येते. समाजातील जातीय प्रवृत्ती लोकांपुढे मांडणे एवढीच या कादंबरीची मर्यादा म्हणता येईल. समाजातील चर्चेची पर्वा न करता पालकांचा विरोध पत्करून आंतरजातीय विवाह करणारे प्रेमिक दाखवून लेखिकेने समाजप्रवृत्तीच्या विकासाच्या दृष्टीने पुढचे पाऊल टाकलेले दिसते.

१९३५-३६ नंतर स्त्रिया विविध क्षेत्रांत अर्थार्जन करू लागल्या. पुरुषांच्या बरोबरीने समाजामध्ये वावरण्याचे प्रसंग स्त्रियांवर येऊ लागले. अशा वेळी, घरात सोवळेपणाने वागणारा पुरुष बाहेर किती स्त्रीलंपट असतो याचे अनुभवही स्त्रियांना आले. या पुरुषी प्रवृत्तीचा निषेध करण्याचे सामर्थ्य स्त्रीमध्ये निर्माण झाले ते मात्र नोकरी व शिक्षणाच्या आधारानेच. त्यामुळे लेखिकांनी यासंबंधातील प्रश्न धीटपणे मांडलेले दिसतात. 'लपलेले गुन्हेगार' (१९४१) या शालिनी तुळपुळे यांच्या कादंबरीत स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहणाऱ्या प्रतिष्ठितांचे बुरखे फाडलेले आहेत. परंतु स्त्रियांना विविध प्रकारे फसवणारे पुरुष एकाच कथानकात गुंफले असल्यामुळे कादंबरीच्या एकसंधपणाला बाध आलेला दिसतो. याकाळात कादंबऱ्यांमध्ये येऊ लागलेली कलात्मकता या ठिकाणी थोडी कमी पडते. परंतु नवीन विषय मांडण्याचे श्रेय लेखिकेला निश्चितपणे द्यावे लागेल. लेखिकेला प्रोत्साहन देणारी अंबादास मुखेडकर यांची प्रस्तावना चांगली आहे. 'या पुस्तकात पुरुषवर्गावर वेळोवळी जी सडेतोड टीका आहे व पुरुषवर्गाचा लब्धप्रतिष्ठितपणा बाहेर काढला आहे, तो वस्तुस्थितिनिदर्शक असल्यामुळे टीकास्त्राचे घाव सहन केल्याखेरीज काही गत्यंतर नाही.' अशी स्पष्ट कबुली प्रस्तवनेत दिली आहे व लेखिकेने मांडलेले विचार परिस्थितीला धरून आहेत असे प्रमाणपत्र देऊन लेखिकेचे कौतुक केले आहे. या कादंबरीतून स्त्रियांच्या अनुभवाची व्यापकता स्पष्ट झाली आहे.

प्रचलित राजकीय प्रवृत्तींवर झगझगीत प्रकाश टाकणारी 'पागलखाना' (१९४१) ही कादंबरी तिच्या मांडणीच्या वेगळेपणामुळे लक्षात राहते. भारत स्वतंत्र झाल्याचे स्वप्न लेखिकेला पडते आणि पुढे दृष्यांतूनच कथानक आकार घेते. १९३४च्या कायद्यानंतर भारतात संयुक्त सरकारे स्थापन झाली आणि राजकारण्यांची सत्तालोभी प्रवृत्ती दिसू लागली, त्याचे पडसाद या कादंबरीत

उमटलेले आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यावर देशभक्तांना वेडे बनवून, तुरुंगात टाकून स्वार्थी सत्तापिपासू लोक राज्य करू लागतात, असा या स्वप्नाचा मथितार्थ आहे. दुर्गाताई जोशी (M.L.A.) या मध्यप्रांत कायदेमंडळाच्या सदस्या होत्या. प्रचलित राजकीय स्थित्यंतरांवर व्याख्याने देऊन आणि प्रचारपुस्तके छापून त्याचा खेड्यापाड्यांतून प्रसार करण्याचे कार्य त्या अनेक वर्षे निरलसपणे करीत होत्या. त्यामुळे राजकारणातील खाचाखोचा त्यांना माहीत आहेत हे कादंबरी वाचताना जाणवते.

खेड्यातील बहुजनसमाजात समरस होऊन राष्ट्रीय भावना जागृत करण्याकरिता अहर्निश प्रचार करणे हा दुर्गाताईंचा आवडता विषय असल्याचे 'पागलखाना' च्या प्रारंभी प्रकाशक श्री. भोगे सांगतात. 'सापुड्यातील वनलक्ष्मी' (१९४३) या कादंबरीत खेड्यापाड्यांतून देशभक्ती व स्वातंत्र्याची जाणीव कशी पोहोचली होती ते दाखवले आहे. गांधीजींच्या ग्रामसुधारणा, दारूबंदी या उपक्रमांची आवश्यकता प्रतिपादन करण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय प्रवृत्तीच्या कोशातून बाहेर पडलेल्या या कादंबरीला काही अंशी प्रचारकी स्वरूप आले आहे. कादंबरीच्या प्रारंभी लेखिका पुढीलप्रमाणे निवेदन करते:

'बहुजनसमाजाला आवडते त्याच मार्गाने जनतेला शिकवावे', हा एक कादंबरी लिहिण्याचा हेतू पुष्कळ दिवस माझ्या मनात घोटाळत होता. पण त्याच हेतूने ही कादंबरी लिहिली गेली असे म्हणता येणार नाही.

कादंबरीतही आपल्याला पाहिजे असते तेच निर्माण होते, असा माझा अनुभव नाही. कल्पनासृष्टी अगदी स्वतंत्र असते. कल्पनासृष्टीत जे आत्मे भेटतात व दिसतात त्यांची ओळख जगाला करून देणे एवढेच लेखक करू शकतो.'

लेखकाच्या वृत्ती-प्रवृत्तींपेक्षा कादंबरी अलिप्त असते असे लेखिकेने म्हटले आहे. मात्र जरी कथानकाचा विकास पात्रांच्या स्वभावानुसार होत गेला तरी त्या पात्रांवर लेखिकेच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. अर्थात लेखकांची विचारप्रणाली कथानकांतून उमटणे अपरिहार्य असते. तथापि, रसभंग होऊ न देणे यातच लेखकाचे कौशल्य आहे. या कसोटीस दुर्गाबाईंच्या कादंबऱ्या उतरल्या आहेत. विषयाचा वेगळेपणा मांडणारी, राजकीय असूनही भडकपणा टाळणारी, स्त्रीजीवनातील सर्वसामान्य समस्यांचा परीघ ओलांडणारी, अशी दुर्गाताई जोशी यांची लेखनशैली आहे. स्वतंत्रपणे राजकीय जीवनावर अगदी मोजक्या कादंबऱ्या आहेत. त्यांमध्ये या कादंबरीचे स्थान महत्त्वाचे आहे.

कारण केवळ राजकीय प्रवृत्तींचे दर्शन घडवून ही कादंबरी संपत नाही, तर नंतरच्या राजकारणातील अविभाज्य घटक बनलेली स्वार्थी, सत्तापिपासू प्रवृत्ती लेखिकेने फार प्रभावीपणे रंगवली आहे. अनुभवाच्या सामर्थ्यावर राजकारणातील नव्या क्षितिजांवरील चित्र लेखिकेने रेखाटले आहे. दुर्गाबाईंच्या द्रष्टेपणामुळे या कादंबरीने राजकीय कादंबरीला विकासाच्या नव्या टप्प्यावर नेऊन पोहोचविले आहे.

कुमुदिनी प्रभावळकर (रांगणेकर) या सातत्याने कादंबरीलेखन करणाऱ्या लोकप्रिय लेखिका आहेत. या कालखंडात त्यांच्या 'कुस्करलेले हृदय' (१९३८), त्याचाच पुढील भाग 'विरलेले वस्त्र' (१९४०), 'बेसुर संगीत' (१९३८), 'रस्सीखेच' (१९३९), 'प्रीतीचा गोलघुमट' इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. अन्य लेखिकांप्रमाणेच यांच्या कादंबऱ्यांची कथानकेही स्त्रीसमस्यांशी संबंधित आहेत. 'बेसुर संगीत' ही आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार आणि आंतरधर्मीय विवाहाचा निषेध करण्यासाठी लिहिली आहे. सामाजिक समस्या दाखविण्यासाठी त्यांनी एकाच साच्याच्या साऱ्या प्रेमकथा रंगविल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतून समाजातील काही सनातन प्रवृत्ती आपणास आढळतात. परंतु बव्हंशी उच्च मध्यमवर्गीय किंवा उच्चवर्गीय समाजात रूढ होणाऱ्या प्रेमविवाह, जातिभेद-निर्मूलन आंतरजातीय विवाह याच प्रवृत्ती त्यांच्या कादंबऱ्यांतून आढळतात. कादंबरीच्या लोकप्रियतेचे तंत्र कुमुदिनीबाईंना नेमके साधलेले दिसते. विषयाचे नाविन्य नसूनही चटकदार भाषेमुळे आणि सामान्य माणसाला अप्राप्य असलेल्या प्रीतिविवाहांमुळे सर्वसामान्य वाचकांना त्या कादंबऱ्या आवडत होत्या.

लेखिकांच्या कादंबऱ्यांतून अनेक समाजप्रवृत्तींचे दर्शन घडत असले तरी, वास्तवजीवनदर्शन घडवूनही लोकप्रियतेचे माप फार थोड्या लेखिकांच्या पदरात पडले आहे. पुरुष-लेखकांच्या बरोबरीने सामान्यजनांमध्ये लोकप्रियता मिळविणाऱ्या कुमुदिनीबाईंना यशस्वी लेखिका म्हणून गौरविले पाहिजे. 'कलेकरिता कला' ही नवीन प्रवृत्ती वाङ्मयक्षेत्रात निर्माण होऊ लागली होती. त्या प्रवृत्तीच्या प्रारंभकाळात कुमुदिनीबाईंना मिळालेले यश उल्लेखनीय आहे. लेखिकांच्या कादंबऱ्यांचा कलात्मकतेच्या अंगाने विकास घडविण्यामध्ये कुमुदिनीबाईंना विशेष श्रेय द्यावे लागेल.

कुमुदिनी रांगणेकर या थोड्या जुन्या पिढीतील लेखिका होत्या, तर त्यांच्याप्रमाणेच प्रेमकथा लिहिणाऱ्या लीला देशमुख या नवोदित लेखिका होत.

राजकारण, स्त्रीपुरुषसमानता, बौद्धिक विवाह इत्यादी वेगवेगळे विषय घेऊन त्यांच्या चार कादंबऱ्या १९४२ ते ११९४८ पर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत. 'समाजप्रबोधन' हा पारंपरिक हेतू त्यांच्या कादंबऱ्यांत गळून पडला आहे. विशिष्ट सामाजिक विषय घेऊनही या कादंबऱ्या मनोरंजनाच्या अंगानेच पुढे सरकतात. कलावादी कादंबरीकारांचा फार मोठा परिणाम या काळातील तरुण पिढीवर झाला होता. त्याचे प्रत्यंतर लीला देशमुख यांच्या कादंबऱ्यांतून येते. प्रेमकथा रंगवताना लेखिकेने फक्त पार्श्वभूमी बदलली असे म्हणावे लागते. त्यांच्या पहिल्याच कादंबरीला कुसुमावती देशपांडे यांनी प्रस्तावना लिहिली आहे. ती केवळ लेखिकेला प्रोत्साहन देण्याच्या हेतूनेच लिहिली आहे असे जाणवते. कुसुमावतीबाई म्हणतात:

'या कादंबरीची बाळसुलभ मोहकता इतकी कौतुकास्पद आहे की, मला ती रसिकांपुढे ठेवण्यात आनंद वाटतो.' त्यानंतर बाईंनी समाज आणि वाङ्मय यांच्या अतूट नात्याचा ऊहापोह केला आहे. बाईंच्या मते या कादंबरीत तरुण मुलींच्या स्वप्नाळू स्वभावावर प्रकाश पडतो. 'प्रेमाची नेमकी पारख होणे आवश्यक आहे,' असे सांगून कुसुमावतीबाई प्रस्तावनेचा शेवट पुढील शब्दात करतात:

'वैवाहिक जीवनाचा पाया शुद्ध व अचूक असण्यावरच आधुनिक स्त्रीची सारी कर्तबगारी अवलंबून आहे. तेथे तडजोड, डागडुजी नको. आधुनिक तरुणींसमोर जीवनाने टाकलेल्या प्रश्नांपैकी हा सर्वांत निकडीचा व मूलगामी प्रश्न आहे.'

तरुणांच्या प्रेमकहाण्या विविध दृष्टिकोनांतून मांडणे हेही आवश्यक असल्याचे कुसुमावती देशपांडे यांनी स्पष्ट केले आहे. लीला देशमुख यांच्या कादंबऱ्या या दृष्टीने पाहिल्यास आधुनिक स्त्री-जीवनातील नवनवीन प्रवृत्तींचे दिग्दर्शन करताना दिसतात.

सर्वसाधारणपणे १९४० नंतर मध्यमवर्गीय घरांतून मुली शिकू लागल्या होत्या. कॉलेजची सोय असलेल्या मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांतून लग्न जमेपर्यंत मुली उच्चशिक्षणही घेत होत्या. अशा उच्चशिक्षित तरुणींमध्ये लेखनाचा प्रयत्न करण्याची हौस होती. त्यामुळे लीला दीक्षित, सरोजिनी बाबर, मनोरमा निमकर, शशिकला आळंदकर, शांता शेळके या नवीन लेखिका उदयास आल्या. काहींनी आपले स्थान वाङ्मयक्षेत्रात निर्माण केले, तर काहींनी एखादा तत्कालीन प्रश्न कादंबरीतून मांडून त्याला प्रेमाचे अधिष्ठान देऊन नवनिर्मिती करण्याचा

प्रयत्न केला व नंतर सोडून दिला.

नलिनी मुळगावकर यांची ' तृष्णा ' (१९४२) प्रेमाच्या खेळात सदैव अतृप्त राहिलेल्या स्त्रीची वेदना सांगते. नवऱ्याशी पटले नाही म्हणून घराबाहेर पडण्याचे धाडस करणारी मंजुळा पुढे गुंड समाजसेवकांकडून केवळ ' वापरली ' जाते. आणि नवऱ्याकडे, मुलीकडे जाण्याचा मार्गही तिला कायमचा बंद होतो. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. तसेच स्वातंत्र्यातील धोके सांगणारी ही लहानशी कादंबरी. ' कादंबरीतून अनुभवाची व्यापकता हवी ' अशी अपेक्षा, प्रसिद्ध समाजचिंतक व लेखक प्रभाकर पाध्ये यांनी प्रस्तावनेत व्यक्त केली आहे. कादंबरीचा विशेष म्हणजे मंजुळेला आलेला तीन पुरुषांचा अनुभव व्यक्त करताना कुठेही रटाळपणा आलेला नाही.

सरोजिनी बाबर यांच्या ' अजिता ' (१९३९), ' कमळाचं जाळं ' (१९४६), ' तू भेटायला नको होतास ' (१९५०) या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. विचारांच्या समृद्धतेला मांडणी व कल्पकतेची जोड असती तर या कादंबऱ्या अधिक सरस उतरल्या असत्या.

सरोजिनी बाबरांप्रमाणे बहुजनसमाजरतील आणखी एक कादंबरीकार म्हणजे शांताबाई शेळके. मध्यम वर्गापलीकडील समाजात वावरलेल्या या लेखिकेने कादंबरी-क्षेत्रात टाकलेले पाऊल विशेष उल्लेखनीय आहे. कोष्टी जीवन रंगवण्याच्या उद्देशाने शांताबाईंनी ' विझती ज्योत ' (१९४६), ' ओढ ' (१९५०) या कादंबऱ्या लिहिल्या. शिवाय ' कोजागिरी ' (१९४७), ' भूवरील स्वर्ग ' (१९४८) याही त्यांच्या कादंबऱ्या आहेत.

' विझती ज्योत 'च्या निवेदनात शांताबाई स्पष्ट करतात की, ' मी ज्या जातीत जन्मले, त्या जातीच्या पार्श्वभूमीवर मी ही कादंबरी लिहीली आहे. यात हेतू इतकाच की, माझ्या जातीची माहिती इतर जातींहून मला अधिक आहे! एवढेच, एरवी बहुजनसमाजापैकी कोणत्याही मागासलेल्या जातीचे हे चित्रण होऊ शकेल. '

' ओढ ' कादंबरीच्या प्रस्तावनेतही लेखिका एका व्यक्तीला महत्त्व न देता कोष्टी कुटुंबजीवनाचे हे चित्रण असल्याचे स्पष्ट करते. कादंबरीचे परीक्षण करताना सुप्रसिद्ध कवी य. दि. पेंढारकर म्हणतात -

' कादंबरीतील व्यक्तींची नावे, पेशा, उलाढाली कोष्ट्यांच्या जमातीला जुळत्या असतील; पण कादंबरीतील कथानक आणि घटनात्मक पेचप्रसंग त्याच जमातीपुरते मर्यादित नसून सार्वजनिक स्वरूपाचे आहेत. '[५]

सरस्वतीची कहाणी केवळ कोष्टी समाजातील वाटत नाही. आणि लेखिकाही स्त्री-पात्रांशी, विशेषत: सरस्वतीशी अधिक तद्रूप झाली आहे. मात्र कादंबरीचा शेवट मिळमिळीत, नेभळा वाटतो. गोपीचा नवरा रंगनाथ याने प्रथमच वडिलांना विरोध करायला हवा होता. कादंबरीतील विधवा सरस्वतीला विधुर दीरापासून दिवस जातात. लग्न करायला अर्थातच तो तयार नसतो. प्रतिष्ठेच्या कल्पनांपुढे माणुसकीचा पराभव होऊन सासरे सरस्वतीला विष देऊन मारतात. समीक्षकांच्या मते धाकट्या दीराने-रंगनाथने वहिनीला संरक्षण द्यायला हवे होते. तथापि असा शेवट आदर्श कथांमध्ये शोभून दिसेल. वास्तवात वडिलांपुढे नमते घेणारा मुलगाच जास्त प्रातिनिधिक आहे. समाजापुढे काही आदर्श ठेवण्याचा अट्टाहास न करता लेखिका वास्तवाचे चित्रण करते. रंगनाथला पश्चात्ताप झाल्याचे दाखवते. सरस्वतीवरील अन्याय निंद्य आहे हे चर्चा किंवा भाषणबाजीतून न सांगता कथेतून सूचित करणे हेच लेखिकेचे यश आहे. मात्र लेखकांनी काही उपदेश समाजाला केला पाहिजे अशी समाजाची अपेक्षा होती, हे श्री. स. रा. नातू यांच्या परीक्षणातून लक्षात येते.

'साहित्य हे जर जीवनातील समस्यांवर टीका करणारे असेल तर ते कार्य रंगनाथसारख्या नेभळट, बुळचट मास्तराकडून कसे व्हावे ? अशा स्वभाव-चित्रांनी वाचकांचे मनोरंजन होईल, पण त्यामुळे वाचकांच्या चिकित्सक वृत्तीला वळण मिळणार नाही. लेखकांनी तिकडेही वळले पाहिजे.'[६]

सर्वसामान्य लोकांना कादंबरीतून मनोरंजन हवे असते, तर विचारवंतांची अपेक्षा असते की वाङ्मयातून नवी जीवनदृष्टी मिळावी.

'कोजागिरी' (१९४७) या कादंबरीत शांताबाईंनी तत्कालीन पांढरपेशा समाजातील एक समस्या हाताळली आहे, ती म्हणजे बौद्धिक विवाह. लेखिका आपल्या निवेदनात म्हणते,

'सपत्निकांच्या द्वितीय विवाहाचा प्रश्न मध्यंतरी बराच गाजला होता. प्रस्तुत प्रश्नाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याचा येथे प्रयत्न केला आहे'.

या कादंबरीतला नायक मुकुंद हा प्राध्यापक आहे. त्याच्याजवळ शिकणाऱ्या मेहुणीबद्दल त्याला अकर्षण वाटू लागते. मात्र 'आपली बहीण परिस्थितीमुळे शिकली नाही. आपण शिकलेल्या म्हणून तिच्या संसाराचा ताबा मिळवणे हा तिच्यावर अन्याय आहे' असा विचार ती धाकटी बहीण (मेहुणी) करते व मेव्हण्यावर प्रेम असूनही त्याला लग्नाला नकार देते. त्याकाळात हा विशेष चर्चेचा असा प्रश्न होता. द्वितीय विवाहाची ही वृत्ती एखाद्या लाटेप्रमाणे

अल्पजीवी ठरली; पण अनेक लेखिकांना विचारप्रवृत्त व लेखनप्रवृत्त करण्याइतकी ती प्रबळ होती. त्या काळातील नाटक व कादंबऱ्यांतून या विषयाची चर्चा आलेली आहे.

स्त्रीशिक्षण या महत्त्वाच्या समाजपरिवर्तनामधून अनेक समाजवृत्ती उदयास आल्या. त्यांचे परिणाम स्त्रीजीवनाशी निगडित असल्याने लेखिकांच्या कादंबऱ्यांतून त्याविषयी कथानके आलेली दिसतात. सुधा साठे यांनी 'पुसलेली चित्रे' या कादंबरीत स्त्रीशिक्षणामुळे निर्माण झालेल्या एका नवीन प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्यनिर्मितीचा ध्यास घेतलेल्या नलिनीला लेखनात मात्र यश येत नसते. पण जेव्हा तिच्या पतीची मैत्रीण-ललितेचा मृत्यू होतो तेव्हा तिच्या भावना हेलावतात. आणि त्या दुःखामधून उत्कृष्ट कलानिर्मिती होते. प्रबोधनाचा अट्टाहास न करताही वेगळ्या विषयाला हात घालून लेखिकेने एक वाङ्मयीन सिद्धांत मांडला आहे, तो म्हणजे 'कलेची सिद्धी अभ्यासात नसून अनुतापात, दुःखात आहे.' या कादंबरीचे परीक्षण करताना प्रख्यात टीकाकार श्री. के. क्षीरसागर म्हणतात -

'सिद्धांत मांडण्याचा हव्यास न धरता लेखिका केवळ आत्मपरीक्षणाने कलेच्या एका मोठ्या सिद्धांतापर्यंत पोहोचली आहे. ही कादंबरी म्हणजे अभ्यास व तंत्र यांचा विजय नसून कलेतील प्रामाणिकपणाचा विजय आहे असे मी मानतो.'[७]

शिकलेल्या मुलींना नावे ठेवण्याची प्रवृत्ती तत्कालीन समाजात होती. तसेच शिकल्यामुळे आपण इतरांपेक्षा काही वेगळे आहोत, आपणांस सर्व कला सहज साध्य होतील अशी अहंमन्यता शिकलेल्या मुलींमध्ये निर्माण झाली होती. या कादंबरीत सुधा साठे यांनी 'बुद्धिमान स्त्रीच्या वाङ्मयीन महत्त्वाकांक्षेचे सूक्ष्म चित्रण' हा विषय घेऊन अनेक प्रकाराने त्याचे विश्लेषण केले आहे. कथानकाची नीटस मांडणी करून लेखिकेने नवशिक्षित तरुणींच्या वृत्तीचे केवळ सूचन केले आहे. मात्र या अनेकपदरी जीवनदर्शनात कोठेही भडकपणा आलेला नाही हा या कादंबरीचा विशेष आहे. एक अनोखा विषय घेऊन लेखिकेने स्त्रियांच्या कादंबऱ्यांतील विषयांची व्यापकता वाढविली आहे.

कृष्णाबाई मोटे यांच्या 'पुसलेली चित्रे' या कांदबरीत बुद्धिमान नलिनीचा प्रेमविवाह झालेला असतो. 'मीनाक्षीचे जीवन' या कादंबरीतही मीनाक्षीचा प्रेमविवाह सुशिक्षित बुद्धिवान समाजसेवकाशी होतो व तो असफल ठरतो. आपला नवरा आपल्यासाठी पुरेसा वेळ देत नाही ही मीनाक्षीची तक्रार असते.

त्याचे पर्यवसान मीनाक्षीच्या घर सोडण्यात होते. याबद्दल प्रतिथयश लेखिका कमलाबाई टिळक म्हणतात - 'स्त्रीशिक्षण हे ध्येय म्हणून पूजता पूजता शेवटी ते कूटप्रश्न होऊन बसण्याची वेळ आली हं!'[८]

स्त्रीशिक्षणातून निर्माण झालेल्या या समस्यांना मुळात स्त्रीची परावलंबी वृत्तीच कारणीभूत ठरते, असे कृष्णाबाई मोटे म्हणतात. स्त्री कायम पुरुषाच्या सहवासाचा आधार शोधत असते. 'मीनाक्षीचे जीवन' या कादंबरीसंबंधी ज्येष्ठ कादंबरीकार ना. ह. आपटे म्हणतात, 'प्रणयी युगुलातील बौद्धिक आकर्षण ही एक मनाची भुरळ ठरते, स्त्री-पुरुषांतील नैसर्गिक आकर्षणाचा बुरखा ठरतो. याला कारण दारिद्र्य तर खरेच; पण ते बुद्धिदारिद्र्य! आणि स्वाभिमान-दारिद्र्यही.'

ना. ह. आपटे यांनी मनुष्यप्राण्याच्या प्रवृत्तींचे चिंतन केले आहे. तरुण वयातील बौद्धिक आकर्षण आणि विवाह हे अंतिमत: शारीरिक आकर्षणाच्या पायावर उभे आहेत हे सार्वत्रिक सत्य 'मीनाक्षीचे जीवन'मध्ये लक्षवेधी भाषेत मांडले आहे.

स्त्रीजीवनातील विविध समस्या सातत्याने समाजापुढे ठेवण्याचे कार्य मालतीबाई दांडेकर यांच्याही कादंबऱ्यांनी केले आहे. सामाजिक प्रश्नांशी संबंधित अशा सार्वजनिक आणि तात्कालिक समाजप्रवृत्ती त्यांच्या कादंबऱ्यांतून प्रकट झालेल्या दिसतात. स्त्रीजीवनाशी निगडित कादंबरीचे विषय असल्याने तेथे कुटुंब, विवाह, शिक्षण या क्षेत्रांतील समाजप्रवृत्तींचे दर्शन प्रामुख्याने घडते.

समाजमध्ये स्त्रीला कायम दुय्यम दर्जा दिला गेला. अर्थात स्त्रीच्या शीलाचे देव्हारे माजवून तिच्याकडून अवास्तव अपेक्षा करण्याची समाजप्रवृत्ती त्यामधूनच वाढीस लागली. अविवाहित मातांना समाजात अवमानित जीवन कंठावे लागते. कित्येक निरपराध स्त्रियांना, निराधार अवस्थेत कुठे आणि कसे राहावे हा प्रश्न भेडसावत असतो. अशा फसलेल्या स्त्रियांसाठी 'मातृमंदिर'ची (१९४०) नायिका एक आश्रम काढते. स्त्रियांचा उद्धार हेच जीवनाचे ध्येय ठरवते. अविवाहित मातांचा प्रश्न समाजजीवनाच्या संदर्भात येथे मांडला आहे. परंतु तिच्यात विचारकर्कशता नाही. जुलै १९४१च्या 'मनोहर' मध्ये, लेखिकेने कादंबऱ्यांतून स्त्रीजीवनासंबंधी पुरोगामी पद्धतीने विचार केल्याबद्दल संपादकांनी तिचे अभिनंदन केले आहे.

मालतीबाईंच्या प्रत्येक नायिकेने समाजसुधारणेच्या क्षेत्रात विकासाच्या दिशेने पाऊल टाकले आहे. परंतु क्रांती करण्याइतके सामर्थ्य त्यांच्यामध्ये नाही.

‘तेजस्विनी’ (१९४५) या कादंबरीचा उल्लेख ‘एका मानिनीची जीवनकथा’ या शद्बात केला आहे. इ. स. १९६५ मध्ये तृतीयावृत्ती निघालेली ही कादंबरी निश्चित लोकप्रिय असावी. त्या कादंबरीच्या प्रारंभी मालतीबाई लिहितात:

“वीस वर्षांनी तृतीयावृत्ती निघत आहे. ‘क्षमेचे’ मूलभूत प्रश्न मात्र अजून संपलेले नाहीत. स्त्रीला संसारात मानाचे स्थान हवे, तिचा पती कर्तबगार हवा, व सासरघरात माणसे कमी असोत, जास्त असोत, तेथे तिला प्रेम व आदर यांची वागणूक प्राप्त व्हावयास हवी.” या क्षमेच्या मागण्या किंवा हट्ट आजच्या काळातही स्त्रीमनाच्या अपेक्षांशी विसंगत नाहीत.

स्त्रीला दुय्यम स्थान देण्याची समाजप्रवृत्ती अनेक शतकांपासून चालत आलेली आहे, ती बदलण्याची लेखिकांना मनापासून इच्छा वाटते. ‘तेजस्विनी’मधील क्षमा, श्रीमंतीच्या खोट्या कल्पनांच्या आहारी न जाता स्वावलंबी बनण्यासाठी घराबाहेर पडते. ‘वज्रलेख’ (१९४६) मध्ये पैशाच्या लोभाने जिचा विवाह एका वृद्ध रोगी माणसाशी करून दिला जातो त्या अभागी छायाची करुण कहाणी आहे. स्त्रियांच्या लेखनाकडे पाहताना, त्याबद्दल काही विशेष अपेक्षा तत्कालीन समाजात होत्या. समीक्षकांचा दृष्टिकोन पुढील परीक्षणातून स्पष्ट होतो.

‘स्त्रियांनी लेखणी हातात धरल्यानंतर साहित्यात उमटणारे स्त्री-जीवनाचे प्रतिबिंब अधिकच स्पष्ट व वास्तव झाले. छायाचे फसवून वृद्धाशी लग्न होते व राजा तिचा पुतण्या होतो. नवऱ्याला महारोग झाल्यावरही ती स्वतंत्र राहू शकत नाही. कारण कायद्याची अडचण. ’स्वतंत्र राहण्याची उत्कटता लेखिकेत तीव्र असती तर ‘छाया’ अधिक तेजस्वी झाली असती.’[१]

कुटुंबामध्ये, तसेच समाजामध्ये स्त्रियांवर जे अन्याय होत होते त्यांना विरोध करणाऱ्या कथानकांची अपेक्षा स्त्रियांकडून केली जात असे. ज्या विवाहबंधनामध्ये स्त्रियांची सर्वार्थाने अवहेलना होत असे, ते बंधन तोडण्याची सोय तत्कालीन समाजात तसेच विवाहसंस्थांमध्येही नव्हती. त्यामुळे ‘वज्रलेख’चा उल्लेख लेखिका ‘जुलमी विवाहाचा कठोर वज्रलेख’ असा करते. लेखिकेने ह्या कादंबरीच्या प्रारंभी ‘दुःखे मूकपणे सोसणाऱ्या आमच्या काही विवाहित मैत्रिणींना ही सहानुभूतीची अल्पभेट समर्पण’ असे लिहिले आहे.

वज्रलेख कादंबरी लिहिताना लेखिकेची प्रचारकाची भूमिका नसली तरी स्त्रियांच्या भाळीचे भोग संपवावे हा आपला हेतू त्यांनी प्रारंभीच्या निवेदनात

सांगितला आहे. त्याचप्रमाणे कादंबरीच्या छपाईच्या कालखंडात ‘देशमुख बिल’ पास झाले. सेपरेशनचा कायदा झाला. तेव्हा या कायद्यामुळे अभागी स्त्रियांना दिलासा मिळेल अशी आशा लेखिकेने व्यक्त केली आहे. कादंबरीत देशमुख बिल पास झाल्याचे वृत्त ‘विविधवृत्ता’तून प्रसिद्ध झाल्याचे दाखविले आहे. कादंबरीचा वास्तवाशी मेळ घालण्याचा लेखिकेचा प्रयत्न येथे स्पष्ट होतो.

‘वज्रलेख’ प्रमाणेच ‘कृष्णरजनी’ (१९४७) ही कादंबरी स्त्रीच्या वाट्याला येणारे अशाश्वत वैवाहिक जीवनाचे नवे पदर उलगडून दाखविते. नवऱ्याने टाकलेली मीरा अनेक वर्षांनी पुन्हा नवऱ्याच्या जीवनात येते, ती त्याची प्रेयसी म्हणून आणि नंतर त्यांच्या लक्षात येते की, नियतीने आपली जन्मगाठ विवाहरूपाने फार पूर्वीच मारली आहे. कादंबरीच्या दुसऱ्या (१९६६) आवृत्तीच्या प्रारंभी परित्यक्तेचं दुःख अजूनही कमी झालेलं नाही हे स्पष्ट केले आहे.

स्त्रियांच्या एकलेपणाचे दुःख मालतीबाईंना तीव्रतेने जाणवलेले दिसते, ते ‘काटेरी मार्ग’ (१९४८) मध्ये. घटस्फोटाच्या कायद्यामुळे स्त्रियांची लग्नाच्या बंधनातून, नवऱ्याच्या जाचातून सहजपणे सुटका होईल अशी काही लोकांची प्रामाणिक समजूत होती. पण नीरगाठ, तोडल्याशिवाय, स्त्रीला अपमानित केल्याशिवाय सुटत नाही हे मालतीबाईंनी ‘काटेरी मार्ग’च्या प्रारंभीच स्पष्ट केले आहे. ‘पाऊल वाटेजवळ’ या सदरात पुस्तकारंभी मालतीबाई लिहितात, ‘निर्मला’ ही स्वाभिमानी तडफदार पोर, तिची कहाणी हे समाजातलं कठोर प्रश्नचिन्ह होतं. क्रूर समस्या होती एक. तीच ही हकीकत मी तिच्या इच्छेप्रमाणे कादंबरीचे रूप देऊन ज्ञात्यांपुढे सुहृदयंवर्गापुढे, विचारशील वाचकांपुढे जमेल तशी लिहून मांडली आहे. वाचक निर्मलाबद्दल व तिच्यासारख्या अनेकजणींबद्दल सहानुभूतीनं विचार करू लागले की या लेखनाचं सार्थक झालंसं होईल.’

‘काटेरी मार्ग’ (१९४८) मध्ये परित्यक्तेचं दुःख लेखिकेने मांडले आहे. ते १९३४ मध्ये ‘हिंदोळ्यावर’मध्येही दाखविले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर समाजाची स्त्रीकडे पाहण्याची प्रवृत्ती काही अंशी मृदू झाली. त्याचा परिणाम म्हणजे निर्मलेला विभावरींच्या अचलेसारखी कोणी बदफैली, भोगलालसा प्रवृत्तीची म्हटले नाही. समाजाची सहानुभूती या नायिकेला मिळाली. वाङ्मयीन दृष्टिकोनातून पाहिले तर अचला अधिक वास्तव, विचारी आणि आपल्या जीवनविषयक जाणिवांशी प्रामाणिक आहे. याउलट, निर्मला थोडी आक्रस्ताळी,

बडबडी आणि बटबटीत आहे. मात्र अनूढ मातृत्वाच्या चाहुलीने अचला घाबरते. याउलट, दुसरे लग्न करताना निर्मला अधिक निश्चयी बनते. याचे कारण याकाळात स्त्रीकडे माणुसकीच्या दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले.

कुटुंबसंस्थेच्या मर्यादेतच स्त्रीजीवन घडत असते. स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या लेखिकांचे अनुभवही या मर्यादेपर्यंत असल्याचे जाणवते. मात्र अनुभवांच्या क्षेत्राची मर्यादा त्यांच्या अभिव्यक्तीच्या उत्कटतेवर कधी अन्याय करीत नाही. स्त्रीला समाजामध्ये ज्या अनेकविध प्रवृत्तींशी झगडावे लागते ते प्रसंग ओघवत्या भाषेत, आणि कौटुंबिक कथानकांतून मालतीबाई दांडेकर यांनी सांगितले आहेत. मातृत्व ही निसर्गाने केवळ स्त्रीलाच बहाल केलेली महान देणगी आहे. त्याबरोबर अपत्यसंगोपनाची अवघड जबाबदारीही केवळ स्त्रीवरच टाकली गेली आहे. मूल घडविणे, सच्छील बनविणे हे प्रत्येक मातेपुढील आव्हान आहे. 'हिरा आणि गारगोटी' (१९५०) ही बालसंगोपनावरील मालतीबाईंची एक बोधप्रद कादंबरी. आपल्या 'हृद्गत' मध्ये बाई आपली भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात,

'अनेक घरांतील मुलं माझ्या नजरेसमोर लहानाची मोठी झाली आहेत. काही सद्गुणी, काही दुर्गुणी. ज्या मुलीची आई मुलीवर लहनपणापासून नजर ठेवून तिला योग्य वळण लावते, ती मुलगी सुशील निपजते, सद्गुणी बनते. परंतु ज्या आईचं मुलीच्या मानसिक विकासाकडे पूर्ण दुर्लक्ष आहे, अशा आयांनी वेळेवर योग्य ती काळजी घेतली नाही तर त्याच मुली पुढे स्वैरिणी होतात. येथेही तेच चित्रण करावेसे वाटले. 'ताईसाहेब' हे पात्र काल्पनिक नाही अगर हिरू ही सत्य सृष्टीत आहे.'

नव्यानं संसार मांडणाऱ्या व छोटी बाळं असणाऱ्या अननुभवी आयांना या छोटया कादंबरीचा तशा दृष्टीनं मार्गदर्शनासाठी थोडासा उपयोग होईल, अशी मला आशा आहे.'

वरील निवेदनामधून लेखिकेची लेखनप्रेरणा स्पष्ट होते. आणि त्याप्रमाणेच कादंबरीचे कथानक उलगडत जाते. त्यामध्ये बाईसाहेब गारगोटीप्रमाणे व हिरा गरीब पण हिऱ्याप्रमाणे तेजस्वी आहे असे दाखविले आहे. त्यांची वयं वर्षे दहा ते वीसपर्यंतची. त्यांची जीवनकथा लेखिकेने आकर्षक भाषेत सांगितली आहे. मांडणीमध्ये उपदेशाचा सूर मात्र प्रामुख्याने जाणवतो. त्यामुळे कादंबरीचे लालित्य काही ठिकाणी कमी पडते. सरोजिनी बाबर मालतीबाईंच्या या कादंबऱ्यांचे सार पुढीलप्रमाणे सांगतात:

'स्त्रियांच्या जीवनात येणाऱ्या कठोर दु:खाची कहाणी मालतीबाईंनी आपल्या कादंबऱ्यांमधून चित्रित केलेली आहे. या त्रिविध दु:खांकडे मालतीबाईंनी अतिशय जिव्हाळ्याने पाहिलेले आहे आणि सहृदयतेने लिहिलेही आहे.'[१०]

अशाप्रकारे स्त्रीजीवनाकडे सहानुभूतीने पाहणाऱ्या प्रश्नप्रधान कादंबऱ्या मालतीबाईंनी लिहिल्या आहेत. त्यामध्ये मनोविश्लेषणाचा गुंता नाही, राजकारणाचा आवेश नाही. दलितजीवनातील कारुण्य नाही. तरीही लोकप्रियतेचे वरदान मालतीबाईंच्या कादंबऱ्यांना लाभले होते.

स्त्री-कादंबरीकारांत संख्यात्मक व गुणात्मक दृष्टीने गीता साने यांचा दर्जा फार वरचा आहे. गीता साने यांच्या कादंबऱ्यांचे गुणवर्णन करताना श्रेष्ठ टीकाकार माधव मनोहर म्हणतात, "फडके-खंडेकरांच्या प्रस्तावना, जोशी-केळकरांचे अभिप्राय, देखणा नायक, प्रेमवेडी नायिका, पाठलाग वगैरे या कादंबऱ्यांत नाही. कामगारांच्या किंकाळ्या, हास्यास्पद चित्रे, दलितवर्गाची कोरडी सहानुभूती नाही."[११] लोकप्रियतेची कोणतीही मान्यवर साधने न वापरताही गीता साने यांच्या कादंबऱ्या लोकमान्य ठरल्या हे त्या कादंबऱ्यांचे मोठेपण आहे. माधव मनोहर पुढे लिहितात :

'कोणत्याही तत्त्वांचा वा हेतूंचा आपल्या कृतींना स्पर्शसुद्धा होऊ नये अशी लेखिकेने हेतुपूर्वक खबरदारी घेतलेली दिसते आणि तरीसुद्धा (का म्हणूनच ?) या कथा अत्यंत हृदयसंगम आणि विचारशील झालेल्या आहेत."[१२]

स्त्रीजीवनाशी निगडित, स्त्री-स्वातंत्र्यावर आधारित कथानकावर गीताबाईंच्या कादंबऱ्या उभ्या राहिल्या आहेत. त्या अनुषंगाने तत्कालीन, राजकीय, सामाजिक प्रवृत्तींचे दर्शन त्यांच्या कादंबऱ्यांतून होते. 'माळरानात 'मध्ये राजकीय क्षेत्रात, आर्थिक बळावर, स्वार्थी हेतूने राजकारणाची सूत्रे आपल्या काबूत ठेवणाऱ्या राजकारणपटूंची धडपड व त्यामुळे ध्येयवादी तरुणांच्या वाट्याला येणारे गाढ नैराश्य त्यांनी निवेदिले आहे. राजकीय पार्श्वभूमीवर एकत्र कुटुंबपद्धती, पति-पत्नीतणाव, स्त्रीचे दुय्यमत्व या प्रवृत्तीही अनेक घटना-प्रसंगांतून दिसतात. स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय क्षेत्रात तरुणांची होणारी मानसिक कुचंबणा 'माळरानात 'मध्ये दिसते. 'आविष्कार 'मध्ये १९३० पूर्वीच्या गांधीवादी चळवळीतील कांही घडामोडी सांगितल्या आहेत. शकुंतला परांजपे यांच्या मते ही कांदबरी केवळ विशिष्ट काळाचे दर्शन घडविणारी कंटाळवाणी कादंबरी आहे.[१३]

वाचकाला खिळवून ठेवणारी रंजनात्मक कादंबरी गीताबाईंनी लिहिली नसेल, पण वाचकाला विचारप्रवृत्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये आहे. १९३५ नंतर स्त्रीच्या संथ व शांत वैवाहिक जीवनात अनेक आंदोलने निर्माण झाली. शिक्षणामुळे स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची ओळख पटलेल्या महिलांच्या मनात असंतोषाचा अग्नी पेट घेऊ लागला. निव्वळ प्रेमविवाह, प्रौढविवाह, विधवाविवाह इ. उपाय-योजनांनी हा असंतोष विझणे शक्य नव्हते. अशा वेळी स्त्री-पुरुषांच्या दृष्टिकोनात व विवाहाच्या मूलभूत कल्पनेतच बदल व्हावयास पाहिजे हे गीताबाईंनी आग्रहाने मांडले. ‘ वठलेला वृक्ष ’, ‘ लतिका ’, ‘ निखळलेली हिरकणी ’ या कादंबऱ्यांतून आपले पुरोगामी विचार मांडताना गीताबाईंनी वास्तवतेची बैठक कधीही सोडलेली दिसत नाही.

‘ स्त्रीमुक्तीचा सर्वांगाने विचार करणारी कादंबरी ’ म्हणून ‘ हिरवळीखाली ’ या कादंबरीचे नाव घ्यावे लागेल. गीताबाईंच्या वैचारिक प्रतिभेची झेप पेलणारी ही एक प्रभावशाली कादंबरी आहे. या कादंबरीसंबंधात भाई उपेंद्र गोडबोले म्हणतात, “ कळ्यांचे नि:श्वास ’ व ‘ हिंदोळ्यावर ’ पेक्षा अधिक तेजदार पुस्तक. स्त्रीहृदयात खळबळ उडाली, क्षोभ उत्पन्न झाला म्हणजे त्यातून कसे जळजळीत साहित्यकण बाहेर पडतात हे पाहण्यासाठी हे पुस्तक वाचावे. पावित्र्यापेक्षा, शारीरिक पावित्र्यापेक्षा, स्वातंत्र्य महत्तम आहे. हे आम्हा स्त्रियांना केव्हा समजणार? ’ ?[१४] स्त्रियांनी कौटुंबिक दु:खापेक्षा सामाजिक, राजकीय समस्यांकडे अधिक लक्ष द्यावे अशी समाजसुधारकांची अपेक्षा ‘ आविष्कार ’मध्ये पूर्ण झालेली दिसते.

स्त्रीच्या शारीरिक दुर्बलतेमुळे समाजाने महिलांवर अनेक बंधने घातली. सुशिक्षित किंवा अशिक्षित असला तरी पती हा परमेश्वर मानण्याची प्रवृत्ती तत्कालीन समाजामध्ये होती. पतीच्या लैंगिक पशुवृत्तीला तोंड देणे स्त्रीला भाग पडते हे ‘ वठलेला वृक्ष ’ किंवा ‘ माळरानात ’ मध्ये दाखविले आहे. बलात्कार हा अपघात मानण्याकडे आज समाजाची थोडीफार तयारी झाली आहे. परंतु ही गोष्ट गीताबाईंनी ‘ फेरीवाला ’ मधूनच सूचित केली आहे. बेकारीची दु:खे सांगताना, वेश्येची व्यथाही बाई मांडतात आणि त्यांच्या उद्धाराच्या चळवळीला एका अर्थाने प्रेरणा देतात. नवे विचार समाजापुढे ठेवताना, प्रचलित समाजप्रवृत्तींना एकदम धक्का देणे साहित्यिकांना शक्य नसते. पुरोगामी आणि प्रतिगामी दोन्ही प्रकारच्या लोकांच्या आक्षेपांचा विचार करावा लागतो. लेखिकांना तर स्त्री म्हणून आपले विचार व्यक्त करताना सामाजिक दडपणांनाही

तोंड द्यावे लागते. कादंबरीतील घटनांकडे लोक अतिशय बारकाईने पाहात असतात.

वास्तवतेशी प्रामाणिक असणाऱ्या या कादंबऱ्या सामान्यजनात व विचारवंतांमध्येही लोकप्रिय झाल्या होत्या. गीताबाईंनी आपल्या कादंबऱ्यांतून सामान्यजनांच्या दु:खाला वाचा फोडली आणि वैचारिक पातळीवर सामाजिक समस्यांची सोडवणूक केली, त्याची अनेक उदाहरणे आपण मागील प्रकरणात पाहिली आहेत.

गीता साने यांची साहित्यनिर्मिती जीवननिष्ठेतून जन्माला आली आहे, असे सांगून तारा धर्माधिकारी म्हणतात: 'त्यांच्या मते लेनिन व मार्क्स यांच्याइतका स्त्रीविषयक समस्यांचा सखोल अभ्यास इतर कुणी केला नाही. त्यांनी (गीता साने) सर्व कादंबऱ्यांतून स्त्रीजीवनाच्या विविध समस्यांचा ऊहापोह केला. त्यांच्या कादंबऱ्यांतील नायक-नायिका पदवीधर, सुशिक्षित आहेत. म्हणून त्यांच्या मुखातून जे विचार, ज्या जाणिवा व्यक्त झाल्या त्याचा आशयही गंभीर आहे'.[१५]

स्त्रीजीवनाला आवश्यक वाटणाऱ्या स्वातंत्र्याच्या जाणिवेवर आधारित असे लेखन गीता साने यांनी केले आहे. मराठी कादंबरीवाङ्मयात त्यांच्या कादंबऱ्यांनी स्वत:चे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आपल्या प्रगल्भ प्रतिभेने, वास्तवजीवनदर्शनाला द्रष्टेपणाची जोड देऊन, गीता साने यांनी लेखिकांच्याच नव्हे, तर एकंदर कादंबरी-वाङ्मयाचा विकास केला आहे.

लेखिकांच्या कादंबऱ्यांतून आढळणाऱ्या समाजप्रवृत्ती या तात्कालिक प्रश्नांच्या संघर्षातून निर्माण झालेल्या दिसतात. स्त्रीशिक्षण, विवाह, कुटुंबसंस्था, यांच्या परिघातून बाहेर पडून सामान्यांना अपरिचित जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न काही लेखकांनी केलेला दिसतो. वैमानिकाचे जीवन मध्यमवर्गीय स्त्रियांना अपरिचित असताना त्यासंबंधी सिंधू गाडगीळ यांनी एक कादंबरी लिहिली ती म्हणजे 'क्षितिजापार' (१९४९). या कादंबरीत नायकाला वैमानिक बनवून त्या क्षेत्रातील अनेक बारकावे लेखिकेने सांगितले आहेत. पांढरपेशा मध्यमवर्गीय तरुणांना या नव्या क्षेत्राबद्दल आकर्षण वाटावे अशा भाषेत सदर कादंबरी पुढे सरकत जाते. शेवटी नागालोकांच्या जीवनाचे अभ्यासपूर्ण चित्र लेखिकेने रेखाटले आहे. स्वत: लेखिकेला वैमानिकांच्या साहसी वृत्तीबद्दल विलक्षण आदर आहे हे प्रास्ताविकापासून जाणवते. अर्पणपत्रिकेमध्ये सिंधूताई गाडगीळ म्हणतात, 'विमान-विद्येच्या बाल्यावस्थेत आत्मदान करून तिला प्रगतिपथावर

आणून सोडणाऱ्या वैमानिकांच्या पुण्यस्मृतीस कृतज्ञतापूर्वक समर्पण.' धाडसी जीवन रेखाटण्याचा अट्टाहास लेखिकेने कायम ठेवल्यामुळे कादंबरीचा शेवट मात्र अगदी अस्वाभाविक वाटतो. विमानदलात गेलेला नायक सदानंद दुसरे महायुद्ध संपल्यावर मुंबईला येतो. त्याचा पत्ता न लागल्यामुळे त्याच्या पत्नीने दुसरे लग्न केल्याचे तेथे त्याला समजते. तेव्हा तो घरापासून परत फिरतो. येथपर्यंत कादंबरीची उत्कंठा स्वाभाविकपणे वाढत जाते. त्यानंतर सदानंद डॉ.भगवती प्रसादांना भेटतो. डॉ. प्रसादांच्या मंगळावर जाण्याच्या प्रयोगात हा साहसी वीर सामील होतो आणि मंगळाकडे झेप घेतो. मंगळावर जाणे आजही माणसाला शक्य झालेले नाही. त्यामुळे सदर शेवट अतिरंजित वाटतो. 'क्षितिजापार' या कादंबरीत एका नव्या विषयाला हात घालण्याचे धाडस लेखिकेने केले. अशातऱ्हेने विषयांच्या संबंधातही लेखिकांनी नाविन्य साधले ही विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणावी लागेल.

विकासपर्वामधील कादंबऱ्यांमध्ये मांडणीच्या व कथानकाच्या वैशिष्ट्यांमुळे मनात रेंगाळून राहते ती शकुंतला परांजपे यांची 'घरचा मालक' ही कादंबरी. समाजप्रबोधनाच्या कोणत्याही दडपणाखाली न येता लहानग्या चांदणीच्या बालमनाची हळुवार स्पंदने या कादंबरीत येतात. एका बालजीवाची ही कहाणी, उच्चनीच भेदाच्या सार्वत्रिक समाजप्रवृत्तीच्या छायेमध्ये रंगली आहे. पण त्याचे सावट त्या व्यक्तिरेखेच्या विकासावर येत नाही. आठ-दहा वर्षांची आईविना पोरकी चांदणी आणि तिला सांभाळणारा म्हातारा रावजी यांचे भावजीवन लेखिकेने खेळकर आणि मोकळ्या वातावरणामध्ये चितारले आहे. लेखिकेला बालमानसशास्त्राची योग्य जाण असल्याचे ही कादंबरी वाचताना लक्षात येते. किंबहुना म्हणूनच चांदणीचे चटकदार आणि चित्ताकर्षक रूप वाचकाच्या मनाची पकड घेते. शाळेतल्या ज्या शिक्षिकेबद्दल नितांत आदर चांदणीला होता, त्या बाई सावत्र आई म्हणून घरात आल्यावर तिला झालेला आनंद हळूहळू ओसरत गेला. तिच्या वडिलांच्या प्रेमात बाई वाटेकरी बनल्या. रावजी नोकर, तेव्हा खालच्या दर्जाचा असल्यामुळे त्याच्यापासून चांदणीला तोडण्याचा प्रयत्न बाई करतात. बाई वाईट नव्हत्या. दुष्ट नव्हत्या. चांदणीवर संस्कार करण्याची त्यांना तळमळ होती, तरीही चांदणीच्या मनात बाईंबद्दल अढी बसत गेली. कोणाचीही चूक नसताना बसलेला हा तिढा कादंबरीत संघर्षाचा उच्चांक गाठतो. हृदयाची पकड घेणाऱ्या करुणरसाने कादंबरीला व्यापून टाकले आहे. सरोजिनी बाबर यांनी कादंबरीतील मोकळेपणाची तुलना पाश्चात्त्य

लेखिकांच्या स्वभाववैशिष्ट्यांशी केली आहे. सरोजिनी बाबर म्हणतात, 'हरिभाऊंची एखादी कलाकृती सोडली तर चांदणीच्या या स्वभावरेखेला मराठी सारस्वतात दुसरी तोड नाही, इतकी ती हृदयंगम झालेली आहे. स्वभावलेखन हाच या कादंबरीचा आत्मा आहे.'[१६]

सरोजिनीबाईंचे हे उद्‌गार चांदणीच्या प्रभावशाली व्यक्तिचित्रणाची साक्ष देतात. मराठी कादंबरीला कुटुंबजीवनाचा नवा पैलू या कादंबरीने दिला, असे म्हणावे लागेल.

मध्यमवर्गीयांपेक्षा अगदी वेगळ्या समाजाची ओळख विभावरी शिरूरकरांनी वाचकांना करून दिली आहे. तो म्हणजे 'बळी'(१९५०) मधील दलितसमाज. पांढरपेशा समाजाने बाजूला सारलेला, गावकुसाबाहेरील समाज मालतीबाईंनी 'आबा'च्या जीवनातून दाखवला आहे.

मराठी कादंबरीत प्रथमच एवढे भेदक दलितजीवनाचे चित्रण आले आहे. तत्पूर्वी श्री. म. माटेंच्या 'उपेक्षितांचे अंतरंग'मध्ये कथामाध्यमातून दलितजीवन आले आहे. आनंद साधले यांनी १९४९ साली दलितसमाजाच्या पार्श्वभूमीवर 'आता उशीर झाला' ही आदर्शवादी कादंबरी लिहिली. अण्णा भाऊ साठे यांचे नाव नुकतेच लोकांपुढे येऊ लागले होते. 'दलितवाङ्‌मय' या नावाने १९५५ नंतर दलितांनी लिहिलेले वाङ्‌मय प्रसिद्ध होऊ लागले. परंतु त्यापूर्वीच दलितवाङ्‌मयाच्या कसोटीला उतरेल असे मांग-गारुडी समाजाचे चित्रण विभावरी शिरूरकरांसारख्या (मालतीबाई बेडेकर) पांढरपेशा वर्गातील स्त्रीने केले, ही मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासातील एक लक्षणीय घटना म्हणावी लागेल. व्यक्तिपूजक प्रवृत्तीमुळे एकांगी बनत चाललेल्या मराठी कादंबरीला विभावरीबाईंनी सामाजिकतेचे कलात्मक माध्यम मिळवून दिले. लेखिकेने घडविलेल्या समाजातील एका उपेक्षित अंगाचे हे दर्शन पाहून मध्यमवर्गीय समाज स्तिमित झाला. यासंबंधी सुप्रसिद्ध कवी यशवंत म्हणतात, 'ही कादंबरी वाचून, हे माझे बांधव काय हा प्रश्न मनात उभा राहून, वाचक बेचैन होतो. हे दर्शन अतिशय वास्तव आहे, ते सूक्ष्म आहे आणि ते भीषण आहे. खरीखुरी सामाजिक आणि हृदयस्पर्शी कादंबरी लिहून मराठी कथावाङ्‌मयाची पातळी वाढविल्याबद्दल विभावरी शिरूरकर हिला धन्यवाद.'[१७]

विषयाच्या वेगळेपणामुळे 'बळी' या कादंबरीचे समीक्षकांनी केवळ कौतुकच केले असे मात्र म्हणता येणार नाही. 'धार आणि काठ' मध्ये नरहर कुरूंदकरांनी या कादंबरीचे परखड परीक्षण केले आहे. कुरूंदकर म्हणतात,

'त्या समाजाचे ज्ञान असूनही मांग-गारुडी समाजाच्या आकलनालाच त्यांची शक्ती अपुरी पडते. हा आबा मांग-गारुडी समाजाचे अपत्यच वाटत नाही. आपल्याच समाजात आबा पूर्णपणे परका वाटतो. '[१८]

आबा त्याच्या समाजात परका वाटतो यामध्ये अवास्तव असे काहीही नाही. 'मला शिकायला पाठवलंत आणि माझी अर्धीमुर्धी मानच छाटून ठेवलीत त्यापेक्षा मी तुमचा मुलगाच नाही म्हणा.' (बळी, पृ. ४८) असे म्हणणाऱ्या आबाचे दुःख, शिकणाऱ्या प्रत्येक दलिताने पचविले आहे. त्याची साक्ष दलितांच्या अलीकडच्या आत्मचरित्रांतून पटते. 'आभरान'च्या 'पार्थ पोळकेला' पोतराजची लाज वाटते. शंकरराव खरात, दया पवार यांना 'बलूतं' मागण्यात कमीपणा वाटतो. 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' लिहिणारे माधव कोंडविलकर एका चांभाराच्या घरात जन्मले. पण हे काम आपल्याला जमणार नाही, हे त्यांनी आपल्या आत्मकथनात सांगितले आहे. या उदाहरणांवरून आपल्या लक्षात येते की, शिक्षणामुळे दलितांची मधली पिढी पांढरपेशा मध्यमवर्गीय बनू पाहात होती, पण मध्यमवर्गीय त्यांना आपलं मानत नव्हते, आणि गावाबाहेरचं आयुष्य या नवशिक्षितांना पचविता येणारे नव्हते. दोर काटलेल्या पतंगाप्रमाणे भिरभिरणारे आयुष्य काही काळ सुशिक्षित दलितांच्या वाट्याला आले होते.

नवशिक्षित दलितांची ही स्थिती १९५० साली ओळखून एका दलितेतर लेखिकेने त्याभोवती आपली कादंबरी उभी करणे ही विलक्षण गोष्ट आहे. राजकारण, नोकरी, समाजसुधारणा या प्रत्येक क्षेत्रात आबाला ज्या मतलबी प्रवृत्तीच्या लोकांशी सामना करावा लागतो, त्यामुळे कादंबरीची उत्कंठा शेवटपर्यंत वाढत राहते. आजच्या दलितवाङ्मयातील नायकाप्रमाणे आबा कुठेही आत्मसमर्थनाला बळी पडत नाही. तरीही वाचकाला बेचैन करणारा संघर्ष लेखिकेने रंगविला आहे. मराठी कादंबरीवाङ्मयाच्या इतिहासातील 'बळी' ही एक वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. 'बळी' मुळे मराठी कादंबरीतील अनुभवाचे आणि अभिव्यक्तीचे क्षितिज विस्तारले. येथपर्यंत मराठी कादंबरी पांढरपेशांच्या संकुचित परिघातच फिरत होती. सामान्य माणसाला त्यापलीकडील अफाट जीवनाची ओळख 'बळी'मुळे झाली. मराठी वाङ्मयाच्या विकासाचा आलेख काढताना 'बळी'ची नोंद घेणे आवश्यक आहे. मराठी लेखिकांपुरतेच या कादंबरीचे मूल्य करून चालणार नाही, तर मराठी वाङ्मयालाच भूषणावह अशी ही कादंबरी आहे. म्हणूनच, लेखिकांच्या कादंबऱ्यांतून आजपर्यंत ज्या

समाजाचे, ज्या समाजप्रवृत्तींचे दर्शन घडले नव्हते त्या गावकुसाबाहेरचे समाजदर्शन घडविणाऱ्या 'बळी' या कादंबरीपर्यंत प्रस्तुत अभ्यासाची कालमर्यादा ठरवली.

**विकासाच्या पाऊलखुणा :** मराठी लेखिकांचे 'कौतुकपर्व' १९२० नंतर संपत गेले आणि 'एक वाङ्मयप्रकार' या निकषावरच स्त्रियांच्या लेखनाचे मूल्यांकन होऊ लागले. १९३५ ते १९५० मधील कादंबऱ्या वास्तवतेच्या निकषावर यशस्वीपणे उतरतात. कन्या, पत्नी आणि माता म्हणून स्त्रीची काही कर्तव्ये असली, तरी स्त्री ही माणूस आहे, तिला देहाप्रमाणे मनही आहे या जाणिवेचा विकास याच काळात होऊ लागला. स्त्रीमध्ये निर्माण झालेल्या या स्वसामर्थ्याच्या जाणिवेचे स्फुल्लिंग लेखिकांनी फुलविले आहे. स्त्रीवर मर्यादा घालणाऱ्या समाजप्रवृत्तींना धैर्याने सामोरे जाण्याची आवश्यकता या सुशिक्षित स्त्रियांना पटली आहे आणि आपल्या विचारांना त्यांनी कादंबरीवाङ्मयातून वाट करून दिली आहे. परंतु या आधुनिक मानवताधिष्ठित विचारांना यावी तितकी व्यापकता आल्याचे जाणवत नाही. परंपरेचे किंवा पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचे दडपण लेखिकेवर असल्याचे लक्षात येते. प्रागतिक विचार मांडता मांडता, लेखिका एकदम थबकते. विवाहित पुरुषाच्या द्वितीय विवाहाला विरोध करतानाही, त्याला शासन करण्याइतकी खंबीर बनत नाही. 'तो वृक्ष-मी लता' हीच भावना स्त्रीच्या मनाच्या तळाशी आहे. आजकाल स्त्रीला अभिप्रेत असणारी विद्रोहाची भाषा ती वापरत नाही. पण त्याची बीजे या कादंबऱ्यांतून सापडतात.

कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्तींचा मागोवा घेतला तर तेथे कल्पनाविलास, स्वप्नरंजन हे दोष प्रामुख्याने नवोदित किंवा तरुण लेखिकांत दिसतात. विषयाच्या मांडणीत ढिलेपणा जाणवतो आणि भाषेच्या उत्कटतेला भडकपणा गिळून टाकतो. हे दोष तत्कालीन सर्वच मराठी वाङ्मयात दिसतात. त्यामुळे केवळ स्त्रियांच्या लेखनाची ही मर्यादा आहे असे मानणे योग्य ठरणार नाही.

वैचारिक प्रगल्भतेच्या दृष्टीने गीता साने यांच्या कादंबऱ्या नवीन आदर्श समाजापुढे ठेवताना दिसतात. मानवी मनाचे सूक्ष्म व्यापार कशा प्रकारे चालू असतात, याचा शोध कादंबरीतून घेतला जाऊ लागला. विचारपर्वामधून विकासपर्वामध्ये आलेली कादंबरी व्यक्तीच्या मनोविश्लेषणाला महत्त्व देऊ लागली. शंकुतला परांजपे यांची 'घरचा मालक' ही कादंबरी या मनोविश्लेषणाच्या सामर्थ्यामुळेच मनात रेंगाळत राहते. वाचकांची उत्कंठा वाढवत

ठेवणाऱ्या तंत्राचा विकास या काळात विशेषत्वाने झालेला दिसतो. त्यादृष्टीने कुमुदिनी रांगणेकर, मालतीबाई दांडेकर, शांता शेळके यांच्या कादंबऱ्या यशस्वी ठरल्या आहेत. 'बळी' कादंबरीची आजच्या दलितवाङ्मयाशी तुलना केली तरी ती वास्तवतेच्या शिखरावर असलेली दिसते. लेखिकांच्या कादंबऱ्या वाङ्मयाच्या इतिहासात दुर्लक्षिल्या गेल्या तरी त्या कादंबऱ्यांपूर्वी लिहिलेली लेखिकांची मनोगते, आजच्या स्त्रीलाही विचार करायला लावतात. लेखिकांची कल्पनाशक्ती द्रष्टेपणाची साक्ष देते. स्त्रियांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणाऱ्या समाजप्रवृत्ती म्हणजे त्यांच्या संवेदनशील मनाचा आविष्कार आहे.

अत्यंत संयमी वृत्तीने, स्वत:चे प्रश्न स्वत: सोडविण्याचा स्त्रीने सतत प्रयत्न केल्याचे दिसते. म्हणूनच या समस्याप्रधान लेखनाची समीक्षा करताना, कलात्मकता हेच एकमेव व्यवच्छेदक लक्षण मानणे गैर ठरेल. लेखिकांच्या कादंबऱ्यांतून केलेले समाजप्रवृत्तींचे चिंतन निश्चितच विचार करण्याजोगे आहे. तथापि काही समीक्षकांना स्त्रियांच्याच लेखनाची चिंता वाटते ही आश्चर्याची गोष्ट आहे. १९५० पर्यंत पाऊणशे वर्षांच्या कालखंडात लेखिकांच्या कादंबऱ्यांतील अनुभवांची व्यापकता आणि मांडणीतील कलात्मकता यांची विकासाच्या दिशेने वाटचाल झाली आहे. लेखिकांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होणाऱ्या समाजप्रवृत्तींचे क्षितिज विस्तारत गेले आहे.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १. | ग.त्र्यं. माडखोलकर | 'मनोहर' ऑगस्ट १९३६ | पृ.५३ |
| २. | सरस्वतीबाई दाभोळकर | 'हृदयाचे कढ' | पृ.१५२,१५३ |
| ३. | गोपीनाथ तळवलकर | 'मनोहर' जाने. १९४० | पृ. ६१ |
| ४. | सरोजिनी बाबर | 'वनिता सारस्वत' | पृ. २६८ |
| ५. | य. दि. पेंढारकर | म. सा. प. ए. जून २३/१/१९५० | पृ. ३८ |
| ६. | रा.रा.नातू | 'अभिरुची' फेब्रु.-मार्च १९५० | पृ.५३ |
| ७. | श्री.के.क्षीरसागर | 'वसंत' मार्च १९४७ | पृ. १७-१९ |
| ८. | कमलाबाई टिळक | 'अभिरुची' मार्च १९४३ | पृ. २९ |
| ९. | — | 'स्त्री' ऑगस्ट १९४७ | पृ. ५६ |
| १०. | सरोजिनी बाबर | 'वनिता सारस्वत' | पृ. २७१ |
| ११. | माधव मनोहर | 'प्रतिभा' १ ऑक्टो.१९३६ | पृ. १५, १६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | उ.नि. | उ.नि. | उ.नि. |
| १३. | शकुंतला परांजपे | 'समाजस्वास्थ्य' ऑगस्ट १९३९ | पृ.- |
| १४. | उपेंद्र गोडबोले | 'ध्रुव' जून १९३७ | पृ. २१२ |
| १५. | तारा धर्माधिकारी | 'युगवाणी' दिवाळी १९८४ | पृ.४४०, ८३ |
| १६. | सरोजिनी बाबर | 'वनिता सारस्वत' | पृ.२७७ |
| १७. | य.दि.पेंढारकर | म.सा.प.वर्ष २३ ए.जून१९५० | पृ.३६ |
| १८. | नरहर कुरूंदकर | 'धार आणि काठ' | पृ.१७४ |

●●●

# मागोवा

लेखक, वाचक आणि समीक्षक यांना कादंबरीचे नेहमीच आकर्षण वाटत आले आहे. कादंबरी हा सर्वांनाच आव्हानात्मक वाटणारा आकृतिबंध आहे. समाजचित्रण आणि व्यक्तिचित्रण हे त्याचे मुख्य लेखनविषय असतात. आजपर्यंत समाजाचे वास्तव चित्रण किंवा मानवी मनोभावांचे सूक्ष्म निरीक्षण हेच वाङ्मयाचे निकष ठरविले गेले. परंतु समाज आणि व्यक्तिरेखांचा विकास ज्या समाजप्रवृत्तींमुळे घडत असतो, त्या समाजप्रवृत्तींचे वाङ्मयातील दर्शन कितपत वास्तव आहे, याचा अभ्यास वाचकांसमोर ठेवण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

इ.स. १८७३ ते १९५० या पाऊणशे वर्षांत प्रसिद्ध झालेल्या स्त्रियांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्तींचा अभ्यास केल्यावर काही महत्त्वाचे निष्कर्ष आपल्या हाती येतात. या कालखंडात मुख्यत: समाजप्रबोधनासाठीच ललितलेखन केले जावे अशी समाजप्रवृत्ती होती. समाजसुधारणेमध्ये प्रारंभी सर्व लक्ष स्त्रीजीवनसुधारणेकडे केंद्रित झाले होते. कालांतराने त्याबरोबर दलितांचा उद्धार करणारा नवा विचारही केला जाऊ लागला.

स्त्रीशिक्षणामुळे समाजात फार मोठे विचारपरिवर्तन घडले. शिक्षणाअभावी स्त्रीच्या वाट्याला येणारी दु:खे सांगताना, शिकलेल्या स्त्रीमध्ये निर्माण झालेला स्वाभिमानही लेखिकांनी यथायोग्य शब्दात दाखविला आहे.

समाजविघातक समाजप्रवृत्तींचे खंडण करणाऱ्या या लेखिका जीवनाधार असणाऱ्या काही सार्वत्रिक प्रवृत्तींची मात्र जपणूक करीत आहेत. म्हणूनच श्रद्धेची परिमाणे बदलण्याची सूचना करतानाही श्रद्धेमुळे मानसिक समाधान लाभते या सार्वत्रिक सत्याला स्त्रिया विसरलेल्या नाहीत. स्त्रीपुरुषसमानतेचा हट्ट धरणारी स्त्री कुटुंबव्यवस्थेला तोडून टाकण्याचा आदेश मात्र कुठेच देत नाही.

व्यक्तिमात्राच्या विकासाला अडथळा आणणारी संकुचित स्वार्थी

समाजप्रवृत्ती वाईट आहे याची जाणीव लेखिकांना झालेली दिसते. परंतु दुसऱ्याच्या वैयक्तिक जीवनात डोकावण्याची प्रवृत्ती कूपमंडूक वृत्ती, याचे समाजातून उच्चाटन झालेले लेखिका कुठेही दाखवीत नाहीत. या सार्वत्रिक समाजप्रवृत्ती बदलणे शक्य नाही हे वास्तवातील सत्य स्त्रियांनी स्वीकारले आहे.

माणूस म्हणून स्त्रीचा विचार व्हावा याचा पाठपुरावा स्त्रियांनीच अधिक प्रमाणात केला आहे. तेव्हा स्त्रियांमध्ये चिंतनशीलता नाही असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कुटुंब आणि स्त्री यांच्यातील ताणतणाव या कादंबऱ्यांतून दिसतात. तसेच विभावरी शिरूरकर, गीता साने, शांताबाई नाशिककर यांच्या कादंबऱ्या वाचल्यावर स्त्रियांचे अनुभवविश्वही विस्तृत असल्याचे लक्षात येते.

यावरून आपणास दिसून येते की, विषयाचे नाविन्य, चिरंतन मूल्यांची जपणूक, वास्तवसमाजाचे सहजस्फूर्त दर्शन आणि स्त्रीमनोभावांचे आक्रंदन या कादंबऱ्यांच्या अभ्यासाद्वारे वाचकांपुढे ठेवण्यात आले आहे.

**समाजप्रवृत्ती-एक संकल्पना :** भिन्न काळातील कादंबऱ्यांतून रंगविलेला समाज वेगवेगळा असला तरी त्याच्या विकासामागे समाजप्रवृत्तींचे सूत्र कायम असते. काळ बदलला की आचारविचारांचे बाह्यस्वरूप बदलते, परंतु त्या जीवनदर्शनामागे मूळ प्रवृत्ती बीजरूपाने असतातच. रूढी, चालीरीती बदलल्या पण जीवनाधार शोधण्यासाठी नवनवीन श्रद्धास्थाने निर्माण झालेली दिसतात. मानवी मनाचा, व्यक्तींच्या सामाजिक संबंधाचा शोध घेणे हे साहित्याचे, पर्यायाने साहित्यिक समीक्षणाचे उद्दिष्ट असते. त्यासाठी समाजप्रवृत्तींच्या निर्मितीची कारणपरंपरा शोधून काढली. तात्कालिक, सार्वत्रिक आणि स्वभावजन्य समाजप्रवृत्तींच्या उपपत्तींची कारणे अनेक उदाहरणांतून स्पष्ट केली. लेखकांच्या वृत्तींचा समाजप्रवृत्तींच्या निर्मितीशी संबंध असतो, हे लेखक आणि समाज यांच्या अन्योन्य संबंधातून लक्षात आणून दिले. मराठी वाङ्मयाच्या अभ्यासासाठी या समाजप्रवृत्तींचा अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यादृष्टीने इ.स.१८७३ ते १९५० पर्यंतच्या काळातील लेखिकांच्या कादंबऱ्यांतून दिसणाऱ्या, प्रत्यक्ष समाजात आढळणाऱ्या प्रवृत्तींचा अभ्यास एवढ्या विस्तृतपणे केला. काही समाजप्रवृत्तींमध्ये कालानुरूप बदल होत असतात म्हणून प्रबोधनपर्व (१८७३-१९२०), विचारपर्व (१९२१-१९३४), विकासपर्व (१९३५ ते १९५०) अशी प्रकरणांची मांडणी केली आहे. या तीन पर्वांमधून कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्ती बदलत गेल्या.

**रूढीप्रियता :** रूढीप्रियता ही सार्वत्रिक समाजप्रवृत्ती प्रारंभापासून ते १९५० पर्यंत प्रकर्षाने जाणवते. प्रबोधनपर्वामध्ये एक 'रंगराव' चा अपवाद वगळता इतर कादंबऱ्यांमधून सनातन रूढींचे मोठ्या कौतुकाने वर्णन केलेले दिसते. 'रंगराव' मध्ये रूढींचा पुनर्विचार केला आहे. विचारपर्वामध्ये श्रद्धास्थाने बदलावीत म्हणून लेखिकांनी आग्रह धरला. 'हाच का धर्म ?' मध्ये दानधर्म काशीयात्रा, वेणीदान यासारख्या रूढींची कारणे शोधून काही पर्याय शोधण्याचा प्रयत्न केला गेला आहे. विचारपर्वापर्यंत सुधारणावादी विचार फक्त नायकाचेच आहेत, पण नंतरच्या काळात नायिका देखील आपल्याला न पटलेल्या रूढींचे खंडण करताना आढळतात. तरीही फारशा त्रासदायक नसलेल्या रूढी या नायिका संघर्ष टाळण्यासाठी पाळतच असतात. किंवा रूढीभंग केला तर अधेमधे त्यांच्या मनात अशुभाची पाल चुकचुकते. धर्मसंबंधातील रूढींचे प्राबल्य या काळापर्यंत ज्या गतीने झाले त्यामानाने १९५० नंतर ही गती मंदावली. मंगळागौरी, सत्यनारायण होतच राहिले. किंबहुना सुधारणेच्या पहिल्या टप्प्यावर तरुणांमध्ये नवीन पुरोगामी प्रवृत्ती निर्माण झाल्या. वैज्ञानिक प्रगतीमुळे आज जे अस्थिर जीवन वाट्याला आले आहे त्यामुळे आजही रूढीप्रियता अधिक जोमाने वाढते आहे. 'रंगराव' किंवा 'हाच का धर्म ?' मध्ये भोंदू साधूंचा खोटेपणा स्पष्टपणे दाखवून दिला गेला. पण आजही 'अंधश्रद्धानिर्मूलन' हे महत्त्वाचे समाजकार्य समजले जाते.

**जातीयता :** मानवताविरोधी प्रवृत्ती नष्ट झाल्या म्हणजे समाज सुधारला असे म्हणावे लागेल. आज जगभर चाललेल्या वांशिक चळवळी, प्रगत राष्ट्रांतही आढळणारा वर्णभेद किंवा भारतातील जातिभेद ही जातीयता या सार्वत्रिक प्रवृत्तीचीच विविध रूपे मानली पाहिजेत. जातिभेद वाईट आहेत अशी तीव्र जाणीव प्रबोधनकालातील लेखिकांमध्ये दिसत नाही. परंतु विचारपर्वापासून मात्र याविषयीची खंत लेखनात डोकावू लागली. त्यामुळे नव्या-जुन्या प्रवृत्तीतील संघर्ष वाढीस लागलेला दिसतो. गांधीजींच्या विचारांचा परिणाम म्हणजे हरिजनांना अस्पृश्य मानण्याची प्रवृत्ती नाहीशी करण्याचा प्रयत्न लेखिकांनी सुरू केला. 'वादळापूर्वी 'मधील या संदर्भातील एक प्रसंग लक्षात घेण्यासारखा आहे. जातीयतेचा बीमोड करण्यासाठी आंतरजातीय विवाहांचा पुरस्कार लेखिकांनी केला आहे. 'कर्तव्याची जाणीव ' ठेवून आंतरजातीय विवाह करावेत असे कुमुदिनी रांगणेकरांनी सांगितले. मध्यमवर्गातील पोटजातींमधील भेद लेखिकांनी उघडे केलेच आहेत. तर 'बळी 'मध्ये आबाच्या प्रेमाला अस्पृश्यांतील

पोटभेदाचे ग्रहण लागल्याचे लेखिकेने दाखविले आहे. जातीयता पाळण्याची प्रवृत्ती कमी झाली नव्हती तरी विकासपर्वामध्ये विरोधाची धार बोथटली होती. दलितांना समानुभूती देण्यापासून ते दलितांचे प्रश्न मांडण्यापर्यंत या मानवतावादी प्रवृत्तींचा विकास झालेला दिसतो. १९५० नंतर दलित जागृत झाले. हक्कांसाठी लढा देण्यास सुरुवात झाली. कुमुद पवाडे, बेबी कांबळे प्रभा गणोरकर या दलित स्त्रिया आपल्या समस्या समर्थपणे मांडू लागल्या आहेत.

**धर्मांतर :** जातीयतेपाठोपाठ धर्मांतर ही सुद्धा एक समाजप्रवृत्ती आहे. अर्थात ख्रिश्चन आणि मुसलमान समाजात धर्मांतराचा वेग वाढत ठेवण्याची प्रवृत्ती आहे, तर हिंदुधर्मियांत फक्त धर्मांतर रोखण्याचाच थोडाफार प्रयत्न दिसतो. प्रबोधनपर्वामध्ये कल्पनारंजनाकडे ओढा असल्यामुळे लेखिकांनी आग्रहाने धर्मांतरविरोधी भूमिका घेतली नाही. या प्रवृत्तीचा १९२० नंतर लेखिकांनी डोळसपणे विचार केलेला दिसतो. शांताबाई नाशिककर, मालतीबाई दांडेकर आणि विभावरी शिरूरकर यांच्या कादंबऱ्यांतून १९५० पर्यंत लोकमत जागृत ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आढळतो. सध्या चालू असलेल्या केरळ व आसाममधील धार्मिक हालचाली आणि मीनाक्षीपुरममधील काही वर्षांपूर्वीची सामूहिक धर्मांतराची घटना ही धर्मांतरप्रवृत्तीची सार्वत्रिकता पटविण्यास पुरेशी आहे. परंतु आजच्या कादंबरीकार स्त्रिया धर्मांतरप्रवृत्तीकडे गंभीरपणे पाहात नाहीत असे दिसते.

**राजकारण :** धर्मांतरापेक्षाही समाजजीवनाला हलवून सोडले होते ते स्वातंत्र्यचळवळींनी. प्रबोधनपर्व हे लोकजागृतीचे असल्यामुळे तत्कालीन कादंबऱ्यांतून राजकारणाच्या फारसे उल्लेखही येत नाहीत. विचारपर्वामध्ये राजकीय स्वातंत्र्याबद्दल आस्था दिसते. राजकारणात सहभागी होण्याची प्रवृत्ती समाजामध्ये निर्माण होत होती, त्याचे संदर्भ नंतरच्या विकासपर्वातील कादंबऱ्यांतून येतात. सरोजिनी नायडू, कॅप्टन लक्ष्मीसारख्या नेत्या आणि प्रेमा कंटक, मृणालिनी देसाई, उषा मेहता व त्यांच्या अनेक साथीदार स्त्रियांची राजकारणातील ओढ स्पष्ट होत होती. स्त्रियांच्या या देशप्रेमाचे संदर्भ लेखिकांनी अनेकदा दिलेले दिसतात. साम्यवादी प्रवृत्तींचाही लेखिकांवर प्रभाव असल्याचे जाणवते. राजकारणाच्या संदर्भातील विविध प्रवृत्ती कादंबऱ्यांतून आढळतात. स्वातंत्र्य मिळाले. राजकारणाचे रंग बदलले. स्वातंत्र्योत्तर स्वार्थी राज्यकर्त्यांचे चित्र दुर्गाताई जोशी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच रेखाटले होते. त्यांच्या दूरदृष्टीचे मर्म त्यांच्या राजकारणातील समरसतेमध्ये सामावले आहे. राजकारणाबद्दल

उत्सुकता दाखविणारी प्रवृत्ती आजही कायम आहे. पण आजची लेखिका अंतर्मुख होताना राजकारणाचे जीवनातील संदर्भांना सोडून उदासीन, कातडीबचावू प्रवृत्तीकडे वळलेली दिसते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात माणूस आत्मकेंद्री बनू लागला. अर्थकारणाला जीवनात महत्त्वाचे स्थान मिळाले. प्रबोधनपर्वातील समाजजीवन औद्योगिक क्रांतीच्या आधीचे, पहिल्या महायुद्धापूर्वीचे आहे, म्हणून खूपच शांत व संथ आहे. पहिल्या महायुद्धानंतर नोकरदारांचा नवा वर्ग उदयाला आला. उपजीविकेचा प्रश्न भीषण होत गेला तसा लेखिकांच्या कादंबऱ्यांतून जमीनदारी प्रवृत्तीचा निषेध होऊ लागला. श्रीमंत अरेरावी प्रवृत्तीवर प्रहार होऊ लागले. गीता साने यांच्या कादंबऱ्यांतून प्रतिष्ठितांचे बुरखे फाडले गेले. लाचलुचपतीचा निषेध झाला. कादंबऱ्यांच्या कथानकामध्ये नाटक, सिनेमा, वैमानिक यांच्या जीवनातील थरार आला. जीवनविकासातील, पैसा या परिमाणाचा अर्थ लेखिकांना उमगला. नोकरीसाठी किंवा समाजकार्यासाठी बाहेर पडलेल्या स्त्रीला समाजातील काही सार्वत्रिक आणि स्वभावजन्य प्रवृत्तींशी मुकाबला करावा लागला.

दुसऱ्याच्या वैयक्तिक जीवनात डोकावणाऱ्या प्रवृत्तीचे दर्शन विकासपर्वामध्ये घडते. स्वत: घेतलेल्या निर्णयाला समाजाने नावे ठेवली तरी तिकडे लक्ष देऊ नका, असा संदेश विभावरींच्या अचलेने दिला. समाज भुंकेल आणि दुर्लक्ष केलं की गप्प बसेल, असा खंबीर विचार करणाऱ्या अचलेला समाजप्रवृत्ती बदलणार नाही हे पटले आहे. दुसऱ्याला नावे ठेवण्याची समाजप्रवृत्ती कधीच नाहीशी होणार नाही हे सत्य लेखिकांना उमगले ही विकासपर्वाला शोभणारी गोष्ट म्हणावी लागेल. आजच्या कादंबरीत आत्मविश्वास वाढीस लागला आणि स्वत:च्या भवितव्याची पर्वा न करता हवे ते निर्णय नायिका घेते व कालांतराने एकटी पडते, दु:खी बनते.

**विवाह :** स्त्रीच्या जीवनात विवाह हेच अंतिम ध्येय होते म्हणून लेखिकांनी आपल्या पहिल्या कादंबरीपासून विवाहसंबंधातील स्त्रीची भूमिका आणि तिचे पिढ्यान्‌पिढ्या डावललेले स्थान दाखविले आहे. लेखिकांच्या कादंबऱ्यांतून प्रेमविवाह दाखविले गेले तरी प्रत्यक्षात मुलीच्या लग्नाचा प्रश्न इतका सोपा नव्हता आणि आजही नाही. विचारपर्वामध्ये मुलीच्या शिक्षणाला लग्नानंतर पूर्णविराम मिळत असे. त्यानंतरच्या काळात शिक्षण पूर्ण होईपर्यंत मुलीच्या लग्नाची घाई करणे पालकांनी थांबविले. तसेच लग्नानंतरही पत्नीच्या उच्च

शिक्षणाला प्रोत्साहन देणारा नायक 'दूर कुठेतरी' मध्ये दाखविला गेला. लेखिकांनी आपल्या व्यक्तिरेखा सुशिक्षित रंगविल्या आणि नंतर लग्नाइतकेच मुलीच्या शिक्षणाला महत्त्व देण्याची प्रवृत्ती मध्यमवर्गात रूढ झाली.

मुलीचे लग्न म्हणजे संकट वाटण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे हुंडापद्धती. त्या हुंडापद्धतीचा निषेध प्रबोधनपर्वापासून विकासपर्वापर्यंत सातत्याने केलेला आहे. समाजातील आर्थिक विकासाबरोबर ही स्वार्थी प्रवृत्तीही वाढत चालली आहे ही मोठी चिंतेची गोष्ट आहे. वाङ्मयामुळे समाजप्रवृत्ती बदलू शकतात असे असले तरी तो नियम सार्वत्रिक प्रवृत्तींच्या अपवादानेच सिद्ध होतो. आजही हुंडाबळीची प्रचंड प्रकरणे उघडकीस येत असताना स्त्रिया कादंबरीत हा प्रश्न आग्रहाने मांडत नाहीत.

मुलीचे लग्न करून दिले तरी तिची काळजी करण्याची प्रवृत्ती सर्वच पालकांमध्ये दिसते. संसार हेच कार्यक्षेत्र असणाऱ्या स्त्रीवर एकलेपणाची कुऱ्हाड कोसळली की तिचे जीवन निर्माल्यवत होत असे. विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता यांच्या संबंधातील समाजप्रवृत्तींचे विदारक दर्शन आपल्याला लेखिकांच्या कादंबऱ्यांमधून घडते. बालविवाहाची प्रवृत्ती कमी झाल्यानंतर समाजात बालविधवांचा प्रश्न काही अंशी सौम्य झाला. १९३५ च्या सुमारास समाजात विधवाविवाहाला अनुकूल प्रवृत्ती निर्माण झालेली दिसते. त्यासाठी सुधारकांना झगडा द्यावा लागला. लेखिकांनी स्त्रियांवरील एकलेपण स्त्रीम्हणून अधिक समजून घेतले. म्हणूनच विभावरींची 'अचला' स्त्रीमनाचा नवा अतृप्त कोपरा समाजाला दाखवून देते. मातृत्वाशिवाय स्त्रीमनाला शांती मिळत नाही, ही जी चिरंतन भावना आहे त्याचा स्पष्ट उच्चार 'हिंदोळ्यावर' मध्ये केला गेला आणि साऱ्या समाजात खळबळ माजली. घटस्फोटाचा कायदा झाल्यावरही घटस्फोटाचा अर्ज करणारी मालतीबाई दांडेकरांची निर्मला समाजात टीकेचा विषय झाली होती. पुरुषांनी दोन विवाह करण्याची पद्धत आपल्याकडे नवी नाही. प्रबोधनपर्वात हा प्रश्न बायकांना टोचत नव्हता. स्त्रियांनी सहजपणे सवतीला स्वीकारले होते. परंतु विचारपर्वामध्ये बौद्धिक विवाहाची प्रवृत्ती सुरू होऊन पुढे पाच-दहा वर्षे त्याचा झपाट्याने विकास झाला. म्हणूनच विकासपर्वातील १० ते १२ कादंबऱ्यांतून बौद्धिक विवाहाचा तीव्र निषेध केला आहे किंवा प्रियकराचा संसार उद्ध्वस्त होऊ नये म्हणून नवीन प्रेयसी दूर झालेली आहे. स्त्रियांनी स्त्रियांच्या दृष्टिकोनातून त्यांच्या प्रश्नांचा विचार केल्यामुळे हा विचार अधिक व्यवहारी आणि समंजसपणाचा होता. हे सामाजिक प्रश्न समाजात

चर्चिले जात असले तरी त्याची सोडवणूक स्त्रियांनी स्वत:च्या पद्धीतीने केली आहे. आणि म्हणूनच स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास अधिक वास्तव निष्कर्षांकडे पोहोचविणारा ठरला आहे.

देवदासींकडेही या पांढरपेशा लेखिकांनी सहानुभूतीने माणूस म्हणून पाहिले आहे. विचारपर्वामध्ये रांगणेकरांनी 'निर्माल्यातील कळी मध्ये देवदासींच्या लग्नाचा हट्ट किती योग्य आहे हे दाखविताना त्या समाजातील अनेक प्रवृत्तींचे दर्शन घडविले आहे, तर विकासपर्वातील 'फेरीवाला' मध्ये गीता साने यांनी शकुंतलेला वेश्यागृहातून सोडवून नायकाची पत्नी बनविले आहे. ही गोष्ट विशेष मानली पाहिजे. कारण आता हळूहळू वेश्यांच्या पुनर्वसनाला सहकार्य देण्याची प्रवृत्ती वाढू लागली आहे.

प्रौढ कुमारिकांचे प्रश्नही या काळात सुरू झाले होते. 'कळ्यांचे नि:श्वास' मध्ये विभावरीबाईंनी प्रौढ कुमारिकांच्या समस्येला वाचा फोडली होती. कादंबरीला हा विषय आव्हानात्मक वाटला नसेल म्हणून लेखिकांनी स्त्रीजीवनातील या महत्त्वाच्या घटनेला न्याय दिला नाही असे म्हणावे लागते. विवाह न करता आजन्म सेवावृत्तीने राहिलेल्या प्रेमा कंटक, गीता साने, दुर्गा भागवत या बुद्धिवान लेखिकाही लग्न न करण्याच्या स्त्रियांच्या प्रवृत्तीचे नेमके मर्म सांगत नाहीत. 'बंधमुक्ता'मधील सुधा मात्र स्वत:चा स्वभाव ओळखते आणि अविवाहित राहून वकिली करते.

**स्त्रीशिक्षण :** स्त्रीजीवनामध्ये अनेक बदल होत गेले. स्त्रिया विचार करू लागल्या. त्यांच्या चिंतनशीलतेचा विकास होत गेला. त्याचे श्रेय स्त्रीशिक्षणाला द्यावे लागेल. एकदा ज्ञानाची कवाडे उघडली गेली आणि स्त्रीने मागे वळून पाहिले नाही. या प्रकाशाच्या मार्गावरून जात असताना स्त्रीला अनेक समाजप्रवृत्तींशी टक्कर द्यावी लागली. स्त्रीशिक्षणाचे महत्त्व साळूबाईंच्या पहिल्या कादंबरीपासूनच लेखिकांनी ओळखले आहे. चंद्रप्रभा हुशार शिकलेली होती. म्हणूनच तिच्या वडिलांचे राजदरबारी प्राण वाचतात असे 'चंद्रप्रभा विरहवर्णन'चे मुख्य सूत्र आहे. स्त्री शिकायला लागली आणि तिला प्रथम घरातील वडील माणसांचा विशेषत: आई, आजी, किंवा सासू, नणंदा यांचा विरोध सोसावा लागला. स्त्रियांच्या अंतरी खुपलेले हे दु:ख, त्यांनी कादंबऱ्यांतून दाखवून दिले आहे. तसेच आत्मचरित्रांतूनही व्यक्त केले आहे. स्त्रीच्या प्राथमिक शिक्षणाचा विरोध मावळला तरी तिच्या उच्च शिक्षणातही अडथळे येऊ लागले. विकासपर्वातील नायिकांना पदोपदी त्यांच्या शिक्षणाचा उद्धार ऐकून घ्यावा

लागला. यातही स्त्रियांनी काही आदर्श पतीची चित्रे रेखाटली आहेत. आपल्यापेक्षा जास्त शिकणाऱ्या पत्नीला सर्वतोपरी मदत करणारा रजनीकांत 'दूर कुठेतरी' मध्ये भेटतो. अशी माणसे त्याकाळात अपवादात्मक असतील, पण आज मात्र उदार दृष्टीने पत्नीच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणारे तरुण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असलेले दिसतात.

समाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळवण्यास जगात सर्वत्र स्त्रीला झगडा करावा लागला. १९व्या शतकात भारतात पती हाच परमेश्वर मानला जाई. त्याने आपल्याला शिकविले म्हणून आपण लेखिका झालो ही उपकाराची भावना लेखिकांमध्ये होती. नवऱ्याचे विचार पटले नाहीत म्हणून मुलांकडे जाऊन राहणाऱ्या काशीबाई कानिटकरांनाही मनामध्ये एक सल होती की, लोक आपल्या वेगळं राहण्याला स्त्रीशिक्षणाचं अपयश समजतील. (स्त्रीशिक्षणामुळे स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव झाली. आपले विचार ती स्पष्टपणे मांडू लागली.) विचारपर्वातील नायिका स्त्रीविघातक समाजप्रवृत्तींचा निषेध करते, तर विकासपर्वामध्ये ती पुरुषी अंहमन्य प्रवृत्तीवर प्रहार करायला पूर्णपणे सिद्ध झालेली दिसते. स्त्रीला भोगवस्तू मानणाऱ्या पुरुषी प्रवृत्तीचे दर्शन लेखिकांच्या कादंबऱ्यांमधून होऊ लागले हा स्त्रीच्या आत्मविश्वासाचा विकास म्हणावा लागेल. नवऱ्याची अरेरावी वृत्ती गतजन्मीचे भोग म्हणून सहन करणारी स्त्री विकासपर्वामध्ये इतिहासजमा झाली होती. घटस्फोटाचा आधार तिला मिळाला होता. तरीही तत्कालीन समाजाने व लेखिकांनी घटस्फोटापर्यंत जाणारी नायिका स्वीकारली नाही. पुरुषी प्रवृत्ती एका पिढीत बदलणार नाही, तसेच स्त्रीच्या मनातही कुठेतरी दुय्यमपणाची भावना आहेच या सत्याचा स्वीकार लेखिकांनी येथे केलेला दिसतो. आज मात्र परिस्थिती थोडी बदलते आहे. आपले हक्क आग्रहाने मागणारी कादंबरीतील नायिका समाजातही दिसते. पण अजूनही समाजप्रवृत्ती मात्र बदललेल्या नाहीत. स्त्रीच्या मनापेक्षा, बुद्धीपेक्षा तिच्या सौंदर्यातच तिचे सामर्थ्य आहे, अशी समाजप्रवृत्ती आढळते. तसेच स्त्रीने आपल्या बुद्धीचा, शिक्षणाचा उपयोग संसाराच्या परिघातच करावा अशी पतीची व समाजाची प्रवृत्ती आजही दिसते. स्त्रियांच्या कादंबऱ्यांकडे प्रारंभापासून पाहिले असता आपल्या लक्षात येते की, कितीतरी जुन्या प्रवृत्ती बदलल्या नाहीत म्हणून नवनवीन समस्या निर्माण होत आहेत.

लेखिकांच्या कादंबऱ्यांतून आढळणाऱ्या समाजप्रवृत्ती व प्रेरणा पाहिल्यानंतर सहज ध्यानात येते की, या लेखिकांनी स्त्रियांच्या विकासाला

अनुकूल असणाऱ्या किंवा प्रतिबंध घालणाऱ्या अशा दोन्ही परस्परविरोधी प्रवृत्ती आपल्या लेखनातून फार समर्थपणे उभ्या केल्या आहेत. सर्व क्षेत्रात स्त्रीने स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण केले असले तरीही पुरुषांपेक्षा स्त्री संसारात अधिक गुंतलेली असते. म्हणून कुटुंबकथा स्त्रियांना जवळच्या वाटतात, आणि यामध्ये गैर काहीही नाही. मातृत्व, वात्सल्य ही स्त्रीने जपलेली अंगभूत प्रवृत्ती आहे आणि त्या ओढीने तिचे घरासंबंधातील अनुभव अधिक तीव्र असतात. अधिक जागरुक असतात. म्हणून लेखिकांच्या कादंबऱ्यांतून येणाऱ्या कौटुंबिक प्रवृत्ती अधिक परिणामकारक आहेत. त्याचप्रमाणे इंग्रजी शिक्षणाबरोबर कादंबऱ्यांतील काही धार्मिक, सामाजिक प्रवृत्तीही बदलत गेल्या.

लेखकाला, वाचकाला अस्वस्थ करणारा माणूस काळाप्रमाणे बदलतो आहे. या मानवी मनाचा शोध घ्यायचा असेल तर मागच्या काळातील समाजप्रवृत्ती व प्रेरणा आकलन होणे आवश्यक आहे. परिस्थितीमध्ये होत असलेल्या बदलाची कारणे सुद्धा समाजामधूनच शोधता येतील. त्यामुळे आधुनिक मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकाला या विसाव्या शतकातील लेखिकांचा विचार करणे अपरिहार्य आहे. म्हणूनच हा ‘ मागोवा ’ अर्धविराम आहे.

●●●

# लेखिकांच्या सहवासात

लेखिकांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्ती व प्रेरणांचा अभ्यास करताना असे आढळले की, सामाजिक परिस्थिती आणि कादंबरीतील व्यक्तिरेखा समाजप्रवृत्तीनुसार बदलत असतात. कादंबरीतील प्रभावशाली व्यक्तिरेखांच्या साहाय्याने समाजप्रवृत्तींमध्ये हळूहळू बदल घडविता येतो, असाही निष्कर्ष या अभ्यासातून हाती आला. तेव्हा ज्यांनी हा कालखंड पाहिला आहे, समाज घडविण्यासाठी ज्यांनी लेखन हे एक महत्त्वाचे साधन मानले आहे, अशा मान्यवर लेखिकांच्या भेटी घेणे, त्यांना समजून घेणे, या अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक होते. म्हणून विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात जन्मलेल्या तीन लेखिकांच्या मी मुलाखती घेतल्या.

श्रीमती कुमुदिनी रांगणेकरांचे नाव मराठी वाचकाला परिचित आहे. सुमारे सव्वाशे कादंबऱ्या लिहिणाऱ्या या वाचकप्रिय वयोवृद्ध लेखिका. अजूनही त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध होत आहेत आणि एखाद्या तरुणीसारखी अवखळ, अल्लड अशी त्यांची लेखनशैली आहे.

श्रीमती कमलाबाई टिळक ह्या मराठीमधील एक प्रथितयश लेखिका आहेत. अत्यंत बुद्धिमान आणि बहुश्रुत अशा कमलाबाईंचे व्यक्तित्व सौम्य आणि शांत आहे. कथाकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या कमलाबाईंनी कादंबरी, बालकथा, निबंध असे अनेक वाङ्मयप्रकार हाताळले. सेन्सॉरबोर्डावर त्या आठ वर्षे होत्या. महाराष्ट्र संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेली ग्रीक नाटके त्यांनी तपासून दिली. त्यासाठी ग्रीक वाङ्मयाचे भरघोस वाचन केले आणि त्यावर व्याख्यानेही दिली.

श्रीमती मालतीबाई बेडेकर म्हणजे मराठी वाङ्मयातील वादग्रस्त, वादळी व्यक्तिमत्त्व. त्यांच्या लेखनाच्या आणि विचारांच्या झंझावातामुळे मराठी वाङ्मयातील लेखनप्रवृत्तीच बदलून गेल्या. साहित्य-संमेलनांचे अध्यक्षपद त्यांना मिळाले ते संमेलनही बंडखोराचे समांतर संमेलन होते. अत्यंत स्पष्ट विचार

आणि विस्तृत जीवनानुभव यामुळे त्यांचे लेखन समृद्ध झाले आहे. या लेखिकांच्या विचारांची दिशा, सामाजिक अनुभव आणि जीवनाबद्दलची ओढ त्यांच्या मुलाखतींमधून अधिक स्पष्ट होईल.

स्त्रियांच्या वाङ्मयाची फारशी दखल कोणी घेतली नसताना त्यांच्या व्यापक अनुभवविश्वाची समाजाला ओळख होत आहे याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. गेल्या पाऊणशे वर्षे समाजप्रवृत्तींमध्ये जे परिवर्तन होत गेले त्याच्या या तिघीजणी साक्षी आहेत. अनेक सामाजिक घडामोडींवर यांनी चिंतन केले आहे आणि विशेष गोष्ट म्हणजे आपले निरीक्षण, आपले अनुभव कुणाला तरी सांगावेत याची त्यांना अतिशय उत्सुकता आहे. म्हणून माझ्या विषयाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. एवढेच नव्हे, तर किती माहिती सांगू, किती अनुभव सांगू, किती अुदाहरण देऊ, या इच्छेने त्यांच्या भावना अगदी उचंबळून येत होत्या. माझ्या प्रत्येक प्रश्नाच्या अनुषगांने त्या बऱ्याच नवनवीन गोष्टी सांगत होत्या. तत्कालीन समाजचित्र माझ्या डोळ्यासमोर त्यांनी उभे केले. आपण कादंबऱ्यांतून व सामाजिक इतिहासातून पाहिलेले समाजप्रवृत्तींतील बदल त्यांच्या डोळ्यासमोर घडले होते. त्यांच्या वैयक्तिक जीवनानुभवाशी निगडित होते. त्यामुळे माझ्या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांच्या मनात आठवणींचा कल्लोळ उठत होता. कुमुदिनी रांगणेकर म्हणाल्या, "तुमच्या प्रश्नांची उत्तरे मी खूपच मोठमोठी देतेय, नाही का ? मी जरा जास्तच बोलतेय असं वाटतंय मला !" अर्थात त्यांच्या आठवणी ऐकण्यात मीही रंगून गेले होते. आमच्या कल्पनेपलीकडच्या स्त्रीजीवनाची त्या ओळख करून देत होत्या. कमलाबाई टिळकांकडेही तोच अनुभव आला. कमलाबाई म्हणाल्या, "अहो, आमच्या हयातीत समाजजीवन इतकं बदलत गेलं की आमचा सुद्धा त्यावर कधी कधी विश्वास बसत नाही. तुम्हाला किती उदाहरणं देऊ, असं झालंय मला !" आपण विषयापलीकडचं पण तरीही विषयाशी संबंधित असं बरंच काही सांगत आहोत याची जाणीव मालतीबाई बेडेकरांना होती. त्या म्हणाल्या, "माझं थोडं विषयांतर होत असलं तरी मला अडवू नका. कारण एकदा थांबले की माझा विचारप्रवाह थांबेल. मला बोलू द्या. तुमच्या कामाचं तेवढं घ्या आणि बाकीचं सोडून द्या !" एकापेक्षा एक श्रेष्ठ लेखिका, तेव्हा त्यांच्या अनुभवांतील प्रत्येक शब्द मला नवाच होता. सोडून काय देणार ?

त्यांच्या मुलखती म्हणजे माझ्या जीवनातील अविस्मरणीय अनुभव आहे. तिघींच्याही बोलण्यातील ऋजुता, आठवणी सांगण्याची उत्कटता, आणि नवीन

पिढीबद्दलची आत्मीयता यामुळे मी भारावून गेले आहे. माझ्या अभ्यासाच्या संदर्भात त्यांनी सांगितलेले अनुभव म्हणजे माझ्या अभ्यासातील वास्तवतेचे अधिष्ठान आहे. कुमुदिनीबाई व कमलाबाई यांचे अनुभव शब्दबद्ध करून त्यांच्या संमतीनिशी सादर केले आहेत, तर मालतीबाई बेडेकरांची मुलाखत शब्दशः त्यांच्याच शब्दात देत आहे. मात्र आज कमलाबाई आपल्यामध्ये नाहीत ही खंत मनाला अस्वस्थ करीत आहे.

**मालतीबाई बेडेकर :**

मी : तुम्हाला बराच मोठा कालखंड पाहावयाला मिळाला, नाही ?

मालतीबाई : हो. माझा जन्म १९०५ मधला. पहिली ४-५ वर्षे सोडली तर पुढच्या ७५ वर्षांचा इतिहास माझ्या मनात आहे.

मी : या ७५ वर्षांत आपल्याला कोणते सामाजिक व राजकीय विशेष जाणवले ?

मालतीबाई : एक म्हणजे पारतंत्र्य! देशाभिमान्यांचा होणारा छळ, राजकीय चळवळी. पण त्या मी दुरूनच पाहात होते. आस्थेने वाचीत होते. पण मला आपल्यातील जातिभेदाची तीव्रता लहानपणापासूनच लक्षात येत होती. दरिद्री, अस्पृश्य समाजाला मिशनरी आपल्या कळपात कसे ओढतात हे मी लहानपणापासून पाहात होते. माझे वडील मिशन-शक्ति काम करीत असल्याने त्यांना हे विशेष जाणवे. माझ्या वडिलांनाही बाटविण्याचा प्रयत्न मिशनऱ्यांनी केला होता. मी पुण्यात १९२३ साली नोकरीला लागले. तेव्हाही बुधवारात एका हॉलमध्ये मिशनरी ख्रिस्ती धर्मावर व्याख्यान देत, पण लोक विरोध करू लागले तेव्हा ती व्याख्याने बंद पडली. मला जास्त जाणवे ती कुमारिका मुलींची, सधवा बायकांची, व विधवा बायकांची असहाय स्थिती!

मी : तुमचे लिखाणही अधिक करून स्त्रियांविषयी आहे, नाही का ?

मालतीबाई : हो, मी मुलगी म्हणून जगले तेव्हा घोडनदीला इतर मुलींहून निराळी जगले आणि पुढेही बहुतेक वेळा लोकप्रवाहाच्या उलट जाण्यातच बरेच जीवन गेले. तेव्हापासून लक्षात येई ते प्रामुख्याने स्त्री-जीवन!

मी : इतरांपेक्षा तुमच्या जगण्यात काय वेगळेपणा होता ?

मालतीबाई : त्यावेळी ६, ७, ८, ९, या वर्षीही लग्ने होत. याहून मोठी मुलगी लग्नावाचून राहिली तर समाज नावे ठेवी. हा घोडनदीचा अनुभव. मुलींनी शिकायचे नाही, संपत्तीवर कोणताही हक्क नाही. संसाराला उपयोगी अशी अडाणी सोशिक सेवावृत्तीची अबोल मुलगी तयार करण्याची, कुटुंबे

काळजी घेत. मुलीचा जन्म हा घरोघरी शापच ठरे.

मी : मग तुम्हाला शिक्षण कसे घेता आले ?

मालतीबाई : माझे वडील पक्के सुधारक. त्यांनी आम्हा बहिणींना पदवीधर करायचा पक्का निश्चय केला होता. मी ११ व्या वर्षी जुन्या काळची व्ह. फा. परीक्षा दिली. एक वर्ष मिशनरी-बाईच्या जवळ इंग्रजी शिकले. आणि १९१७ साली हिंगण्याच्या आश्रमात पुढील शिक्षणासाठी गेले.

मी : पण मग घोडनदीकरांना तुमच्याबद्दल काय वाटे ?

मालतीबाई : आमच्या घराबद्दल सगळ्याच बाबतीत त्यांना नवल वाटे. माझे वडील जाति-भेद मुळीच पाळीत नसत आणि आम्हालाही पाळू देत नसत. आम्हाला त्यांनी शाळेत घातलं. एवढंच नव्हे, तर मुलांच्या शाळेत घातलं. पुढे न्हाण येण्यापूर्वी लग्न करण्याची प्रथा धुडकावून १२व्या वर्षी हिंगण्याला शिकायला ठेवलं. हे सर्व, लोक चकित होऊन मागे टीका करीत पाहात असत. पण घोडनदीलाच कशाला, पुण्यासारख्या शहरातही मुलींची लग्नं १२व्या वर्षी होत. १९२३ साली मी कन्याशाळेत नोकरीला लागले. तेव्हा बायकांनी नोकरी करणं हे पुण्यातही कमीपणाचं समजलं जात असे. त्यामुळे कन्याशाळेत शिक्षक-वर्ग हा बहुतेक पुरुषांपैकीच होता. मॅट्रिक पर्यंत जेमतेम ५,६ मुली पोहोचत. त्यांतही विधवा जास्त. बाकी शाळेत येणाऱ्या मुली १२ वर्षांपर्यंत उजवल्या जात. अहो, त्या काळात मी न्हाणवलीची एक मिरवणूकही बघितली. मला खूप लाज वाटली. मुलगी प्रजाजननक्षम झाली हे जाहीरपणे सांगण्याइतका समाज स्त्रीच्या बाबतीत आपली वृत्ती सांगणारा होता. आधी मुलीचा जन्म हा घरोघरी शापच वाटे. त्यातून १२-१३ व्या वर्षी लग्न, मग सासुरवाशीण म्हणून पतिदेवांच्या सुखासाठी, दीर्घायुष्यासाठी, आरोग्यासाठी धर्म या नावाखाली कर्मकाण्ड आचरीत राहायचं, निर्बुद्धतेने, विचारशून्यतेने. असा तो काळ होता. पण हे डोळसपणे पाहात असता मुलींची मने किती दुखावली जात! तरीही त्या अबोलपणे कशा समाजनियमांना शरण जात हे मी पाहात असे. माझ्यावर त्याचा खूप परिणाम होई.

मी : तुमच्या 'कळ्यांचे नि:श्वासां'त तुम्ही कुमारिकांची मनं उलगडून दाखवली आहेत.

मालतीबाई : हो, पण त्या उलगडून दाखवण्यामुळे सामान्य वाचक बिथरून गेले होते. मुलींना मन असतं, हे प्रथमच त्यांना जाणवलं. काहींना ते आवडलंही. पण त्यामुळे मला माझं नाव उघड करण्याची भीती वाटत

होती बरीच वर्षं.

मी : हिंगण्याला मुलींत तुम्ही जीवन घालवले ?

मालतीबाई : हो. १९१७ ते १९२३ पर्यंत अनेक विधवा, परित्यक्ता आणि कुमारिका यांची फार जवळून ओळख झाली. हिंगण्याचा आश्रम म्हणजे महाराष्ट्रीय स्त्रियांच्या परिस्थितीचा छोटा अजबखानाच होता. पण एवढं खरं की, मी जन्माला आले तेव्हा सुधारणेची पहाट झालेली असल्याने मला माझ्या लहानपणी शिकणाऱ्या कुमारिकांत हिंगण्यास जगता आले. नवऱ्यांनी टाकलेल्या बायकांची त्रिशंकू अवस्था तेथेही पाहिली. आणि पुढे पुण्यातही जवळून पाहिली. त्या काळात सुकेशा विधवा स्वावलंबनासाठी हिंगण्यास शिकायला येत होत्या. इतकी सुधारणा झाली होती.

मी : तुम्ही हिंगण्यास पाहिलेल्या परित्यक्तांमधूनच हिंदोळ्यावर मधली अबला जन्मली का ?

मालतीबाई : हो. परित्यक्तेचे मन त्यात मी फार उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. पण असं काही लिहीणं हे सनातनी वाचकांना पसंत नव्हतं. त्यामुळे लेखिकेची स्मशान-यात्राही काढली. मुलींना किंवा बायकांना मन असतं, त्याही माणसारखे भलेबुरे विचार करतात, त्यांनाही षड्विकार असतात, हे समजायला समाज तयारच नव्हता. फर्ग्युसन कॉलेजमध्ये थोड्या प्रौढ कुमारिका होत्या. त्यांच्याकडे समाज टवकारून पाहात असे. या प्रौढ कुमारिकांपैकी काहींनी प्रेमलग्ने केली. एखाद्या प्रौढ मुलीचं लग्न मोडलंही. त्यामुळे या कुमारिका समाजाच्या टीकेचा विषय होऊन बसल्या होत्या. पण त्याचबरोबर कुमारिका मुलींनाही मन असतं हा प्रत्यय येऊ लागला होता.

मी : तुमच्या ' हिंदोळ्यावर ' आणि ' कळ्यांचे नि:श्वास ' या पुस्तकांनी खळवळ उडाली. त्यापूर्वी मन उलगडून दाखविणाऱ्या लेखिका नव्हत्या का ?

मालतीबाई : त्या काळात साधारण १९२५ नंतर शांताबाई नाशिककर, इंदिराबाई सहस्रबुद्धे, पिरोज आनंदकर, आनंदीबाई शिर्के आणि कितीतरी बायका किर्लोस्करांच्या मासिकांमुळे, गृहिणी, मनोरमा इ. मासिकांमुळे लिहू लागल्या होत्या. सुधारणेच्या विचारांना जोराची गती मिळत होती.

मी : त्यांच्या कादंबऱ्यांबद्दल तुम्हाला काय वाटले ?

मालतीबाई : मी त्या कादंबऱ्या सुधारणेला मदत म्हणून चांगल्या असं म्हणते.

मी : चांगले कादंबरी-लेखन कशामुळे होते ?

मालतीबाई : अनुभवांची वरवरची जंत्री ही कादंबरीला सकस करायला कामी येत नाही. कादंबरी निर्जीव होते.

मी : वरवरची जंत्री म्हणजे काय ?

मालतीबाई : बाह्य वर्णन अनुभव हा सखोल डोळसपणे, चिंतनाने, मननाने, सार्वकालिक सत्यावर नजर ठेवून, पुन्हा चैतन्य होईल अशा शब्दांत मांडणं हे महत्त्वाचं आहे. समाज हा व्यक्तींचा बनतो. व्यक्तीव्यक्तीत, व्यक्तीत आणि समाजात सतत ताण असतात. त्यांतूनच नवसमाज पुढे सरकतो. त्या ताणांची यथायोग्य चिकित्सा मनानं करणं आवश्यक असतं.

मी : हे चिकित्सक मन कसं तयार होतं. ?

मालतीबाई : वाचनानं मन समृद्ध होतं. वाचन म्हणजे वाटेल ते वाचन नव्हे. मन समृद्ध होईल असं विचारप्रवर्तक वाचन हवं. तसंच प्रत्येक अनुभव पिसून पिंजून समृद्ध मनाने पाहिला पाहिजे. बाह्यवर्णनापेक्षा अंतरंग जाणणं महत्त्वाचं असतं. ते अंतरंग ज्याने डोळसपणे, चिकित्सकपणे जाणलं तो प्रज्ञावंत लेखक चांगली कादंबरी लिहू शकतो.

मी : तुम्हाला चिकित्सक दृष्टी यायला कुणाची मदत झाली ?

मालतीबाई : पहिले शिक्षक माझे वडील. दुसरे म्हणजे वामनराव. आम्ही त्यांना तात्या म्हणत असू - वमनराव जोशी. ते प्रत्येक गोष्ट सर्व बाजूंनी विचार करून ठरवायचे. त्यांची शिकवण्याची पद्धतच चिकित्सक दृष्टी देणारी होती.

मी : केवळ चिकित्सक दृष्टी पुरी पडेल का ?

मालतीबाई : मला वाटतं म्हणजे माझा अनुभव आहे की, एखाद्या व्यक्तीच्या किंवा सामाजिक ताणाने लेखकाचे मन कमालीचे अस्वस्थ होते. त्या अस्वस्थ मनाला उमाळा येतो. लिहिल्यावाचून राहवत नाही. अशी अवस्था येते. पण तेथे चिकित्सक दृष्टी समतोल देते आणि लेखन समतोल होते. लेखकाला द्रष्टेपण पाहिजे असते तेही या चिकित्सक दृष्टीनेच येऊ शकते.

मी : आपल्या भाषेतील पहिल्या कादंबरीकर्त्यांबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

मालतीबाई : मला वाटतं पहिल्या लेखिकांना स्त्रियांचे ताण कळत नव्हते असे नाही. पण पुरुषाला आणि समाजाला जे मानवणार नाही ते सुचवायचं धाडस त्यांनी केलं नाही. त्यांचं जीवन बरचसं संकुचित असे. तसं म्हटलं तर आताही स्त्री-जीवन हे संकुचितच असतं. व्यापक जीवनानुभव घेण्याची

संधी फारच थोड्या स्त्रियांना मिळते.

मी : तुम्हाला सामाजिक अनुभव कसा मिळाला ?

मालतीबाई : अहो, मध्यमवर्गीयांचा अनुभव होता हे मान्य केलंच पाहिजे. हिंगण्याच्या आश्रमात अनेक मुली साऱ्या महाराष्ट्रातून येत. त्यामुळे अनेक ठिकाणाचं स्त्री-जीवन कसं असतं ते कळे. इंदूर, ग्वाल्हेर, सिलोन इथूनही मुली आलेल्या होत्या. घोडनदीचा अनुभव लहानपणचा. पण पुढे पुण्यात नोकरी केल्याने बऱ्याच जातींतल्या मुलींचे जीवन कळले. मी मुलींच्याच वयाची होते. त्यामुळे मी त्यांच्यात सहज मिसळे. घरोबाही अनेकांशी असे. त्याकाळी सभा-व्याख्यानांना जाण्याने बराच फायदा होई. व्याख्यानेही अभ्यासपूर्ण असत. प्रो. माटयांच्यामुळे मी अस्पृश्यांतही काम केलं. सायकलवरून वारज्यासारख्या खेड्यात साक्षरता-प्रसारासाठी आम्ही काहीजणी जात होतो. कन्याशाळेत जसा एक व्यापक अनुभव आला तसा १९३६ नंतर सोलापूरच्या गुन्हेगारांच्या वस्तीतही एका वेगळ्याच समाजसमूहाची ओळख जवळून झाली. त्याचा माझ्या लेखनाला उपयोग झाला. माझी आवड अभ्यासाची होती. मी साऱ्या स्मृति, उपनिषदे, दोन वेद वाचले आणि तत्कालीन प्रसिद्ध होणारी पुस्तके, चरित्रे इ. वाचनाचे मला वेडच होते. याचा नाही म्हटलं तरी भाषेवर, विचारावर परिणाम झाला. मी अनाथ मुलांच्या, अनाथ स्त्रियांच्या संस्थेतही खूप वर्षं काम केलं. नोकरी म्हणून नव्हे, कामाची आवड म्हणून. १९०५ साली बालविवाह होत. १९३५ पर्यंत ते कमी प्रमाणात होऊ लागले. ४० वर्षांत मध्यमवर्गीय समाज खूपच बदलला. लग्नाची वयं वाढली. माझं स्वत:चं लग्न ३३ व्या वर्षी झालं. काही मुली अविवाहितही राहू लागल्या. प्रेमलग्नेही होऊ लागली. बाईने नोकरी करणे हे फार वाईट समजलं जाई. केवळ नर्स वा शिक्षिका काही काळ दिसू लागल्या. पण पुढे तर अनेक क्षेत्रांत स्त्रिया नोकऱ्या करू लागल्या. १९४० च्या सुमारास रेशनिंग सुरू झाल्यावर हा विशेष फरक जाणवू लागला. पण स्त्री ही अखेर स्त्रीच. ती रक्षणाखेरीज राहूच शकत नाही, हा अनुभव मला वाटतं अजूनही आहेच. समाजाचे प्रश्न संपले असे कधी होत नाही. काही सुधारणा होतात तर कधी त्यांतूनच नवे प्रश्न निर्माण होतात. लेखिकेला त्याची जाण पाहिजे. परिणामांचा आडाखा बांधता आला पाहिजे.

मी : स्त्री-लेखिका या पुरुषांच्या मानाने कमी प्रतीचं लिहितात असं काहींना वाटतं.

मालतीबाई : पुरुषही निकृष्ट साहित्य तयार करतातच की ! आणि मुद्दाम

सांगायला हवं की, प्रथम जगात कादंबरी ही स्त्रीनेच जपानमध्ये लिहिली आणि फ्रान्समध्येही लिहिली. त्या वेळच्या लोकांमध्ये स्त्रीने लिहिलेले साहित्य हीन अशी भावना झाली होती. इंग्लंडमधल्या पहिल्या काही लेखिकांनी तर पुरुषांची नावे घेऊन कादंबऱ्या लिहिल्या. त्यामानाने आपल्याकडे पहिल्या कादंबरीकर्त्या काशीबाई कानिटकरांचं कौतुकच झालं. पण मला असं वाटतं की आता सुद्धा ' चीप ' लिहिण्याकडे अनेकांची प्रवृत्ती असते. त्यात सखोल अनुभव नसतो. केवळ लैंगिक वाङ्मय खपतं म्हणून महिन्याला दोन दोन कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखिका आहेत. त्यात उत्कृष्ट साहित्याचे कोणतेच गुण नसतात.

मी : पहिल्या पुरुष-लेखकांनी स्त्रियांची चित्रे रेखाटली त्याबद्दल तुम्हाला काय वाटतं ?

मालतीबाई : हरिभाऊ आपटे हे त्याकाळातले सर्वमान्य लेखक. मलाही त्यांच्या कादंबऱ्या खूप आवडतात. पण त्या काळात स्त्री-पुरुषांत प्रचंड भिंती होत्या. त्यामुळे स्त्रियांची दु:खं पुरुष-लेखकांना कळली तरी ती स्थूलमानाने. स्त्रिया आपली मनं पुरुषांजवळ मोकळी करणं अशक्यच होतं. त्यामुळे हरिभाऊंच्या सामाजकि कादंबऱ्यांत स्त्रियांची दु:खं हृदय हेलावण्याएवढी सुंदर दाखविली असली तरी बोलकी स्त्री-मनं त्यांना दाखविता आली नाहीत असं मला वाटतं. एवढंच कशाला, माझे गुरू प्रो. वा. म. जोशी यांच्याही कादंबऱ्यांत प्रत्येक पात्राच्या मागे लेखक उभा आहे हे लक्षात येतं. ही कादंबरी श्रेष्ठतेला पोहोचण्यातील उणीवच म्हटली पाहिजे. कादंबरीतील पात्रं बोलकी आहेत, जिवंत आहेत हे जाणवलं तरच लेखनात चैतन्य आल्यासारखं वाटतं.

मालतीबाईंच्या मुलाखतीमधून त्या काळाचे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते, तसेच अक्षर-वाङ्मयाचे सिद्धांतही आपल्याला मिळतात.

**कुमुदिनी रांगणेकर :**

कुमुदिनी रांगणेकर मराठी वाङ्मयातील एक प्रतिथयश कादंबरीकार आहेत. हसऱ्या चेहऱ्याच्या, उत्साही अशा कुमुदिनीबाईंनी मुलाखतीच्या प्रारंभी त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी सांगितली.

कुमुदिनी रांगणेकर म्हणजे पूर्वाश्रमीच्या प्रभावळकर. त्यांचे वडील एक प्रख्यात इंजिनीअर होते. त्यामुळे सुखवस्तू आणि सुधारक वातावरणामध्ये बाईंचे बालपण गेले. त्यांची आई त्या काळात इंग्रजी संभाषण शिकली होती. बाई बुद्धिमान होत्या. त्यांना चित्रकला, संगीत या कलांचीही आवड होती. त्यांच्या वडिलांनी मुलीची सर्व हौस पुरी केली.

वयाच्या २३व्या वर्षी एकुलता भाऊ गेल्याची आठवण सांगताना बाई आजही अगदी सद्‍गदित झाल्या होत्या. त्या म्हणाल्या, 'त्यावेळी माझी देवावरील श्रद्धाच उडाली. त्या दु:खावेगामध्येच मी माझी पहिली दीर्घ कविता लिहिली. कुमुदिनीबाईंचे जीवनावर अत्यंत प्रेम होते. बाई म्हणतात, 'आई, बाबा व मी या तीन व्यक्ती, पण प्राण एकच होता आमचा.' दुर्दैवाने त्यांचे आई, वडील व भाऊ यांच्यापाठोपाठ त्यांचे यजमान गेले आणि आता आठ-दहा महिन्यांपूर्वी त्यांची मुलगी गेली. बाई म्हणाल्या, 'परमेश्वर माझ्याशी अधर्मयुद्ध खेळतो.'

पहिल्या कवितेनंतर मी 'नियम की अपवाद' ही कथा आणि 'कर्तव्याची जाणीव' ही कादंबरी लिहिली. असे सांगून बाई म्हणाल्या, 'मी सामाजिक कादंबरीकार नसले तरी लेखन करीत असताना माझ्या मनात समाजप्रबोधनाची जाणीव होती.'

समाजातील प्रचलित प्रवृत्तींशी आपल्या कादंबऱ्यांचं नातं स्पष्ट करताना बाई म्हणाल्या, 'अनेक समाजिक प्रश्न मी हाताळले आणि वेळोवेळी लोकांनी मला चांगली दादही दिली आहे. आमच्या वेळी एक फॅशन म्हणून आंतरजातीय विवाह होत असत. प्रत्यक्षात त्यामागे विचाराचे अधिष्ठान नसून फक्त तरुण वयातील आकर्षण असे. 'कर्तव्याची जाणीव' मध्ये प्रेमविवाह व मिश्रविवाह दाखवूनही मी जबाबदार नायक, नायिका रंगविले आहेत. आईवडिलांना विरोध करून लग्न न करता, त्यांची अनुमती मिळाल्यानंतर नायिका लग्न करते. कर्तव्याची जाणीव ठेवून विवाह करावा हा विचार मी सांगितला आणि लोकांना तो विचार पटला. त्याचेही प्रत्यंतर मला आले.

आपल्या लेखनाचा समाजजीवनावर झालेला परिणाम कुमुदिनीबाईंनी उदाहरणांसह सांगितला. समाजप्रवृत्तींचाही लेखनावर परिणाम होत असतो. त्यासंबंधी कुमुदिनीबाई म्हणाल्या, 'समाजात बोलके सुधारक खूप, पण करते सुधारक मोजकेच असतात. त्याकाळी कुसुमावती-अनिलांचे प्रेमप्रकरण गाजले होते. कुसुमावतीच्या वडिलांप्रमाणे 'कर्तव्याची जाणीव' मध्ये नायिकेच्या वडिलांना मुलीचा विवाह पसंत नसतो आणि ते मुलीला शिकण्यासाठी इंग्लंडला पाठवतात असे रंगवले आहे. एकंदरीत साहित्य आणि समाज यांचा हा असा संबंध असतो.'

'कादंबरीच्या कथानकाला वास्तवतेचा भक्कम आधार हवा! कुमुदिनीबाई म्हणाल्या की, 'कादंबरी लिहिताना त्या तपशिलाबद्दल जागरुक

असतात.'

'कर्तव्याची जाणीव'मध्ये शेवटी किशोरला घटसर्प होतो. त्याची लक्षणे व इंजेक्शनची नावे अगदी अभ्यासपूर्ण व बिनचूक दिली आहेत.

मिश्रविवाहाला पाठिंबा देणाऱ्या बाईंनी हुंड्याचा प्रश्न कुठे मांडला नाही. त्याबद्दल बाईंचे मत पुढीलप्रमाणे आहे-'माझा मिश्रविवाहाला विरोध नाही. पण त्यामागे काहीतरी तत्त्व पाहिजे. मी सुधारलेल्या समाजात मोठी झाले. सेंट कोलंबा व विल्सन कॉलेजमध्ये शिकले. त्यावेळी हुंड्याचे प्रमाण आजच्याइतके नव्हते. आमच्या सर्व नातेवाईकांचे विवाह हुंडा न देता व न घेता झाले. मी ठरवले होते की, आपण ज्याचा अनुभव घेतला नाही त्यावर लिहावयाचे नाही. म्हणून हुंड्यावरही लिहिले नाही. तसेच राजकारण व वेश्याव्यवसायावर लिहावयाचे नाही असे ठरविले होते.'

मी बाईंना त्यांच्या 'निर्माल्यातील कळी' या कादंबरीची आठवण करून दिली. वेश्याजीवनावर कादंबरी लिहिण्याचे कारण सांगताना त्या म्हणाल्या की, राष्ट्रीय कन्याशाळेत शिक्षिका असताना दोन मराठा मुलींच्या आग्रहावरून त्यांच्या 'समाजसुधारक' या मासिकासाठी त्यांनी ही कादंबरी लिहिली.

बायका शिकू लागल्या आणि नवऱ्याचा छळ बिनतक्रार सोसणे त्यांना मानवेना. घटस्फोटाची आवश्यकता भासू लागली. त्यावर बऱ्याच कादंबऱ्या आल्या. कुमुदिनीबाईंनी स्त्रीचे हक्क सांगणारी 'एकेरी गाठ' ही कादंबरी लिहिली होती. माझी 'एकेरी गाठ' ही कादंबरी मी एम्. एल्. ए. ना अर्पण केली होती. घटस्फोटाच्या कायद्यासाठी त्यांनी प्रयत्न करावा अशी माझी अपेक्षा होती. पुढे त्यासंबंधी कायदा पास झाला. तरी घटस्फोटासाठी लोकांची मानसिक तयारी नव्हती. पण कादंबरी वाचून काही लोकांनी घटस्फोट घेतले. हा या कादंबरीचा प्रत्यक्ष परिणाम होय. त्या काळात बुद्धिवादी लोकांनी बौद्धिक भुकेचे नवीन पिल्लू सोडले होते. अशा विवाहात मला फारसे तथ्य वाटत नाही म्हणून 'एकेरी गाठ'मध्ये मी त्याचीही चर्चा केली आहे.

भारतीय समाजजीवनाशी संबंधित कादंबऱ्या लिहीत असताना बाई भाषांतरित कादंबऱ्यांकडे कशा वळल्या याबद्दलही मला उत्सुकता होती. आजपर्यंत त्यांच्या १६१ कादंबऱ्या, ५२,५३ प्रकाशकांनी प्रकाशित केल्या आहेत. त्यांमध्ये अनेक स्वैर भाषांतरे आहेत. बाईंनी सांगितले, 'अंतरकरांना 'नवल'मध्ये रहस्यकथा हवी असे. माझे इंग्रजी चांगले होते म्हणून त्यांनी मला काही कादंबऱ्या दिल्या व भाषांतर करण्यास सांगितले. माझी भाषांतरे

त्यांना इतकी आवडली की त्यांनी दरमहा एक अशा वर्षातून अकरा कादंबऱ्या लिहिण्यास सांगितले. श्री. रांगणेकर स्वत: बरीच पुस्तके वाचून भाषांतरासाठी मला कादंबऱ्या निवडून देत असत. हे काम १९५६ पासून १९७४ पर्यंत सतत चालू होते. रांगणेकर गेल्यावर मात्र या कामातील नियमितपणा कमी होत गेला. कारण रांगणेकर गेल्यावर मी फार थकले. जीवनात दु:ख सोसूनही माझे मन मात्र कठोर झाले नाही, निर्ढावले नाही. मी दु:खात मिसळून गेले पण दु:खद कादंबऱ्या लिहिल्या नाहीत.'

बाईचं बोलणं मला मनोमन पटलं. त्यांच्या भाषांतरित कादंबऱ्यांतही त्यांची खास शैली असते. त्यांच्या भाषेतील सहज खेळकरपणा त्यांच्या वयावरही मात करताना दिसतो. वयाची ऐंशी वर्षे उलटल्यावरही त्यांच्या कादंबऱ्या प्रसिद्ध होत आहेत आणि त्यांचे हस्तलिखित त्या स्वहस्ते लिहितात याचं मला आश्चर्य वाटले. एवढे लेखन करीत असताना कुमुदिनीबाई कधी वाङ्मयीन वादामध्ये अडकल्या नाहीत. तसेच पुस्तकांना प्रस्तावना किंवा परीक्षणे लिहितानाही दिसल्या नाहीत. त्यावर कुमुदिनीबाई म्हणाल्या, 'माझं एक तत्त्व आहे. कोणालाही नावं ठेवायची नाहीत. त्यामुळे मी चालू घडामोडींविषयी काहीही लिहत नाही. लहानपणी मी काही कविता केल्या होत्या. त्यांचा दर्जा सामान्य असूनही थोर समाजसेविका शांताबाई कशाळकर यांनी माझे कौतुक केले आणि सांगितले, 'कुमुद, तु पुढे खूप मोठी हो आणि लहानांची पाठ थोपट.' त्यांच्याप्रमाणे अनेकांनी मला प्रोत्साहन दिले म्हणून मी कुणाला वाईट म्हणत नाही.' असे म्हणून त्यांनी जीवनाबद्दल समाधान व्यक्त केले.

**कमलाबाई टिळक :**

अगदी साध्या, नऊवारी पातळातल्या सुटसुटीत कमलाबाई, नवीन विचार, तरुण पिढी याबद्दल फार उत्साहाने बोलत होत्या. त्यांच्याकडे पाहिल्यावर त्या ऐंशीच्या घरातील असतील असे वाटलेही नाही. तसेच एवढं मनमोकळं बोलणाऱ्या या बाई पन्नास वर्षांपूर्वी इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका असतील हेही खरं वाटत नव्हतं. त्यांच्या मुलाखतीला औपचारिकपणा शिवलाच नाही.

१९२३ साली पुण्यातून २० मुली मॅट्रिक झाल्या. त्यामधील एका मुलीने संस्कृतची जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळविली. ती बुद्धिमान मुलगी म्हणजेच या कमलाबाई टिळक होत. मध्यमवर्गातील मुली उच्च शिक्षण घेत नसताना कमलाबाई कशा शिकल्या याचीही माहिती त्यांनी पुढे सांगितली. वास्तविक मुलींच्या लग्नाची त्याकाळी पालकांना घाई असे. आईवडिलांच्या मृत्यूनंतर

कमलाबाईंना आजीने मॅट्रिकपर्यंत शिकविले. अनेक विषयांत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्यामुळे कमलाबाईंना मॅट्रिकनंतर, अनेक शिष्यवृत्या मिळून महिना १०० रु. मिळत होते. तेव्हा मेव्हण्यांच्या प्रोत्साहनामुळे कमलाबाई पुढे शिकत गेल्या. १९२९ मध्ये इंग्रजी विषय घेऊन एम्. ए. झाल्या.

कमलाबाईंच्या काळात काही प्रेमविवाह गाजले होते. त्यामुळे कमलाबाईंच्या विवाहाबद्दल मनात उत्सुकता होती. कमलाबाई म्हणाल्या, ‘ त्या काळात सर्वसाधारणपणे मुलांशी संबंधच येत नसल्याने प्रेमविवाहाची संधीच तरुणांना मिळत नसे. कॉलेजात समवयस्क मुलगे व मुली एकमेकांना दादा व ताई असंच म्हणत असत. कमलाबाईसुद्धा श्री. टिळकांनी कॉलेजात असताना भाऊ म्हणत असत. त्यांचे लव्ह मॅरेज असूनही गाजले नव्हते. बाईंच्या मते ती एक बौद्धिक पातळीवरील तडजोड होती. दोघेही शिकलेले म्हणून जवळ आले होते.

शिकलेली सून म्हणून त्यांना सासरी त्रास झाला नाही. कारण लग्नानंतर टिळक पतिपत्नी बनारस विद्यापीठात नोकरीवर रुजू झाले होते. शिकलेल्या बाईकडे समाजाने नेहमी अचंब्याने पाहिले. शिक्षण हा अलंकार होता तेव्हा पुरुष शांत होता; पण शिकलेल्या बाईचे लग्न झाले, स्त्री बोलायला लागली तेव्हा प्रश्न निर्माण झाले.

कमलाबाईंचे शिक्षण पुण्यामध्ये झाले होते. पुण्यातील सुधारक वातावरण त्यांच्या परिचयाचे होते. कमलाबाईंच्या मते सुधारकांचा एक विशिष्ट श्रीमंत वर्ग होता. मध्यमवर्गीयांना त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटत असे. सामान्य लोक सनातनी होते. मेळ्यांमधून सुधारकांवर टीका होत असे. केस वाढवतो, सदरा घालून जेवायला बसतो. अशी चेष्टा होत असे. लोकांना कर्वे, आगरकर या सुधारकांबद्दल फारसे प्रेम नव्हते. पण टिळक म्हणजे पुणेकरांचे देवच! राजकारणात टिळकांचा आदर्श, तर सांस्कृतिक क्षेत्रात गंधर्व लोकप्रिय होते. तत्कालीन तरुण पिढी गडकऱ्यांच्या मोहात पडली होती अशी माहिती कमलाबाईंनी दिली.

रूढींनी सामान्य जीवन व्यापलं होतं. चालीरीतींमध्ये कसा बदल होत गेला ते कमलाबाई सांगत होत्या. रूढी बायकांना जाचक होत्या. सुशिक्षित स्त्रिया त्याविरुद्ध बोलू लागल्या तेव्हा सर्वसामान्य स्त्रीपुरुषांनी त्याला विरोध केला. ‘ मेळे पाहायला बायका माडीवर बसत. मंडपात येऊन बसत नसत. अशा या काळात रमाबाई रानड्यांनी सेवासदन सुरू केले होते. ’ असे कमलाबाई

सांगत होत्या तेव्हा त्यांच्या डोळ्यासमोर रमाबाई, त्यांचे सेवासदन, सारे उभे राहिले होते. सेवासदनात सुधारकाच्या मुली शिकायला जात तर हातातलं पुस्तक लपवून जात. नवऱ्याने प्रोत्साहन दिले तरच शिकत. 'रमाबाईंनी सेवासदन काढले. आता आम्हाला स्वयंपाकाला विधवा ब्राम्हण बाई कशी मिळणार?' अशी चर्चा तेव्हा होत असे.

समाजातील चालीरीती बदलत होत्या. एकंदर राहणी व पोशाखामध्ये लक्षात येण्याइतके बदल झाले. कमलाबाईंच्या मते श्रीमंत अशा डॉक्टर-वकील वर्गानंतर कारकून, शिक्षक हा मध्यमवर्ग फार उशिरा बदलला. त्याकाळी गरीब व श्रीमंत कुणी उघडच्या अंगाने जात नसत. सर्वजण शेले घेऊनच बाहेर पडत. महिला मंडळे, वाढदिवस, पाटर्या नव्हत्या म्हणून लग्नकार्याला लोक अगदी आवर्जून जात. वाड्यांमधून एकोपा होता. कार्याचे बोलावणे जेवायला, वाढायला या असेच असायचे. वेषभूषा, केशभूषेतही खूप फरक पडला. कमलाबाई सांगत होत्या की, पूर्वी खोपा घालत, मग तो खोपा पाडायचा. मग आंबाडा, नंतर चक्र आणि आता तर काय विचारूच नका! तेव्हा केस कानावर घेतले की 'परभासारखी छपंर उतरतात असे म्हणत'. त्याकाळी कपड्यांचे सुद्धा एवढे स्तोम नव्हते. कमलाबाईंसारख्या मध्यमवर्गीय घरांतून चॉकलेटी, बैंगणी रंगाची, टिकेकरवाडीची दोन लुगडी असत. ती पाण्यात घालूनच नेसायची. कोरं लुगडं नेसत नसत. पांढरी पातळं वेश्या नेसत असत.

कमलाबाईंनी डोळ्यांसमोर तत्कालीन पुणं उभं केल होतं. पुढे टिळक Oxford English Degree घ्यायला इंग्लंडला गेले. तेथून परत आल्यावर दोघांनीही बडोद्याला नोकरी धरली. कमलाबाईंनी कुटुंबासाठीच नोकरी धरली होती. बनारसला तेव्हा मुलींचंच कॉलेज असूनही वातावरण जुन्या वळणाचं होतं. कमलाबाई कॉलेजच्या प्राचार्या असताना बाबुराव पेंढारकर तेथे गेले होते. त्यांना मुलींच्या कॉलेजची, वसतिगृहाची फिल्म घ्यायची होती. परंतु मुली पडदाघरातून आल्या असल्यामुळे वॉर्डनने आणि पं. मालवीयजींनी मुलींची फिल्म घ्यायला स्पष्ट नकार दिला. असा तो काळ होता.

कमलाबाई ज्या वातावरणात वाढल्या, जिथे त्यांनी नोकरी केली त्या समाजप्रवृत्तींचे संस्कार आपल्यावर झाले असे त्या म्हणतात. कमलाबाई बनारसला असताना त्यांनी छोट्या गोष्टी लिहिल्या, त्या लोकांना आवडल्या. त्यांनी वैचारिक लेखनही थोडंफार केलं. पण कमलाबाईंच्या मते मराठी कादंबरीत गीता साने, मालतीबाई बेडेकर, कृष्णाबाई मोटे यांनी नवीन विचार पुढे आणले.

त्यापूर्वी अगदी सुरवातीला बायकांच्या हृदयात तळमळ होती. पण पुरुषी समाज, पुरुष-प्रकाशक यामुळे तिला दडपणाखाली लिहावे लागले, म्हणून प्रथम बायकांनी संकोचाने पुरुषी वळणाचे लिहिले.

स्त्रियांच्या लेखनाला नवीन लागले, हे सांगताना कमलाबाईंनी प्रथम पुरुषांच्या लेखनपद्धतीचा आढावा घेतला. हरिभाऊंनंतर फडके, माडखोलकर यांनी रोमँटिक लिहिले. केतकरांच्या कादंबऱ्यांची भाषा खडबडीत असली तरी बंडखोर विचारांमुळे बुद्धिवाद्यांमध्ये त्या कादंबऱ्या प्रिय होत्या. वा. म. जोशींनी रंगविलेले चित्र मराठी समाजात फारच कमी होते. मिल, स्पेन्सर वाचून रागिणी, उत्तरा समजून घेणारे अगदी तुरळक उच्चपदस्थ नोकरदार होते. स्त्रियांवर या पुरुषलेखकांचा परिणाम होत होता, असे सांगून कमलाबाईंनी तत्कालीन परिस्थितीमध्ये नवीन लेखनबीजे असल्याचे सांगितले. पहिल्या लढाईनंतर मुली रेशन ऑफिसमध्ये नोकरीला लागल्या. त्यांच्या पैशावर डोळा ठेवून त्यांची लग्ने लांबणीवर टाकली जात होती. त्यासंबंधी विभावरी प्रथम बोलल्या, त्यांचे कमलाबाईंना महत्त्व वाटते.

सर्वसाधारण आयुष्याबद्दल समाधानक व्यक्त करणाऱ्या कमलाबाईंना कथा हाच वाङ्मयप्रकार अधिक आवडतो. एकंदरीत नवीन विचार, तरुण पिढी याबद्दल बाई उत्साहानं बोलत होत्या. स्त्री-शिक्षण, स्त्री-जीवन आणि स्त्रीकडे पाहण्याची समाजप्रवृत्ती याबद्दल त्यांनी फार खोलवर विचार केल्याचे त्यांच्या मुलाखतीमधून प्रत्ययास आले.

●●●

# लेखिकांच्या कादंबऱ्यांची सूची

१. आनन्दकर, पिरोजबाई
**'माझे बाळ ते!'** महाराष्ट्र कुटुंबमाला नं.९, विठ्ठल रामचंद्र खाडिलकर, श्रीगणेश, पुणे १९२७.

२. आंबेगावकर, इंदिराबाई
**'उजळलेला हिरा!'** मनोरमा ग्रंथमाला नं.९, वामन पांडुरंग केळकर, राजगुरु, पुणे १९३१.

३. आळंदकर, शशिकला
**'सीमा'** महाराष्ट्र ग्रंथ भांडार, न्यू भारत, मुंबई, १९४३.

४. ऐतिवडेकर, माई
**'जीवनसाथी'** (साहा. म. त्रि. सहस्रबुद्धे) अभिनव प्रकाशन, आर्यभानु. श्री. सिद्धेश्वर, कोल्हापूर १९५०

५. कंटक, प्रेमा.
**'अग्नियान'**, कोल्हापूर महाराष्ट्र ग्रंथ भांडार. कोल्हापूर १९४२.

६. उ. नि.
**'काम आणि कामिनी'** श्री ज्ञानेश्वर, कोल्हापूर १९३७.

७. कानिटकर, काशीबाई,
**'पालखीचा गोंडा'**, साहित्यसेवक, पुणे १९२८.

८. उ. नि.
**'रंगराव'** ज्ञानचक्षू. पुणे १९०३.

९. गाडगीळ, सिंधू.
**'क्षितिजापार'** मोरारजी पद्मसी. पद्म प्रकाशन. रामकृष्ण, मुंबई १९४९.

१०. जयवंत, आनंदीबाई.
**'ऊर्मिला'**, य. गो. जोशी, जनार्दन सदाशिव, पुणे १९३८.

११. उ. नि.
**'कुलकथा'** शं. न. जोशी. चित्रशाळा, पुणे १९३२.
१२. उ. नि.
**'जगाशी बंडखोरी'** वि. ग. ताम्हनकर. विजय, पुणे १९३५.
१३. जोशी, दुर्गाबाई
**'पागलखाना'** रामभाऊ भोगे. प्रकाश मंडळ, नागपूर १९४१.
१४. उ. नि.
**'सातपुड्यातील वनलक्ष्मी'** अकोला, १९४३.
१५. तांबवेकर, साळूबाई भाऊसाहेब
**'चंद्रप्रभा विरहवर्णन'** विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांचा छापखाना, पुणे १८७३.
१६. उ.नि.
**'हिंदुस्थानातील तारा'** जगद्धितेच्छु, पुणे शके १८१६.
१७. तुळपुळे, शालिनी,
**'लपलेले गुन्हेगार'**,शालिनी साहित्य प्रकाशन, ज्ञानविलास, पुणे १९४१.
१८. दांडेकर, मालती
**'कांटेरी मार्ग'** कुलकर्णी ग्रंथागार, पेपर ॲन्ड पल्प कन्व्हर्शन छा., पुणे १९४८.
१९. उ.नि.
**'कृष्णरजनी'** बुधगाव, महादेव लक्ष्मण दांडेकर, रामेश्वर, पुणे १९४७.
२०. उ.नि.
**'मातृमंदिर'**, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, श्री सिद्धेश्वर कोल्हापूर, १९४१.
२१. उ.नि.
**'वज्रलेख'** देशमुख आणि कंपनी, अग्रणी, पुणे १९४६.
२२. उ.नि.
**'हिरा आणि गारगोटी'** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९५०.
२३. दाभोळकर, सरस्वतीबाई
**'हृदयाचे कढ'**, जगन्नाथ शंकर प्रभुणे, विजय, पुणे, १९३९.
२४. दीक्षित, लीला
**'मधुबोल'** वीणा प्रकाशन, नागपूर, १९४९.

२५. देशमुख, लीला
'**दूर कुठेतरी**' नागपूर प्रकाशन, रामेश्वर, नागपूर १९४८.
२६. उ.नि.
'**दोन घडीचा डाव**' नागपूर प्रकाशन, रामेश्वर, नागपूर, १९४५.
२७. उ.नि.
'**पूर्वेचा वारा**' कुलकर्णी ग्रंथागार, ज्ञानविलास, पुणे, १९४८.
२८. उ.नि.
'**वीणा**' नागपूर प्रकाशन, नागपूर १९४३.
२९. देसाई, जानकीबाई
'**अघोर पातक**' दत्तात्रय गोविंद सडेकर, खानापूर, १९२४.
३०. उ.नि.
'**गृहलक्ष्मी**' तात्या नेमिनाथ पांगळ, सरस वाङ्मय रत्नमाला नं. ५, पुणे १९१५.
३१. उ.नि.
'**पातिव्रत्याची कसोटी**' तात्या नेमिनाथ पांगळ, जगत्हितेच्छु सरस वाङ्मय रत्नमाला, पुणे १९१९
३२. उ.नि.
'**प्रेमळ सवत**' तात्या नेमिनाथ पांगळ, जगद्हितेच्छु सरस वाङ्मय रत्नमाला, पुणे १९१७.
३३. उ.नि.
'**मूकनायिका**' तात्या नेमिनाथ पांगळ, सरस वाङ्मय रत्नमाला नं. ५६, पुणे १९२५.
३४. उ.नि.
'**सौभाग्यतिलक**' सरस वाङ्मय रत्नमाला नं.२२, पुणे १९१८.
३५. नाशिककर, शांता
'**कीर्ती**' हिरजी मोहनजी, राष्ट्रवैभव, मुंबई १९४२.
३६. उ.नि.
'**चिखलातले कमळ**' ना.ल.कोकाटे, हनुमान, पुणे १९३९.
३७. उ.नि.
'**पुसलेल्या रांगोळ्या**' केशव भिकाजी ढवळे, वैभव, मुंबई १९४७.

३८. उ.नि.
**'माझी कोरीव लेणी'** किर्लोस्कर छापखाना, किर्लोस्करवाडी, १९४०.

३९. उ.नि.
**'लग्नाचा बाजार'** वसंत बळवंत मराठे, रा. महिला विजय ग्रंथमाला, मुंबई १९२९.

४०. उ.नि.
**'हाच का धर्म ?'** गो.गो. अधिकारी, मनोरमा ग्रंथमाला नं.१, पुणे १९३०.

४१. निमकर, मनोरमा
**'अखेरची लाट'**, मनोरमा निमकर, मुंबई १९५०.

४२. परांजपे, शकुंतला
**'घराचा मालक'**, देशमुख आणि कं., पुणे १९४८.

४३. पंडित, गोदावरीबाई
**'प्रीतीचा मोबदला अथवा पुष्पगुच्छ आणि वनमाला'** उपयुक्त ग्रंथप्रसारक मंडळी, मुंबई, १८९०.

४४. पेंडसे, इंदिरा
**'ललिता'** य. गो. जोशी, पुणे १९३७.

४५. प्रभावळकर, कुमुदिनी
**'अनियमित जग'** प्रभाकर श्रीपाद कोल्हटकर, मौज प्रकाशन, मुंबई १९३४.

४६. उ.नि.
**'एकेरी गाठ'** मं. ना. कुलकर्णी, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, १९३७.

४७. उ.नि.
**'कर्तव्याची जाणीव'** म. ना. कुलकर्णी, मुंबई १९३२.

४८. उ.नि.
**'कल्पना'** वि. ग. ताम्हनकर, पुणे १९३८.

४९. उ.नि.
**'कुस्करलेले ह्रदय'** वि. रा. खाडिलकर, कोल्हापूर १९३८.

५०. उ.नि.
**'बेसूर संगीत'**, सुशीला कुलकर्णी, कोल्हापूर १९३८.

५१. उ.नि.
**'निर्माल्यातील कळी'**, सुदाम शांताराम मांजरेकर, मुंबई १९३५.

५२. उ.नि.
**'रस्सीखेच'** वि. ग. ताम्हनकर, पुणे १९३९.

५३. उ.नि.
**'विरलेले वस्त्र'** बकुल प्रकाशन, मुंबई १९४०.

५४. उ.नि.
**'शकुनी मोहर'** अनंत सखाराम गोखले, विजय, पुणे १९३२.

५५. बंबेवाले, कमला
**'बंधमुक्ता'** गो. गो. अधिकारी, मुंबई १९३०.

५६. बाबर, सरोजिनी
**'अजिता'** ग्रामीण प्रकाशन संस्था, पुणे १९४९.

५७. उ.नि.
**'कमळाचं जाळं'** उषा जोशी, न्यू बुक एजन्सी, निर्मल साहित्य, पुणे १९४६.

५८. उ.नि.
**'तू भेटायला नको होतास'** राजेंद्र रावजी शहा, प्रफुल्ल सुरस ग्रंथमाला, ८९. पुणे १९५०.

५९. भट, यशोदाबाई
**'मुलांचे बंड अथवा प्रतिज्ञाभंग'** सरस वाङ्मय रत्नमाला नं. ३६, पुणे १९२१.

६०. मंत्री, उषा
**'निष्पाप व्यभिचार'** चंद्रिका प्रकाशन, पुणे १९४४.

६१. मुळगावकर, नलिनी
**'तृष्णा'** बा. द. सातोस्कर, सागर साहित्य मुंबई १९४२.

६२. मोटे, कृष्णाबाई
**'मीनाक्षीचे जीवन'** पुस्तक पहिले, देशमुख आणि कंपनी, न्यू भारत, मुंबई १९४३.

६३. शांता, रमण
**'नाही'** शामराव परशुराम नवरे, राजापूर १९३२.

६४. शिरूरकर, विभावरी
**'बळी'** देशमुख आणि कंपनी, पुणे १९४९.

६५. उ.नि.
**'विरलेले स्वप्न'** ह. वि. मोटे, मुंबई १९३५.

६६. उ.नि.
**'हिंदोळ्यावर'** ह. वि. मोटे, मुंबई १९३४.

६७. शेळके, शांता
**'ओढ'** कॉन्टिनेन्टल बुक सर्व्हिस, पुणे १९५०.

६८. शेळके, शांता
**'कोजागिरी'** धरित्री प्रकाशन, नाशिक १९४७.

६९. उ.नि.
**'भूवरील स्वर्ग'** बा. द. खडपे – निलिमा, मुंबई १९४८.

७०. उ.नि.
**'विझती ज्योत'** कुलकर्णी ग्रंथागार, पुणे १९४६.

७१. उ.नि.
**'सुखाची सीमा'** अभिनव प्रकाशन, मुंबई १९५०.

७२. उ.नि.
**'स्वप्नतरंग'** जनार्दन गणेश जोशी, पुणे १९४५.

७३. सरदार, शीला
**'भावनेच्या भोवऱ्यात'** महाराष्ट्र ग्रंथ भांडार, सागर साहित्य, मुंबई.

७४. सहस्रबुद्धे, इंदिरा
**'बाळूताई धडा घे'** महिला विजय ग्रंथमाला नं.३. वसंत बळवंत मराठे, मुंबई १९३१.

७५. साठे, सुधा
**'पुसलेली चित्रे'** वि. द. दामले, पुणे १९४७.

७६. साने, गीता जनार्दन
**'आविष्कार'** वीणा प्रकाशन, नागपूर १९३४.

७७. उ.नि.
**'धुके आणि दहिवर'** कुसुम कुलकर्णी, अरुण साहित्य, न्यू भारत, मुंबई १९४२.

७८. उ.नि.
'**निखळलेली हिरकणी**' गो. गो. अधिकारी, मुंबई १९३६.
७९. उ.नि.
'**फेरीवाला**' कृ.ना. सापळे, मुंबई १९३८.
८०. उ.नि.
'**माळरानात**' महाराष्ट्र ग्रंथ भांडार, श्री ज्ञानेश्वर, कोल्हापूर १९४१.
८१. उ.नि.
'**लतिका**' गो. गो. अधिकारी, न्यू भारत, मुंबई १९३७.
८२. उ.नि.
'**वठलेला वृक्ष**' गो. गो. अधिकारी, मुंबई १९३६.
८३. उ.नि.
'**हिरवळीखाली**' गो. गो. अधिकारी, मुंबई, १९३६.
८४. सोहनी, कमला
'**वादळापूर्वी**' गो. गो. अधिकारी, पुणे १९३७.
८५. हरिपूरकर, इंदिरा
'**दैवलीला**' प्र.श्री. भसे, मुंबई प्र.आ. १९११. द्वितीय आ. १९१५.

## संदर्भ ग्रंथ

१. अनंतराम, शरयू
'**समाजशास्त्र**' प्राची प्रकाशन, मुंबई १९८२.
२. अवचट, अनिल
'**संभ्रम**' अमेय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती डिसेंबर, १९८०.
३. कर्णिक, द्वा. भ.
'**विभावरीचे टीकाकार**', बकुल प्रकाशन, २६.१.१९४९. नाडकर्णी, ब्र.मु.(संपा) 'प्र.आ.' मुंबई.
४. कऱ्हाडकर, के.सी.
'**बाबा पद्मनजी काल व कर्तृत्व**' 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई १९७९.

५. कवठेकर, बालकृष्ण
**'प्रतिसाद'** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च १९८५.

६. उ.नि.
**'दलितसाहित्य': एक आकलन'** अजब पुस्तकालय, कोल्हापूर, जानेवारी, १९८१.

७. कर्वे, इरावती
**'मराठी लोकांची संस्कृति'** देशमुख, रा. ज. आणि कंपनी, पुणे १९५१.

८. कानिटकर काशीबाई
**'आत्मचरित्र आणि चरित्र'** (१८६१-१९४८) संपादन व लेखन सरोजिनी वैद्य, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई ४०००३४, प्र. आ. १९८० / १९८२.

९. कीर, धनंजय
**'महात्मा ज्योतीराव फुले'**
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र. आ. १९६८.

१०. कुरूंदकर, नरहर
**'अभयारण्य'** साहित्य प्रकाशन, शास्त्रीनगर, नांदेड २, १ मे, १९८५.

११. उ.नि.
**'धार आणि काठ'** देशमुख आणि कंपनी, पुणे १९७१.

१२. कुंभोजकर, ललिता
**'दलित कविता : एक दर्शन'** प्रतिमा प्रकाशन, पुणे, ६.२.८४.

१३. कुलकर्णी, श्री.मा.
**'कादंबरी समीक्षा'** उन्मेष प्रकाशन, नागपूर १९७२.

१४. कुलकर्णी गो. म.
**'वाटा आणि वळणे'** नवसाहित्य प्रकाशन, बेळगाव, १९७५.

१५. कुलकर्णी, गो. म. (संपा)
**'अभिरुची ग्रामीण व नागर'** अ. भा. मराठी साहित्य संमेलन अधिवेशन, ५१ वे, कऱ्हाड.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३५२४
निबंध
क्र. २९९६६
9/3/93
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

१६. कुलकर्णी, भीमराव (संपा)
'**अस्मिता महाराष्ट्राची**' रौप्यमहोत्सवी ग्रंथ, मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, नोव्हें. १९७१.

१७. कुलकर्णी वा. ल.
'**हरिभाऊंची सामाजिक कादंबरी**' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७३.

१८. कुलकर्णी वि. ह. आणि इतर (संपा.)
'**प्रदक्षिणा**' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७२.

१९. कुलकर्णी वि. स., देशपांडे कृ. पं.
'**खांडेकरांचे समाजचिंतन**' चारुदत्त प्रकाशन, पुणे, जानेवारी १९७९.

२०. केतकर, श्रीधर व्यंकटेश
'**भारतीय समाजशास्त्र**' सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड, नागपूर, १९३६.

२१. केतकर, शीलवती
'**मीच हे सांगितलं पाहिजे**' ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई १० एप्रिल, १९६९, प्र. आ.

२२. गर्गे, स.मा. (संपा)
'**भारतीय समाजविज्ञान कोष**' संचालक - समाजविज्ञान मंडळ, पुणे १९८६.

२३. गाडगीळ, गंगाधर
'**खडक आणि पाणी**' उत्कर्ष प्रकाशन, पुणे ३०, डिसेंबर १९६०, प्र. आ.

२४. उ.नि.
'**पाण्यावरची अक्षरे**' सुविचार प्रकाशन मंडळ, प्रकाशक श्यामकांत बनहट्टी, पुणे आणि धंतोली, नागपूर ४४००१२, ३.७.१९७८.

२५. गोसावी मो.स.
'**प्रा. गं. बा. सरदार : प्रबोधनाचे प्रवक्ते**' गोखले एज्युकेशन सोसायटी, नासिक, १९८६.

२६. जयवंत, कुसुम, देशपांडे आ. रा.
'**कुसुमानिल**' ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई १९७२.

२७. जावडेकर, शं.दा.
**'आधुनिक भारत'** रघुनाथ गणेश जोशी, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, प्र. आ. १९३८.

२८. उ.नि.
**'गांधीवाद'** वाद विवेचन माला, प्रकाशक य. गो. जोशी, पुणे १९४१.

२९. जोग, रा. श्री.
**'मराठी वाङ्मयाचा इतिहास'** खंड चौथा. इ.स. १८०० ते १८७४ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ पुरस्कृत. प्रकाशक डॉ. भीमराव कुलकर्णी, कार्यवाह, म. सा. प. पुणे ३०, प्र. आ. १९६५, दु. आ. १९७३.

३०. जोशी, यशोदाबाई
**'आमचा जीवनप्रवास'** प्रकाशक श्रीमती माणिकबाई भिडे, कँप, अमरावती, जानेवारी १९६५.

३१. जोशी, श्री. ज.
**'पुणेरी'** श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९७८.

३२. टिळक, लक्ष्मीबाई
**'स्मृतिचित्रे'** भाग १, २, ३, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, प्रथमावृत्ती १९३५. पुनर्मुद्रण १९५२.

३३. ठिपसे, प्रतिमा
**'हृद्गत'** रामचंद्र धोंडो दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे १९८१.

३४. दातार, छाया
**'स्त्री-पुरुष'** ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, मुंबई १९८४.

३५. देशपांडे, अ. ना.
**'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास'** भाग १, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९५४, भाग २ – व्हीनस प्रकाशन, पुणे, १९५८.

३६. देशपांडे, कमलाबाई
**'स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल'** (१८२९-१९२९), मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, मनोहर माधव केळकर, पुणे, १९६०.

३७. देशपांडे, कुसुमावती
**'मराठी कादंबरी - पहिले शतक'** (१८५० ते १९५०) मुंबई मराठी साहित्य संघ, १९५३.

३८. देशपांडे, मु.गो., धर्माधिकारी, भाऊ (संपा)
'**गांधीजींचा स्त्रियांशी हितगुज**' धर्माधिकारी सदाशिव जगन्नाथ, कोल्हापूर. द्. आ. १९४६.

३९. देसाई, मृणालिनी
'**निशिगंध**' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८

४०. नाडगोंडे, गुरुनाथ
'**समाजशास्त्राची मूलतत्त्वे**' कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्र. आ. १९८०.

४१. पवार, गो. मा., हातकणंगलेकर म. द. (संपा)
'**मराठी साहित्य - प्रेरणा व स्वरूप**' (१९५०-१९७५) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - १९८६ / १९०७ प्र. आ.

४२. परांजपे, कल्पना
'**मराठी सामाजिक नाटक आणि स्त्री-समस्या**' गंधर्ववेद प्रकाशन, पुणे १९८४.

४३. पंडित, नलिनी
'**जातिवाद व वर्गवाद**', साधना प्रकाशन, पुणे ३०.

४४. पंडित, भ. श्री.
'**महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे**' पुणे विद्यापीठ प्रकाशन. पुणे १९६०.

४५. पानतावणे, गंगाधर
'**मूल्यवेध**' अस्मिता प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. जून १९७४.

४६. उ.नि.
'**वादळाचे वंशज**' प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९६९.

४७. पाध्ये, प्रभाकर, टिकेकर, ग.रा.
'**आजकालचा महाराष्ट्र**' भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई १९३५.

४८. पुण्डे, दत्तात्रय (संपा.)
'**वाङ्मयेतिहासाची संकल्पना**', प्रकाशक-अरुण पारगावकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे २८-२-८६.

४९. फडके, भालचंद्र
'**मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन**' श्री विद्या प्रकाशन, पुणे ३० मार्च १९८०.

५०. फडके, ना.सी.
**'अल्ला हो अकबर'** (प्रस्तावना), पंडित अनंत कुलकर्णी, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, ऑगस्ट, १९७६.

५१. फडके, य.दि.
**'काल आणि कर्तृत्व'** श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७३.

५२. फडकुले, निर्मलकुमार
**'लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व'** कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे,१९७३

५३. बाबर, सरोजिनी
**'वनिता सारस्वत'**, समाज शिक्षण प्रकाशन, पुणे १९६१.

५४. बांदिवडेकर, चंद्रकांत
**'मराठी कादंबरी : चिंतन आणि समीक्षा'** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८३.

५५. बेडेकर, मालती
**'मनस्विनीचे चिंतन'** किर्लोस्कर प्रेस प्रकाशन, पुणे ९. १९६९.

५६. भणगे, भालचंद्र शंकर (संपा.)
**'साहित्यविचार आणि समाजचिंतन'** गं.बा.सरदार षष्ठ्यब्दीपूर्ती गौरवग्रंथ, ओरिएंट लाँगमन्स लिमिटेड, मुंबई ३१, १९६८.

५७. भालेराव, विमल
**'आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे - एक अभ्यास'** (१९१० ते १९७५) साहित्य प्रसार केंद्र,नागपूर १९८६.

५८. भावे, पु.भा.
**'प्रथमपुरुषी एकवचनी'** खंड २, आनंद अंतरकर, विश्वमोहिनी, पुणे ४, १९८३.

५९. माटे, श्री.म.
**'अस्पृश्यांचा प्रश्न'** मुद्रक व प्रकाशक शंकर रामचंद्र दाते, लोकसंग्रह छापखाना, पुणे १९३३.

६०. मालशे, स.गं.,आपटे, नं.दा.
**'विधवाविवाह चळवळ'** स्त्री संशोधन केंद्र, श्री.ना.दा.ठा.महिला विद्यापीठ, मुंबई, सप्टें. १९७८.

६१. मुणगेकर, श्री.ग.(संपा.)
**'परिवर्तनाचे प्रकार,'** महाराष्ट्र १९३२ ते १९८१ 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १ जानेवारी १९८२.

६२. मुक्तिबोध, शरश्चंद्र
**'काही निबंध'** दिगंबर मारुती धुमाळ, नागपूर प्रकाशन, नागपूर, १९६३.

६३. उ.नि.
**'जीवन आणि साहित्य'** अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७२.

६४. उ.नि.
**'सृष्टिसौंदर्य आणि साहित्यमूल्य'** आर. जी. देसाई, लोकवाङ्मय गृह प्रा. लि. मुंबई (१९७८)

६५. रेगे, पु. शि. (संपा.)
**'एका पिढीचे आत्मकथन १९७५'**, मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई १९७५

६६. रेळे, लीला मस्तकार
**'कल्लोळ'** (आत्मवृत्त), श्री विद्या प्रकाशन, पुणे १९८६.

६७. लिमये, अनसूया
**'स्त्रीचे समाजातील स्थान आणि भूमिका'** समाजवादी महिला सभा, पुणे.

६८. वैद्य, सरोजिनी
**'संक्रमण'** श्री विद्या प्रकाशन, पुणे १९८५.

६९. शिरवाडकर, वि.वा.
**'रूपरेषा'** (संपा.), सुभाष सोनावणे, चेतश्री प्रकाशन, अंमळनेर, मार्च १९८४.

७०. शिरूरकर, विभावरी
**'कळ्यांचे निःश्वास'** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७६, दु.आ.

७१. शिंदे, ताराबाई
**'स्त्री-पुरुष तुलना'** मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर, मुंबई, १९७५.

७२. शेणोलीकर ह.श्री. व देशपांडे, प्र.न.(संपा.)
**'महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास'**, मोघे प्रकाशन, ति.आ. कोल्हापूर १९७२.

७३. सरदार, गं.बा.
'**आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार**' व्हीनस प्रकाशन, पुणे १९७५.

७४. उ.नि.
'**महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार**' दिनकर गांगल, ग्रंथाली अभिनव वाचक चळवळ, मुंबई - प्र.आ. १९८१, दु.आ.१९८२

७५. उ.नि.
'**महाराष्ट्र जीवनपरंपरा, प्रगति आणि समस्या**' खंड १, २. मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे १९६०.

७६. सहस्रबुद्धे, पु.ग.
'**महाराष्ट्र संस्कृती**' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९७९.

७७. सहस्रबुद्धे, पु.ग.(संपा.)
'**लोकहितवादींची शतपत्रे**' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २, तृ.आ. १९६३.

७८. संत, दु.का.
'**मराठी स्त्री**' मोघे दा.ना., कोल्हापूर, एप्रिल, १९५७.

79 Edwin SELIGMAN,
Encylopaedia of The Social Science Volume III & IV, Macmillan Company, New York 1957, 12th Printing.

80 Theodorson George A, Theodorson A, Chilles G.,
A modern Dictonary of Sociology, Barnes of Noble Books. A Division of Harper of Row Publishers. New York, Sanfrancisco, London, 1979.

81 Dhurjali Prasad Mukerji,
Sociology of Indian Culture, Rawal Publication, Jaipur, 1979 Reprinted.

82 P.M.C.C.Miller and M.J.Wilson.
A dictionary of Social Science Method. John Wiley and Sons. Chichester. New York, Brisbane, Toronto, Singapur, printed March 1984.

83 Sinha Raghuvir,
Social Change in Indian Society, Naurang Rai, Concept Publishing Society, Delhi. 1978 First Edition.

## मराठी नियतकालिकांची सूची, १८०० - १९५०

०१. अदवंत, म.ना.
**मराठी साहित्य पत्रिका** (२)२०-३०, डिसें. १९४७ पृ. ६०-६२

०२. अळेकर, ना.रं.
'हिंदोळ्यावर' कादंबरीकार लेखमाला - (विवाह-विच्छेद ऊर्फ घटस्फोट) **विश्ववाणी** ३-११ जुलै १९३५, पृ. ६६ - ७७.

०३. कालेलकर, काका
'त्यक्तधवेची दुःखे' (हिंदोळ्यावर संबद्ध पत्र) **विहंगम** ४ - ५मार्च १९३७ पृ. १७ - २०.

०४. काळे, के.नारायण.
'हिंदोळ्यावर', **प्रतिमा** २-१४ जुलै १९३४ पृ. ११-१७, २-१६ ऑक्टोबर १९३४, पृ.२६-३१, २-१७ सप्टेंबर १९३४ पृ. १९-१९

०५. काळे, चिं.य.
'फेरीवाला' **मसाप** (२) १२-२ माघ शके १८६० पृ. ५३-५५

०६. केतकर, श्री.व्यं.
'हिंदोळ्यावरील विचार', **प्रतिभा** २-१६ ऑक्टोबर १९३४, पृ.१-४.

०७. खरे, बाळूताई
'लग्नाचा बाजार', **अरुणमाला** ५-२ ऑक्टोबर १९२९. पृ. १५-१९.

०८. खांबेटे,महादेव लक्ष्मण
'केवळ विश्रांतीसाठी' **मासिक मनोरंजन** ३ सप्टें. १९२७ पृ. ८७-९०.

०९. गायतोंडे, गणपति शिवराम
'हिंदोळ्यावर' **पारिजात** १-१० अश्विन १९३४ पृ.५३-५७

१०. चितळे, शारदाबाई
बंधमुक्ता - घटस्फोट (पुप संदर्भ : लक्ष्मीबाई प्रधान 'बंधमुक्ता' स्त्री मासिक १९३१) **स्त्री** १ - ९ एप्रिल १९३१ पृ. ८२-८३.

११. टिळक, कमला
'मीनाक्षीचे जीवन', **अभिरुचि:** १-२ मार्च १९४३ पृ. २९-३३.

१२. डांगे, चंद्रकुमार
'कमळाचं जाळं' (पुप) **मसाप** (२) सप्टें १९४७ पृ.४१.

१३. तळवळकर, गोपीनाथ
'चिखलातले कमळ', **मनोहर** ६-७ जाने. १९४० पृ. ६१-६२.

१४. देव, बा.ना.
रंगराव, **विविधज्ञानविस्तार** ३५-२ फेब्रु. १९०४ पृ. ४३-६०.

१५. धर्माधिकारी, तारा
गीता साने बंडखोर साहित्य कर्तृत्व, **युगवाणी** दिवाळी ८४, पृ.८३.

१६. नातू, रा.रा.
'ओढ', **अभिरुचि** ८-(१-२)फेब्रु-मार्च १९५० पृ.५३-५५, 'माझी कोरीव लेणी' **वाङ्मयशोभा** २-७, नोव्हें. १९४० पृ.२०१.

१७. निरंतन, गं.भा.
'शिकार' **मसाप** (२) १७-४ अश्विन शके १८६६ पृ.२०२-०४.

१८. नेरूरकर, विठ्ठल कृष्ण
लग्नाचा बाजार, **मासिक मनोरंजन** २ फेब्रु. १९३० पृ. १८-२४.

१९. परांजपे, शकुन्तला
'आविष्कार' (पु.प.) **समाजस्वास्थ्य** १३-२ ऑक्टो. १९३९, पृ. ४५-४७.

२०. पावडे, कुमुद
**अस्मितादर्श** एप्रि-मे-जून १९८० पृ. २४.

२१. पेंढारकर, य. दि.
'माझे बाळ तें!' (पु. प.) **गृहलक्ष्मी** नोव्हें-डिसें १९२८, पृ. ३९-४२.

२२. पेंढारकर, य. दि.
'ओढ' (पु. प.) **मसाप** (२) २३-१ जू. १९५० पृ. ३६-३९.

२३ पेंढारकर, य. दि.
'बळी' (पुप) **मसाप** (२) २३-१ जून १९५० पृ. ३६-३९.

२४. प्रधान, लक्ष्मीबाई
'बाळूताई धडा घे' (पुप) **मासिक मनोरंजन** ३७ पू. डिसें. १९३१ पृ. ६८-७२.

३८. सरदार, गं. बा.
**'अध्यक्षीय भाषण-** मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन-अधिवेशन २१ वे' २५ ऑक्टो. १९७५, मुंबई ४.

३९. सा. वि. द.
'अनियमित जग' (पुप) **प्रतिमा** मुंबई २-२३ नोव्हें. १९३४ पृ. १६-१७.

४०. स्वरमंडळी, नारायण रामचंद्र
'लग्नाचा बाजार' (पुप) **मधुकर** (२) अश्विन शके १८५१ पृ. २९-३२.

४१. सुधा
मालतीबाई दांडेकर यांची दोन पुस्तके पैकी 'वज्रलेख' कादंबरीवरील मतप्रदर्शन, **स्त्री** ऑक्टो. १९४७ पृ. ५१-५२.

४२. सुरूचिप्रिय
'बेसूर संगीत' (पुप) **मनोहर** सप्टें १९३९ पृ. ५१-५२.

४३. हिर्लेकर, यमुनाबाई
'लग्नाचा बाजार' (पुप) **गृहलक्ष्मी** जुलै १९२९ पृ. ३३-३५.

४४. हुदलीकर, सुलोचना
'लग्नाचा बाजार' (पुप) **मनोरमा** ऑक्टो. १९२९ पृ. ३५-३९.

४५. हुदलीकर, सुलोचना
'हाच का धर्म?' (पुप) **मनोरमा** ऑक्टो. १९३० पृ. १५-१८.

४६. क्षीरसागर, श्री. के.
'पुसलेली चित्रे' (पुप) **वसंत** ३ मे १९४९ पृ. १७-१९.

• • •

REFBK-0026869

मराठी ... वाचनालय ठाणे
ग्रं. क्र. २६८६९
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)



डॉ. विद्या देवधर या मुंबई व उस्मानिया विद्यापीठाच्या (हैदराबाद) पदवीधर आहेत. हैदराबादच्या त्या रहिवासी. पंचधारा त्रैमासिकाचे संपादक मंडळ, मराठी साहित्य परिषद, महाराष्ट्र मंडळ; स्त्री-सखी मंडळ, इत्यादी संस्थांच्या त्या सभासद आहेत. राष्ट्रसेविका समितीच्याही त्या सक्रिय कार्यकर्त्या आहेत. हैदराबाद आकाशवाणीच्या निवेदिका व मराठी कार्यक्रमात सहभाग, दूरदर्शनसाठी दोन मालिकांचे लेखन, तसेच मराठीतील दैनिके, महत्त्वाची नियतकालिके, हिंदीतील मिलाप, सियासतमध्ये नियमित लेखन असे चौफेर प्रसन्न व्यक्तिमत्त्व लाभलेल्या या लेखिका आहेत. इलेक्ट्रॉनिक्स व्यवसायातील मार्केटिंग क्षेत्रातील हैदराबादमधील त्या पहिल्या महिला आहेत. त्यांचे वडील कै. मधुकरराव महाजन यांच्या सामाजिक व राष्ट्रीय विचारांचा वारसा पुढे चालविण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला आहे.

**स्त्रीलिखित कादंबऱ्या: प्रेरणा आणि प्रवृत्ती** या प्रस्तुत ग्रंथात डॉ. विद्या देवधर यांनी लेखिकांच्या कादंबऱ्यांतील समाजप्रवृत्ती तपासत असताना मालतीबाई बेडेकर, कुमुदिनी रांगणेकर, कै. कमलाबाई टिळक यांच्या त्यांनी प्रदीर्घ मुलाखती घेतल्या. या मुलाखती या ग्रंथाचे महत्त्वाचे अंग आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून भारतातील राजकीय आणि सामाजिक जीवन बदलत गेले. पुरुषांच्या प्रेरणेने त्या काळात स्त्रियाही तुरळकपणे लिहू लागल्या होत्या. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, संमतीवय, स्त्रीचे अर्थार्जन, स्त्री-स्वातंत्र्य, विभक्त कुटुंबपद्धती हे विषय त्यानंतरच्या काळात वैचारिक व ललितवाङ्मयातून डोकावू लागले. आपल्या जीवनातील या महत्त्वाच्या घडामोडींकडे बघण्याचा त्या लेखिकांचा काही वेगळा दृष्टिकोन होता का, सुधारक विचारांचे वारे सामान्य स्त्रीला कितपत मानवले, नवशिक्षित स्त्रीच्या म्हणून काही वेगळ्या समस्या होत्या का, या जिज्ञासेतून तत्कालीन समाजप्रवृत्ती व स्त्री-साहित्य याचा एक आलेख प्रस्तुत ग्रंथात मांडला आहे. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या जिज्ञासू वाचकांना या ग्रंथातून अनेक प्रश्न उपस्थित होतील, हेच या ग्रंथाचे यश आहे.